म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १३६५

निबंध
झिम झिम
ले. वि. स. खांडेकर

REFBK-0011536

# झिम झिम

वि. स. खांडेकर

किंमत पांच रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0011536

# झमझिम

वि. स. खांडेकर

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी,
७३९, बुधवार, पुणे २

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

चित्र
दीनानाथ दलाल

किंमत पांच रुपये

प्रथमावृत्ति नोव्हेंबर १९६१

मुद्रक
मा. ह. पटवर्धन,
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण, पुणे २

श्री. मेघश्याम शिरोडकर

व

सौ. सुशीलावहिनी शिरोडकर

यांस

# दोन शब्द

'झिम झिम' हा माझा दहावा लघुनिबन्ध-संग्रह. या संग्रहांतलें बहुतेक लिखाण 'मंझधार' च्या काळांतच (१९४८ ते १९५९) झालें. 'मंझधार' मधली पंगत तशी कांही लहान नव्हती. तरी हाताशीं असलेल्या सर्व लघुनिबंधांचा तिच्यांत समावेश होईना ! म्हणून कांही निबन्ध मागें ठेवावे लागले. कित्येकांचीं कात्रणेंच माझ्या संग्रहीं नव्हतीं. या बेपत्ता मंडळींना शोधून काढावें लागलें ! हें शोधाशोधीचें काम प्रकाशक श्री. रा. ज. देशमुख व विद्यार्थी मित्र श्री. दामोदर नाईक यांनी तत्परतेनें केलें. संग्रह छापखान्यांत गेल्यावर त्यांतल्या कांही निबंधांना पानशेतचा प्रसाद मिळाला ! पण श्री. नाईक यांनी मुंबईहून ते निबंध लगेच नकलून पाठविले त्यामुळे मुद्रण प्रतीची वेळेवर डागडुजी झाली.

'वायुलहरीं' पासून 'झिम झिम' पर्यंतच्या तीन तपांच्या प्रवासांत रसिक वाचकांची मला सदैव सोबत लाभली. 'मंजिऱ्या' सारखा एखादा अपवाद सोडला तर आतापर्यंत लघुनिबंधाचा राजमार्ग सोडून मी कधी फार दूर गेलों नाहीं. आता एखाद्या आवडत्या पाऊलवाटेने भटकत जाण्याचा विचार आहे ! या भ्रमंतींतहि ही सोबत मला मिळेल, अशी आशा आहे.

कोल्हापूर
६-१०-६१

वि. स. खांडेकर

# अनुक्रम


| | नांव | लेखनकाल | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | पाहुणे | १९५१ | ९ |
| २ | नवें पुस्तक | १९५१ | १६ |
| ३ | हिवाळा | १९५१ | २२ |
| ४ | फिरायला जाणें | १९५० | ३० |
| ५ | आडवी रेघ | १९५३ | ३९ |
| ६ | ध्रुवतारा | १९५९ | ४६ |
| ७ | रात्रीचा पोषाख | १९४९ | ५७ |
| ८ | नवें व्याकरण | १९४९ | ६८ |
| ९ | वनलता | १९५५ | ७४ |
| १० | सुविचार | १९६० | ८० |
| ११ | नवा कायदा | १९४८ | ८५ |
| १२ | व्युत्पत्ति | १९५४ | ९४ |
| १३ | कल्पना | १९५३ | १०० |
| १४ | घडयाळ | १९५१ | १०७ |
| १५ | सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् | १९५७ | ११६ |
| १६ | आत्मचरित्रें | १९४९ | १२३ |
| १७ | पांच मिनिटें आणि एक तरुणी | १९५७ | १३६ |
| १८ | तीन लाख सुनीतें | १९५९ | १४४ |
| १९ | उंच उडी | १९५८ | १५१ |
| २० | आवाज | १९५५ | १५९ |
| २१ | न्हाणीघर | १९५३ | १६७ |
| २२ | धागा | १९५९ | १७५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७८८० वि: निबंध
क्रमांक ९३६४९ नों: दि: १२४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११५३६

१

# पाहुणे

'दहा पाहुणे !'

लेखाचा तो मथळा वाचतांच मी आश्चर्याने थक्क झालों. वाटलें, बहुधा विनोदी गोष्ट असावी ही ! फार प्राचीन काळीं माणसाला अतिथि हा देवासारखा वाटत असेल. पण आजच्या काळांत दारांत दत्त म्हणून उभा राहणारा पाहुणा त्याला पूर्वजन्मींचा वैरी वाटला नाही तरच नवल ! अशा स्थितींत एखाद्याच्या दारांत एकदम दहा पाहुणे उभे राहिले तर या संकटांतून त्या बिचाऱ्या यजमानाने आपली सुटका कशी करून घ्यायची ? घराला मागचें दार असेल तर प्रश्नच नाही ! त्या क्षणीं तें त्याला स्वर्गदार वाटेल यांत शंका नाहीं. पण तें नसलें तर ?

खिडक्या कांही केवळ हवा आणि उजेड यांच्यासाठीच केलेल्या नसतात. त्यांचा अन्य रीतीनेहि उपयोग करतां येतो, हें चोरापासून संतापर्यंत सर्वांनी सिद्ध केलें आहे. तुळशीदास सापाला दोर मानून भर मध्यरात्रीं पत्नीला भेटायला गेला, तो खिडकींतूनच ना ?

मधेच एक शंका माझ्या मनांत आली. तुळशीदासाच्या काळीं

उघड्या खिडक्यांची पद्धत असावी. खिडकीला जाळी किंवा गज असलेच तर ते लाकडाचे. आतांसारखे लोखंडी गज—ते मोडून किंवा वांकवून खिडकींतून पोबारा करायला घरमालक सर्कशींतला जगप्रसिद्ध खेळाडूच असला पाहिजे !

दहा पाहुण्याचें संकट आपल्यावरच कोसळलें आहे या कल्पनेने त्यांतून पार पडायचा मी विचार करूं लागलों. शिवाजीमहाराज मिठाईच्या पेटाऱ्यांतून तुरुंगाबाहेर निसटले. पण तसा पेटारा सामान्य माणसाच्या घरांत सांपडायचा कसा ? आणि चुकून तो मिळाला, तरी आपण पेटाऱ्यांत बसल्यावर तो उचलून बाहेर नेणार कोण ?

माझी अक्कल अगदी गुंग होऊन गेली. त्या गोष्टींतल्या नायकाने दहा पाहुण्यांना कसें तोंड दिलें तें तरी पाहावें म्हणून मी तें लिखाण वाचूं लागलों. पहिल्या दहा ओळी वाचतांच माझा जीव भांड्यांत पडला. ते दहा पाहुणे काल्पनिक होते ! अंकगणितांत लक्षावधि रुपयांच्या रकमा असतात ना ? तसे.

'पंक्तीला दहा पाहुणे बोलवायचे असतील तर आतापर्यंत जगांत होऊन गेलेल्या माणसांपैकी तुम्ही कुणा कुणाची निवड कराल ?' असा प्रश्न एकाने उपस्थित केला होता, आणि वाचकांकडून आलेल्या उत्तरांच्या आधारें संपादकांनी या निवडणुकीचा निकाल जाहीर केला होता. यापेक्षा अधिक भयंकर असें त्या लेखांत कांही नव्हतें.

बहुमताने निवडून आलेल्या त्या दहा पाहुण्यांपैकी पहिल्या नांवाकडे मीं पाहिलें—शॉ. मी विचार करूं लागलों. छे ! आपण नाही शॉला बोलावणार आपल्या पंक्तीला. त्याचीं पांच सात नाटकें मीं मोठ्या आवडीने वाचलीं आहेत. नाटकांपेक्षाहि त्याच्या प्रस्तावनांत मी रमून गेलों आहें. पण एकंदरींत तो कांहीं इब्सेन आणि गाल्सवर्दी यांच्याइतका माझा आवडता नाटककार नाही. पण त्याला जेवायला न बोलाण्याचें मुख्य कारण कांही हें नव्हे. शॉसारख्या माणसांचें मला मनांतून नेहमीच भय वाटतें. तीं माणसें बुद्धिवान असतात. पण त्यांची बुद्धि

अनुक्रमांक ३७.६२० दि. ७ ११ क्रमांक ९३५६

म्हणजे छोटया जॉर्ज वॉशिंग्टनच्या हातांतली कुऱ्हाडच ! ती कशावर केव्हा चालेल याचा नेम नाही. शॉच्या जातीचीं माणसें विनोदी असतात, यांत शंका नाही. पण त्यांची विनोदी दृष्टि क्षणाक्षणाला भोवतालच्या माणसांचें सूक्ष्म निरीक्षण करीत असतें. त्यांच्या टोप्या जातां जातां उडविण्यांत तिला विलक्षण आनंद होतो. आता तुम्हीच सांगा, असला मनुष्य जेवतां जेवतां कुणाची कशी कुचाळी करील हें सांगतां येईल का ? जेवतांना तरी माणसानें उदार मनोवृत्ति दर्शवावी असें माझें ठाम मत आहे. आपला आत्माराम संतुष्ट झाल्यावर, विनोदाने का होईना, जगांतलीं वैगुण्यें चिवडीत बसण्यांत काय स्वारस्य आहे ?

माझ्या दहा पाहुण्यांच्या यादींत शॉला पहिलाच नव्हे तर दहावा-सुद्धा नंबर द्यायला मी तयार होणार नाहीं. समाजवादी विचारसरणीचा पुरस्कर्ता म्हणून एखादे वेळीं तो मला जवळचा वाटतो. पण एकंदरींत त्याच्यांत भावनेचा भाग फार कमी आहे. त्याच्यापेक्षा—

वृत्तपत्रांतल्या दहा पाहुण्यांच्या यादीवरून मीं नजर फिरविली. चवथ्या का पांचव्या नंबराला गांधींचें नांव होतें. त्यांची सहृदयता म्हणजे अगदी बावनकशी सोनें. तेव्हा आपण बोलवायच्या पाहुण्यांत त्यांना अग्रपूजेचा मान द्यायला हरकत नाही असा विचार माझ्या मनांत आला. पण लगेच या सोन्याच्या ढालीची रुपेरी बाजू मला दिसूं लागली. गांधींना जेवायला बोलावलें म्हणजे आपल्यावर उपाशी राहण्याचाच प्रसंग एखादे वेळीं यायचा. सन्मान्य पाहुणे खादाड असल्यामुळे नव्हे, तर आहाराविषयीच्या त्यांच्या असंख्य नियमांमुळे. साधारणत: पाहुणा जेवायला यायचा असला की बायका भजीं करतातच. किंबहुना कुठ-ल्याहि नवऱ्याला भजीं खायची लहर आली तर त्यानें स्वयंपाकखात्या-कडे तसा सरळ अर्ज करूं नये असाच मी त्याला सल्ला देईन. वरिष्ठ अधिकारी जसा नोकराच्या रजेचा अर्ज ताबडतोब मंजूर करीत नाही, तशी पत्नीहि पतीच्या असल्या मागणीकडे नेहमी दुर्लक्ष करते. आपल्या नवऱ्याला पोटदुखीचा आजार आहे याची अशा वेळीं तिला एकदम

आठवण होते. म्हणून त्याने पाहुणे जेवायला येणार आहेत असें सांगितलें की पत्नीच्या सुग्रणपणाला एक प्रकारचें आव्हान मिळतें आणि मग ताजीं, गरम, खुसखुशीत भजीं पतिराजांच्या पानांत येऊन पडतात.

पण गांधी पाहुणे म्हणून आले तर यजमानाच्या पानांतलीं भजीं त्याच्या पोटांत जाणें मोठें कठीण आहे. ते ताबडतोब असलें खाद्य प्रकृतीच्या दृष्टीने किती अपायकारक आहे, हें त्याला सुनाविल्याशिवाय राहणार नाहीत.

मात्र गांधींना पाहुणे म्हणून पंक्तीला बोलवायला माझें मन कचरूं लागलें तें केवळ या कारणामुळे नव्हे. मी स्वभावत: गप्पीदास आहें. घरीं, दारीं, उठतां, बसतां देवाचें नांव घ्यावें असें कुणा तरी कवीने म्हटलें आहे ना ? गप्पांच्या बाबतींत तो उपदेश मी पूर्णपणें पाळतों. दुपारीं जेवतांना सुरू झालेल्या गप्पा अर्धवट टाकून तिसऱ्या प्रहरचा चहा घेण्याकरिता नाइलाजाने पाटावरून उठण्याचे प्रसंग माझ्यावर अनेकदा आले आहेत. अशा मनुष्याचें गांधींशीं सूत कसें जमायचें ? ते तर पळापळाला घड्याळ पाहणारे ! नेमून दिलेली वेळ संपली की पाहुण्याला गाशा गुंडाळायला सांगणारे !

गांधींचें नांव रद्द करून मीं मुकाट्याने दुसरी निवड करायचें ठरविलें. नेपोलिअनचें नांव मला मोठें आकर्षक वाटलें. प्रेम आणि युद्ध यांच्या गोष्टी ऐकायला नेहमींच मोठ्या गोड असतात. नेपोलिअनने दोन्ही क्षेत्रांत अभूतपूर्व पराक्रम केले होते. ‘ मेरी वालावस्का ’ हा चित्रपट पाहिल्यापासून त्यांतल्या मेरीच्या व नेपोलिअनच्या करुणरम्य प्रेमकथेने तर मला चटका लावला होता. नेपोलिअन पाहुणा म्हणून आपल्याकडे जेवायला आला तर ती हृदयंगम कथा आपल्याला सविस्तर ऐकायला मिळेल, या कल्पनेने मीं माझ्या यादींत पहिलेंवहिलें म्हणून त्याचें नांव निश्चित केलें.

पण—माझ्यापुढे मूर्ति उभी राहिली ती सेंट हेलेना बेटांतल्या खडकावर बसून चारी बाजूंनी वेढणाऱ्या समुद्राकडे शून्य दृष्टीने पाहणाऱ्या

एका पराभूत पुरुषाची ! नेपोलिअनने भोजनाचें निमंत्रण स्वीकारलें तरी तो त्या उदास मन:स्थितींतच आपल्याकडे येईल आणि जेवतांना सुद्धां 'सैन्यें पोटावर चालतात' असला सिद्धान्त आपल्या गळीं उतरविण्याचा तो प्रयत्न करील अशी भीति मला वाटूं लागली. मीं मनांतल्या यादींतून त्याचें नांव खोडून टाकलें.

त्या वृत्तपत्रांतल्या पहिल्या दहा निवडक पाहुण्यांची यादी मी पुन:पुन्हा वाचूं लागलों. एकहि नांव माझ्या पसंतीला उतरेना. आतां कुठे माझी चूक माझ्या लक्षांत आली. अनुकरण म्हणजे आत्महत्त्या या तत्त्वाची प्रचीति मला पटली. मी न कळत त्या वृत्तपत्रांतल्या यादीचें अंध अनुकरण करीत होतों !

तें वर्तमानपत्र दूर भिरकावून देऊन जगांतून निघून गेलेलीं कोण कोण माणसें आपल्याला अगदीं हवींहवींशी वाटतात हें मी आठवूं लागलों. लगेच वडिलांची मध्यम उंचीची, गोऱ्या वाटोळ्या चेहऱ्याची मूर्ति माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली. एके दिवशीं बटाट्याच्या भाजीसाठीं आईशीं भांडून मी उपाशी शाळेला गेलों होतों. माझा तो सत्याग्रह अत्यंत यशस्वी झाला. मधल्या सुट्टींत वडिलांनी मला आपल्या कचेरींत नेऊन तिथें श्रीखंडपुरी खायला दिली. ते तापट होते खरे. पण त्यांची माझ्यावर अपरंपार माया होती.

बस्स ! पहिलें नांव निश्चित झालें.

वडिलांच्या पाठोपाठ धोंडू मोलकरीण माझ्या पंक्तीला येऊन बसली. मीं आजपर्यंत अनेक सहभोजनांत भाग घेतला असेल. पण धोंडू माझ्याकडे जेवायला येणार या कल्पनेमुळे होणारा आनंद अगदी अवर्णनीय होता. लहानपणीं तिच्या घरच्या थाळींतली झुणकाभाकर मी आनंदानें खात असें. त्या गोष्टी जेवतांना निघतील आणि मग आमच्या गप्पांना कमालीचा रंग चढेल. बोलतां बोलतां आपण अधिक जेवलों हें कांही केल्या कुणाच्या लक्षांत सुद्धा येणार नाही !

धोंडूनंतर मुद्‌गल मास्तरांना बोलवायलाच हवें ! ते मारकट होते

हें खरें. पण त्यांच्या मनांत माझ्याविषयीं वात्सल्य होतें यांत शंका नाही. पांचव्या यत्तेंतली वार्षिक तपासणीची ती आठवण अजून विसरलों नाहीं मी. वडिलांचें औषध आणायला मला दररोज दवाखान्यांत जावें लागे. त्यामुळे माझी शाळा पुष्कळदा बुडली होती. अभ्यास असा कच्चा असतांना तपासणीच्या वेळीं हजर राहण्यांत काय मतलब आहे असा पोक्त विचार करून मीं त्या दिवशीं शाळेला बुट्टी दिली. पण मास्तरांनी मुद्दाम मुलें पाठवून मला बोलावून नेलें. मीं शाळेंत पाऊल टाकतांच डोळे वटारून ताड ताड बोलले ते मला. असा राग आला होता मला त्यांचा! पुढे इन्स्पेक्टर आमच्या वर्गात आले. त्यांच्या अनेक प्रश्नांचीं मीं बरोबर उत्तरें दिलीं. ते निघून गेल्यावर मास्तरांनी माझ्याकडे ज्या अभिमानाच्या दृष्टीनें पाहिलें—त्यांच्या त्या दृष्टीने माझा आत्मविश्वास जागृत केला.

मास्तरांना शेवटीं वेड लागलें होतें म्हणे! असेना. तें वेड कायम असलें तरी आमच्या पंक्तीचा ते विरस करणार नाहींत अशी माझी खात्री आहे.

मास्तरांच्या नंतर–ती निळ्या डोळ्यांची गोड मुलगी! दोनच महिने ती माझ्या आयुष्यांत आली. नुक्ता कुठे मी कॉलेजांत गेलों होतों तेव्हा. दररोज कमींत कमी मी एक दोन, कविता लिहीत होतों. त्या दोन महिन्यांतल्या कवितांत ‘पुष्पा’ म्हणून मी तिचा उल्लेख करीत असें. तिचें खरें नांव काय होतें तें मला आतां आठवत नाही. पुढे पुष्कळ वर्षांनी तिची मीं अगत्याने चौकशी केली. ती अकालीं हें जग सोडून गेल्याचें मला कळलें. त्या वेळीं तिच्याविषयी माझी काय भावना होती हें माझें मला अजूनहि कळत नाही. तें प्रेम असेल अथवा नसेल. पण त्या निळ्या डोळ्यांच्या आणि हसऱ्या चेहऱ्याच्या मुलीची मधुर स्मृति अद्यापहि माझ्या मनांत तरंगत आहे. तिला आयुष्य लाभायला हवें होतें, तिच्या उपयोगीं पडायची एखादी तरी संधि आपल्याला मिळाली असती तर बरें झालें असतें, असें कांही तरी तिची आठवण होतांच मनांत येतें.

ती निळ्या डोळ्यांची मुलगी सोळाव्या वर्षी माझ्या आयुष्यांत येऊन गेली. त्यानंतरच्या तीन तपांत मला भेटलेलीं आणि प्रिय झालेलीं किती तरी माणसें लगबगीने माझ्यापुढे येऊन उभीं राहिलीं. माझ्या पाहुण्यांची यादी हां हां म्हणतां वाढूं लागली. क्षणार्धात ती पंचविसावर गेली. मी एकदम दचकलों. चोविसांपेक्षा अधिक माणसें जेवायला बोलावणें हा अन्ननियंत्रण कायद्याचा भंग आहे ही गोष्ट मला आठवली. लगेच माझें मलाच हसूं आलें. कल्पनासृष्टींत किती रंगून गेलों होतों मी !

शॉपेक्षां धोंडू मोलकरणीला आणि गांधींपेक्षा इंग्रजी पांचवीच्या मास्तरांना मी अधिक प्रिय मानतों हें पाहून अनेक लोक माझ्यावर रागावतील. पण प्रेम आणि आदर, बुद्धि आणि भावना, जगाचें जीवन आणि स्वतःचें आयुष्य यांतलें अंतर त्यांना कळत नाही असेंच मी म्हणेन. आपली बुद्धीची किंवा भक्तीची भूक भागवायला महापुरुष ठीक असतात. मी मोठ्या आनंदाने भगवान् सूर्यनारायणाशीं त्यांची तुलना करीन. पण पवित्र, तेजस्वी, बुद्धिदाता, चराचर सृष्टीचा निर्माता वगैरे कितीहि विशेषणें आपण सूर्याला लावलीं तरी दुपारीं बारा वाजतां बायकोला बरोबर घेऊन रखरखणाऱ्या उन्हांत हौसेने फिरायला कांही कुणी जात नाही. त्या आनंदाचा आस्वाद मनुष्य चांदण्या रात्रींच घेतो. चंद्र कलंकित आहे, परप्रकाशित आहे, हें ठाऊक असूनसुद्धा !

अर्थात् जेवायला बोलवायच्या परलोकवासी पाहुण्यांची मीं वर केलेली यादी अगदी पक्की आहे. वडील, धोंडू, मास्तर, ती निळ्या डोळ्यांची मुलगी—

तुम्ही कान टवकारून यादींतलीं नांवें ऐकायला लागलां आहांत याची जाणीव आहे मला. त्या निळ्या डोळ्यांच्या मुलीनंतर आणखी एखादी तरुणी माझ्या पंक्तीला येणार आहे कीं काय या कुतूहलाने तुम्ही बेचैन झालां असाल. पण माझीं पुढलीं नांवें वाचून दाखविण्यांत काय अर्थ आहे ? मला कांही ही यादी वर्तमानपत्रांत छापायला द्यायची नाही ! १९५१

# २

# नवें पुस्तक

बस वळली. किंचित् पुढे गेली. समोर कोपऱ्यावरच्या घरांतल्या दिव्याचा प्रकाश दिसूं लागला. आनंदाची एक लहर माझें शरीर पुलकित करून निघून गेली. आपलें घर—तो प्रकाश नव्हे, त्या घराचें स्मित आहे! तें हसून आपलें स्वागत करीत आहे असें मला वाटलें.

सकाळीं आठ वाजतां मी कामाकरितां घराबाहेर पडलों होतों. दिवसभर भटकून, बडबडून, थकून गेलों होतों. वादळी समुद्रांत सांपडलेल्या जहाजाला एखादा दीपस्तंभ दिसावा तसा तो घरांतून डोकावून पाहणारा प्रकाश मला वाटला.

माझ्या डोळ्यांपुढे चित्रें नाचूं लागलीं. मी घंटा वाजवितांच छोटी मंगल धावत दार उघडायला येईल, मी दिसतांच लडिवाळपणाने ती मला मिठी मारील, मग मी तिला उचलून घेईन, लगेच ती म्हणेल, 'माझा पापा घ्यायचा नाही हं. मी मोठ्ठी झालेंय आतां.' खाली उतरून ती मला शाळेंतल्या गोष्टी सांगूं लागेल, त्या सांगतां सांगतां मधेच बोबडें बोलेल, मग आपण तिचा गालगुच्चा घेऊन म्हणूं 'अहा रे बोबडकांदा—'

खरंच, वात्सल्य ही केवढी संजीवनी आहे ! शुक्राचार्यांची कथा ही कांही केवळ मद्यपानाचे अनर्थ दर्शविणारी कथा नाही. ती खरोखर वात्सल्याच्या विजयाची कथा आहे. शुक्राचार्यांना जर देवयानीसारखी मुलगी नसती तर मद्याच्या प्याल्यांत राख म्हणून मिसळून गेलेला कच पुन्हा कधीच जिवंत झाला नसता !

कल्पनेच्या या तरंगांवर झुलतच मी घराच्या पायऱ्या चढलों. आतून कुणाचें तरी रडणें ऐकूं येत होतें. रडणें हें सुद्धा एक प्रकारचें संगीत आहे. तें अनेक रागांत गातां येतें. मंगला विविध राग आळवीत होती. तिच्या एकेक सुरानें माझ्या स्वप्नाचा चुरा होत होता. मी खिन्नपणानें स्वत:शींच हसलों. मनांत आलें, या जगांत सफल होणारीं स्वप्नें किती कमी आहेत !

दार उघडलें. मी आत आलों. मंगलला जवळ घेतलें. ती अधिकच जोरानें रडूं लागली. आतांपर्यंत वाचलेलीं बालमानसशास्त्रावरलीं सर्व पुस्तकें आठवून मीं माझें मन व हात कसेबसे ताब्यांत ठेवले. शेवटीं इतरांकडून तिच्या रडण्याचें कारण मला कळलें. ती नुकतीच तिसरींत गेली होती. तिचें वाचनपुस्तक कालपर्यंत बाजारांत मिळत नव्हतें. आज तें कुठल्यातरी एका दुकानांत आलें होतें. तिच्या वर्गांतल्या दहा-बारा मुली आज तें वर्गांत घेऊन आल्या होत्या. मधल्या सुट्टींत ही ताजी बातमी ती आईला सांगून गेली. संध्याकाळीं शाळा सुटल्यावर तिनें 'अर्जंट' असा शेरा मारून ती मागणी केली. पण तिचें पुस्तक आणायला कुणीच गावांत गेलें नव्हतें !

'उद्यां' हा शब्द मुलांच्या कोशांतच नसतो. माझें शरीर आंबलें होतें. पण मंगलची कळी फुलविण्याकरिता मी तिला बरोबर घेऊन गावांत गेलों. तें पुस्तक पैदा करून आलों; आलों तों पानें मांडलीं होतीं. 'जेवल्यावर पुस्तकाला पुठ्ठा घालूं' असें मी तिला सांगूं लागलों. पण तिची समजूत पटेना. आपल्या आधीं जेवून सुलभा बैठकीच्या खोलींत गडबडीनें येईल आणि त्या नव्या पुस्तकावर शाई सांडेल अशी तिला भीति वाटत होती. तारांच्या कुंपणांतून जातां जातां नवी चिमुकली साडी फाडून

घेणारी, कांहीं तरी खाऊन हात धुतले कीं ते फ्रॉकला पुसणारी ही पोरटी पुस्तकाला इतकी जपूं इच्छिते हें पाहून मला मोठा आनंद झाला. मागच्या जन्मीं मोठी पंडिता असली पाहिजे ही ! त्याशिवाय पुस्तकाची इतकी काळजी—

रंगीत पुठ्ठा घातलेलें तें पुस्तक जवळ घेऊनच मंगल झोपली. झोपेंत ती एकदोनदा हसल्याचा सुद्धा भास झाला मला. बहुधा ती आपलें पुस्तक आभाळाला दाखवून त्याला हिणवीत असावी ! ती त्याला म्हणत असेल ‘तुझ्यापाशीं सकाळ संध्याकाळ खूप रंगीत कागद असतात; पण त्यांचा पुठ्ठा कुठें तुला आपल्या पुस्तकाला घालतां येतो ?’

या प्रसंगाला दोन महिने होऊन गेले. संध्याकाळीं मी दमून भागून घरीं आलों. मुलें कुठे खेळायला गेलीं होतीं. घर कसें सुनेंसुनें भासत होतें. चित्रपटाच्या पडद्यावर नुसतीं माणसें दिसावींत आणि कुणाचाहि आवाज ऐकूं येऊं नये तसें मला वाटूं लागलें. हुश्श करीत मी बैठकीच्या खोलींतला दिवा लावला आणि तक्क्याला टेकून पडलों. तक्क्यापाशींच एक पुस्तक दिसलें. तें सहज उचललें. पहिल्या पृष्ठाकडे नजर टाकली. त्याच्यावर तेहतिसाचा आंकडा होता. बत्तिशी पार पडलेल्या त्या पुस्तकाची मला कींव आली. आतां त्या बिचाऱ्याचा काय उपयोग होता ? द्यावें रद्दींत टाकून असें म्हणत मी डोळे मिटणार होतों. इतक्यांत तें कसलें पुस्तक आहे तें पाहावें अशी लहर मला आली. मी पानें चाळूं लागलों. हें मंगलच्या इयत्तेचें वाचनपुस्तक आहे हें चटकन् माझ्या लक्षांत आलें. तेंच तें पुस्तक—ज्याच्याकरिता तिने त्या दिवशीं इतकें अकांडतांडव केलें होतें. आणि अवघ्या दोन महिन्यांत त्याची काय दुर्दशा झाली होती ! त्याचीं पहिलीं बत्तीस पानें तर बेपत्ताच होतीं. उरलेलींहि आपल्या आयुष्याच्या किती घटका शिल्लक राहिल्या आहेत याचा विचार करीत असावींत. आंत दोन तीन ठिकाणीं शाईचे वेडेवाकडे डाग पडले होते. एका मुलीला मिशा काढल्या होत्या, एका म्हाताऱ्याच्या डोक्यावर शिंगासारखें कांहींतरी उगवलेलें दिसत होतें—

मला मंगलचा राग आला. पोरटी घरांत नव्हती म्हणून! नाही तर तिला समोर उभें करून अशी हजेरी घेतली असती—तें बालमानस-शास्त्र गेलें खड्डयांत!

डोळे मिटून मंगलची वाट पाहत मी पडून राहिलों. पण शरीर स्वस्थ असलें तरी माझें मन भ्रमतच होतें. तें भुर्रकन उडून माझ्या बाळपणांत उतरलें. मी दुसऱ्या इयत्तेंत होतों तेव्हा. कशाबद्दल तरी 'वसईचा वेढा' हें पुस्तक मला बक्षीस मिळालें होतें. पुढे कांही दिवसांनी त्या बक्षि-सांत एक चूक झाली आहे असें हेडमास्तरांना आढळून आलें. म्हणजे माझा शेवटचा नंबर आला होता म्हणून मला बक्षीस मिळालें होतें असें नाही; तर माझें पुस्तक दुसऱ्या कुणाला तरी दिलेलें होतें आणि त्याचें पुस्तक चुकून मला बहाल करण्यांत आलें होतें. हेडमास्तरांनीं 'वसईचा वेढा' परत आणायला मला सांगितलें. त्या दिवशीं मी अगदी रडकुंडीला आलों. वसईच्या वेढ्यांत त्या किल्ल्याची जी स्थिति झाली असेल ती मला मिळालेल्या त्या पुस्तकाच्यापेक्षा खास बरी असेल! त्याचीं सर्व पानें शोधून गोळा करण्याकरिता मला तब्बल तीन तास लागले. तरी बरें! स्वयंपाकिणीने हातीं धरण्याकरिता त्याचा उपयोग केला नव्हता. तीं सगळीं पानें चिकटवून त्यांना पुस्तकाचा आकार आणण्याकरिता मला काय परिश्रम पडले ते त्या परमेश्वरालाच माहीत!

विद्यार्थिदशेंतल्या अशा अनेक आठवणी जाग्या होऊं लागल्या. कुठून हें स्मृतीचें पोळें आपण डिवचलें असें मला झालें.

कांही तरी वाचीत पडावें म्हणून मी उठलों, कपाट उघडलें. समोरच इब्सेनचा नाटचसंग्रह होता. बरेच दिवसांत—छे, वर्षांत—इब्सेन चाळला नव्हता. कुठला तरी एक आवडता अंक वाचावा म्हणून मीं तें पुस्तक हातांत घेतलें. पण तें माझ्या हातांत तसेंच राहिलें. जवळ जवळ दोन तपांपूर्वीं 'इब्सेन' मी पहिल्यांदा वाचला. तेव्हांच्या अनेक रात्री माझ्या डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या. एखादा सुंदर देखावा कितीहि पाहिला तरी मनाची तृप्ति होत नाहीं ना? तशी माझी त्या वेळीं स्थिति झाली

होती. इब्सेनवर एक टीकाग्रंथ लिहायचें ठरवून मी रात्रीं बारावारा वाजेपर्यंत जागत होतों, टिप्पणें करीत होतों, मुंबईहून मित्रांकडून पुस्तकें मागवीत होतों, तीं वाचीत होतों. माझ्या ध्यानीं, मनीं, स्वप्नीं इब्सेन-शिवाय दुसरें कांहीं नव्हतें तेव्हा ! एकदां जेवतांना 'डॉल्स हाऊस 'च्या शेवटच्या अंकाचा मी खाली मान घालून विचार करीत होतों. बायको मला सांगत होती, 'त्या कुंभाराचा मुलगा शाळेंत येतो ना ? त्याला म्हणावं, तुझ्या बापाला बोलावलंय जरा. मी दररोज सांगतें नी तुम्ही दररोज विसरतां. तें भट-ब्रेन-टॉनिक तरी घ्यायचं होतं जरा. या शेगडचा अगदीं निरुपयोगी झाल्या आहेत. मी स्वयंपाक तरी कसा करूं ?'

मीं एकदम मान वर करून उत्तर दिलें 'Thousands of women have done it. ' (आतांपर्यंत हजारों बायकांनीं हें केलें आहे.)

ती चिडली आणि म्हणाली, 'काय केलंय ? आपलं डोंबलं ? आणा त्या तुमच्या बायकांना माझ्यापुढे, एकेकीला बसवितें इथं नी लावतें स्वैंपाक करायला, म्हणजे तिला कळेल या शेगडचांचं सुख !'

हे शब्द कानांवर पडले तेव्हा कुठे आपली चूक माझ्या लक्षांत आली. डॉल्स हाऊसची नायिका जें वाक्य उच्चारते तें त्यागाला उद्देशून आहे, शेगडचांना नाही !

इब्सेनचा एवढा मोठा भक्त होतों मी, त्याच्यावरलें माझें पुस्तक चार-पांचशें पानांचें तरी झालें असतें. त्या संकल्पित पुस्तकाचीं टिप्पणेंच—

अरेच्या पण तीं टिप्पणें आतां आपल्यापाशी कुठे आहेत? आणि तो ग्रंथ लिहायचा संकल्प ! तोहि कुठें गेला कळत नाहीं. आपल्याला अजून पुष्कळ पुस्तकें लिहायचीं आहेत असें आपण दररोज मनाशी घोकतों. पण त्या सर्वांत 'इब्सेन'चें नांव कुठेच नसतें. असें कां व्हावें ?

एकटचा 'इब्सेन' चीच गोष्ट कशाला हवी ? असे लेखनाचे किती तरी संकल्प आपण विसरून गेलों आहों. ज्या सुंदर कल्पनांच्या जन्माच्या वेळीं आपण हर्षानें नाचलों होतों, त्या आज कुठे आहेत ? जीं स्वप्नें प्रथम आपल्याला पडलीं तेव्हा आपण कुठल्या तरी अनामिक धुंदीनें बेहोष

झालों होतों त्यांचा चुरा सुद्धा आज आपल्या हातांत नाही. इच्छा, आशा, स्वप्नें, संकल्प, यांचे थवेच्या थवे माझ्या मिटलेल्या डोळ्यांपुढून उडत जाऊं लागले. किती नाजुक पंख—किती सुंदर रंग--

मी डोळे उघडून पाहिलें. त्यांतलें कांही कांही आपल्या आयुष्यांत प्रत्यक्षांत उतरलें नाही याचा मला खेद वाटला. पण तो क्षणभरच !

तेहतिसाव्या पानावर सुरू होणाऱ्या मंगलच्या पुस्तकाकडे माझें लक्ष गेलें. त्याने मला एकदम दिलासा दिला. एक विचित्र कोडें क्षणार्धांत सुटलें. आशा, स्वप्नें, संकल्प हीं आयुष्यांतलीं फुलें आहेत, ही जाणीव मला झाली. तीं क्षणभंगुर असलीं तरी आपलें आयुष्य सुगंधित करून जातात. त्यांचें सुख सफलतेंत नाही, तर नावीन्यांत आहे. हें सुख आपण भरपूर मिळविलें आहे. आपलीं अनेक स्वप्नें भंग पावलीं असतील, किती तरी संकल्प या फाटक्या पुस्तकाप्रमाणें—

इतक्यांत खेळून परत आलेली मंगल धावत आली आणि माझ्या कुशींत शिरून लाडकेपणाने डोकें घुसळूं लागली. प्रत्येक स्पर्शाची भाषा भिन्न असते. स्वारीला कांही तरी हवें आहे हें ओळखून तिचें तोंड वर करीत मीं विचारलें, ' काय हवंय तुला ! '

माझ्या नजरेला नजर न देतां मंगल म्हणाली, ' माझं पुस्तक फाटलंय् भाऊ. मी नाहीं फाडलं, सुलभीनं. त्याचीं बत्तीस पानं--'

मी हंसत उठलों आणि म्हणालों, ' चल, आपण नवं आणूं या दुसरं ! '

१९५१

३

# हिवाळा

किती वाजले होते देव जाणे ! मी एकदम जागा झालों. कुणाच्या चाहुलीने नव्हे. चोरपावलांनी खोलींत प्रवेश करणाराची चाहूल – आणि तीहि गाढ झोपलेल्या माणसाला – कशी ऐकूं येणार ?

मात्र त्या व्यक्तीचें अस्तित्व मला जाणवत होतें. मी डोळे उघडून पाहूं लागलों. माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. चोराच्या भीतीने ? छे ! खोलींत शिरलेल्या त्या अमूर्त व्यक्तीच्या नाजूक हालचालींनी. ती माझ्या अंथरुणाच्या आसपास घोटाळत होती. क्षणार्धात अगदी जवळ आली ती ! गालांतल्या गालांत हसत, स्वत:शीच एक अस्फुट मधुर गीत गुणगुणत. तिच्या स्पर्शानें माझें शरीर रोमांचित झालें. सतारीच्या किणकिणाटा-सारखे ते रोमांच मला वाटले. त्या अदृश्य व्यक्तीला उद्देशून मी म्हणालों, ‘आलीस, फार चांगलं झालं. तूं कुठं तरी दूर पळून गेली आहेस असा साऱ्या लोकांचा समज झाला आहे. जग कितीहि सुधारलं तरी स्त्रीजाती-विषयी तें थोडंस साशंक असतंच ! त्याचा हा गैरसमज आता दूर होईल.’

पडल्या पडल्या पायाजवळचा रग मी वर गळ्यापर्यंत ओढला. त्याची

ऊब मला मोठी आल्हादकारक वाटली. मी त्याला म्हणालों, 'मित्रा, प्रसंगाशिवाय माणसाची पारख होत नाही हेंच खरं! गेला महिना-दीड महिना तूं माझे पाय धरून बसला आहेस आणि मी एकसारखा तुला लाथाडत आहें. आज ही थंडी पडली, तेव्हा कुठं माझ्या लक्षांत आलं की तूं माझा जिवश्च कंठश्च मित्र आहेस!'

रगाच्या उबेंत शरीर सुखावलें, पुन्हा निद्रेची आराधना करूं लागलों. डोळे मिटले. पण मन उघडेंच होतें. त्यांत अनेक आठवणी गर्दी करूं लागल्या. लहानपणीं थंडी अशीच अचानक येई चोरपावलांनी. मध्यरात्र उलटल्यावर मला तिची मोठी मौज वाटे. ती एखाद्या परीसारखी भासे. ही परी दिवस-भर गांवाबाहेरच्या रानांत गुप्तपणाने संचार करते आणि रात्र पडल्यावर हळूच गावांत येते अशी कांहीतरी माझी त्या वेळीं कल्पना होती. पुढे पुढे वाटे, या थंडीचें मांजराशीं अगदी जवळचें नातें असलें पाहिजे. तसें पाहिलें तर ही ऊनपावसांची बहीण. पण त्यांच्या आणि हिच्या स्वभावांत अगदी जमीन-अस्मानाचें अंतर! ऊन येतें ते हजारो कर्णकटु आवाज बरो-बर घेऊन. पाऊस पडतो तो ढगांची घोडदौड करीत, टापांचा टपटप आवाज ऐकवीत. थंडीचें तसें नाही. ही अबोल ललना फार लाजाळू आहे. ती नेहमी मांजराच्या पावलांनी माणसाच्या खोलींत प्रवेश करते.

सकाळीं उठलों तेव्हां थंडीचा चांगलाच कडाका पडला होता. कांही केल्या मुलें पांघरुणांची ऊब सोडून उठायला तयार होईनात. साम-दाम-दंड-भेद वगैरे सर्व उपाय हरले! मराठमोळ्यांतली डोक्यावरून पदर घेण्याची पद्धत फार चांगली आहे हा शोध सौभाग्यवतीला लागलेला दिसला. अनेक सचित्र जाहिरातींत चहाचें जें गुणवर्णन आढळतें तें अक्षरशः सत्य आहे असें माझें अंतर्मन आवेशाने प्रतिपादन करूं लागलें.

चहा घेतल्यावर ट्रंकेंतला जुना स्वेटर अंगावर चढवून मी फिरायला बाहेर पडलों. रस्त्यावरले सारे लोक थंडीच्या या आकस्मिक स्वारीनें त्रस्त झालेले दिसले. कुणी मोठे हातरुमाल कानावरून बांधून घेतले होते, कुणी छातीशीं कोट घट्ट लपेटून चालले होते, कुणी नुसतेच हात चोळीत

जात होते ! बहुधा थंडीच्या नांवाने ते बोटें मोडीत असावेत !

उन्हें वर आलीं. पण हवेंतला गारठा नाहीसा होईना. ओळखीचीं माणसें अधूनमधून मला भेटत. ‘ कसं काय ! ’ या प्रश्नाऐवजी जो तो म्हणे ‘ छे बुवा ! अशी थंडी कधी पाहिली नव्हती ? काय वाइट्ट वारं सुटलंय.’ कांही उत्तर न देतां मी दूरवर पाही. निळसर धुक्याचे रंग पांघरून मोठ-मोठे डोंगर अजून अंथरुणांत लोळत पडले आहेत असा भास मला होई.

घरीं, बाहेर, बसमधे, मंडईंत, सभास्थानीं जिथे जावें तिथे प्रत्येकजण थंडीची निंदा करीत होता. दिवसभर जो तो हुडहुडी भरल्यासारखें करून म्हणत होता, ‘ काय गार वारं सुटलंय् ! ही थंडी फार वाईट बुवा ! ’

अजून थंडी पडत नाही म्हणून कालपर्यंत तक्रार करणारें जग आज ती पडली म्हणून आक्रोश करूं लागलें ! माणूस स्वभावत: असंतुष्ट आहे हेंच खरें. तुम्ही एखाद्याच्या गळयांत सुस्वभावी कुरूप मुलगी बांधा, तो म्हणेल, ‘ हिच्यावर मी प्रेम कसं करूं ? ’ जणुं कांही प्रीतीची वेल फक्त लावण्याच्या परिसरांतच फुलूं शकते ! तो सुखी व्हावा म्हणून साऱ्या जगांतली सुंदर मुलगी तुम्ही त्याला शोधून आणून द्या. तो लगेच कुरकुर करूं लागेल, ‘ या अप्सरेला घेऊन मी काय करूं ? सारं जग हिच्याकडे अष्टौप्रहर टकमक बघत बसणार ! हिला मी कुठं संभाळत बसूं ? मला काय तेवढाच धंदा आहे ? ’

थंडीचें राज्य आलें म्हणून चोहींकडे दिवसभर द्वाही फिरविणाऱ्या गार वाऱ्याची पदोपदीं ऐकूं येणारी निंदा मला थेट याच मासल्याची वाटली ! आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टी क्षुद्र लेखण्यांत माणूस किती पटाईत असतो पाहा ! हिवाळयांतल्या या गार वाऱ्याविषयी जो तो तुच्छतेने आणि तुसडेपणाने बोलत होता ! वसंत ऋतूंतल्या वाऱ्याच्या झुळकांना वायुलहरी या नाजुक नांवाने संबोधणारे आणि वर्षाकाळांतल्या बेछूट वाऱ्याला झंझावात हें काव्यमय नांव देणारें जग थंडीची साथ करणाऱ्या वाऱ्याला अगदी नालायक मानीत होते. पावलोपावलीं त्याचा नपुंसक-लिंगी उल्लेख करीत होते. त्या बिचाऱ्या वाऱ्यावर हा फार मोठा

अन्याय होत आहे असें मला वाटलें. वासंतिक वायुलहरींचें साम्य किंवा वर्षाकालीन झंझावाताचें तांडव यांच्यांतलें काव्य या हिंवाळ्यांतल्या वाऱ्यांत नसेल ! पण काव्य हा कांही जीवनाचा आत्मा नव्हे. तो त्याचा एक अलंकार आहे आणि या दोन ऋतूंतल्या वाऱ्यांतल्या काव्याचें खरें स्वरूप तरी काय आहे ? उकाड्याने शिजून निघालेल्या माणसाला उन्हाळ्यांत संध्याकाळीं गार वाऱ्याच्या चार झुळका मिळाल्या म्हणजे तो सुटकेचा सुस्कारा सोडतो. त्या सुस्काऱ्याच्या आधारावर कवींनी मलयानिलाचे रामायण रचलें आहे. वस्तुस्थिति अशी आहे की, उन्हाळ्यांत वारा दिवसभर दडलेला असतो. साऱ्या सृष्टीला एखाद्या कारखान्यांतल्या भट्टीचें स्वरूप येतें. मोदकपात्रांत रटरटणाऱ्या मोदकांप्रमाणे माणसें शाळांत, रस्त्यांत, कचेऱ्यांत, कारखान्यांत, स्वयंपाकघरांत, फार काय अंथरुणांत सुद्धा घामाघूम होऊन कुरकुरत असतात. दिवसभर चाललेली ही उकडहंडी संध्याकाळशिवाय थांबणें शक्य नाही हें प्रत्येकजण जाणतो. पण उपाशी भिकाऱ्याला कुणी शिळेपाके चार तुकडे दिले तरी तो दात्याला दुवा देत सुटतो ना ? तसेंच त्या दिवसांत सायंकालीन वासंतिक वायु-लहरींच्या बाबतींत आपलें होतें.

याबद्दल मी कवींना – विशेषतः संस्कृत कवींना — दोषी धरतों. रेशनिंगचें अन्न खावें लागत नसल्यामुळे त्या प्राचीन कवींची प्रकृति आधुनिक कवीपेक्षा चांगली असणें स्वाभाविक होतें. राजाश्रयामुळे पोटासाठी कुठे तरी कारकुनी किंवा मास्तरकी करण्यांतहि त्यांचा वेळ जात नव्हता. अशा सुखवस्तु मंडळींनी शृंगाराला सर्व रसांचा राजा मानूं नये तर काय करावें ? त्याचा परिणाम असा झाला की, शृंगाराशीं संबंध असलेल्या साऱ्या गोष्टींचा भाव काव्यांत भराभर चढत गेला ! चंद्र, कोकिळा, आम्रमंजिरी वगैरेंचें संस्कृत काव्यांत माजविण्यांत आलेलें स्तोम या वृत्तींतूनच निर्माण झालें आहे. वसंत हा मदनाचा जिवलग मित्र असल्या-मुळे वासंतिक वायुलहरींच्या भोवती असेंच एक रम्य वलय त्या कवींनी तयार केलें असावें. या सांकेतिक वलयामुळे चांगल्या आधुनिक कवींची

सुद्धा कशी कुचंबणा होते तें ' सख्या वसंत वाता ' या दत्तांच्या कवितेंत दिसून येतें. हा वसंतवात दिवसाकाठी किती वेळ वाहतो, लोकांच्या अंगाची काहिली नाहीशी करण्याच्या कामीं त्याचा कितपत उपयोग होतो, हे प्रश्नच कवीला सुचत नाहीत ! तो त्याला म्हणतो ' मित्रा वसंतवाता, येतां येतां मलयगिरीला प्रेमालिंगन दिल्यामुळे तुझा स्पर्श इतका शीतल वाटतो काय ? की हा सरितांच्या दृढालिंगनाचा परिणाम आहे ' वगैरे वगैरे.

कुठल्याहि वस्तूची दुर्मिळता झाली की तिची किंमत वाढूं लागते हा अर्थशास्त्राचा सिद्धांतच वासंतिक वायुलहरींच्या लोकप्रियतेच्या मुळाशीं आहे; वर्षाकालांतल्या उद्दाम वाऱ्याच्या बाबतींतहि आपली अशीच वंचना होत आली आहे. मदोन्मत्त हत्तीने शुंडादंडाने सुंदर उद्यान उध्वस्त करावें त्याप्रमाणे धूळ उधळीत आणि वृक्षवेली उन्मळीत थैमान घाल-णाऱ्या झंझावाताचें जगाने कौतुक करावें ही प्रथम दर्शनीं मोठी विचित्र गोष्ट वाटते. पण मनुष्य बाह्यत: कितीहि सुधारला तरी त्याचें मन हें लहान मुलाचेंच मन राहतें, त्याला भव्यतेचा सदैव मोह पडतो. डोळे दिप-विणाऱ्या गोष्टीप्रमाणे अंगावर रोमांच उभ्या करणाऱ्या गोष्टींत काव्य आहे असें त्याला वाटतें. म्हणून तर जगांत विध्वंसकांची अजून पूजा केली जाते. रक्ताच्या नद्या वाहविणाऱ्यांचीं नांवें इतिहास अभिमानाने उच्चारतो. पण एखाद्या नंदादीपाप्रमाणे शांतपणाने तेवत राहणाऱ्या, जग आहे त्यापेक्षा थोडें का होईना अधिक चांगलें व्हावें म्हणून आयुष्य-भर मूकपणानें काम करीत राहणाऱ्या माणसाची त्याला आठवणसुद्धा राहत नाही !

जग हें असें आहे ! म्हणूनच हिवाळ्याच्या गार वाऱ्याचें कुणी हंसत-मुखाने स्वागत करतांना दिसत नाही. बिचारें वारें वाहूं लागलें की एक-सारखें वाहत राहतें ! आजकालच्या जगांत इतकें स्वस्त होणें म्हणजे आपली किंमत आपण कमी करून घेणें आहे हेंहि त्या वेड्याला कळत नाही ! डोळे दिपविण्यासारखें तर त्याच्यापाशीं कांहीच नाही. वास्तविक

झंझावातापेक्षा त्याचें कार्य अधिक विधायक आहे. तो उन्मत्त वारा कडाकड झाडें उपटून छिन्नभिन्न करून टाकतो. एखाद्या खोडकर मुलानें कचकड्याची खेळणीं मोडावीं तशीं. पण हिवाळ्यांतलें वारें वृक्षवेलींवरलीं सर्व जीर्ण पर्णे हसत खेळत अगदी हलक्या हाताने दूर करतें. आईने तान्हुल्याच्या डोळ्यांतलें काजळ पदराच्या टोकाने पुसावें त्याप्रमाणे तीं पिवळीं पानें केव्हा गळून पडलीं हें त्या झाडाझुडपांना अनेकदा कळतसुद्धा नाही. पण नव्या पालवीची पूर्वतयारी करणाऱ्या या वाऱ्याचें कौतुक करण्याइतकी रसिकता आपल्यांत आहे कुठे! आम्ही गर्जना करीत येणाऱ्या उग्र क्रांतीच्या सौंदर्यावर लुब्ध होतों. पण खाली मान घालून निश्चयाने एकेक पाऊल पुढे टाकणाऱ्या उत्क्रांतीचें लावण्य मात्र कांहीं केल्या आमच्या नजरेंत भरत नाही.

याचें कारण एकच आहे असें मला वाटतें. आपण गेलीं शंभर वर्षें जीवनाकडे फक्त काव्यमय दृष्टीने पाहूं लागलों आहों. पण जीवन हा जसा काव्याचा तसाच तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे! त्याला ज्ञानेश्वरीचीच उपमा शोभेल. ही जाणीव प्राचीन भारतीय संस्कृतींत निःसंशय होती. अलीकडे मात्र तिचा आपल्याला विसर पडूं लागला आहे. त्या संस्कृतींत मृत्यु हा जन्माइतकाच पवित्र आणि काव्यमय मानला गेला आहे. गीतेंतील शरीराला दिलेली वस्त्राची उपमा जीवनाचें किती सुंदर आणि विशाल दर्शन आपल्याला घडवितें. मृत्यु म्हणजे जुनें फाटकें वस्त्र टाकून नवें सुंदर वस्त्र परिधान करण्याची अनुभूति. या कल्पनेंत उदात्त भावना जागृत करण्याचें केवढें सामर्थ्य आहे! मृत्यूचें सत्य स्वरूप जाणून घेण्याकरिता निर्भयपणाने त्याच्याकडे जाणाऱ्या नचिकेतासारख्या बालकाची कथा इतर कुठल्याहि संस्कृतींत सापडणार नाही असें मला वाटतें.

मृत्युप्रमाणे वार्धक्यहि मनुष्याला स्वागतार्ह वाटलें पाहिजे. तसें पाहिलें तर म्हातारपणांत अस्वाभाविक असें काय आहे? पण माणसाला सृष्टींतला काय किंवा आपल्या आयुष्यांतला काय हिवाळा बिलकूल आवडत नाही! डोक्यावर पांढरे केस डोकावूं लागले की, आधुनिक मनुष्याचे डोळे

पांढरे होतात. तो वर्तमानपत्रांतल्या कलपांच्या जाहिराती शोधूं लागतो. शुभ्रपणा हा संस्कृत कवींनी यशाचा रंग कल्पिला आहे असें त्याला कुणीं सांगितलें तर त्याला तें खरें सुद्धा वाटत नाही! ही केस पांढरे होऊं लागणाराची स्थिति. मग ज्याच्या डोक्याला टक्कल दिसूं लागलें आहे त्याचे हाल तर विचारायला नकोत! नाटककंपन्या व सिनेमा कंपन्या कुठल्या दुकानांतून दाढीमिश्या पैदा करतात याची पूसतपास करण्यांत त्याचा सारा वेळ खर्च होतो. या महागाईच्या काळांत आयता केस कापण्याचा खर्च कमी झाला असा विनोदी विचार त्याला कांही केल्या सुचत नाही; मग 'खल्वाटो निर्धनः क्वचित्' (टकल्या बहुधा श्रीमंत असतो) या संस्कृत वचनाने त्याचा जीव कसा भांड्यांत पडणार?

ही वार्धक्याची भीतिसुद्धा आपल्या संस्कृतींतल्या एका उच्च जीवनमूल्याचा आपल्याला विसर पडत चालला आहे हेंच दर्शविते. सार्त्र या प्रख्यात फ्रेंच लेखकाच्या 'Age of reason' या कादंबरींत अशीं अनेक पात्रें आपल्याला आढळतात. त्यांची पुरती पंचवीशीसुद्धा उलटलेली नसते. पण आपलें तारुण्य लवकरच संपणार या विचाराने तीं अधूनमधून बेचैन होतात! हातांतल्या उपभोगाच्या पेल्याचा तळ त्यांना स्पष्टपणें दिसूं लागतो. अधाशीपणाने शरीरसुख लुटण्याची इच्छा त्यांच्या मनांत बळावते. तारुण्यांतल्या उपभोगाखेरीज जीवनाला कांही अर्थ आहे हें बिचाऱ्यांच्या लक्षांत येतच नाही!

ही मनोवृत्ति अस्वाभाविक आहे असें मी म्हणत नाहीं. पण ती किती एकांगी आहे हें सूचित करण्याकरिताच महाभारतकाराने ययातीची कथा सविस्तर सांगितली आहे. ययाति राजाचें तारुण्य संपलें तेव्हा त्याने सर्व प्रकारचे उपभोग मनसोक्त घेतले होते; पण भोग भोगून माणसाची तृप्ति कधीच होत नाही. ययाति असाच अतृप्त राहिला होता. तो वार्धक्याचें स्वागत करायला तयार होईना. त्याने आपल्या साऱ्या मुलांना बोलावून आणलें आणि तो त्यांच्यांशी एक सौदा ठरवूं लागला. जो मुलगा आपलें यौवन देऊन पित्याचें वार्धक्य घ्यायला तयार होईल त्याला राज्य द्यायला

शरीराचा गुलाम झालेला ययाति तयार झाला ! मला अनेकदा वाटतें, ‘ किंग लियरसारखें ’ एखादें अतिशय प्रभावी नाटक ययातीच्या कथेवर लिहितां येईल. त्या नाटकांतला हा सौद्याचा प्रवेश जेव्हा रंग-भूमीवर सुरू होईल तेव्हा ययातीच्या पात्राची प्रेक्षकांकडून कशी संभावना होईल याची कल्पना करतांनासुद्धा माझ्या अंगावर काटा उभा राहतो ! ज्याला आपण जन्म दिला त्याचें तारुण्य विकत घ्यायचें ? क्षणिक शरीर-सुखाच्या मोहासाठी आपल्या पोटच्या गोळ्याला—

छे: ! मनुष्य कितीहि स्वार्थी असला, सुखलंपट असला तरी त्याच्या हातून हें अधम कृत्य होणार नाही. पण तें करून तरी ययातीने काय मिळविलें ? तृप्ति ? छे ! तृप्ति हा मनाचा धर्म आहे. शरीराचा नाही. मुलाचें तारुण्य विकत घेऊन ययाति पुन्हा कैक वर्षें सर्व सुखोपभोग भोगीत राहिला, पण त्याचें समाधान झालें नाही. मग त्याला जीवनांतलें अंतिम सत्य उमजलें. तो वानप्रस्थ झाला.

या वानप्रस्थाश्रमाच्या कल्पनेंत भारतीय संस्कृतीचें सारे उदात्तत्व प्रतिबिंबित झालें आहे. हिवाळ्याचें मी स्वागत करतों तें हा काळ माझ्या प्रकृतीला मानवतो म्हणून नव्हे. तर या ऋतूंत मला सारी सृष्टि वानप्रस्थ झाल्याचा साक्षात्कार होतो म्हणून. वाळलेलें, पिवळें पडलेलें गवत मला वानप्रस्थाच्या वैराग्यानुकूल वेषाची आठवण करून देतें. वाळ-लेलीं पानें पटापट खाली पडल्यामुळे निष्पर्ण होत चाललेल्या वृक्षवेली पाहिल्या की सांसारिक सुखदु:खें दूर लोटून अलिप्ततेने जीवनाकडे पाह-णारें त्याचें मन दिसूं लागतें. मग वसंत ऋतूंतलें काव्य आणि वर्षाकालांतलें नाट्य यांना माझ्या मनांत तत्त्वज्ञानाची जोड मिळते आणि जीवनाच्या परिपूर्ण स्वरूपाचें एक निराळेंच चित्र डोळ्यापुढे उभें राहतें.

हें सारें खरें असलें तरी दुसरीहि एक गोष्ट तितकीच खरी आहे. कालपासून मोठं गार वारं सुटलंय् ! आणि माझा स्वेटर तर फार जुना झाला आहे. दुसरा नवीन स्वेटर कांही करून आजच्या आज विकत घेत-लाच पाहिजे !

१९५१

# ४

# फिरायला जाणें

केवळ खाण्यापिण्यांत, वस्त्रांच्या रंगांत किंवा वाङमयविषयक मतांतच माणसांच्या आवडीनिवडी निराळ्या असतात असें नाही. अगदी लहान गोष्टींत सुद्धा जवळ जवळ राहणाऱ्या दोन माणसांत दोन ध्रुवांचें अंतर असूं शकतें. आपल्याकडे स्वत:च्या आवडीनिवडी मोकळेपणानं सांगण्याची पद्धत नाही. ती असती तर एकमेकांवर उत्कट प्रेम करणाऱ्या पतिपत्नींचं दांपत्यजीवन संध्याकाळचा सांजा गोड असावा की तिखट असावा या खडकावर आपटून त्याच्या ठिकऱ्या होण्याचे प्रसंग निर्माण होतात, हें जगाला सहज दिसून आलें असतें.

साधी फिरण्याची गोष्ट घ्या. तसें पाहिलें तर फिरायला जाण्यांत प्रत्येकाच्या अशा काय आवडीनिवडी असायच्या आहेत ? पाय मोकळे करायचे एवढाच घराबाहेर पडण्यांत माणसाचा हेतु असतो. निदान प्रथमदर्शनीं तसें वाटतें खरें ! पण फिरण्यांत सुद्धा नाना प्रकार आहेत. विविध आवडी आहेत. त्यांतल्या कित्येक वयावर अवलंबून असतात. शनिवारीं अगर रविवारीं शाळकरी मुलगा फिरायला म्हणून बाहेर

पडला की त्याचे पाय क्रिकेटच्या क्रीडांगणाकडे वळलेच म्हणून समजावें ! पेन्शनर मंडळी सकाळीं फिरायला जातात ती एका धोंड्याने दोन पक्षी मारण्याकरिता ! आपल्याला दीर्घकाळ पेन्शन उपभोगतां यावें, ही त्यांची इच्छा आरोग्याच्या सदरांत घालतां येईल. पण हे सारे एकसष्टी साजरे झालेले लोक फिरायला जाण्याच्या वाटेवर एखादें देऊळ असलेंच पाहिजे अशी दक्षता घेतात. पहिला धोंडा चुकून लागला नाही तर देवदर्शनाने मिळणारें पुण्य तरी पदरांत पडेल आणि त्याच्या बळावर स्वर्गात आपल्याला शेर-अच्छेर अधिक अमृत पैदा करतां येईल, असा त्यांचा कयास असावा !

मनुष्य कुठे फिरायला जातो हें वयाप्रमाणे त्याच्या स्वभावावरहि अवलंबून आहे. माझे एक मित्र आहेत. त्यांना नेहमी म्युनिसिपालिटीनें तयार केलेल्या गांवांतल्या छोट्या बागांत फिरायला जाणें फार आवडतें. पहिल्या पहिल्यांदा मला वाटलें, हा गृहस्थ कविता करीत नसला तरी अंतःकरणाने कवि असावा. बालकवींना जसें निसर्गाचें वेड होतें तसा त्यालाहि फुलांचा शोक असेल. असल्या माणसाला शहरांत फुलांच्या दुकानाखेरीज दुसरीकडे फुलें कुठें पाहावयाला मिळणार ? तेव्हा आपली हौस भागविण्याकरिता तो या बागांत जाऊन बसत असावा.

पण या बाबतींत लवकरच माझा भ्रमनिरास झाला. स्वारी अशा बागांत जेठा मारून बसते ती विविध रंगांचीं फुलें डोळे भरून पाहण्याकरिता नाही तर पोटभर चुरमुरे खाण्याकरिता, हें मला लवकरच कळून चुकलें !

फिरायला म्हणून घरातून बाहेर पडून लायब्ररींत जाऊन बसणारे आणि प्रत्येक दैनिक पत्रांतलें अक्षर नि अक्षर वाचणारे लोक कुणी पाहिले नाहीत ? फिरायला म्हणून निघालेले व वाटेवरल्या एखाद्या दुकानांत बैठक मारून पान तंबाखू चघळत बसलेले हरीचे लाल आपण नित्य पाहतों. चेहेऱ्यावरून मनुष्यस्वभाव सांगण्याचें शास्त्र दिवसेंदिवस प्रगति करीत आहे असें मीं परवाच कुठे तरी वाचलें. माणसाच्या तळ-

हाताचे ठसे घेऊन तो कितपत सच्चा किंवा लुच्चा आहे हेंहि सहज सांगतां येतें म्हणे ! पण मला वाटतें, माणूस ओळखायला इतक्या खोल पाण्यांत जाण्याची मुळीच जरुरी नाही. मनुष्य केव्हा आणि कुठे फिरायला जातो एवढें नक्की कळलें तरी त्याचा स्वभाव त्यावरून निश्चित करतां येईल.

माझाच अनुभव सांगतों. शहराच्या गजबजलेल्या भागांतून अगदी पाय दुखेपर्यंत भटकलों तरी आपण फिरलों असें मला वाटत नाही. नटून-थटून मिरविणारे आणि झकपक पोषाख करून चाललेले स्त्री-पुरुष जेव्हा राजमार्गावरल्या गर्दीत मला दिसतात, तेव्हा एक कल्पना माझ्या मनांत हटकून येते – हीं माणसं फिरायला निघालेलीं नाहीत. तीं आपल्या रूपाचें, आपल्या संपत्तीचें किंबहुना आपल्या शिंप्याच्या कौशल्याचें प्रदर्शन करायला घराबाहेर पडलीं आहेत. जिथे गर्दी असेल तिथेच तीं घिरट्या घालीत राहणार !

गर्दी आणि फिरणें या दोन शब्दांचा मेळ मला मात्र घालतां येत नाही.. चित्रविचित्र जमावापासून, आंधळ्या धावपळीपासून आणि वाहनांच्या कलकलाटापासून दूर जातां आलें तरच माझें मन प्रसन्न होतें. मी फिरायला जात असलेल्या रस्त्यानें गुराखी किंवा खेडेगावाहून शहराकडे येणारीं माणसें भेटलीं तरी माझ्या रंगाचा भंग होत नाही. पण कुणीतरी ओळ-खीचे शिष्ट दिसले आणि कसं काय आहे म्हणून त्यांनी मला हटकलें की माझ्या कपाळाला आठी पडते. फिरायला जाणें ही माझ्या दृष्टीने काव्य रचण्यासारखी, चित्र काढण्यासारखी, संगीत-साधनेसारखी कला आहे. जेवढा एकांत लाभेल, आपल्याच नादांत जितकें अधिक गुंगून राहतां येईल, तितका या कलेचा विलास आनंददायक होतो.

हा विलास पावसाळ्यांतच मनसोक्त उपभोगायला मिळतो. त्यामुळे पडसें-खोकल्यानें वारंवार माझी प्रकृति नादुरुस्त होत असली तरी पावसाळा मला फार आवडतो. उन्हाळ्यांत सकाळीं आठ वाजतांच ऊन असें तापूं लागतें की, पुराणें वाचलेल्या मनुष्याला दुर्वास आणि जमदग्नि यांचीच आठवण व्हावी ! यामुळे सारीं फिरणारीं माणसें लवकर घराबाहेर

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों: दि:



पडतात. ज्याला चुकवायची इच्छा असते तोच दत्त म्हणून अशा वेळीं आपल्यापुढे उभा राहतो. आणि मग आपल्या फिरण्याला प्रत्येक स्टेशना-वर थांबणाऱ्या मालगाडीची कळा येते. जातां जातां वाटेंत भेटणाऱ्या विविध विभूतींशीं तोंड द्यायला मनुष्य चौदा विद्या आणि चौसष्ट कला यांत अगदी पारंगत असावा लागतो. एक तिसऱ्या महायुद्धाबद्दल तुम-च्याशीं जोरजोराने चर्चा आरंभतो, तर दुसरा संतति-नियमनाबद्दल तुमचें काय मत आहे तें पोटांत शिरून हळूच काढून घेऊं इच्छितो. एका शरीरश्रीमंत गृहस्थाने तर माझ्या प्रकृतीची कीव करून भर बागेंत मला सूर्यनमस्कार शिकवायला सुरवात केली. त्या वेळीं कुणी फोटो-ग्राफर हजर नव्हता हें माझें भाग्य, नाहीतर त्या फोटोग्राफरला विनोदी चित्राबद्दल बक्षीस मिळवून देण्याच्या कामीं माझा हातभार खास लागला असता !

उन्हाळ्याप्रमाणे हिवाळ्यांतहि नको असलेलीं माणसें हटकून भेटतात. त्या दिवसांत ऊन थोडें वर आल्याखेरीज कोणीच घराबाहेर पडत नाही. साहजिकच जातां येतां सर्वांचे सलाम आपल्याला स्वीकारावे लागतात. तोंडदेखले कां होईना दोन शब्द प्रत्येकाशी बोलणें भाग पडतें अशा एका हिवाळ्याची मला जन्माची आठवण राहिली आहे. एका सद्गृह-स्थाशी गप्पा मारतां मारतां विजयनगरच्या राज्याच्या पार्श्वभूमीवर एक ऐतिहासिक कादंबरी लिहिण्याचा संकल्प मीं चुकून बोलून दाखविला. ते गृहस्थ पशुवैद्य असल्यामुळे फार तर विजयनगरच्या सैन्यांतल्या घोड्या-विषयी मला थोडी जादा माहिती सुनावतील अशी माझी कल्पना होती. पण दुसऱ्या दिवशीं फिरायला येतांना त्यांनी बरोबर जुन्या कागद-पत्रांचा एक रुमालच आणला. माझें मोडीचें ज्ञान बेताबाताचेंच असल्या-मुळे ते सारे कागद वाचायला आपला उभा जन्म पुरणार नाही अशी माझी खात्री झाली. पण ते गृहस्थ कांही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. दुसऱ्या दिवशीं त्यांनी पहिलीचें मोडी पुस्तकच खिशांत घालून आणलें. टेकडीवरल्या एका झाडाखाली वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षीं माझें खंडित

घरांतल्या टबांत बसून नदीस्नानाचें सुख कधी कुणाला मिळेल का? कवि टिळकांनी सृष्टीला 'कामरूपिणी' म्हटलें तेव्हां त्यांच्या डोळयांपुढे कुठलें मोहक चित्र उभें होतें याची मला कल्पना नाही. पण हें विशेषण जितकें काव्यमय तितकेंच सार्थ आहे. पावसाळयांत सकाळीं, दुपारीं, तिसऱ्या प्रहरीं, संध्याकाळीं, रात्रीं, केव्हाहि पाहा, सृष्टीचीं जीं भिन्न भिन्न रूपें दिसतात तीं किती मनोहर असतात!

मागच्याच महिन्यांत सकाळीं दहा वाजतां पश्चिमेकडे पडलेलें विशाल इंद्रधनुष्य मीं पाहिलें. तें दृष्टीला पडलें मात्र. आकाशाच्या त्या भावगीताच्या सुरांनी मुग्ध होऊन मी जागच्या जागीं खिळून राहिलों. आभाळाच्या या टोकापासून त्या टोंकापर्यंत तें पसरलें होतें. पांच मिनिटांतच तें पुसट होऊं लागलें. पण त्या पांच मिनिटांत माझें मन अमर आनंदाने न्हाऊन निघालें. त्याचे ते तीन सुंदर पट्टे पाहून जसा आपला राष्ट्रध्वज माझ्या डोळयापुढे उभा राहिला, तसा त्याच दिवशीं सकाळीं एका मित्राबरोबर झालेला वादविवादहि मला आठवला. आत्म्याची बधिरता हा आजच्या जगाला झालेला मोठा रोग आहे. या रोगाने ग्रासलेल्या जगांत यापुढें निर्भेळ आनंद मनुष्याला मिळणें अशक्य आहे असें या स्नेह्याने तावा-तावाने प्रतिपादन केलें होतें. तें इंद्रधनुष्य पाहतांना माझ्या मनांत आलें, तो इथे असायला हवा होता. म्हणजे त्याला वर्ड्स्वर्थच्या 'डॅफोडिल्स' या कवितेचें मर्म उमगलें असतें. मनुष्य कितीहि क्रूर झाला तरी जगांतल्या सर्व अविनाशी आनंदाची हत्या तो कधीच करूं शकणार नाही. जलाशयाच्या काठीं रांगेने फुललेली ती पुष्पमालिका वर्ड्स्वर्थने एक-दाच पाहिली. पण त्या एका क्षणाने आपल्याला जन्मभर पुरणारें आनंदाचें निधान दिलें, हें त्याच्या कविमनाने ओळखलें.

इंद्रधनुष्य हा क्वचित् दिसणारा स्वर्गीय चमत्कार आहे, असें मानलें तरी स्वच्छंदाने फिरतां फिरतां भोवताली जें पार्थिव सृष्टिसौंदर्य दिसतें तें सुद्धा मला मोहून टाकतें. पावसाळयाबरोबर वाढणारें साधें गवत पाहा. किती विविध आणि मोहक रंग असतात त्याचे! कधी पोपटी, कधी

काळसर हिरवें, मग किंचित् पिवळसर हिरवें, असें वस्त्र नेसून तृणदेवता जेव्हा माझ्यापुढे उभी राहते, तेव्हा चिमण्या चिमण्या फुलांनी नटलेल्या निसर्गाच्या त्या गालिचावर रात्रीं वनदेवता मोठ्या आनंदाने नृत्य करायला येत असाव्यात, अशी कल्पना माझ्या मनांत आल्यावाचून राहत नाही. आणि दूरवर पसरलेलीं शेतें सुद्धा वायुलहरीबरोबर डुलतांना किती सुंदर वाटतात ! आभाळ अंधारून आलें म्हणजे शेतांतल्या बालअन्नपूर्णेच्या मुद्रेवर जे भाव उमटतात, त्याचें चित्रण कुशल चित्रकार सुद्धा करूं शकेल की नाही याची शंकाच आहे. अशा वेळीं दूरचे डोंगर पाहण्यांत सुद्धा मोठी मौज असते. ते मध्येच निळे, मध्येच जांभळे, मध्येच काळेसावळे दिसूं लागतात. जणुं कांही ते विश्वाच्या रंगभूमीवरले नट असून प्रकाशयोजनेमुळे क्षणाक्षणाला निराळे दिसत आहेत !

पण एकट्याने स्वच्छंद फिरण्यांत नुसतें काव्यच नाही. त्या काव्याला तत्त्वज्ञानाची सुंदर किनारहि आहे. आजच्या गर्दीच्या आणि धावपळीच्या जगांत मनुष्य नकळत फार बहिर्मुख होऊं लागला आहे. तो घड्याळाचा गुलाम झाला आहे. यंत्र हा आपला फार जवळचा मित्र आहे असें त्याला वाटूं लागलें आहे. मानवी जीवनांतलें कोळशाचें स्थान त्याला पूर्णपणें कळतें. त्याच्याशिवाय आपली दुपारची वेळ निभावणार नाही हें तो पुन:पुन्हा स्वत:ला बजावतो व इतरांना सांगत सुटतो. पण त्या कोळशांइतकीच फुलांनाहि आपल्या आयुष्यांत जागा आहे, ती नसली तर करून दिली पाहिजे, याची मात्र त्याला विस्मृति पडत आहे. घरांत, बाजारांत, कचेरींत, आगगाडींत, सर्वत्र त्याला पैशाची पूजा होत असलेली दिसते. न कळत तोहि द्रव्यदेवाभोवती प्रदक्षिणा घालूं लागतो.

या अंध आणि अखंड प्रदक्षिणांचें भेसूर सत्य-स्वरूप एकटेंच फिरतांना मला प्रतीत होतें. लोभ-क्रोधाच्या किंवा मद-मोहाच्या आहारीं जाऊन आपल्या हातून जीं कृत्यें घडतात, त्यांची क्षुद्रता अशा वेळींच मनाला तीव्रतेने जाणवते. व्यवहाराच्या मूल्यांपेक्षा अधिक श्रेष्ठ अशीं मूल्यें जीवनांत आहेत, हें आत्मपरीक्षण करतां करतांच आपल्याला कळूं शकतें. फिर-

ण्याच्या निमित्ताने कां होईना, दिवसाकाठी तास दीड तास आपण वानप्रस्थाश्रमांत प्रवेश करतों असें मला वाटतें. फिरायला घराबाहेर पडतांना माझें मन खिन्न किंवा क्षुब्ध असलें तरी फिरून परत येतांना तें प्रसन्न होतें. जणुं कांही त्या मधल्या दोन घटकांत एक अदृश्य पाऊस माझ्या मनांत पडून जातो. त्याच्यामुळे तिथली सारी धूळ खाली बसते. अंगाला राख फासल्यासारखीं दिसणारीं पानें-फुलें हिरवींगार होतात, हसूं लागतात.

म्हणूनच मला अनेकदा वाटतें, समाजाच्या सुधारणेकरिता सरकारने इतर कायदे करण्यापेक्षा प्रत्येकाने दररोज तासभर गावाबाहेर एकट्याने फिरून आलें पाहिजे असा कायदा प्रथम करावा.

पण सारे लोक गावाबाहेर फिरायला पडल्यावर प्रत्येकाला एकान्त कसा मिळणार, हा प्रश्नच आहे म्हणा !

१९५०

५

# आडवी रेघ

माणसाचें आत्मप्रेम किती आंधळें असतें !

कुठल्या तरी वाचनमालेने माझा एक वेचा निवडला होता. तें पुस्तक आज हातीं पडलें. कुतूहलाने मीं तें उघडलें. दोन तीन धडे चाळून झाले नाहीत तोंच अशा पुस्तकांच्या शेवटीं लेखकांचा परिचय दिलेला असतो हें मला आठवलें. मी मारुतीसारखी उडी मारली. मधले सुंदर वेचे गाळून लगबगीने शेवटचीं पानें चाळूं लागलों.

परिचयाच्या चार ओळींत तो बिचारा संपादक माझ्याविषयी असें काय महत्त्वाचें लिहिणार होता ? पांच-पांचशे पानांचीं चरित्रें वाचून जिथे माणूस मूर्तिमंत डोळ्यांपुढे उभा राहत नाही, तिथे पांचदहा वाक्यांत कुणी झालें तरी एखाद्याची ओळख काय कपाळ करून देणार ? आणि खरें सांगूं ? आपण किती चांगले आणि किती वाईट आहोंत, आपली खरी लायकी काय आहे हें जगांत इतरांना कधीच कळत नाही. तें फक्त आपलें आपल्यालाच ठाऊक असतें. जगाला नेहमी आपली चांगली बाजू दिसावी म्हणून आपण धडपडत असतों. त्याकरितां आपण बुरखे घेतों,

ण्याच्या निमित्ताने कां होईना, दिवसाकाठी तास दीड तास आपण वानप्रस्थाश्रमांत प्रवेश करतों असें मला वाटतें. फिरायला घराबाहेर पडतांना माझें मन खिन्न किंवा क्षुब्ध असलें तरी फिरून परत येतांना तें प्रसन्न होतें. जणुं कांही त्या मधल्या दोन घटकांत एक अदृश्य पाऊस माझ्या मनांत पडून जातो. त्याच्यामुळे तिथली सारी धूळ खाली बसते. अंगाला राख फासल्यासारखीं दिसणारीं पानें-फुलें हिरवींगार होतात, हसूं लागतात.

म्हणूनच मला अनेकदा वाटतें, समाजाच्या सुधारणेकरिता सरकारने इतर कायदे करण्यापेक्षा प्रत्येकाने दररोज तासभर गावाबाहेर एकट्याने फिरून आलें पाहिजे असा कायदा प्रथम करावा.

पण सारे लोक गावाबाहेर फिरायला पडल्यावर प्रत्येकाला एकान्त कसा मिळणार, हा प्रश्नच आहे म्हणा !

१९५०

५

# आडवी रेघ

माणसाचें आत्मप्रेम किती आंधळें असतें !

कुठल्या तरी वाचनमालेने माझा एक वेचा निवडला होता. तें पुस्तक आज हातीं पडलें. कुतूहलाने मीं तें उघडलें. दोन तीन धडे चाळून झाले नाहीत तोंच अशा पुस्तकांच्या शेवटीं लेखकांचा परिचय दिलेला असतो हें मला आठवलें. मी मारुतीसारखी उडी मारली. मधले सुंदर वेचे गाळून लगबगीने शेवटचीं पानें चाळूं लागलों.

परिचयाच्या चार ओळींत तो बिचारा संपादक माझ्याविषयी असें काय महत्त्वाचें लिहिणार होता ? पांच-पांचशे पानांचीं चरित्रें वाचून जिथे माणूस मूर्तिमंत डोळ्यांपुढे उभा राहत नाही, तिथे पांचदहा वाक्यांत कुणी झालें तरी एखाद्याची ओळख काय कपाळ करून देणार ? आणि खरें सांगूं ? आपण किती चांगले आणि किती वाईट आहोंत, आपली खरी लायकी काय आहे हें जगांत इतरांना कधीच कळत नाही. तें फक्त आपलें आपल्यालाच ठाऊक असतें. जगाला नेहमी आपली चांगली बाजू दिसावी म्हणून आपण धडपडत असतों. त्याकरितां आपण बुरखे घेतों,

मुखवटे चढवितों, नाना तऱ्हांचीं नाटकें करतों, वेषभूषेपासून शिष्टाचारापर्यंत अनेक बंधनें मनुष्य स्वतःवर लादून घेतो तीं केवळ या एका हेतूने ! आपल्यांतला नायक तेवढा जगाला दिसावा आणि त्याच्या हातांत हात घालून फिरणारा खलनायक सदैव पडद्याआड राहावा म्हणून ?

हें सारें कळत असूनहि त्या पुस्तकाच्या शेवटीं दिलेला स्वतःचा परिचय वाचण्याचा मोह कांही मला आवरला नाही.

मी तो वाचूं लागलों मात्र ! माझ्या मनाला एकदम असा धक्का बसला म्हणतां ? मीं तें पुस्तक रागाने दूर भिरकावून दिलें !

त्या संपादकाने माझ्याविषयी तसें कांहीं वेडवाकडें लिहिलें नव्हतें ! 'या सद्गृहस्थांनी लहानपणीं वडिलांच्या खिशांतून पैसे चोरून पेढे खाल्ले आहेत !' असें किंवा असेंच कांही दुसरें त्याने लिहिलें असतें तर चित्रगुप्तालासुद्धा तें खोडून काढतां आलें नसतें ! पण तो संपादक खरोखरच सभ्य गृहस्थ होता !

मला धक्का बसला तो दुसऱ्याच गोष्टीने—एका रेघेने ! माझा जन्मसन लिहून त्याच्यापुढे त्या संपादकाने एक आडवी रेघ छापून टाकली होती ! फुलांच्या पायघड्यांवरून ऐटींत मिरवायला जाणाऱ्या विहिणीच्या पायांत काटा शिरावा ना ? तशी माझी स्थिति झाली ती आडवी रेघ पाहून ! ती रेघ माझ्याकडे पाहून मिस्किलपणाने म्हणत होती, 'जन्म आणि मृत्यु यांना जोडणारा पूल आहे मी. वेड्या माणसा, या पुलावरून पलीकडे जायला तूं तयार नाहीस, पण एक गोष्ट लक्षांत ठेव. आज ना उद्या, कधी ना कधी, तुला या पुलावरून पैलतीराला जावंच लागेल ! आणि मग काय होईल ठाऊक आहे ? या पुस्तकाच्या संपादकाला इथं सुधारणा करावी लागेल. माझ्यामागं ज्याप्रमाणें एक सन आहे त्याप्रमाणं पुढं एक सन त्याला छापावा लागेल !'

ती आडवी रेघ छापून टाकणाऱ्या संपादकाचा असा संताप आला मला ! हा इसम 'शुभ बोल रे नाऱ्या' मधल्या 'नारायणरावा'चा थोरला भाऊ असावा असें माझ्या मनांत आलें. मरण हें प्रत्येकाच्याच

मार्गे लागलें आहे ! 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' हा श्लोक काय मला पाठ येत नाही ? म्हणून काय या शहाण्याने माझें मरण असें सूचित करायचें ? त्याने ती आडवी रेघ छापली नसती तर स्वतःच्या मृत्यूचा अभद्र विचार माझ्या मनांत कशाला आला असता ? मनांतल्या मनांत मी त्या संपादकाला शिव्यांची लाखोली वाहूं लागलों. या पुस्तकाच्या पुढल्या आवृत्तींत माझा वेचा छापूं नका असें पत्र ताबडतोब त्याला पाठविण्याचा निश्चय मीं केला. तावातावाने उठलों एक कार्ड घेतलें—

पण त्याला काय लिहावें हें मला कळेना. अशुभ अथवा अभद्र बोलूं नये हा सामाजिक शिष्टाचार ठीक आहे. पण तो त्याने कुठे मोडला होता ? लेखकांतले अनेक लोक कैलासवासी झाले होते. त्यांच्या जन्माप्रमाणे मृत्यूचे सन देणेंहि आवश्यक होतें. साहजिकच सर्वांच्या जन्मापुढे एक आडवी रेघ त्या संपादकाने छापून टाकली असावी ! सप्त चिरंजिवांपैकी मी एक असतों तर गोष्ट निराळी ! मग त्याला या बाबतींत हुडसून खडसून विचारतां तरी आलें असतें ! हें सारें मनांत येतांच त्या संपादकापेक्षा स्वतःचाच अधिक राग आला मला ! मरणाच्या कल्पनेला भिणारें माझें मन वडचाचें तेल वांग्यावर काढीत होतें हेंच खरें !

माणसाने इतकें घाबरून जावें असें मरणांत तरी काय भयंकर आहे ? दिवस आणि रात्र यांच्याप्रमाणे जन्म आणि मृत्यु हीसुद्धा जुळीं भावंडें नाहीत का ? हें खिडकींतून दिसणारें समोरचें गुल्मोहराचें झाड, किती सुंदर आणि नाजूक दिसते याची पालवी ! पण हीच पालवी हां हां म्हणतां गळून पडते हें आपण दर वर्षी पाहत नाहीं का ? मनुष्यप्राणी या पालवीपेक्षा काय निराळा आहे ? तोसुद्धा विश्वाच्या विशाल वृक्षावरलें एक चिमुकलें पानच नाही का ? तें पान अगदी पिकून गळून पडेल किंवा अर्धवट हिरवें असतांनाच झंझावात त्या झाडाशीं झोंबायला लागल्यावर निखळून धरणीवर येईल. तो योगायोगाचा भाग आहे. पण आज ना उद्या या गुल्मोहराची सारी पालवी झडून जाणार आणि तिथे नवी पालवी हसूं लागणार हें शंभर टक्के सत्य आहे. मग—

मी माझ्या मनाला मारून मुटकून तत्त्वज्ञानी बनवीत होतों. पण मनुष्य स्वभावत: कवि आहे, तत्त्वज्ञ नाही. माझें मन मध्येंच उसळून म्हणालें, 'तुझी ही घटपटादि खटपट बंद कर! अरे दीडशहाण्या, मनुष्य हा जड सृष्टीपेक्षा निराळा प्राणी आहे. प्रेम आणि द्वेष, त्याग आणि भोग, विचार आणि विकार, सुख आणि दु:ख यांच्या लाटांवर हेलकावे खात तो जगतो म्हणूनच त्याला मरणाचं इतकं भय वाटतं. जीवनांतलीं हीं सूक्ष्म आंदोलनं ज्यांना जाणवत नाहीत त्यांचीं उदाहरणं देऊन मला ब्रह्मज्ञान शिकविण्यांत काय अर्थ आहे?'

मृत्यूला न भिणाऱ्या माणसांचीं उदाहरणें मी शोधूं लागलों. मूर्तिमंत यमधर्माला भेटणारा नचिकेत, मुलाच्या मरणाने वेडया झालेल्या आईला जिथे कुणी मेलेलें नाही अशा घरांतून तेल आणायला सांगणारा बुद्धदेव, पतीच्या चितेवर हसत चढणाऱ्या प्राचीन काळांतल्या सती, ऐतिहासिक काळांत जोहार करणाऱ्या शूर रजपूत स्त्रिया, देशाकरिता हसत फासावर चढणारे भगतसिंगासारखे आधुनिक काळांतले तरुण—या सर्वांचें मीं स्मरण केलें. पण माझ्या भित्र्या मनाचें समाधान होईना. या सर्व उदाहरणांतून फक्त एकच गोष्ट सिद्ध होत होती. मरण ही एक सृष्टींतली अपरिहार्य गोष्ट आहे आणि मृत्यूपेक्षा ज्यांचें महत्त्व मनुष्याला अधिक वाटतें अशी जीवनांत अनेक मूल्यें आहेत.

मला हें मान्य आहे. पण एवढ्यासाठी माणसाने मरण मंगल मानून त्याला मिठी मारायची? असे अटीतटीचे किंवा आणीबाणीचे प्रसंग आयुष्यांत काय हरघडीं येतात? अशा प्रसंगीं काय सारींच माणसें मृत्यूचें हंसतमुखाने स्वागत करतात? पौराणिक काळांतला नचिकेत असो नाही तर विसाव्या शतकांतला जतींद्र असो, लाखांत असा माणूस एखादाच निघायचा! सामान्य लोकांनी त्याची आदर्श म्हणून पूजा करावी हें स्वाभाविक आहे. पण पूजा म्हणजेच त्या पायरीला पाय लावायची आपली पात्रता नाही अशी उघड उघड दिलेली कबुली नाही का? आदर्श हा नेहमी अपवाद म्हणूनच आढळायचा. मग माझ्यासारखा सामान्य माणूस

मरणाला भितो यांत गैर असें काय आहे ?

पूर्वीच्या काळची गोष्ट निराळी होती. त्या वेळीं मरणोत्तर मिळणाऱ्या स्वर्गाकडे सर्वांचे डोळे लागलेले असत. सामान्य मनुष्यानें स्वर्गावर विश्वास ठेवावा अशीच त्या वेळची परिस्थिति होती. स्वर्गांत अष्टौप्रहर स्वस्थ बसायला मिळतें ही समजूत जन्मभर मर-मर काम करणाऱ्या मनुष्याला त्या काळीं केवढा दिलासा देत असेल ? एखाद्या कुरूप आणि कजाग बायकोशीं जन्माची गांठ पडलेल्या त्या युगांतल्या पुरुषाला स्वर्गांत फक्त सुंदर अप्सराच असतात या कल्पनेनें केवढा आनंद होत असेल आणि तिथे प्यायला मिळणारें तें अमृत ! तें भरपूर पिऊन घेतलें म्हणजे मरणाचें मुळी भयच बाळगायला नको !

पाहिलंत ! स्वर्गात गेल्यावर सुद्धां मनुष्याच्या मनांत मृत्यूचें भय शिल्लक राहतेंच ! मग ज्याचा स्वर्गावर विश्वास नाही अशा माझ्या सारख्या माणसाचें मन मरणाच्या कल्पनेनें चरकलें तर त्यांत नवल कसलें ?

मृत्यु ही स्वाभाविक गोष्ट आहे, त्यांत अशुभ असें कांही नाही, हें आपण पिढ्यान् पिढ्या पढत आलों. पण प्राचीन कांळीं हें तत्त्वज्ञान मनुष्यानें काय सुखासुखीं स्वीकारलें असेल ? क्षितिजावर उषेच्या गोंडस पावलांचें तांबूस तळवे दिसूं लागतांच काळोखाच्या कारागृहांतून मुक्तता केल्या-बद्दल सर्व शक्तिमान देवाची प्रार्थना करण्याचे दिवस होते ते ! रात्र ही त्या वेळीं अजस्र काळा बुरखा पांघरून येणारी राक्षसी होती. आणि पाऊस ही पूजा केल्यानें प्रसन्न होणाऱ्या परमेश्वराची कृपा होती. उल्कापात पाहून आपणांला आजकाल कांही वाटत नसलें तरी त्या काळीं आकाशांतून निखळून पडणारा तारा हें मोठें अशुभ चिन्ह मानलें जाई. धूमकेतूचा उदय म्हणजे एखाद्या महापुरुषाचा अस्त, असें समीकरण मांडल्याशिवाय मानवी मनाला त्या सपुच्छ ज्योतीचें कोडें उलगडतच नसे! कार्यकारण-भाव न कळल्यामुळे कुंठित होणाऱ्या मनुष्याच्या बुद्धीनें त्या काळीं असे कल्पित संबंध शोधून काढले म्हणून मी तिची थट्टा कधीच करणार नाहीं. शास्त्र हें काव्याचेंच जुळें भावंड आहे. ते काव्यापेक्षा थोडें उशिरा जन्माला

यतें येवढेंच !

पण जुळ्या भावंडांत मागून जन्माला आलेलें मूल वडील मानण्याची आपली रीत आहे ना? तीच या बाबतींतहि आपण पाळली पाहिजे. शरीराच्या विकासाचें व विनाशाचें फारसें ज्ञान नसलेल्या काळांत मृत्यूची भीति वाटूं नये म्हणून मानवी बुद्धीने त्याच्याभोवती काव्यपूर्ण तत्त्वज्ञानाचें वलय निर्माण केलें. स्वर्गनरकांचें मोठें रसभरित वर्णन आपल्या पुराणांत आढळतें याचें कारण हेंच आहे. वाचकाला शृंगाराची सूचक आणि सुंदर प्रतीति देणारा महाकवि कालिदास मृत्यूविषयी बोलूं लागतांच 'मरण ही प्रकृति आणि जीवन ही विकृति' असें कांहीतरी सांगूं लागतो किंवा ॲटम बॉंबहूनहि जिची भीति वाटावी अशी नररुंडांची माला गळ्यांत धारण करणाऱ्या रुद्राची शुभंकर शंकर म्हणून समाज पूजा करूं लागतो तें काय उगीच? याच प्राचीन संस्कृतीचा साने गुरुजींच्या मनावर विलक्षण परिणाम झाला होता. त्यामुळे ते स्थानीं-अस्थानीं मरणाचीं मंगल स्तोत्रें गात असत. दिवसभर बाहेर खेळून दमलेलें मूल रात्र पडतांच घराकडे येतें आणि आईच्या मांडीवर झोपी जातें; मृत्यू ही मनुष्याची अशीच आई आहे, तो तिच्या मांडीवर मस्तक ठेवून चिरनिद्रा घेतो, असे ते वारंवार उद्गार काढीत.

मृत्यूचें हें माहात्म्य मला मंजूर नाही. झाडावरून गळून पडणारें पान, ज्योतीच्या स्पर्शाने जळून जाणारा पतंग, आकाशांतून निखळून पडणारी उल्का, आणि जीवनाचा निरोप घेऊन जाणारा मानवी जीव हीं सर्व माझ्या दृष्टीने सारखींच आहेत. मृत्यु हा प्रत्येकाच्या जीवनाचा पूर्णविराम आहे. याचा अर्थ 'मृत्योर्माऽमृतं गमय' ही आपल्या ऋषिमुनींची उदात्त वाणी मला प्रेरक वाटत नाही असें नाही. मृत्यूंतून अमृताकडे जाण्याकरितांच तर मानवी जीवन गेलीं पांचदहा हजार वर्षें धडपडत आहे. माझें म्हणणें एवढेंच कीं, मरणानंतर मिळणाऱ्या स्वर्गाच्या मागे माणसाने धावूं नये. तें मृगजळ आहे. खरा स्वर्ग पृथ्वीवरच आहे. आईबापांची माया, पत्नीचें प्रेम, मुलांचें वात्सल्य, मित्रांचा स्नेह, देशाची भक्ति, समाजा-

करिता केलेला त्याग इत्यादि गोष्टींत किंबहुना जग अधिक सुखी, सुंदर आणि सरस व्हावें म्हणून मनुष्य जी जी घडपड करतो तिच्या यशांतच नव्हे तर अपयशांतहि स्वर्ग आहे !

या नव्या विचाराने माझें मन विलक्षण उल्हसित झालें. माझ्या जन्म-सनापुढे ती आडवी रेघ टाकणाऱ्या संपादकांना आभारप्रदर्शक पत्र पाठविलें पाहिजे असें मला वाटूं लागलें. त्यांनी ती इवलीशी रेघ तिथे टाकली नसती तर मी मृत्यूविषयी असा विचार करीत बसलों असतों का ?

तें फेकून दिलेलें पुस्तक मीं उचललें, क्षमा मागण्यासाठी त्याच्या चुरगळलेल्या पुठ्ठ्यावरून मी नाजुकपणाने हात फिरविला. मग माझा परिचय ज्या पानावर छापला होता तें उघडलें. माझ्या जन्म-सनापुढच्या आडव्या रेघेकडे मी आदराने पाहूं लागलों. पाहतां पाहतां माझ्या मनांत आलें, एरवी ही आडवी रेघ ठीक आहे. पण कलेच्या दृष्टीने ती बरोबर वाटत नाही. कला कशी सूचक असायला हवी ! माझ्यावरचे हे लेखक कैलासवासी झाले आहेत, त्यांच्या परिचयांत ही आडवी रेघ शोभून दिसते. त्या रेघेवरून मीं योग्य तो बोध घेतला नसता कां ? उगीच या संपादकानी ही आडवी रेघ माझ्या नांवापुढे टाकली !

१९५३

६

# ध्रुवतारा

मी घुश्श्यांतच जिना उतरूं लागलों. सारखें मनांत येत होतें, ‘ काय माणसं असतात हीं. काळवेळ कांही कांही कळत नाही यांना .’ माझी अशी सुंदर समाधि लागली होती — होय, संगीत ऐकून मनुष्य जसें देहभान विसरतो, तसा आकाशवाणीवरून क्रिकेटच्या सामन्याची हकीगत ऐकतांनाहि तो स्वत:ला विसरून जातो ! निदान माझा तरी असा अनुभव आहे.

माझी आतांची समाधि तर केवळ अवर्णनीय होती. इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या आपल्या चौथ्या कसोटी सामन्याचा हा शेवटचा दिवस होता. दैवाचा कांटा कुठल्या बाजूला झुकणार हें कळणें अशक्य होतें ! एखाद्या रहस्यकथेपेक्षांहि सामन्याला अधिक रंगत आली होती. काल जखमी झालेला बेग आज पुन्हां खेळायला आला होता. त्याने आपलें शतक पुरें केलें. पहिल्या कसोटी सामन्यांतलें शतक ! मोठा अभूतपूर्व पराक्रम होता तो ! एखाद्या जखमी वीराने अधिकच क्रुद्ध होऊन शत्रूसैन्याचें कंदन आरंभावें, तसा तो फटके मारीत होता. आमच्या उम्रीगरसाहेबांतहि

वीरश्रीचा संचार झाला होता! आतापर्यंत टांग्याच्या घोड्याप्रमाणे चाललेलें त्यांचें कर्तृत्व एकदम शर्यतीच्या घोड्यांप्रमाणे धावूं लागलें होतें. खेळ क्षणाक्षणाला अधिक अधिक रंगत होता. मी दूर भारतांत आपल्या घरांत बसून खेळाचें वर्णन ऐकत आहें हें भानसुद्धा मला राहिलें नव्हतें. हे दोघे वीर आतां शेवटपर्यंत खेळत राहणार आणि सामना अनिर्णित ठेवणार अशी आशादायक कल्पना माझ्या मनांत डोकावूं लागली. सामन्याच्या वर्णनांतला शब्द न् शब्द माझे कान मोठ्या उत्कंठेने ऐकूं लागले. एखादा शब्द रेडिओच्या खरखरींत नीट ऐकूं आला नाही, तर मनाला मोठी चुटपुट लागे. बेगने चाराचा एक फटका मारला. तो एकशेंदहाच्या रोखाने धांवत होता. माझ्या दृष्टीने हा मोठा विलक्षण आनंदाचा क्षण होता!

पण याच क्षणीं रेडिओ बंद करून मला खाली यावें लागलें. कुणी प्रतिष्ठित गृहस्थ मला भेटायला आले होते. मनांतल्या मनांत मीं त्यांना लाखोली वाहिली! क्रौंचवधाचं दृश्य पाहून वाल्मिकीला शापवाणी कशी स्फुरली असेल, याची जिना उतरतांना मला पूर्ण कल्पना आली. पण शिष्टाचार म्हणून कांही चीज जगांत आहेच ना? ज्वालामुखीलासुद्धा तो पाळावा लागतो! आंत आग पेटली असूनहि बिचारा जगाला अष्टौप्रहर पृष्ठभागावर हिरवळीचें हास्य दाखवीत राहतो!

मी खालीं आलों. दंतपंक्ती प्रगट करून आलेल्या गृहस्थांचें स्वागत केलें. त्या गृहस्थाशीं गोडीगुलाबीने बोललों. त्यांचें काय काम होतें तें ऐकून घेतलें. त्यांना चहा विचारला. ते नको नको म्हणत होते. पण मीं आग्रह केला. मात्र हें सारें सव्यापसव्य करीत असतांना माझें मन माडीवरच्या रेडिओभोवतीं घुटमळत होतें. एखाद्या पतंगानें दीपज्योतिभोवती फडफडत रहावें तसें!

सर्व शिष्टाचार मी अगदी कसोशीनं पाळला. चहासुद्धा विचारला. बोलण्यांत नेहमींचा मोकळेपणा नाही असें त्या गृहस्थांना वाटलें असावें. त्यांनी मध्येंच विचारलें, 'तुमची प्रकृति बरी दिसत नाहीं आज!' मी

मानेने होय म्हटलें. तोंडाने खोटें बोलण्यापेक्षा मानेने खोटें बोलणें मला अधिक आवडतें. अनेक दृष्टींनी तें बरें असतें. मान हलविण्याचे दोन परस्परविरुद्ध अर्थ होऊं शकतात ! शिवाय एकतर तोंडाने खोटें बोलल्यावर आपलें मन आपल्याला उगीचच खाऊं लागतें. मानेने असत्याचे प्रयोग करण्यांत सदसद्विवेकबुद्धीचा त्रास कमी होतो. पापहि कमी लागत असावें.

माझी प्रकृति बरी नाही असें पाहतांच आलेल्या सद्गृहस्थांनी आपली बैठक उठवली. 'प्रकृतीला जपा हं', 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्', 'शीर सलामत तर पगडी पचास' वगैरे वगैरे उपदेश करून ते निघून गेले. लगेच माझी प्रकृति सुधारली ! मी धांवतच माडीवर गेलों. माझें धांवणें त्यांना दिसणें शक्य नव्हतें, हें त्यांतल्या त्यांत बरें होतें.

मी पुन्हां रेडिओ लावला. पण एव्हांना सहा वाजून गेले होते. मुंबईंत केंद्रावरून ऐकूं येणारें सामन्याचें वर्णन बंद झालें होतें. सामना थेट ऐकायचा असेल तर रेडिओ कुठे लावायचा हें मला ठाऊक नव्हतें. मी हिरमुसला झालों. खट्टू मनाने खालीं आलों, दुपारीं एक चांगलें नवीन पुस्तक वाचीत होतों तें पुढे वाचण्याकरता उघडलें. पण कांही केल्या मन त्या पुस्तकांत लागेना. तें पुन:पुन्हा इंग्लंडमध्यें चाललेल्या त्या सामन्याचा विचार करूं लागलें.

माझ्या रक्तांत हें क्रिकेटचें प्रेम कुठून आलें हें सांगणें मोठें कठीण आहे. तें आनुवंशिक आहे असें म्हणणें अशक्य आहे. कारण माझ्या वडिलांच्या लहानपणीं क्रिकेट हा खेळच कुणाला ठाऊक नव्हता ! कदाचित् माझ्या पूर्वजांत कुणीतरी मोठे क्रीडापटु गृहस्थ होऊन गेले असतील ! पेशवाईच्या काळांत माझ्या पणजोबांनी किंवा खापरपणजोबांनी विटीदांडू खेळतांना विटी अशी जोरानें टोलविली असेल कीं आधुनिक काळांतल्या सी. के. नायडूंच्या षट्काराशींच त्या टोल्याची तुलना व्हावी ! तें कांही असो ! माझ्या वाडवडिलांना क्रिकेटचा गंध नव्हता ही गोष्ट उघड आहे !

माणसाच्या आवडीनिवडी किंवा छंदफंद यांची मीमांसा करायची

ही शास्त्रीय पद्धत मुळांतच सदोष आहे असें मला वाटतें. माझ्या लहानपणीं स्पेन्सर, मिल, डार्विन, यांचें विद्वान् मंडळींत मोठें स्तोम होतें. ते नुसते साधे देव नव्हते; महादेव होते! आतां तें स्तोम कमी झालें आहे. मार्क्स्, फ्राइड, गांधी, विनोबा वगैरे आजकालच्या देवांचीसुद्धा शेवटीं हीच गत होणार याविषयीं मला काडीइतकीहि शंका नाही. नियमांच्या कांटेरी कुंपणांत आणि गुणाकारभागाकारांच्या अथवा बेरीजवजाबाकींच्या बंदिस्त चौकटींत स्वस्थ बसण्याइतका मनुष्य हा साधा प्राणी नाही! तो पाऱ्यासारखा चंचल आहे. वाऱ्यासारखा स्वतंत्र आहे. मनुष्य कितीहि सामान्य असो, अगदी क्षुद्र असो, चौकटींत न बसणें हें असामान्यत्वाचें लक्षण त्याच्या ठिकाणीं सदैव आढळतें!

माझ्यांतलें क्रिकेटप्रेम हें सामान्य माणसांतल्या असामान्यत्वाचें असेंच एक लक्षण आहे. तसें पाहिलें तर या खेळाचा नाद मला लहानपणीं कां लागावा? ज्या सांगलींत माझें बालपण गेले तिथे त्या काळीं तालमींतले छड्डू ठोकण्याचे आवाज गल्लोगल्लीं ऐकूं येत असत. वारंवार कुस्त्यांचीं मैदानें होत. आजच्या क्रिकेटच्या सामन्याप्रमाणे त्यांची घरोघर चर्चा चाले. खुद्द माझे एक मामेभाऊ कुस्तीगीर होते. जिलब्यांचें ताट फस्त करणें किंवा बुक्की मारून नारळ फोडणें हा त्यांच्या तळहाताचा मळ होता! अशा स्थितींत मी तांबडया मातींत लोळूं शकलों असतों, तर तें स्वाभाविक होतें. पण मला नाद लागला तो क्रिकेटचा! बरें, त्या खेळांत माझी तशी कांहीं गति होती म्हणावें, तर तेंहि नाही. आमच्या बालचमूंचे जे सामने होत, त्यांत कुठल्याहि पक्षांत मी असलों तरी माझा खेळण्याचा क्रमांक अगदीं खालीं असे. तसें होणें अपरिहार्य होतें. माझी दृष्टि मूळचीच अधू होती. ईश्वरसाक्ष सांगायचें तर गोलंदाजाने टाकलेला चेंडू मला नीट दिसला आणि मीं तो व्यवस्थित तडकावला असें कधी झाल्याचें मला आठवत नाही. मी प्रसंगीं पांचदहा धांवा काढीत असें. क्वचित् मी तासतासभर चिकाटीने मैदानावर जिवंत राहत असें, पण हें सारें नशिबाने घडे. इतर गोष्टींत नसलों तरी या बाबतींत मी पूर्णपणें भारतीय होतों.

दैवावर माझा संपूर्ण भरंवसा होता !

पण दैव मोठें लहरी असतें. स्त्री, निद्रा, बालक आणि सम्राट् या सर्वांचा लहरीपणा त्यांच्यांत एकवटलेला असतो. एकदां मी एक उंच उडालेला चेंडू झेलायला गेलों. चेंडू मला नीट दिसत नव्हता ! त्या चेंडूला तरी कांही अक्कल असावी की नाही ? सरळ माझ्या हातांत पडण्याऐवजी बेटा अचूक माझ्या नाकावर पडला ! चांगलें नाक ठेंचलें त्याने माझें ! मी बेशुद्ध होऊन जमिनीवर पडलों. दोनतीन तासांनी शुद्धीवर आलों.

क्रिकेटमधला माझा पराक्रम असा एवढाच आहे ! असें असून गेलीं पन्नास वर्षे मी क्रिकेटचा परम भक्त राहिलों आहें. सामन्याचें वर्णन रेडिओवर सुरू झालें म्हणजे मला दुसरें कांही सुचेनासें होतें. लेखन, वाचन, सारें सारें फिक्कें वाटूं लागतें. आजहि तसेंच झालें होतें. पण त्या सद्गृहस्थांनी ऐन वेळीं येऊन माझ्या रंगाचा भंग केला, माझ्या आनंदावर विरजण घातलें.

आतां रात्रीं आठ सव्वाआठपर्यंत या सामन्याची माहिती मिळणें शक्य नव्हतें मधला दीड तास मला दीड युगासारखा वाटूं लागला. कुठलाहि नाद – मग तो क्रिकेटचा असो वा अध्यात्माचा असो – हा मद्याचा प्याला असतो ! तो प्याला घेतल्यानंतर मनुष्य इतर दुःखें घटकाभर विसरून जातो. पण त्याचबरोबर त्याची त्याला चटक लागते ! त्याची तलफ आली आणि तो मिळाला नाही म्हणजे मनुष्य अस्वस्थ होतो. केव्हां एकदा तो पेला तोंडाला लावीन असें त्याला होऊन जातें. एखाद्या पुस्तकांतल्या किडयाला ओसाड बेटावर नेऊन टाकावें, पुस्तकांखेरीज इतर सर्व सुखसाधनांची सोय करावी ! चार दिवसांत त्याला वेड तरी लागेल किंवा सरळ समुद्रांत जाऊन तो जीव तरी देईल.

मधला दीड तास कसा घालवायचा या विवंचनेंत मी होतों. नाइलाजाने अकरा वाजतां शाळेंत गेलेल्या मुलाचें मन जसें रात्रीं जागून अर्धवट वाचलेल्या कादंबरीभोवती घुटमळत असतें तसें माझें मन रेडियोभोवती प्रदक्षिणा घालीत होतें.

दा. ११५३६

मला उगीच आठवणी येऊं लागल्या. मी कॉलेजमध्ये होतों, तेव्हां युरोपियन संघाच्या बाजूनें खेळणारा टॅरंट (त्याच्या नांवावर टायरन्ट [ Tyrant ] अशी कोटीहि त्या वेळीं आम्ही करीत होतो.) नांवाचा एक शीघ्रगति गोलंदाज होता. त्यानें एकदां आमच्या खेळाडूंची अशी दाणादाण उडवून दिली होती ! अगदी पानपत केलें होतें त्यानें आमचें ! या आठवणीबरोबर विठ्ठल, देवधर, नायडू, अमरनाथ यांच्या पराक्रमांच्या अनेक आठवणी माझ्या मनांत जागृत झाल्या. अमरनाथनें पहिल्याच कसोटी सामन्यांत काढलेलें तें शतक ! त्याला आता तीस वर्षें होऊन गेलीं. तें पाहण्याची संधीहि मला मिळाली नव्हती. पण कोंकणांतल्या कोपऱ्यांत दुसऱ्या दिवशीं आलेल्या मुंबईच्या दैनिकांतून या पराक्रमाचें वर्णन मिटक्या मारीत मी पुन:पुन्हा वाचलें होतें, लहानपणीं पांडवप्रताप वाचतांना अभिमन्यूच्या शौर्याचें वर्णन वाचून मी थरारलों होतों. तो रोमांचकार आनंद त्या इंग्रजी दैनिकाने मला पुन्हा दिला होता. नायडूंचा असाच एक न पाहिलेला भीमपराक्रम मीं वाचला होता. एकदां ग्रिमिट या धूर्त ऑस्ट्रेलियन गोलंदाजाने कमरेइतका उंच उडणारा चेंडू टाकला. त्या चेंडूला कंकय्यांनी षट्कार मारला ! नि तोहि कसा ? तर चेंडू हवेंत उंच न उडवतां ! एखादा तोफेचा गोळा सूं सूं करीत जावा तसा तो चेंडू कंबरभर उंचीवरूनच हवेंतून सीमारेषेच्या पलीकडे जाऊन पडला होता !

शेवटीं कसाबसा तो कंटाळवाणा दीड तास संपला. मी रेडियोवरच्या बातम्या ऐकूं लागलों. ध्यानीं मनीं नसतांना एखादें विमान जमिनीवर कोसळावें तशी माझी मन:स्थिति झाली. दैव फितूर झालें होतें ! बेग धांवबाद झाला होता. सामना अनिर्णित ठेवण्याचें भारताचें स्वप्न विरून गेलें होतें ! मला फार वाईट वाटलें. क्षणभर बेगच्या उतावळेपणाचा राग आला. त्याने असें धांवबाद व्हायला नको होतें. मग मनांत आलें, जीवनांत नेहमींच असे अपघात होत असतात. क्रिकेट म्हणजे तर क्षणाक्षणाला चाललेला जीवनमरण खेळ ! या जगांत माणसाला अनुकूल असलेलें दैव क्षणार्धांत त्याच्यावर कसें उलटेल याचा नेम नसतो. आपण

सामना हरलों तरी आमच्या बेगने आज मैदान गाजविलें यांत शंका नाही. रात्रीं झोंपेपर्यंत मी विशींतल्या या पराक्रमी वीराचें मनांतल्या मनांत कौतुक करीत होतों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी वर्तमानपत्र उघडलें. त्यांतल्या क्रिकेटच्या बातम्या मी प्रथम वाचूं लागलों हें सांगायची जरुरीच नाही. या बातम्यांत एक गोष्ट मीं वाचली; आणि काल बेगच्या पराक्रमाचें कौतुक करीत असतांनासुद्धा जी आनंदाची उत्तुंग लाट माझ्या मनाला स्पर्श करून गेली नव्हती, ती तिथे उचंबळली. बेग धांवबाद झाला होता हें खरें ! पण धांवबाद होतांनाहि त्यानें एक पराक्रम केला होता. लौकिक दृष्टीने तो पराक्रम नसेल ! पण माझ्या मनाला त्यानें चटका लावला. आपला जोडीदार उम्रीगर हा शतकाच्या जवळ आला आहे, त्याला शतक पुरें करण्याची संधि देणें हें आपलें कर्तव्य आहे हें ओळखून बेगनें स्वत:चा बळी दिला होता. ट्रूमन आणि ऱ्होडस यांना फटके मारण्यांत नि:संशय त्याचें शौर्य प्रकट झालें होतें. डोक्यावर चेंडू बसून जखमी झाल्यावर दुसऱ्या दिवशीं पुन्हा खेळायला येण्यांत आणि आधल्या दिवशींच्या धडाडीने खेळण्यांत श्रेष्ठ प्रतीचें साहस त्याने प्रकट केलें होतें. पण आपल्या जोडीदाराला बचावण्याकरतां हसतमुखाने आपला बळी देणें हा नि:संशय त्या पराक्रमाचा कळस होता !

शौर्य आणि त्याग हे दोन्ही फार उच्च प्रतीचे गुण आहेत. कुठलाहि लहानमोठा पराक्रम पाहिला कीं माझ्या मनांत कौतुकाची किंवा आदराची मोठी लाट उसळते. वाटतें माणसाच्या अंगीं ही जी ईर्ष्या आहे , उंच उंच कुंपणें ओलांडून नवनव्या प्रदेशांत आपल्या कर्तृत्वाचें निशाण रोखण्याची मनुष्याची ही जी जिद्द आहे, तिच्यावर सतत पुष्पवृष्टि करावी ! ही भावना हा मानवी संस्कृतीचा एक प्रमुख आधार आहे. आर्य लोक प्रथम उत्तर ध्रुवावर राहत होते. तिथें बर्फप्रलय झाला. आपलें वसतिस्थान सोडून त्यांना खालीं सरकावें लागलें. पिढ्यान्‌पिढ्यांची भ्रमंती सुरू झाली. अशा वेळीं यज्ञकुंड कुठलें आणणार ? हवन कसें करणार ?

पण यज्ञकुंड प्रज्वलित करतां येत नसलें तरी त्या वेळीं म्हणावयाचे मंत्र पठण करून स्मृतिगत करतां येतील हें त्यांनी ओळखलें. त्यांनी वेद जिवंत राखले ते अशा अष्टौप्रहर मंत्रपठण करणाऱ्या वीरांच्या सहाय्याने ! कोलंबस काय, कॅप्टन स्कॉट काय, लुइ पाश्चर काय किंवा यांच्या तोडीचे दुसरे शास्त्रज्ञ किंवा संशोधक काय, हे सर्व शूर वीर आहेत. त्यांनी आपल्या पराक्रमाने मानवाची संस्कृति घडवली आहे. आज तो जीं सुखें उपभोगीत आहे त्यांचीं बीजें त्यांनी पेरलीं आहेत.

पराक्रम हा शब्द लढाईतल्या वीरश्रीशीं संलग्न आहे असें आपण मानीत आलों आहों. पण हा त्या शब्दाचा फार संकुचित अर्थ झाला. पराक्रमांत जिद्द, शौर्य, साहस, स्वतःच्या प्राणांविषयीची बेफिकिरी हे गुण असतातच ! पण त्याचबरोबर कांहीतरी नवें, सुंदर, उदात्त निर्माण करण्याची तीव्र इच्छाहि असते. म्हणूनच मानवी जीवनाच्या विकासाबरोबर पराक्रमाचीं क्षेत्रेंहि विस्तार पावत आहेत. चंद्रमुखीच्या चुंबनावर संतुष्ट असलेला मानव आज चंद्राला आलिंगन द्यायला निघाला आहे. किती झालें तरी रणांगणावरला पराक्रम आत्मपूजक असतो. पराक्रम दुसऱ्याच्या सुखाचा विचार करूं लागला की त्याचें स्वरूप अधिक उज्ज्वल आणि अधिक उदात्त होतें. प्रसंगावधान राखून बेगने उम्रीगरसाठी आपला बळी दिला ही गोष्ट त्याच्या एकशेंबारा धावांपेक्षाहि मला अधिक सुखदायक वाटली ती यामुळेच !

कॅप्टन कुकच्या चरित्रांत तर हें सनातन सत्य किती सुंदर आणि भव्य रीतीनें प्रगट झालें आहे. कुकने दक्षिण ध्रुवावर निशाण रोवलें हा त्याचा पराक्रम फार मोठा होता. तिथून परत येतांना या साहसी संशोधकाची सारी तुकडी बर्फाच्या वादळांत सांपडली. गलितगात्र आणि मरणोन्मुख झालेला त्यांतला एक सहकारी ‘ मला सोडून तुम्हीं पुढं चला, तुम्ही आपले प्राण वांचवा ’ असा सल्ला सारखा देत होता. पण कुकने तो ऐकला नाही. तो इतरांसह त्या मित्रासाठी मागे रेंगाळत राहिला आणि अंतीं सर्व मृत्यु-मुखीं पडले ! दक्षिण ध्रुवाचा शोध लावण्यांतलें साहस भविष्यकाळांत

कदाचित् फिक्कें वाटूं लागेल. त्याची मानवतेला विस्मृति होईल. पण हा त्याग ? तो अमर आहे !

शौर्यापेक्षाहि उदात्ततेचें मानवतेला सदैव आकर्षण वाटतें. तसें वाटणें हें मानवाच्या मोठेपणाचें लक्षण आहे. दुसऱ्याकरितां स्वतःला विसरणें, दुसऱ्याच्या सुखाकरिता स्वतःच्या सुखाचा त्याग करणें, शारीरिक सुखांच्या पलीकडे असलेल्या सुखांचा ध्यास घेणें, आणि केवळ जगण्याच्या पातळी-वरल्या मूल्यांपेक्षा निराळ्या मूल्यांचें दर्शन होणें हीं सर्व संस्कृतीचीं लक्षणें आहेत. म्हणूनच ज्यांच्या चरित्रांत त्यांचा प्रकर्षानें आढळ होतो तीं माणसें मानव समाजाला सदैव प्रिय आणि पूज्य होऊन राहतात.

भारतीय पुराणकथा म्हणजे या चिरकालीन सत्याचीं चालतींबोलतीं स्मारकेंच आहेत. पार्वतीची कथा पाहा. तसें पाहिलें तर लक्ष्मी जगच्चालक भगवान विष्णूची प्रिय पत्नी ! संपत्ति आणि समृद्धि यांची अधिष्ठात्री देवता ! इतकी नाजूक आणि सुंदर कीं, कमलपत्राशिवाय अन्यत्र उभें राहणें तिला क्षणभरहि रुचत नाही. धनधान्य, अलंकार, वैभव, ऐश्वर्य हें सारेंसारें तिच्या कृपाकटाक्षावर अवलंबून ! पण सर्वसामान्य मनुष्याचा पैसा हा सहावा प्राण असूनहि तो कांहीं लक्ष्मीची पूजा करीत सुटत नाही. दिवाळींतलें लक्ष्मीपूजन सोडलें तर लक्ष्मीच्या वांट्याला सहसा मोठा मानसन्मान येत नाही. पण पार्वतीची गोष्ट सर्वस्वी निराळी आहे. ती हिमालयाची कन्या तशी थोडीफार रांगडीच ! उग्र तपानें आपलें शरीर सुकवून घेणारी, पुढेहि शंकरासारख्या कफल्लक नवऱ्याबरोबर संसार करणारी. शिष्टाचार म्हणून कांहीं चित्रकार चित्रांतल्या पार्वतीच्या अंगावर दागिने घालतात ! पण सत्याच्या दृष्टीनें तें अगदी चूक आहे. स्मशानांत संसार थाटणाऱ्या शंकराची एकंदर मिळकत काय असेल याची तुम्हां आम्हां सर्वांना पूर्ण कल्पना आहे. उद्या स्वर्गांत पंचवार्षिक योजना सुरू झाल्या, इन्द्राला पैशांचा तुटवडा पडूं लागला आणि कुबेराच्या मदतीला यमाला देऊन सर्व देवांवर जास्तीत जास्त प्राप्तिकर बसवायचें त्यानें ठरविलें, तरी शंकराला कर म्हणून फुटकी कवडीसुद्धा द्यावी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्वीकृत
अनुक्रम दि:
नों दि:

लागणार नाहीं, हें आपण पूर्णपणें जाणतां !

असें असूनहि पार्वती लक्ष्मीपेक्षा लोकप्रिय आहे. गौरीच्या, उमेच्या, भिल्लीणीच्या, जगन्मातेच्या किती तरी किती विविध रूपांनीं भारतीय मनांत ती घर करून राहिली आहे ! पित्याने पतीचा अपमान केलेला पाहून यज्ञकुंडांत उडी घेणारी ही सती ! प्रेम कसें करावें हें तिने आपल्याला शिकविलें आहे. तिला लक्ष्मीपेक्षा अधिक भक्त मिळाले आहेत, त्याचें कारण तिच्या प्रेमांतली उत्कट उदात्तता हें आहे.

आपल्या श्रेष्ठ पुराणकथांना जी भव्यता लाभली आहे तिचें मूळ मनुष्याच्या अंत:करणाच्या या विलक्षण तृषेंत आहे. सामान्य मनुष्याला त्याग करतां येत नाही. पण तो करतां यावा असें त्याला सतत वाटत असतें. म्हणूनच त्याचें मन त्यागाची पूजा करण्यासाठी आसुसतें. रामायणाच्या लोकप्रियतेचीं वाङ्मयीन कारणें कोणतींहि असोत, मानसशास्त्राच्या दृष्टीने तें कारण सर्वसामान्य मनाला वाटणारें त्यागाचें आकर्षण आहे. प्रभु रामचंद्र मोठा पराक्रमी आहे. तेहतीस कोटी देवांना चळचळा कापायला लावणाऱ्या रावणाचा तो नि:पात करतो. पण त्याच्या या शौर्यापेक्षाहि आपलें मन अधिक ओढ घेतें, तें राजपदाचा हंसतमुखानें त्याग करून तो वनवास स्वीकारतो त्या प्रसंगाकडे. सीतेसह अयोध्येच्या सिंहासनावर विराजमान झाल्यानंतर लोकानुरंजनासाठी तो सीतेचा त्याग करतो त्या प्रसंगाकडे ! भवभूतीसारखा श्रेष्ठ कवि रामाच्या या उदात्त मनाचें एखाद्या विलक्षण नाजूक छटेने जेव्हा चित्रण करतो तेव्हा तर त्याच्या रावणवधाच्या पराक्रमाची आपणाला आठवणहि राहत नाही ! उत्तररामचरिताच्या पहिल्या अंकांत हा अनुभव येतो. हा सारा अंकच सुंदर आहे. त्यांत कोमल काव्य आहे; नाजूक नाट्य आहे; राम, सीता, लक्ष्मण यांच्या स्वभावाच्या विविध मनोहर छटा आहेत; आणि गतकाळांतल्या सुखदु:खांच्या प्रसंगांकडे ज्या आर्त दृष्टीने आपण पाहतों तिचें उत्कृष्ट प्रतिबिंब आहे. राम आणि सीता आपल्या लग्नापासूनच्या सर्व प्रसंगांचीं चित्रें पाहत असतात. अनेक गोड आठवणींनी

त्यांचीं मनें पुलकित होतात. हीं चित्रें पाहतां पाहतां एका चित्राकडे बोट दाखवून लक्ष्मण म्हणतो, 'दादा, ही पाहा मंथरा !' राम हें ऐकतो. तो मुकाट्यानें पुढे होतो आणि सीतेला म्हणतो, 'देवी, वैदेहि, शृंगवेर-पुरांतील हाच तो इंगुदी वृक्ष. इथंच मागे आम्हांवर उपकार करणारा निषाधपति गुहक याची व आमची भेट झाली !' राम पुढल्या चित्राकडे वळलेला पाहून लक्ष्मण हसून स्वगत म्हणतो, 'हं, एकूण दादांनी कैकेयी मातेचं चरित्र वगळलं !' किती साधा प्रसंग आहे हा ! लक्ष्मणाचें स्वगत नसतें, तर तो आपल्या लक्षांतहि आला नसता ! पण या प्रसंगांत रामाच्या उदात्त मनाचें केवढें रम्य दर्शन आहे !

म्हणूनच मला वाटतें, उदात्ताविषयीची ही अनामिक आंतरिक ओढ हा मानवी मनाच्या विकासाचा ध्रुवतारा आहे. तिच्यामुळेच विविध दृश्यें पाहतांनासुद्धा जिथे त्याग आहे, जिथे समर्पण आहे, जिथे जिथे उदात्ताच्या क्षितिजाला स्पर्श करण्याची धडपड आहे, तिथे तिथे मनुष्याचें मन अलौकिक आनंदाने फुलून जातें. दूरवर पसरलेल्या पर्वतराजीपेक्षा तिचे एखादें उत्तुंग शिखरच आपलें लक्ष वेधून घेतें. दुथडी भरून वाहणाऱ्या नदीपेक्षाहि जिथे नदी समुद्राला मिळते तिथे आपल्याला दिव्यत्वाचा साक्षात्कार होतो.

बेगच्या शतक काढण्याच्या पराक्रमाचें कौतुक करणारें माझें मन उम्रीगरसाठी धावबाद होण्याचें त्याने पत्करलें या गोष्टीने अधिक आनंदित होऊन गेलें तें उगीच नव्हे! हें उदात्ततेचें आकर्षण जोंपर्यंत माझ्यासारख्या सामान्य मनुष्याच्या ठिकाणीं धुगधुगत आहे, तोंपर्यंत असंख्य भीषण महायुद्धें झालीं, शीतयुद्धाने पंचखंड पृथ्वी कुडकुडूं लागली, अणुबाँब व हायड्रोजन बाँब यांच्या स्फोटांनी जीवनावर मरणाची कृष्णछाया पसरली, तरी मनुष्याच्या प्रगतीविषयी मी मुळीच निराश होणार नाहीं !

१९५९

# ७

# रात्रीचा पोषाख

'भाजी आणायला हवी' हे शब्द कानांवर पडतांच जबळपास एखाद्या बाँबगोळ्याचा स्फोट झाल्यासारखें वाटलें मला ! हे तीन शब्द माझ्या पत्नीने रागाने उच्चारले होते असें मुळीच नाही. तिचा स्वर विनंतीचा होता; आज्ञेचा नव्हता. भाजीची मंडई तर आमच्या घरापासून हांकेच्या अंतरावर आहे. आणि ती मैल दोन मैल लांब असती, तरी त्या लांबीला भिणारा प्राणी मी थोडाच आहें ? बोलण्याप्रमाणे चालणे सध्यांच्या जगांत फार क्वचित् आढळतें. पण चार चार तास स्वैर गप्पा मारीत बसण्याप्रमाणे चार चार मैल स्वच्छंद भटकण्यांतहि मी प्रवीण आहें. या गोष्टी माझ्या रक्तांतच आहेत म्हणानात ! असें असूनही गृहस्थधर्मांतल्या दैनंदिन पवित्र कर्तव्याविषयी पत्नीने केलेली ती अत्यंत प्रेमळ सूचना मला मोठी अप्रिय वाटली.

असें वाटण्यासारखीच माझी परिस्थिति होती. स्वर्गातून पृथ्वीवर पाणी आणण्याकरितां आकाशांत टाकलेले नळ रात्रीपासून मधेच कुठेंतरी फुटले होते. विश्वकर्मा एखाद्या नव्या अप्सरेच्या नृत्यगायनांत गुंग झाल्या-

त्यांचीं मनें पुलकित होतात. हीं चित्रें पाहतां पाहतां एका चित्राकडे बोट दाखवून लक्ष्मण म्हणतो, 'दादा, ही पाहा मंथरा !' राम हें ऐकतो. तो मुकाट्याने पुढे होतो आणि सीतेला म्हणतो, 'देवी, वैदेहि, शृंगवेर-पुरांतील हाच तो इंगुदी वृक्ष. इथंच मागे आम्हांवर उपकार करणारा निषाधपति गुहक याची व आमची भेट झाली !' राम पुढल्या चित्राकडे वळलेला पाहून लक्ष्मण हसून स्वगत म्हणतो, 'हं, एकूण दादांनी कैकेयी मातेचं चरित्र वगळलं !' किती साधा प्रसंग आहे हा ! लक्ष्मणाचें स्वगत नसतें, तर तो आपल्या लक्षांतहि आला नसता ! पण या प्रसंगांत रामाच्या उदात्त मनाचें केवढें रम्य दर्शन आहे !

म्हणूनच मला वाटतें, उदात्ताविषयीची ही अनामिक आंतरिक ओढ हा मानवी मनाच्या विकासाचा ध्रुवतारा आहे. तिच्यामुळेच विविध दृश्यें पाहतांनासुद्धा जिथे त्याग आहे, जिथे समर्पण आहे, जिथे जिथे उदात्ताच्या क्षितिजाला स्पर्श करण्याची धडपड आहे, तिथे तिथे मनुष्याचें मन अलौकिक आनंदाने फुलून जातें. दूरवर पसरलेल्या पर्वतराजीपेक्षा तिचे एखादें उत्तुंग शिखरच आपलें लक्ष वेधून घेतें. दुथडी भरून वाहणाऱ्या नदीपेक्षाहि जिथे नदी समुद्राला मिळते तिथे आपल्याला दिव्यत्वाचा साक्षात्कार होतो.

बेगच्या शतक काढण्याच्या पराक्रमाचें कौतुक करणारें माझें मन उम्रीगरसाठी धावबाद होण्याचें त्याने पत्करलें या गोष्टीने अधिक आनंदित होऊन गेलें तें उगीच नव्हे! हें उदात्ततेचें आकर्षण जोंपर्यंत माझ्यासारख्या सामान्य मनुष्याच्या ठिकाणीं धुगधुगत आहे, तोंपर्यंत असंख्य भीषण महायुद्धें झालीं, शीतयुद्धाने पंचखंड पृथ्वी कुडकुडूं लागली, अणुबाँब व हायड्रोजन बाँब यांच्या स्फोटांनी जीवनावर मरणाची कृष्णछाया पसरली, तरी मनुष्याच्या प्रगतीविषयी मी मुळीच निराश होणार नाहीं !

१९५९

समाधीचा भंग, तपश्चर्येचा नाश, नंदनवनांतून हद्दपारी—

आदाम आणि विश्वामित्र यांचें स्मरण करीत मी मुकाट्याने उठलों. रगाचा निरोप घेतांना आश्रमांतली आवडती हरिणी सोडून जाणाऱ्या शकुंतलेचें सांत्वन करायला निदान कण्ववाबा तरी होते. पण माझें दुःख मला निमूटपणें गिळणें प्राप्त होतें. 'मध्यान्ह काळ मोठा कठिण आहे', 'बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते' इत्यादि सुभाषितांचें साहाय्य घेऊन मी भाजीच्या मोहिमेवर जायला कसाबसा सिद्ध झालों.

पण म्हणतात ना? नकटीच्या लग्नाला सत्राशें विघ्नें! मी माझ्या अंगांतल्या कपड्यांकडे पाहिलें. हिरव्या पट्टयापट्टयांच्या नाईट-सूट विराजमान झाला होता माझ्या शरीरावर! आता आली कीं नाहीं पंचाईत? असल्या भयंकर गारठ्यांत रात्रीचा हा पोषाख काढून ठेवायचा, नवे चांगले भट्टीचे कपडे अंगांत घालायचे आणि रस्त्यावरच्या चिखलाच्या रिपरिपींत ते घाण करून आणायचे—म्हणजे चार आण्यांच्या भाजीसाठी परटाला चार आणे दक्षिणा द्यायची! कुणीं देवाने सांगितला आहे हा नसता उद्योग? त्यापेक्षा हा नाइट-सूट घालूनच भाजी आणायला गेलें म्हणून काय बिघडलें? अवघें पांच-दहा मिनिटांचें काम! तेवढ्यासाठी पोषाखाचें हें सव्यापसव्य करण्यांत काय अर्थ आहे?

नाइट-सूट घालून भाजी आणायला जायचा हा नवा विचार मला फार नामी वाटला. मी झटकन् कोटाच्या खिशांतून पाकीट घेतलें, खुंटीला टांगलेल्या दोन पिशव्या लंबे केल्या, छत्री उचलली, पायांत वहाणा सरकावल्या, आणि आता घराबाहेर पडून छत्री उघडणार इतक्यांत—

मी जागच्या जागीं थांबलों. माझ्या अंतर्मनाला कुरुक्षेत्राचें स्वरूप प्राप्त झालें होतें. 'नाही कृष्णा, मी लढणार नाहीं. मी माझ्या नातेवाइकांवर शस्त्र चालविणार नाहीं' असें म्हणून गांडीव फेकून देणाऱ्या अर्जुनाप्रमाणे हातांतल्या पिशव्या भिरकावून देण्याच्या तीव्र इच्छेने माझा मार्ग अडविला. मी आत्मपरीक्षण करूं लागलों. रात्रीचा पोषाख अंथरुणांत

लोळण्याच्या दृष्टीनें ठीक आहे. प्रसंगीं हे कपडे घालून दिवसा घरांतल्या घरांत वावरायलाही कांही हरकत नाही. घराच्या चार भिंतींना जनानखान्यांतील दासीप्रमाणें अनेक रहस्यें लपवून ठेवायची विद्या जन्मतःच साध्य झालेली असते. त्या कांहीं आल्या गेल्यापाशीं माझ्या या पोषाखाची टिंगल किंवा चहाडी करीत बसणार नाहींत. पण या वेषांत आपण घराबाहेर पडलों तर—छे !

मुकाट्याने सन्माननीय माघार घ्यावी आणि आंत जाऊन कपडे बदलून यावें असें मला वाटूं लागलें. पण कृष्ण व अर्जुन यांच्या पुराणांतरीं वर्णन केलेल्या गाढ मैत्रीचा मलाहि अनुभव यायचा होता. माझ्या मनांतल्या भित्र्या अर्जुनाच्या कानांत तिथे एकाएकी प्रगट झालेल्या कृष्णाने काय सांगितलें तें मला कांही नीटसें कळलें नाही. तें कळलें असतें तर एक नवी गीताच मीं लिहिली असती. पण कोंडाणा सर करण्याची प्रतिज्ञा करून निघालेल्या तानाजीप्रमाणे मीहि छाती वर काढून भाजी आणायला घराबाहेर पडलों हें मात्र खरें.

मी पांचदहा पावलें गेलों असेन, भाजी घेऊन येणारे एक गुजराती शेटजी मला भेटले. आम्ही भाजीसोबती होतों. म्हणजे त्यांची नि माझी मंडईंत जायची वेळ एकच होती. त्यामुळे आमची चांगली तोंडओळख झाली होती. दररोज मला पाहून ते मूक नमस्कार करीत. पण आज माझ्याविषयी त्यांची कांहीं तरी गैरसमजूत झाली आहे असें मला आढळून आलें. गृहस्थ माझ्याकडे विचित्र नजरेने पाहात पुढे चालता झाला. रात्रीं बायकोबरोबर भांडण झाल्यामुळे त्याचें मन ताळ्यावर नसेल असा विचार करून मी पुढे झटकलों. इतक्यांत एक आठदहा वर्षांचें पोरटें पावसांत भिजत भिजतच पुढे येऊन माझ्याकडे निरखून पाहूं लागलें. गावांत शिमगा किंवा मोहरम नसतांना या गृहस्थाने हें सोंग कां काढलें आहे हा गहन विचार त्या बाळजिवाला त्रस्त करून सोडीत असावा ! छत्री तोंडापुढे धरून मी त्याच्या त्या तीक्ष्ण दृष्टीच्या माऱ्यांतून स्वतःची सुटका करून घेतली. थोडा पुढे जातों न जातों तोंच एक म्हातारे गृहस्थ भेटले.

त्यांनी हाताने जरा थांबा अशी खूण केली. काळे केस कितीही सुंदर दिसत असले, तरी जगांतलें पांढऱ्या केसांचें प्रस्थ अजून कमी झालेलें नाही. साहजिकच मी थांबलों. ते गृहस्थ माझ्याजवळ आले, डोळ्यांवर हात धरून दोन तीन वेळां त्यांनी माझ्याकडे पाहिलें आणि म्हणाले, 'तसं कांही काम नाही, माझें. तुम्ही खांडेकरच की काय हें नीट दिसलं नाही लांबून ! म्हातारपणचं हें दुःख फार वाईट बघा. दुरून कांही गंमत बघावी म्हटलें तर ती दिसतच नाही !'

पाठीशीं वाघ लागल्याप्रमाणे मी मंडईकडे जाऊं लागलों. त्या गडबडींत रस्त्यावरल्या एका डबक्यांत खसकन् माझा पाय गेला. एखाद्या म्हाताऱ्याने आपल्या तोंडाच्या रंगीत बोळक्यांतून पचकन् पिंक टाकावी त्याप्रमाणे गढूळ पाण्याचा हजारा माझ्या अंगावर उडाला. नाइट-सुटाच्या खालच्या अर्ध्या भागाकडे आतां मला पाहवेना ! जणुं कांही तो माझा खास रंगपंचमीकरितां राखून ठेवलेला पायजमा होता !

जातां जातां बुरख्यांतून भोंवताली दृष्टिक्षेप करणाऱ्या स्त्रीप्रमाणें मीही छत्री आडून जागतिक परिस्थितीचें अवलोकन करीत होतों. जो तो क्षणभर थांबून आपलें सूक्ष्म निरीक्षण करीत आहे हें चटकन् माझ्या लक्षांत आलें. रस्त्याने एखादी सिनेमा नटी जाऊं लागली म्हणजे जाणाऱ्या येणाऱ्या लोकांत अशी चलबिचल होते हें मीं पाहिलें होतें. पण तें भाग्य चार चित्रपटकथा खरडणाऱ्या माझ्यासारख्या लेखकाच्या वांट्याला येईल असें मला कधी स्वप्नांत सुद्धा वाटलें नव्हतें ! पण आजचा दिवस कांही निराळाच दिसत होता. आपल्या पत्रिकेंत एखादा नवा शुभ ग्रह नुक्ताच उदय पावला असावा अशी मनाची समजूत करून घेत आणि बघ्यांच्या नजरांचा मारा चुकवीत मी मंडई गाठली.

पण तिथेहि प्रत्येक भाजीवाली जेव्हा माझ्याकडे रोखून पाहूं लागली तेव्हा मात्र मी गडबडून गेलों. अंगांतल्या त्या नाइट-सुटाचा असा राग आला मला ! तो तावडतोब काढून फेंकून देणें शक्य नव्हतें म्हणूनच मी गप्प बसलों. मात्र रागामुळे माणसाचें किती नुकसान होतें हा अनुभव

पुढल्या पांच मिनिटांत मला मिळाला. सारे लोक आपल्याकडे पाहून गालांतल्या गालांत हसत आहेत असें वाटतांच भाजीवालीशीं दरदामाबावत घासाघीस करण्याचें भानच मला राहिलें नाही. माळिणीने सांगितलेल्या दराला कमींत कमी दोन अगर तीन या आंकड्याने भागावें हा मंडईशास्त्रांतला लहानपणीं पाठ केलेला पहिला नियम सुद्धा मी या गोंधळांत साफ विसरून गेलों. तिने दिलेली जून जरबट भाजी कशीबशी पिशव्यांत कोंबून मी घाईघाईने घराकडे परतलों. अर्ध्या वाटेवर एक सतरा अठरा वर्षांची काळीसावळी पण गोड मुलगी नेहमीप्रमाणे आजही मला दिसली. ती बहुधा सकाळीं कुठल्यातरी गाण्याच्या वर्गाला जात असावी. एकदा तिच्या शाळेंत मी व्याख्यानाकरितां गेलों होतों आणि तिच्या 'वंदे मातरम्'चे स्वच्छ व शुद्ध उच्चार ऐकून तिला शाबासकीहि दिली होती. तेव्हापासून कुठेंहि भेटली तरी ती माझ्याकडे पाहून क्षणभर मंद स्मित करीत असे. मुग्ध अभिवादनाची तिची ही मधुर पद्धत मला मोठी काव्यमय आणि आनंददायक वाटे. आतां पाऊस थांबला होता. शिवाय छत्रीच्या आड कोण व्यक्ति आहे हें कदाचित् त्या मुलीला नीट दिसणार नाही अशीही शंका माझ्या मनांत आली. मीं छत्री मिटली. जवळ येतां येतां ती मुलगी माझ्याकडे आश्चर्ययुक्त दृष्टीने पाहूं लागली. आता पुढल्याच क्षणीं त्या चिरपरिचित स्मिताचा आपल्याला लाभ होईल अशा आशेने मी तिच्याकडे पाहूं लागलों. पण आज तिचें तें अस्फुट मधुर हास्य कुठे लपून बसलें होतें कुणाला ठाऊक! दुसरीकडे कुठेतरी पाहत असल्याचें सोंग करीत माझ्या अंगावरून ती खुशाल पुढे चालती झाली.

भाजी आणायला घरांतून बाहेर पडल्यापासून मी उपहासाचा विषय झालों होतों. पण त्या उपहासापेक्षा या मुग्ध मुलीच्या उपेक्षेने माझ्या मनाला अधिक जबर जखम केली. अस्सें मागें फिरावें आणि तिला गाठून 'तू सुद्धा ?' असें ब्रूटसला म्हणणाऱ्या सीझरप्रमाणे आर्त उद्गार काढावेत अशी एक विचित्र इच्छा माझ्या मनांत क्षणभर चमकून गेली.

घरीं आल्यावर मीं आणलेली भाजी पाहून माझ्या बायकोला हंसावें

का रडावें हें कळेना ! ललितकलांमध्ये पत्नी ही पतीची प्रिय शिष्या असते वगैरे वगैरे काव्य कालिदासाने पुष्कळ केलें आहे. त्याची सत्यता शेंकडा एक दोन नवऱ्यांच्या सुद्धा अनुभवाला येत नसावी. पण बायको ही नवऱ्याने केलेल्या बाजाराची अत्यंत कठोर टीकाकार असते असें मी म्हटलें तर शेंकडा अठ्ठ्याण्णव पतिराज टाळ्या वाजवितील याबद्दल मला मुळीच शंका नाही. आज तर काय भाजी घेतांना माझें डोकेंच ठिकाणावर नव्हतें. तेव्हां पत्नीचा नेपथ्यपाठ मुकाट्याने ऐकत, मी पुन्हा अंथरुणावर जाऊन पडलों. मघाची ती कादंबरी उघडली. पण आता माझें लक्ष तिच्यांत लागेना. ती फेकून देऊन मी विचार करूं लागलों. मला एकदम कवि बोरकरांची आठवण झाली. वाटलें, या गृहस्थाची आणि आपली जर ओळख झाली नसती तर मघाचा रस्त्यावरला मानहानीचा प्रसंग आपल्या आयुष्यांत कधीही उद्भवला नसता. सोळा-सतरा वर्षांपूर्वी या कविराजांची स्वारी प्रथम आपल्या घरीं आली. त्या क्षणापर्यंत नाइट-सूटशीं इंग्रजी कोशापलीकडे आपला परिचय नव्हता. पण या कवीने पहिल्या दिवशीं संध्याकाळीं आपला रंगीबेरंगी रात्रीचा वेष जेव्हा अंगावर चढविला, तेव्हा त्याच्या प्रतिभेइतकेंच त्याच्या पोषाखाचेंहि आपल्याला कौतुक वाटूं लागलें. निद्रादेवीच्या नंदनवनांत प्रवेश करून तिच्या कुसुमकोमल बाहुपाशांत विसावतांना माणसाने त्या अद्‌भुतरम्य सृष्टीला शोभणारा पोषाखच करायला हवा अशी कांहीतरी कल्पना माझ्या मनांत तरळून गेली. सैल पायजमा, पातळ आणि घळघळीत कोट, त्या दोहोंची सुंदर रंगसंगति, दिव्यांच्या मंद प्रकाशामुळे नाइट-सुटाच्या रंगीबेरंगी पट्ट्यांची डोळ्यांत भरणारी सौम्य मोहकता इत्यादि गोष्टींचा विचार करीतच मी त्या रात्रीं झोपीं गेलों. त्या रात्रीं माझ्या स्वप्नांत फुलपांखरें भिरभिरत होतीं. लहान मोठीं इंद्रधनुष्यें उगवत होतीं. काळे ढग संध्येने दिलेले सुंदर नाइट-सूट घालून हसत हसत पृथ्वीवर सौंदर्यवृष्टि करीत होते. त्या स्वप्नांमुळे असेल, अथवा लहानपणीं सुंदर कपड्यांच्या बाबतींत अतृप्त राहिलेल्या माझ्या अंतर्मनाने सत्याग्रह केल्यामुळे असेल, मी

लवकरच एक नाइट-सूट शिवायला टाकला.

तेव्हापासून या विशिष्ट पोषाखावर माझें मनस्वी प्रेम जडलें आहे. शर्ट, कोट, पायजमे वगैरे कपडे करतांना कसलेंही कापड मला चालतें. कुणीं त्याच्या रंगाला नाक मुरडलें किंवा कुणी असलें कापड म्हाताऱ्यांना शोभतें असें म्हटलें तरी मला त्याचें कधी दुःख होत नाही. पण नवा नाइट-सूट शिवायचा झाला म्हणजे मात्र माझा सारा चोखंदळपणा जागा होतो. या पोषाखावर माझें इतकें प्रेम बसण्याचें आणि तें इतके दिवस टिकण्याचें कारण केवळ त्याचा सोयीस्करपणा किंवा रंगीबेरंगीपणा हें नाही. तें निराळेंच आहे. एखाद्या पारिजातकावर असंख्य नाजूक सुगंधी फुलें फुलावींत, त्याप्रमाणे रात्रीच्या या पोषाखाशीं माझीं अगणित स्वप्नें, माझ्या विविध आकांक्षा, माझी अंतर्मुख होण्याची शक्ति, माझी प्रीति, माझी भक्ति इत्यादि अनेक भावनात्मक गोष्टी संलग्न झाल्या आहेत. शरीरापुढे मन दुबळें ठरल्यामुळे अनुतापाने जळणाऱ्या माझ्या आत्म्याचे दैनंदिन निश्वास केवळ त्याच्याच कानीं पडूं शकतात. दिवसा पाहिलेलीं दैन्याचीं आणि दारिद्र्याचीं अनेक दृश्यें आठवून स्वतःच्या दुर्बलतेबद्दल माझ्या डोळ्यांत जें पाणी उभें राहतें तें मी फक्त त्यालाच पुसूं शकतों. माझ्या न लिहिलेल्या कादंबऱ्या आणि सत्यसृष्टींत न उतरलेले सत्संकल्प त्यालाच ठाऊक आहेत. आपण या अफाट विश्ववृक्षावरलें एक इवलेंसें पान आहों, या अथांग जीवनसागरावरली एक क्षणिक लाट यापलीकडे आपल्याला कांही किंमत नाही, या जाणिवेने माझा सारा अहंकार गळून पडतो तो या पोषाखाच्या सहवासांतच ! अशा वेळीं मला जीवनाचा जो साक्षात्कार होतो त्यानें मनाला मिळणारी शांति केवळ अवर्णनीय आहे. ह्या शांतीचा साक्षीदार म्हणून मी नाइट-सुटाकडे पाहतों. त्याच्या सहवासांत रात्रीची सात्त्विक किंवा अद्भुतरम्य सृष्टि आपल्याभोवती एखाद्या सुगंधाप्रमाणे तरंगत राहील या आशेने केव्हा केव्हा दिवसासुद्धा तो अंगांत घालून मी घरांत वावरतों. माझी बायको माझे जुने शर्ट आणि कोट बोहाऱ्याला देऊन कांचेचीं सुंदर भांडीं पैदा करते. तेव्हा तिच्या त्या व्यवहार-

चातुर्याची मी मन:पूर्वक स्तुति करतों. पण तिने माझा जुना नाइट-सूट बोहारणीला द्यायला काढला म्हणजे मात्र माझ्या कपाळाला आठ्या पडतात याचें कारण हेंच आहे. माझ्या दृष्टीने तो नुसता निर्जीव कपडा नसतो. एकांतांत ज्याच्यापाशी मीं आपल्या अंत:करणाचे कप्पे उघडले आहेत असा जिवलग मित्र वाटतो तो मला !

पण मघाशीं रस्त्यावर माझ्याकडे उपहासानें पाहणाऱ्या त्या लोकांपैकी एकाला तरी माझें हें रहस्य कळलें असेल काय ? त्या सर्वांच्या दृष्टीने मी वेडा —निदान विक्षिप्त आणि छांदिष्ट असा—इसम ठरलों होतों. पोषाखाच्या बाबतींत त्यांना मान्य असलेला संकेत मीं मोडला होता. नाइट-सूट घालून मी घराबाहेर पडलों होतों. यापेक्षा आणखी दुसरा कुठला मोठा गुन्हा माझ्या हातून व्हायला हवा होता ?

क्रांति, प्रगति, सुधारणा, लोकशाही, नवें जग, नवा मानव वगैरे मोठमोठे शब्द आपण सध्या सदैव वापरतों. पण अद्यापि अगदी लहानसहान गोष्टींतसुद्धां आपण रूढीचे गुलाम आहोंत हेंच खरें ! आपल्या सामाजिक मनाला कुठलीहि नवी ऊर्मि सहसा आवडत नाही. त्याला परंपरागत जुना सांचाच प्रिय असतो. जीवनाच्या उगमाशीं असलेल्या झऱ्यापर्यंत जाण्याची आपण कधी धडपडच करीत नाहीं. त्यामुळे सुख, पैसा, प्रीति, इत्यादिकांविषयीच्या उष्टया कल्पना चघळीत बसण्यांत, प्रचलित संकेतापुढे निमूटपणें मान तुकवण्यांत, आणि कलेपासून राजकारणापर्यंत प्रत्येक क्षेत्रांत मोठ्या मानल्या जाणाऱ्या लोकांच्या मतांची री ओढण्यांत आपल्या सामाजिक मनाला आनंद होत असतो. सामान्य माणसाला अजून अनुभूतीपेक्षा अनुकरण अधिक आवडतें. जगांत ध्वनीपेक्षा प्रतिध्वनीच फार असें गटेने म्हटलें आहे, तें अशा वेळीं पूर्णपणें पटतें. जग असें नसतें तर कुणीतरी नाइट-सूट घालून दिवसा घटकाभर घराबाहेर पडल्याबरोबर तें त्याच्याकडे विचित्र उपहासात्मक नजरेने टकमक पाहात राहिले असतें काय ?

याचा अर्थ समाज जुन्या गोष्टींना आणि प्रचलित कल्पनांना निष्ठेने

चिकटून राहतो असा मात्र मुळीच नाही. त्याची जुन्यावर एवढी श्रद्धा असती तर लांब लांब दाढ्या वाढविणाऱ्या प्राचीन ऋषींचे वंशज आजकाल सकाळ संध्याकाळ गुळगुळीत दाढी करीत बसलेले दिसले नसते. कुठल्याही नव्या गोष्टीचा पुरस्कार व्यक्तीकडून होतो तेव्हा समाज तिचा तिरस्कार करतो. तो तिच्याकडे पाठ फिरवून उभा राहतो. पण तीच नवी गोष्ट हळूहळू अनेकांच्या अंगवळणीं पडून जुनी झाली की सामाजिक मन तिला डोक्यावर घेऊन नाचूं लागतें. माझ्या लहानपणीं स्त्रियांच्या केशरचनेवर पेशवाईंत प्रचलित असलेल्या पद्धतीचा पगडा होता. त्या वेळीं सैल अंबाडा बांधणारी नवी स्त्री नटवी आणि छचोर मानली जाई. पण काळाइतका मानवी जीवनाचा चतुर विडंबक जगांत दुसरा कुणी नाही हेंच खरें! अवघ्या पंचवीस वर्षांत अंबाडा बांधणारी ती नवी स्त्री जुनीपुराणी होऊन बसली आहे. केशरचनेमुळे जिच्या पातिव्रत्याविषयी लोकांना शंका येत असे ती छचोर बाई आता त्याच कारणामुळे सभ्य स्त्रीचा आदर्श बनली आहे.

लोकमताचा हा चंचलपणा लक्षांत घेतला म्हणजे नाइट-सुटांत घराबाहेर पडणारा माझ्यासारखा आजचा वेडा उद्यां शहाणा ठरण्याचा संभव आहे हें कोण नाकबूल करील ? आज बुशकोट झपाट्याने लोकप्रिय होत चाललाच आहे कीं नाही ? मग उद्या नाइट-सूट घालून माणसें कचेऱ्यांना जाणार नाहीत असें छातीवर हात ठेवून कुणीं सांगावें ? तसें झालें तर या नव्या प्रथेचा प्रवर्तक म्हणून इथल्या मंडई-जवळच्या चौकांत माझा एखादा पुतळासुद्धा उभारला जाईल.

मात्र त्या वेळीं नाइट-सूट घालून मंडईंत जाण्याची लहर मला आली तर माझ्या अंगावरला पोषाख पाहून तो पुतळा चकित झाल्यावांचून राहणार नाही. कांही लोक रात्रीचा पोषाख सर्रास दिवसा वापरायला लागले म्हणजे त्यांतलें काव्य संपलेंच म्हणून समजावें. काव्य हें कांहीं झालें तरी आत्म्याचें स्वप्न आहे. त्याच्याशिवाय मनुष्य जगूं शकेल असें मला वाटत नाही. म्हणून असल्या स्वप्नांच्या साक्षात्काराकरिता, मनांतल्या साऱ्या

मुक्या कळ्या फुलविण्याकरिता देवाने जशी रात्र निर्माण केली आहे तसा त्या रात्रीला शोभणारा पोषाखही माणसाने शोधून काढला पाहिजे. ज्याच्या सहवासांत आपण अद्‌भुतरम्य सृष्टींत जाऊं शकतों, त्या पोषाखाचें स्वतंत्र अस्तित्व त्याने कायम ठेवलें पाहिजे.

१९४९

८

# नवें व्याकरण

सध्या जगांत जिकडे तिकडे जुनें नाहीसें करून त्याच्या जागीं नवें स्थापन करण्याकरिता चळवळी चालल्या आहेत. नवा समाज, नवीं मूल्यें, नवा मानव, नवी स्त्री हे शब्द सकाळपासून संध्याकाळपर्यंत इतक्यांदा कानावर पडतात की जुनें म्हणून कांही या जगांत शिल्लक राहणार आहे की नाही याचीच माझ्यासारख्याला शंका वाटूं लागते. मी कांही तसा जुन्याचा अंधभक्त नाहीं! पण हें नव्याचें लोण उद्या लोणच्यापर्यंत पोचलें तर माझी मोठी पंचाईत होईल. माफक मीठ घातलेलें सुरसुरीत आटवल, त्याच्यावर भरपूर तूप (कुठल्याहि लहानमोठ्या वनस्पतीचें नव्हे) आणि तोंडीं लावायला जुनें लिंबाचें लोणचें ही माझी आयुष्यांतली सर्वांत मोठी चैन आहे. सारेंच जुनें निकालांत निघूं लागलें तर आपण या चैनीला मुकूं की काय अशी अंधुक भीति अलीकडे अधूनमधून माझ्या मनाला चाटून जाते.

तसें पाहिलें तर मी नव्याचाच भोक्ता आहें. बाजारांत नेहमी पाकिटांतली जुनी नोट मी दुकानदाराला देतों आणि नवी पाकिटांत जपून

ठेवतों. ती नवी नोट दुसरे दिवशीं त्याच दुकानदाराला द्यावी लागणार हें माझ्या लक्षांत येत नाही असें नाही. पिता कितीहि प्रेमळ असला तरी मुलगी मोठी झाली म्हणजे त्याला ती लग्न करून देऊन टाकावीच लागते! पण त्या नव्या नोटेचें आणखी एक दिवसाचें सहवाससुख आपल्याला मिळणार या कल्पनेवरच मी खूष असतों.

उद्याचा नवा समाज केव्हा निर्माण होणार हें सांगणें माओपासून म्हापणकरांपर्यंतच्या तज्ज्ञ लोकांचें काम आहे. नवा मानव घडविण्याचें कार्य विनोबांपासून कृष्णमूर्तीपर्यंत अनेक माणसें यथाशक्ति करीतच आहेत. नव्या स्त्रीच्या बाबतींत इतरांनी खटपट करण्याचें कारण नाही. आधुनिक स्त्री प्रत्येक नव्या फॅशनचें इतक्या झपाट्याने स्वागत करीत असते की कांही कांही वेळां महिनाभराच्या फिरतीवरून परत आलेल्या नवऱ्याला आपली बायको ओळखणेंसुद्धा कठीण होऊन बसतें! या साऱ्या नव्या चळवळी माझ्या आटोक्याबाहेरच्या असल्यामुळे 'जें जें होईल तें तें पाहावें' या तुकोबांच्या उपदेशाचा कालपर्यंत मी अवलंब करीत आलों होतों. पण काल माझी प्रतिभा का काय म्हणतात ना ती जागी झाली. या नवनिर्मितींत आपलेंहि कार्य आहे असा साक्षात्कार मला झाला म्हणानात! नवी स्त्री, नवा मानव, नवा समाज इत्यादि गोष्टींप्रमाणे नवें व्याकरणहि त्वरित तयार करणें जरूर आहे असें कालपासून मला एकसारखें वाटत आहे.

शाळेंत मी व्याकरणाचा शत्रु होतों--छे! व्याकरणच माझें शत्रुत्व करीत होतें असें म्हणणें बरोबर होईल--हें मी कबूल करतों. पण तो दंश मनांत ठेवून केवळ सूडाच्या भावनेने जुनें व्याकरण जमीनदोस्त करायला मी निघालों आहें अशी कृपा करून कुणीं समजूत करून घेऊं नये. मी रागीट आहें; पण दीर्घदंशी नाहीं.

लहानपणीं मला व्याकरणाचा राग येत असे तो निराळ्याच कारणामुळे. कडू कारलें आणि गोड आंबा यांतील कडू हें विशेषण आणि गोड हेंहि विशेषण असें जेव्हा मास्तर जोरजोराने सांगूं लागत तेव्हा त्यांना

वेड लागलें असावें अशी शंका माझ्या मनांत येई. 'अरेरे' आणि 'अहाहा' हीं दोन्ही म्हणे केवलप्रयोगी अव्ययें ! माझ्या बाल अनुभवाला हें मान्य नव्हतें ! पतंग आकाशांत उंच उंच जाऊं लागला, मावळतीकडल्या रंगीबेरंगी ढगाचा तो एक लहानसा तुकडा आहे असा भास होण्याइतका तो उंच गेला म्हणजे माझ्या तोंडांतून 'अहाहा' असा उद्‌गार बाहेर पडे कृष्णाकाठच्या मळींत आम्ही पोरें एकदा कणसें लुंगवायला गेलों होतों. ऐन मोक्यावर मळीचा मालक दत्त म्हणून तिथे प्राप्त झाला. त्याने पाठलाग सुरू करतांच आम्हांला पळतां भुई थोडी झाली. धावतां धावतां माझी जरीची टोपी खालीं पडली त्या वेळीं नकळत मी ओरडलों, 'अरेरे !'

'अहाहा' व 'अरेरे' यांतला हा भेद मास्तरांना समजावून सांगावा असें मराठी शाळेंत अनेकदा माझ्या मनांत येई. पण त्यांच्या टेबलावरल्या रुळाचा कागदावरल्या रेघापेक्षा पोरांच्या पाठीशींच अधिक निकटचा संबंध आहे हें लक्षांत घेऊन तो मोह मी आवरीत असें.

माझी आणि व्याकरणाची जानपछान झाली तेव्हा त्याच्याविरुद्ध माझ्या अनेक तक्रारी होत्या. भूत म्हटलें की त्या वेळीं माझ्या पोटांत गोळा उभा राही. अशा स्थितींत काळ समजावून सांगतांना मास्तर 'भूत भूत' म्हणून ओरडूं लागले की वर्गांतून पोबारा करावा असा विचार माझ्या मनांत येई. पेढयाचें एकवचन आणि चापटपोळीचें अनेकवचन मला नामंजूर होतें. भातापेक्षा भाकरींत अधिक शक्ति असते असें म्हणणारे लोक पहिला शब्द पुल्लिंगी आहे व दुसरा स्त्रीलिंगी आहे असें सांगूं लागले म्हणजे तोंडपाठ असलेल्या 'शारदा' नाटकांतलें एक गाणें मला आठवे—
'जन खुळावले । सकळ उलट चालले.'

आपण शिकत असलेलें व्याकरण जीवनांतल्या अनुभवांशीं अत्यंत विसंगत आहे हें अशा रीतीने बालपणींच मला कळून चुकलें होतें. पण त्याच्याविरुद्ध बंड करून उठण्याची इच्छा मात्र माझ्या मनांत कालच उत्पन्न झाली. प्रत्येक गोष्टीचा काळ यावा लागतो हेंच खरें !

तें झालें असें. एका मित्राबरोबर त्याच्या आजारी स्नेह्याकडे मी सहज

गेलों. ते होते वकील. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या. डॉक्टर आपल्याला दररोज किती इंजेक्शनें देतात, त्यांनी सांगितलेलीं औषधें किती महाग असतात, महिन्याच्या पहिल्या तारखेला त्यांचें बिल आलें म्हणजे तें पाहण्याचा धीर आपल्याला कसा होत नाही वगैरे वर्णन वकीलसाहेब मोठ्या रसभरीत रीतीने करूं लागले. याच वेळीं त्यांना तपासायला डॉक्टर आले म्हणून बरें ! नाहीतर त्यांच्या वक्तृत्वपूर्ण वर्णनावरून डॉक्टरमजकूर हे मोठे डाकू असावेत अशी आमची खात्री झाली असती. डॉक्टरांनी आग्रह केला म्हणून आम्ही त्यांच्या गाडींतून घरीं परत जायला निघालों. गाडी सुरू होतांच डॉक्टर आपल्याला घर व दवाखाना यांचें किती भारी भाडें भरावें लागतें हें रंगांत येऊन सांगूं लागले. त्यांच्या घर-मालकाची एक सिनेमाकंपनी होती. अशा लक्षाधीश मनुष्याने आपल्याला लुबाडावें याबद्दल डॉक्टरांना अत्यंत दुःख होत होतें. ' लुच्चा ', ' चोर ' वगैरे विशेषणांची ते त्याच्यावर खैरात करूं लागले. त्या गृहस्थाला शंभर वर्षें आयुष्य असल्यामुळेंच की काय, त्याची गाडी याच वेळीं आमच्या समोरून आली. फार दिवसांत आम्ही त्याला भेटलों नव्हतों. त्यामुळे आम्हांला त्याच्या चहाच्या आग्रहाला नाही म्हणवेना !

त्याच्या बंगल्यावर फक्कड चहाचा व खमंग चिवड्याचा समाचार घेतांना तो आपली रडकथा आम्हांला सांगूं लागला. चित्रपटांतले तारे आणि तारका यांचा भाव किती भरमसाट वाढला आहे, तारका कितीहि गोऱ्या असल्या तरी त्या काळाबाजार कसा करतात, पंधरा हजारांचा तोंडी करार झाला तर त्यांतले दहा हजार गुपचुप आगाऊ कसे मोजावे लागतात, एवढ्या मोठ्या रकमा दुसरीकडे हिशेबांत टाकणें किती कठीण जातें, इतके पैसे देऊनहि गोंडस मुखड्याखेरीज दुसरें कुठलेंहि भांडवल जवळ नसलेलीं हीं माणसें कामाची खोटी कशी करतात, हें सारें त्याने आम्हांला साग्रसंगीत ऐकवलें. त्याचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलों. चार पावलें चालतों न चालतों तोंच मागून येणाऱ्या गाडींतून कुणाची तरी हाक ऐकूं आली. वळून पाहतों तों याच कंपनींतले एक नामांकित

नट. आम्ही गाडींत बसतांच त्यांनी आपलें पुराण सुरू केलें. कोर्टांत कसली तरी केस होती त्यांची. त्या केसच्या पायीं वकिलाने त्यांना असें पिळून काढलें होतें म्हणे—

तो वकील दुसरा तिसरा कुणी नव्हता. आम्ही ज्याच्या समाचाराला गेलों होतों ते वकीलसाहेबच—

हसावें की रडावें हें मला कळेना. वकिलांचें म्हणणें आपल्याला औषध देणारा डॉक्टर लुच्चा, डॉक्टरांचें म्हणणें आपला घरमालक लबाड, त्या घरमालकाचें म्हणणें आपल्या कंपनींत काम करणारा नट चोर आणि त्या नटवर्यांचें म्हणणें आपली केस चालवणारा वकील डाकू ! यांतला प्रत्येकजण खरें बोलत होता. पण त्या खरें बोलण्यांत एक मेख होती. हे सारे सज्जन फक्त व्यवहारदृष्टया खरें बोलत होते. व्यवहाराची दृष्टि नेहमीच एकांगी असते. ती स्वतःपुरती पाहते. 'दुसऱ्यांनी तुझ्याशीं जसें वागावें असें तुला वाटतें तसें तूं दुसऱ्यांशीं वाग' हें सांगणाऱ्या ख्रिस्ताची दृष्टि ही खरी जीवनदृष्टि होय. पण अशी दृष्टि या जगांत हजारांत एखाद्या-पाशीच आढळते. बाकीचे सारे—त्यांचें वर्णन कशाला करायला हवें ? सकाळपासून मी त्यांचीं दर्शनें घेतच होतों की !

असें कां व्हावें याचा मी विचार करूं लागलों आणि मला एकदम वाटलें, याचें सारें खापर व्याकरणाच्या माथीं फोडलें पाहिजे. या व्याकरणाने तीन पुरुषांचीं तीन भिन्न जगें कशाला निर्माण केलीं ? त्याने फक्त प्रथम-पुरुष ठेवला असता तर त्याचे असे काय तीन चव्वल बुडणार होते ? पण आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन करण्याकरिता त्याने द्वितीय आणि तृतीय पुरुष शोधून काढले. साहजिकच जो तो 'सत्य बोला', 'परोपकार करा', 'मुलांनी आईबापांची आज्ञा पाळावी', 'मुक्या प्राण्यांवर दया करावी' असा उपदेश करूं लागला. 'मी सत्य बोलतों', 'मी परोपकार करतों' असें म्हणायची आवश्यकता कुणालाच वाटेना. ओझें वाटून घ्यायची पाळी आली की त्यांतला जड भाग दुसऱ्याच्या शिरावर लादायचा हा मनुष्यस्वभावच आहे ! व्याकरणाने तीन पुरुष कल्पून

नेमकें याच गोष्टीला उत्तेजन दिलें. त्यामुळे जग सुधारण्याची जबाबदारी द्वितीय आणि तृतीय पुरुषांवर टाकून प्रथम पुरुष नामानिराळा राहिला ! त्यामुळेच मानवी जीवनांत अनेक दुःखें निर्माण झालीं.

म्हणून कालपासून मला वाटूं लागलें आहे की आता कांही करून नवें व्याकरण तयार करायलाच हवें. या व्याकरणांत द्वितीय आणि तृतीय पुरुषांना मज्जाव असेल. असें व्याकरण झालें तरच नवा समाज आणि नवा मानव यांची तुम्हांआम्हांला आज पडणारीं अंधुक स्वप्नें कधीतरी स्पष्ट दिसूं लागतील—अंशतः का होईना, तीं सत्यसृष्टींत उतरतील.

१९४९

९

# वनलता

'बराय् ! येतों.'

'पुन्हा आलांत म्हणजे आमच्याकडंच उतरायचं हं !'

'तें काही सांगायला नको ! आवर्त दशांशांत तोच तोच आंकडा पुन्हा पुन्हा येतो ना ! पाहुणाहि तसाच असतो'

पाहुणे होते गणिताचे प्राध्यापक. तेव्हा त्यांनी आवर्त दशांशाचा उल्लेख करावा हें ठीक होतें. पण या उल्लेखाने माझ्या मनांतल्या इंग्रजी दुसरींतल्या अनेक आठवणी जाग्या केल्या. त्या यत्तेंत मी गेलों तेव्हा दशांश चिन्हाइतकी रहस्यमय गोष्ट साऱ्या गणितशास्त्रांत दुसरी कुठलीच नसेल असें मला वाटलें. लहान मुलीला लावलेल्या कुंकवाच्या बारीक टिकलीसारखें तें सुंदर दिसे. सख्खी बहीण नसल्यामुळेंच की काय अशा टिकलीचें मला मोठें आकर्षण वाटे. मी दशांश शिकायला लागलों तेव्हाची एक पौर्णिमा तर अजून मला आठवते. पूर्वेकडे पिवळसर चंद्रबिंब हसत हसत वर आलें. आकाशाच्या पाटीवर परमेश्वर दशांशाचें उदाहरण सोडवायला बसला आहे आणि त्या उदाहरणांतलें हें दशांशचिन्ह त्याने

मांडलें आहे असें तें बिब पाहून मला वाटलें. तरुण रमणीच्या गालावरच्या तिळांत दशांशचिन्हाचा भास होण्याचें तें माझें वय नव्हतें ! म्हणून तसली कल्पना त्या वेळीं मला कधीच सुचली नाही. पण इंग्रजी दुसऱ्या यत्तेंत फुलपांखराच्या पंखावरच्या नाजूक ठिपक्याप्रमाणे दिसणाऱ्या गणिताच्या पुस्तकांतील दशांश चिन्हांच्या मेळाव्यांत मी कितीतरी दिवस गुंग होऊन गेलों होतों !

मात्र दशांशाचीं अवघड उदाहरणें सुरू होतांच माझ्या डोळ्यांवरली ही गोड धुंदी उतरली ! माझ्या तोंडचें पाणी पळालें. विशेषत: आवर्त सुरू होतांच हें काय अजब प्रकरण आहे तेंच मला कळेना. पुन्हा भाग द्यावा तरी तोच आकडा आपला दत्त म्हणून पुढे उभा ! त्या काळीं सांगली-हून बुधगांव स्टेशनाकडे जाणाऱ्या मधल्या वाटेवर सात एकसारखीं दिसणारीं चिंचेचीं झाडें होती. त्या झाडांवर सात एकसारखीं दिसणारीं भुतें राहतात अशी आम्हां सर्व बाळगोपाळांची ठाम समजूत होती. तीं भुतेंच त्या भागाकारांत आपल्यासमोर येऊन उभीं राहत आहेत असें तें आवर्ताचें उदाहरण सोडवितांना मला वाटे. त्या भासाचा परिणाम उत्तर चुकण्यांत आणि छडया खाण्यांत होई हें सांगायला कशाला हवें ?

म्हणूनच पाहुण्यांच्या बोलण्यावर कोटी करण्याच्या फंदांत न पडतां मी त्यांना टांग्यापर्यंत पोचविण्याकरितां बाहेर आलों. आम्ही दोघेहि घराच्या पायऱ्या उतरलों, अंगण ओलांडलें. पाहुणे एकदम थांबले आणि फाटकाजवळच्या एका झाडाकडे कौतुकाने निरखून पाहत म्हणाले, 'मोठं सुंदर झाड आहे हं !'

तें कसलें झाड आहे हें इथं कुणा लेकाला ठाऊक होतें ? तसलीं पुष्कळ झाडें घराभोंवतालच्या मोकळ्या जागेंत आपोआप उगवलीं होतीं. मी त्यांच्याकडे कधीच लक्ष दिलें नव्हतें. विश्वाच्या संसारांत आकाश हा पुरुष आणि धरणी ही स्त्री आहे हें मला ठाऊक आहे. त्यामुळे स्त्रीचे सर्व गुण जमिनींत दिसतात. केसांत माळायला सुंदर, सुगंधी फुलें मिळालीं नाहीत तरी स्त्री कसलीं तरी फुलें, प्रसंगीं पानेंसुद्धा केसांत खोवते. जमिनीचेंहि

तसेंच आहे. तुम्ही घराभोंवतालच्या मोकळ्या जमिनींत सुंदर बाग उठविली नाही म्हणून तिचें कांही नडत नाही. गवत, झुडपें, कांहीना कांही तिच्यांत आपोआप उगवतेंच! आपलें शरीर कसें सुशोभित करावें हें तिला कांही कुणी शिकवावें लागत नाही !

त्या झाडाचें कौतुक करणारे पाहुणे गणितशास्त्रज्ञ आहेत की वनस्पतिशास्त्रज्ञ आहेत हें मला कळेना. गाडी चुकेल याची काळजी न करतां ते मोठ्या बारकाईने तें झाड पाहूं लागले. अर्थात् मलाहि त्या अपूर्व वनस्पतीकडे लक्ष देणें भाग पडलें.

त्या वनस्पतीला झाड म्हणावें कीं झुडुप म्हणावें हें सांगणें मोठें कठीण होतें. छातीइतकें उंच होतें तें. त्याचीं पानें दोन रंगांचीं होतीं. कांही हिरवीं आणि कांही—हा दुसरा रंग. मोठा मजेदार होता ! एखाद्या लहान मुलाने नकळत निरनिराळे रंग मिसळून चित्र रंगवावें तशी या पानांच्या बाबतींत निसर्गाची स्थिति झाली होती. तीं पानें कोवळ्या पालवीसारखीं तर दिसत होतींच. पण ती पालवी किरमिजी, पोपटी, सोनेरी आणि काळसर रंगाच्या मिश्रणांत नुकतींच नाहून आलीं आहेत असें वाटत होतें. काळी चंद्रकळा नेसलेली गोरी मुलगी जशी अधिकच उठून दिसते तशी हिरव्या पानांच्या झुबक्यांत हीं रंगीबेरंगी पानें मोठीं मोहक वाटत होतीं. झाडाच्या फांद्यांवर मधूनमधून हिरव्यागार बारीक फळांचे झुबके लटकले होते. शेजारच्या पोरांनी हीं फळें शिल्लक ठेवलीं होतीं यावरून तीं खाण्याच्या उपयोगी पडत नसावींत ! पण राय-आवळ्याच्या आकाराच्या त्या हिरव्या फळांमुळें या अनामिक झाडाचें सौंदर्य वृद्धिंगत झालें होतें यांत संशय नाही. त्याला फुलें बहुधा येत नसावींत ! तरीहि तें मोठें सुंदर दिसत होतें.

तें झाड डोळे भरून पाहिल्यावर पाहुण्यांनी घराभोवतालच्या मोकळ्या जागेंत चोहीकडे नजर फिरविली आणि ते हर्षून उद्गारले, ‘ अरे वा ! तुम्हीं तर या झाडांची सुंदर बागच उठवून दिली आहे की ! ’

सत्य म्हणजे काय हा प्रश्न पायलटने कांहीं उगीच विचारला नव्हता !

वस्तुस्थिति अशी होती—तीं झाडें मला किंवा माझ्या बायकोला न

विचारतां आमच्या घराभोवती उगवलीं होतीं. हद्दींत परवानगीवांचून प्रवेश केल्यावद्दल त्यांच्यावर फिर्याद करण्याचा घरमालक—म्हणजे भाडे-करू—या नात्याने मला हक्क होता. ‘काय घराभोवती जंगल माजलंय् ! एकदा सारं काढून टाकायला हवं हं !’ असें परवाच त्या झाडांकडे तिरस्काराने पाहून सौभाग्यवती म्हणाली होती. तिने म्हटलें म्हणूनच नव्हे, पण लोकांनी आपल्याला अरण्यपंडित म्हणू नये म्हणून मुद्दाम एक गडी लावून हें जंगल तोडण्याचा विचारसुद्धा त्या वेळीं माझ्या मनांत येऊन गेला होता ! आणि हे प्राध्यापक महाशय तर आता म्हणत होते, ‘तुम्ही या झाडांची सुंदर बागच उठवून दिली आहे !’

मी पूर्वेकडच्या बाजूला उगवलेल्या पांचपंचवीस झाडांकडे पाहिलें. मला दुष्यंताच्या त्या मार्मिक वाक्याची आठवण झाली. आश्रमवासी शकुंतलेला पाहून तो तिच्या लावण्याची राजवाड्यांतल्या रमणींच्या सौंदर्याशी तुलना करतो आणि म्हणतो, ‘वनलतांनी उद्यानलतांना मागं टाकलं हेंच खरं !’

आमच्या घराभोवती पसरलेल्या या वनलतांच्या बाबतींतसुद्धा तें खरें होतें. पण या वनलतांचें सौंदर्य आजपर्यंत मला कधीच दिसलें नव्हतें. घराभोवती कसलें तरी रान माजलंय् या समजुतींत मी मघापर्यंत होतों ! असें कां व्हावें ? डोळे असूनहि माणसें आंधळीं होतात काय ?

जगांतल्या प्रत्येक माणसांत कांही ना कांही गुण असतोच. जिच्यांत औषधी गुण नाही अशी वनस्पति नाही असें म्हणतात ना ? तसेंच माणसाचें आहे. पण अतिपरिचयामुळे असो, आंधळेपणामुळे असो अथवा अज्ञानामुळे असो, माणसाची चांगली बाजू सहसा आपल्या डोळ्यांत भरत नाही. ओळखीच्या बहुतेक माणसांची त्यांच्यामागे आपण निंदा करतों याचें कारण हेंच आहे.

हें माझ्या मनांत आलें मात्र—घराभोवती वेडीवाकडीं पसरलेलीं ती पांचपंचवीस झाडें एकदम अदृश्य झालीं. त्यांच्या जागीं माझ्या आयुष्यांत येऊन गेलेले कितीतरी आप्त आणि मित्र उभे राहिले. त्यांच्यापैकी

अनेकांवर अजून मनांतून मी रुष्ट आहें, कित्येकांशी मी कडकडून भांडलों आहें. कांहींची वेळींअवेळीं मीं निंदा केली आहे. माझ्या त्या वेळच्या वागण्यांत कांही चूक असेल असें मला आतापर्यंत वाटलें नव्हतें. प्रत्येक वेळीं मी बरोबर आहें, सारी चूक इतरांकडेच आहे, असें मी मानीत आलों होतों. हजार उदाहरणें कशाला हवींत ? सख्खी आई आणि दत्तक वडील या दोघांशीहि मी नेहमीच एक प्रकारच्या तुटकपणाने, तुसडेपणाने वागलों होतों. त्यांच्या स्वभावांतले कांटेच मला सदैव बोचत गेले ही गोष्ट खरी आहे. पण त्या कांट्याप्रमाणे सुगंधाच्या कांही छटाहि तिथे असू शकतील याचा मीं कधी विचारच केला नाही. ओबडधोबड लेखक ज्याप्रमाणे खलनायक म्हणजे साऱ्या अवगुणांचें माहेरघर असलेलें पात्र मानतो, त्याप्रमाणे मला अप्रिय वाटणाऱ्या माणसांकडे मी नेहमी पाहत आलों. आपआपल्या परीने प्रत्येक झाड आणि प्रत्येक माणूस सुंदर असतें या गोष्टीचा उमजच मला उभ्या आयुष्यांत पडला नाही !

असें होऊं नये ! पण होतें खरें !

या पाहुण्यांची नजर घराभोवताली स्वैरपणे उगवलेल्या या झाडांकडे गेली नसती तर कदाचित् चार दिवसांत पत्नीच्या सौंदर्यदृष्टीचें समाधान करण्याकरितां मी त्यांचा निःपातहि करून टाकला असता !

गडबडीने टांग्यांत बसतां बसतां पाहुण्यांनी मला प्रश्न केला, ' या झाडांचं बीं कुठून आणलंत तुम्ही ? मीसुद्धा तीं घराभोवती लावावींत म्हणतों ! '

आता काय सांगायचें कपाळ ? खरें सांगत बसावें तर पाहुण्यांची गाडी चुकविल्याचें पाप पदरीं पडायचें ! म्हणून दिली झालें एक लोणकढी ठेवून—' माझ्या मेव्हण्यांना फार आवड आहे असल्या गोष्टींची—त्यांच्याकडून बायकोने कसलें बीं आणलें होतें कुणाला ठाऊक ! पण झाडं फार सुंदर दिसतात हं ! जरा व्यवस्थित लावायला हवीं होतीं तीं ! चौकशी करून तें बी तुमच्याकडे पाठवून देईन मी ! '

टांगा खाड खाड करीत निघून गेल्यावर किती तरी वेळ त्या झाडांकडे

पाहत मी उभा होतों. शेवटीं मी घरांत जाण्याकरिता वळलों तो एक निश्चय करून. बायकोशी भांडावें लागलें तरी बेहेत्तर आहे! पण हीं झाडें काढून टाकायचीं नाहीत, उलट त्यांचें सौंदर्य पाहायला तिला शिकवायचें!

या निश्चयाला एका मनाच्या टाळ्या पडल्या. इतक्यांत दुसरें मन हळूच म्हणालें, 'या झाडाला कसलीं तरी फुलं हवीं होतीं म्हणजे आपलं काम अधिक सोपं झालं असतं.'

मी फाटकाजवळच्या त्या झाडाजवळ परत जाऊन निरखून पाहिलें. त्याच्या हिरव्या फळांच्या मधें तांबडसर रंगाचीं अगदी बारीक फुलें दिसत होतीं.

हीं फुलें पत्नीला दाखवावींत म्हणून मी तीं भरभर तोडूं लागलों.

अरे बापरे! जिथें हात लावावा तिथें असा विचित्र चिकटपणा जाणवूं लागला—साऱ्या बोटांना डिंक फासल्यासारखें झालें!

वनलतेंतील लता या शब्दाइतकाच वन हा शब्दहि महत्त्वाचा आहे हें दुष्यंताला शकुंतलेबरोबर संसार करतांना पुढें कधीकाळीं कळलें की नाही कुणाला ठाऊक! पण माझी मात्र त्या बाबतींत खात्री होऊन चुकली! त्या झाडाला स्पर्श करण्यापूर्वीं मी काव्याच्या जगांत होतो. त्या स्पर्शानें मी एकदम व्यवहाराच्या जगांत येऊन आदळलों!

प्राध्यापक मजकुरांचें या झाडाच्या बाबतींत स्मरण देणारें पत्र येतांच मी उलट टपालीं उत्तर पाठविलें, 'माझ्या मेव्हण्याच्या मतें हें झाड थोडें विषारी आहे! तेव्हा तें घराभोंवतीं न लावणेंच चांगलें'.

१९५५

## १०

# सुविचार

सुविचार वाचण्याचा मला लहानपणापासून छंद आहे. ही आवड माझ्या ठिकाणीं कशी निर्माण झाली कोण जाणे ! कांही तरी रम्य किंवा भव्य पाहिलें म्हणजे माणसाचें मन क्षणभर उजळून जातें ना ? तसेंच सुभाषिताच्या वाचनानें होत असावें ! निदान चहा घेतल्यावर वाटतें, तसें तरी माणसाला खास वाटत असावें ! यामुळेच की काय चहाच्या खालोखाल मला सुभाषितें वाचण्याचें व्यसन जडलें आहे.

साहजिकच आजचें दैनिक हातीं पडतांच पहिल्या पानावरच्या भयंकर खुनाकडे फारसें लक्ष न देतां मी आंतलें पान उघडलें. अग्रलेख वाचण्याकरिता नव्हे; त्या अग्रलेखावर छापलेला सुविचार पाहण्यासाठी ! तो सुविचार असा होता ‘ आपलें प्रत्येक कृत्य हें आयुष्यांतलें शेवटचें कृत्य आहे असें मानून वागत जा.’

हें वाचतांच मी चमकलों. कुणा वेड्याचा तर हा सुविचार नसेल ना, असें माझ्या मनांत आलें. हो ! वेडे लोकहि कधी कधी जगाला शहाणपण शिकवितात ! शेक्सपिअरचा ‘ किंग लियर ’ हें वेडाच्या लहरींत

शाश्वत सत्यें बोलून जाणाऱ्या माणसाचें सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे.

या विचित्र सुविचाराखालीं कुणाचें नांव आहे हें मी कुतूहलानें पाहूं लागलों. मार्कस ऑरेलिस हें नांव माझ्या कानांवरून गेलें होतें! पण इत्तीच्या फकिराइतकीच या गृहस्थाची मला आता आठवण राहिली होती! खूप डोकें खाजविलें. तेव्हा कुठे लक्षांत आलें की, मार्कस ऑरेलिस हा एक रोमन राजा होता. नुसता राजाच नव्हे तर तत्त्व-चितकहि!

तत्त्ववेत्ते राजे झाल्याशिवाय जग सुखी होणें शक्य नाही, अशा अर्थाचें एका तत्त्ववेत्त्याचेंच वचन मीं ऐकलें होतें. मार्कस ऑरेलिसच्या बाबतींत हें अद्‌भुत स्वप्न सत्यसृष्टींत उतरलें होतें! पण——

स्वप्नें ताऱ्यांसारखीं असतात हेंच खरें! तीं दूर अंतराळांत असतात तोंपर्यंत त्यांची चमक आपलें मन वेधून टाकतें. तसें नसतें तर 'आपली प्रत्येक कृति ही या जगांतली शेवटची कृति मान' असा विक्षिप्त उपदेश या तत्त्वज्ञ राजाने कशाला केला असता? आजचा दिवस हा आपल्या आयुष्यांतला शेवटचा दिवस आहे अशी एखाद्याची खात्री झाली तर तो मनुष्य उरलेले आठ प्रहर धर्माचरणांत घालवील अशी हा उपदेश करणाऱ्या ऑरेलसची समजूत असावी! पण तत्त्ववेत्ता असलेल्या या राजाला जगाचें खरें स्वरूप कळलें होतें असें कोण म्हणेल? त्याच्यापेक्षा एक अमेरिकन नाटककारच या बाबतींत मला अधिक शहाणा वाटतो.

या नाटककाराने एका बँकेंतल्या कारकुनाचें अशा प्रकारचें चित्र रंगविलें आहे. आपलें आयुष्य आतां फक्त एक आठवडा उरलें आहे, अशी त्या कारकुनाची कांही कारणानें समजूत होते! हें भयंकर सत्य त्याला डॉक्टरांकडून कळतें की ज्योतिषाकडून कळतें, हें मला आठवत नाही. पण तशी त्याची खात्री मात्र होते. या जगांत आपला मुक्काम आता फक्त सात दिवस होणार आहे अशी खात्री होतांच कारकून महाशय गडबडतात. पण लगेच तो सामान्य जीव आपल्या सर्व शक्ति एकवटून जीवनातल्या अंतिम युद्धाला सज्ज होतो. तो म्हणतो, एवीतेवी आपल्याला सात दिवसांनीं हें जग सोडून जावें लागणार! मग या सात दिवसांत जगांतल्या

सुखांच्या सप्त सागरांवर स्वच्छंद सफरी कां करूं नयेत? मिळतील आणि मिळविता येतील त्या सुखांचा मनसोक्त उपभोग कां घेऊं नये? मरायचेंच तर अजीर्ण होऊन मरावें! उपाशी मरण्यांत काय हशील आहे?

पण सुखांचा स्वच्छंद उपभोग घ्यायचा म्हटलें की हातांत मुबलक पैसा हवा! सात दिवसांनी मरणाऱ्या मनुष्याने मागाहून होणाऱ्या बेअब्रूची पर्वा करूं नये असा हा कारकून पोक्त विचार करतो. बँकेंतली बरीचशी रक्कम लंपास करून तो बेपत्ता होतो. सात दिवसांनी काय होईल याची त्याला मुळीच काळजी नसते! सात दिवसांत जास्तीत जास्ती सुख कसें लुटायचें, आपल्या अगणित अतृप्त इच्छा कशा पूर्ण करून घ्यायच्या, या फिकिरींत तो असतो. तो आपल्या बायकोला बरोबर घेऊन चैन करायला जातो असें मूळ नाटकांत दाखविलें आहे. पण मला वाटतें, सात दिवसांनी आपण नक्की मरणार अशी खात्री असेल तर जगांतले पुष्कळ पुरुष दुसऱ्याच्या बायकोला बरोबर घेऊन जाण्याससुद्धां कमी करणार नाहींत.

सदरहू कारकून महाशय सात दिवसांनंतर जिवंत राहतात, आणि उधळलेले पैसे परत करून बँकेंतली नोकरी कशी टिकवायची या विवंचनेंत पडतात! नाटिकेंतल्या त्या पुढच्या भागाशीं आपल्याला कांही कर्तव्य नाही. पण कारकुनाचें हें चित्र रंगवितांना मार्कस ऑरेलिस-पेक्षा या नाटककारानेंच मनुष्यस्वभाव अधिक अचूक ओळखला होता यांत शंका नाही.

ऑरेलिसपेक्षा निराळा सुविचार सांगणारा एक संस्कृत पंडितहि मला लहानपणीं भेटला होता. त्याचा उपदेश असा होता—'आपण अगदी अमर आहों असें मानून शहाण्या मनुष्याने विद्या व पैसा या दोन्ही गोष्टी मिळ-वीत राहावें, मात्र धर्माचें आचरण करतांना प्रत्येक वेळीं मृत्यूनें जणुं कांहीं आपले केस पकडले आहेत अशा वृत्तीने वागावें.' हा उपदेश विद्यार्थिदशेंत मला फार आवडे. पण जसजसा मी मोठा होऊं लागलों, तसतसा त्याचा फोलपणा माझ्या लक्षांत आला. हा संस्कृत पंडित माणसाला उलट दिशांनी

जाणाऱ्या दोन तारांवर कसरत करायला सांगत होता. संसार करणें आणि संन्यासी होणें हें एकाच वेळीं कुणाला कसें साधणार ? स्वत:ला अजरामर मानणारा माणूस मृत्यूविषयीं बेफिकीर होईल, जगांत बेछूटपणाने वागूं लागेल ! उलट मृत्यूच्या गूढ, भयानक छायेने ज्य चें हृदय झाकळून टाकलें आहे. तो कुठलेंहि काम उत्साहानें करण्याला असमर्थ होईल.

मी तत्त्ववेत्ता नाहीं, पंडितहि नाहीं ! पण सामान्य माणसाचें तत्त्वज्ञान या दोन्ही उपदेशांपेक्षा अगदीं निराळे असलें पाहिजे असें मला वाटतें. प्रत्येक दिवशीं उजाडल्याबरोबर हा माझा जगांतला शेवटचा दिवस आहे असें मानण्याऐवजीं, हा या जगांतला माझा पहिला दिवस आहे असें माणूस म्हणूं लागला, तर जीवनांतलें कितीतरी दु:ख कमी होईल. तसें पाहिलें तर दररोज एक नवें सुंदर जग आपल्या भोंवती निर्माण होत असतें ! पण आपण या जगाची दखल घेत नाहीं. कालपरवांचीं काळजीने भरलेलीं असंख्य जड गाठोडीं पाठीवर घेऊन आपण भुईला नाक लावून चालत असतों. त्यामुळें साऱ्या सृष्टीवर सोनें उधळीत येणाऱ्या नव्या सूर्याचें सौंदर्य आपल्या नजरेंत भरत नाही. आजचा दिवस हा या जगांतला माझा पहिला दिवस आहे असें मनुष्याने मानलें तरच उषेच्या गुलाबी स्मितांत, निशेच्या मखमली बुरख्यांत, तारकांच्या लपंडावांत, ऋतूंच्या पाठशिवणींत, बहरलेल्या फुलवेलींत, निष्पर्ण वृक्षांत, आकाशाला भिडूं पाहणाऱ्या उंच हवेलींत, मातीशीं गुजगोष्टी करणाऱ्या चुडतांच्या खोपटींत, समुद्राच्या ओहोटींत, महापूर आलेल्या नदींत, किंबहुना आपल्या सभोवती पसरलेल्या सर्व सृष्टींत केवढें सौंदर्य भरलें आहे, याची त्याला कल्पना येईल.

केवळ जडसृष्टींतच हें सौंदर्य आहे असें नाहीं. आपल्या भोंवतालच्या प्रत्येक लहान मोठ्या व्यक्तींतहि तें चमकत असतें. पण जीर्ण जीवनाचीं झांपडें डोळ्यांना लावून आपण प्रत्येक माणसाकडे पाहतों. पूर्वग्रहदूषित दृष्टीनें त्याचे सर्व व्यवहार आपण न्याहाळतों. त्यामुळें सामान्य माणसांतलें माधें काव्य आपल्या लेखी कोमेजून जातें !

पण आजचा दिवस हा आपल्या आयुष्यांतला पहिला दिवस आहे या जाणिवेनें मनुष्य वागूं लागला तर ?–तर बसमध्यें खिडकीपाशी बसण्याचा हट्ट धरणाऱ्या मुलापासून तो हट्ट ओळखून त्याला जागा करून देणाऱ्या म्हाताऱ्यापर्यंत, बालकाच्या बोबड्या बोलापासून पंडितांच्या विद्वत्तापूर्ण प्रवचनापर्यंत, यौवनाच्या धुंदींत मस्तपणानें चालणाऱ्या रूपगर्वितेपासून जिच्या केसांचा कापूस झाला आहे आणि चेहऱ्यावर काळपुरुषानें आपल्या ट्रॅक्टरने नांगरट केली आहे अशा वृद्धेपर्यंत, सर्वत्र आपल्याला त्या सौंदर्याचें दर्शन होईल. प्रत्येक व्यक्तींत, त्या व्यक्तीच्या चालण्याबोलण्यांत, तिच्या प्रत्येक उत्कट अनुभूतींत किती काव्य आहे, याची आपल्याला जाणीव होईल. क्षणोक्षणीं होणाऱ्या जीवनाच्या काव्यात्मक जाणिवेपेक्षा जगांत अधिक रसाळ असें कुठलें सुख आहे ? अधिक श्रेष्ठ असा कोणता आनंद आहे ?

१९६०

११

# नवा कायदा

अवघी दोन ओळींची बातमी ! पण ती वाचल्यापासून गेले चार दिवस मी बेचैन आहें ! हैद्राबाद संस्थानांत रझाकारांचा जो धुमाकूळ चालला होता, त्याच्याशीं या बातमीचा कांही संबंध नाही, हें आधीच सांगून टाकलेलें बरें ! मन अस्वस्थ करून सोडणाऱ्या असल्या बातम्या चहा पितां पितां वाचायच्या आणि पेल्यांतला शेवटचा घोट संपतांच त्यांचा निरोप घ्यायचा, याची आम्हां सुशिक्षितांना चांगलीच सवय झाली आहे ! आम्ही वृत्तपत्रांतल्या रोमांचकारी वार्ता वाचतों त्या घटकाभर करमणूक व्हावी म्हणून ! त्या बाबतींत आम्हांला कांही करायचें असतें म्हणून नव्हे ! चहाच्या पेल्यांतलीं वादळें आम्हांला तिन्ही त्रिकाळ हवीं असतात पण खरेंखुरें वादळ आमच्याभोवती घोंगावूं लागलें तर ? तर त्याच्याशीं घटकाभरसुद्धा आम्ही टक्कर देऊं शकणार नाहीं !

त्या दोन ओळींच्या बातमीने माझ्या मनांत असलेंच एक वादळ उठविलें ! मुंबई सरकार लवकरच एक नवा कायदा करणार आहे, अशी माहिती होती त्या बातमींत ! गेल्या दोन तीन वर्षांत या सरकारां

अनेक नवे कायदे केले आहेत. पण यांपैकी एकानेहि माझें मनःस्वास्थ्य इतकें बिघडवून टाकलें नव्हतें. दारूबंदीचा आणि बायको-बंदीचा ( म्हणजे एक बायको जिवंत असतांना दुसरीला बंदी करण्याचा ) कायदा पास झाल्यावर अनेक लोकांनी ओरड केली. या आरडाओरडींत कांही साहित्यिक आणि कलावंतहि सामील झाले ! ज्याचें जळे त्याला कळे, या न्यायाने त्यांच्या विरोधांत अर्थ असूं शकेल ! नाही कुणीं म्हणावें ? पण हे दोन्ही कायदे पास झाले तेव्हां मला प्रलयकाल ओढवल्याचा भास मुळीच झाला नाही ! प्रीतीप्रमाणे नीतीचाहि उगम माणसाच्या अंतरंगांतून व्हायला हवा, अशी कांहीतरी स्वतःशींच पुटपुट करण्यापलीकडे मी या कायद्यांचा अधिक विचार कधीच केला नाही !

या दोन कायद्यांकडे मी स्थितप्रज्ञाच्या दृष्टीने पाहूं शकलों. कारण ते अमलांत आल्यामुळे माझी कोणतीच अडचण होण्याचा संभव नव्हता. माझ्या कथा-कादंबऱ्यांतलें एखादें पात्र क्वचित् मद्याचा आस्वाद घेत असलें तरी 'ब्रँडीच्या बाटलीं'तल्या त्रिंबकरावापेक्षा कांही मला दारूची अधिक माहिती नाही ! 'तुमचें हें पात्र कोणत्या प्रकारची दारू पितें ?' असा जर एखाद्या तज्ज्ञ टीकाकाराने मला प्रश्न केला, तर त्याचें समाधान मला करतां येणार नाही ! कोकणांतल्या खेड्यांत रस्त्याच्या कडेलाच माडीचीं छपरें असत. तरीसुद्धा तिचें मला बरोबर वर्णन करून सांगतां येणार नाही. माझें मद्यज्ञान तीं दुकानें दुरून पाहण्यापलीकडे गेलें नसल्यामुळे, दारूबंदीचें सोयरसुतक मला वाटूं नये हें स्वाभाविकच होतें.

जी स्थिति दारूची तीच बायकोची ! आपलें लग्न कसें झालें याचा उलगडा ज्यांना उभ्या जन्मांत होत नाही, अशा बावळट प्राण्यांपैकीच मी एक आहें. असले शेंदाड शिपाई दुसऱ्या लग्नाच्या फंदांत कशाला पडतील ? शिवाय, 'दोन बायकांचा दादला' ही इसापनीतींतील गोष्ट माझी फार आवडती आहे. म्हातारीने काळे आणि तरणीने पांढरे केस उपटल्यामुळे टक्कल पडलेल्या आणि हुळहुळणाऱ्या डोक्यावरून हात फिरवणाऱ्या इसापच्या त्या बिचाऱ्या नवऱ्याचें चित्र मला नेहमीच

हास्यास्पद वाटत आलें आहे ! त्यामुळेच कीं काय, एक बायको असतांना दुसरी करणें ही महा भयंकर गोष्ट आहे, असें बाळपणापासून माझें ठाम मत झालें आहे.

काँग्रेस सरकारच्या द्विभार्या-प्रतिबंधक कायद्यामुळे अनेक शूर पुरुष सरकारवर रुष्ट झाले. त्यांतले एक सद्‌गृहस्थ सोलापूरजवळच्या एका खेड्यांतले पाटील आहेत. परवा हैद्राबाद प्रकरणीं खेरांनी सरहद्दीवरच्या गावांना भेट दिली. तेव्हा हे पाटीलबुवा त्यांना भेटून म्हणाले, 'कांग्रेस सरकार येरवीं कितीबी चांगलं असलं, तरी त्यानं एक लई वंगाळ काम केलंया साहेब !' पाटीलबुवांचा हा आरोप ऐकून खेर चकित झाले ! ते उद्‌गारते झाले,' तें कोणतें रे बाबा ?' पाटलाने शांतपणाने उत्तर दिलें, 'माझ्या सात बायका हायत साहेब ! पन मला आनखी एक लगीन करायचं व्हतं ! तुम्हीं तर असल्या लग्नाला बंदी घातलीया ! मोठा जुलूम होतोय हा साहेब आमच्यावर ! ' सात बायकांबरोबर सुखाने संसार करून आठवी करण्याची हिम्मत बाळगणाऱ्या या पाटलाच्या बहादुरीवर मी प्रसंगीं एखादा पोवाडाहि रचीन ! पण माझी प्रकृति त्याच्याहून फार भिन्न असल्यामुळे लग्नबंदीच्या कायद्याला विरोध करण्याची इच्छा मला स्वप्नांत सुद्धा होणार नाही.

असें असून आतांच एका कायद्याच्या बातमीने मी अस्वस्थ झालों आहें. राहून राहून मी स्वतःशींच म्हणत आहे, 'साप्ताहिक आणि मासिक भविष्यें छापण्याचे जे असंख्य देशी कारखाने आपल्याकडे सध्या चालू आहेत, त्यांना बंदी करण्याची सरकारची ही कल्पना मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्या तत्त्वांशीं सुसंगत आहे काय ? या कायद्याने माझ्यासारख्या सामान्य माणसाचें दुःख वाढेल कीं कमी होईल ?'

मी कुठल्याहि मासिकाचा किंवा साप्ताहिकाचा संपादक नाहीं. तेव्हा भविष्यकथनाच्या या संकल्पित बंदीकडे मी धंदेवाईक दृष्टीने पाहत नाहीं हें सांगायला नकोच ! माझे मालवणचे मित्र म्हापणकर यांच्या धंद्यावर सरकार कुऱ्हाड चालवीत आहे, म्हणून मित्रप्रेमाने मी या कायद्या-

विरुद्ध तक्रार करीत आहें असेंहि नाही. म्हापणकरांचें भविष्य नसलेला ‘धनुर्धारी’ म्हणजे हॅम्लेटचें पात्र नसलेलें ‘हॅम्लेट’ नाटक होय, हें खरें आहे! पण भविष्य छापण्याची मुंबई प्रांतांत बंदी घातल्यामुळे म्हापण-करांचें फारसें नुकसान होणार नाहीं! इतर प्रांतिक भाषांत त्यांच्या भविष्याचीं भाषांतरें होत राहतीलच! शिवाय सरकारने भविष्य-बंदीचा कायदा करायचें ठरविलें असलें, तरी कायदेमंडळांत तो पास होणें कठीण आहे! कारण या मंडळांतच म्हापणकरांचीं अनेक गिऱ्हाइकें असतील! त्यामुळे खुद्द वसंतराव ही बातमी वाचून मुळीच गडबडले नसतील! पण मला मात्र तिने बेचैन करून सोडलें आहे. आनंदाचा एक हुकमी साप्ताहिक झरा आतां आटणार, या कल्पनेनें मी अस्वस्थ होऊन गेलों आहें!

फलज्योतिष हें विश्वसनीय शास्त्र नसलें, तरी सरकारने भविष्य-बंदीचा हा कायदा मंजूर करूं नये असें मला वाटतें. व्यासपीठावरून किंवा लेखनांतून भविष्यकथनाची सर्व लोक थट्टा करतात. मीहि कांही या नियमाला अपवाद नाहीं! पण माझ्या लिहिण्याबोलण्यावरून मी नियत-कालिकांतल्या कुठल्याहि भविष्याकडे ढुंकूनसुद्धा पाहत नाही, असा कुणी ग्रह करून घेतला असेल, तर त्याला मनुष्यस्वभावाचें मुळीच ज्ञान नाही असें मी म्हणेन. केवळ वेळ घालविण्याकरितां म्हणून कां होईना, माझ्या राशीचें प्रत्येक पत्रांतलें प्रत्येक आठवड्याचें भविष्य वाचल्याशिवाय मला चैन पडत नाही! त्या विविध भविष्यांतल्या पांच-दहा अनुकूल ओळींतून निर्माण होणाऱ्या अनेक सुखस्वप्नांत मी थोडावेळ गुंग होऊन जातों! सारीं दैनंदिन दुःखें विसरतों.

माझ्यासारख्या दुबळ्या मनुष्यालाच हा मोह पडतो, असें नाही. आचार्य अत्र्यांची गोष्ट घ्या. ते मोठे मिस्किल, बेडर आणि प्रत्येक वेडाची हुर्यो करण्यांत पटाईत आहेत. ‘साष्टांग नमस्कारां’त सिद्धेश्वराचें पात्र घालून फलज्योतिषाची किती मजेदार टवाळी केली आहे त्यांनी! त्या नाटकांत ‘ष्टार्स’ची त्यांनी उडविलेली भंबेरी पाहून ग्रहांच्या सामर्थ्यावर

त्यांचा काडीइतका सुद्धा विश्वास नसावा, अशी माझी कल्पना झाली होती. पण पुढे एका अपघाताच्या वेळीं माझी ही कल्पना किती चुकीची आहे, हें मला कळून चुकलें– दहा वर्षें झालीं त्या गोष्टीला. गगनबावड्याहून मोटारींतून बाबुराव पेंढारकर, अत्रे व मी परत येत होतों. मे महिन्यांतले दिवस. रस्त्यावर माती पसरण्याचें काम सुरू होतें. त्या मातीवर नुकताच पाऊस पडून गेला होता. त्यामुळे आमच्या ड्रायव्हरने आपल्या कौशल्याची शिकस्त केली, तरी निसरड्या झालेल्या रस्त्यावरून गाडी घसरली. ती खाली गेली. अर्धवट उलटली! सुदैवाने कुणाला कांही इजा झाली नाही. शेतांतल्या काळ्या मातींत रुतून बसलेली गाडी बाहेर ओढून काढायला आसपासच्या मंडळींची मदत मिळविणें आवश्यक होतें. त्या कामगिरीवर ड्रायव्हर गेला. मधला वेळ कसा घालवायचा या विवंचनेंत आम्ही शतपावली करूं लागलों. तेव्हां अत्रे एकदम म्हणाले,' आपण मैलाच्या दगडापर्यंत चालत जाऊं या. आज अपघातांतून आपण बचावलों. तेव्हा आपण तेराव्या मैलापाशीं आहों, हें उघड आहे! तेरा हा माझा शुभ आंकडा आहे!'

आम्ही कोल्हापूरच्या दिशेने चालूं लागलों. रस्त्याच्या कडेला आम्हांला जो पहिला छोटा दगड भेटला, त्याच्यावर कोणता आंकडा होता, हें जर आता मी सांगितलें नाही, तर ओ हेन्रीच्या लघुकथेचें तंत्र मला मुळीच समजलेलें नाही असें लोक म्हणतील! म्हणून त्याचा उल्लेख करतों. पहिल्याच फर्लांगाच्या दगडापाशीं आम्ही थांबलों. मोठ्या आदराने आणि उत्सुकतेने त्या दगडाकडे आम्ही पाहूं लागलों. या दगडावरून कोल्हापूर अकरा मैल आणि सहा किंवा सात फर्लांग लांब आहे, असें दिसत होते. तो आंकडा पाहून अत्रे हर्षित होत्साते उद्गारले, ' पाहा! मी म्हणत नव्हतों? तेराच्या जवळपासचाच आंकडा आहे हा!'

अत्र्यांचीच गोष्ट कशाला हवी? साऱ्या जगांत संयमी, वैराग्यशील आणि प्रयत्नवादी म्हणून गाजलेले आपले गांधीजी! शनि आणि मंगळ सेवाग्रामला भेट द्यायला आले असते, तर त्यांनासुद्धा गांधींनी चरख्यावर

सूत काढायला लावलें असतें असें वाटतें ! पण वस्तुस्थिति तशी नाही.

'चलेजाव'च्या चळवळीनंतर गांधीजींना तुरुंगांत डांबून टाकण्यांत आलें. तिथे त्यांनी उपास सुरू केला. त्यांची प्रकृति अगदी क्षीण झाली. हें पाहून कुणीतरी म्हणाले, 'उपास करून तुम्ही तुरुंगांत मेलां तर ब्रिटिश सरकारला तेंच हवें आहे !' त्याबरोबर महात्माजी उद्गारले, 'माझ्या पत्रिकेंत काय आहे, हें तुम्हांला ठाऊक आहे ना ? तुरुंगांत मरण्याकरितां जन्माला आलेला प्राणी नाहीं मी ! एका बडया ज्योतिष्यानें माझी पत्रिका पाहून असं चक्क भविष्य वर्तविलंय् की मी फासावर लटकेन, नाहीतर गोळीबाराला बळी तरी पडेन ! याशिवाय दुसऱ्या मार्गानं मला मरण येणं शक्य नाही !'

त्या ज्योतिष्याचें हें भविष्य दुर्दैवाने पुढें खरें ठरलें ! या योगायोगाचा उपयोग करून गांधीजींना गुरुस्थानीं मानणाऱ्या सध्याच्या सरकारने भविष्यबंदीचा कायदा करूं नये, असें मी म्हणणार नाहीं. पण हा कायदा अमलांत आला कीं माझें आयुष्य अधिक नीरस होईल, अशी मला साधार भीति वाटते. भविष्यकथन खरें असो वा खोटें असो, तें आपल्याला एका स्वप्नसृष्टींत घेऊन जातें, यांत मुळींच शंका नाही. सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत पोटाकरिता कष्ट करणाऱ्या आणि रोजरोज बायकापोरांच्या त्याच-त्याच मागण्यांनी गांजून गेलेल्या माणसाच्या मनाला आठवडयाचें भविष्य केवढा विरंगुळा देतें ! माझाच अनुभव पाहा. 'या आठवडयांत पैशांची आवक समाधानकारक आहे', असें जेव्हा मी साप्ताहिक भविष्य वाचतों, तेव्हा माझ्या अनेक आशा पालवूं लागतात. लोकरीचा एक नवा कोट करावा असें मी फार दिवस म्हणत आहें. या भविष्याने त्या सुप्त इच्छेला गुदगुल्या होतात. कोटाच्या त्या कापडाचा फिकट निळा रंगसुद्धा माझ्या डोळयांपुढे तरळूं लागतो. त्याचा मऊ उबदार स्पर्श माझ्या हातांना जाणवतो. शर्यतीला जाण्याची किंवा जुगार खेळण्याची सवय नसल्या-मुळे, या आठवडयांत आपल्याला एखादें घबाड मिळेल, अशी वेडी आशा मी करीत नाहीं. पण 'या आठवडयांत पैशाची जोरदार आवक आहे',

असें वाचलें की ज्यांना उसने पैसे देऊन फार दिवस झाले आहेत अशा माझ्या मित्रांच्या मानगुटचांवर बसून माझे उच्चीचे ग्रह या सात दिवसांत वसुलीचें काम फत्ते करणार आहेत असें मनांत येऊन मला बरें वाटतें. मनिऑर्डरी व इन्शुअर्ड रजिस्टरें घेऊन येणाऱ्या पोस्टाच्या शिपायाच्या वाटेकडे तर मी डोळे लावून बसतों ! तुम्हीच सांगा, आठवडाभर असा उत्सुकतेचा आनंद मिळविणें ही सध्याच्या रुक्ष जीवनक्रमांत काय लहान-सहान गोष्ट आहे ? एखाद्या वस्तूच्या प्राप्तीपेक्षां तिच्या अपेक्षेंतच अधिक आनंद असतो, असें कविकुलगरूनें म्हटलें आहे तें काय उगीच ?

'आहे बुवा ! पुरुषस्य भाग्यम् ! या आठवडचांत स्त्रीसुखाला कांही कमतरता नाही', अशा अर्थाचें वाक्य एखाद्या रविवारच्या भविष्यांत वाचलें की मी समाधानाचा सुस्कारा सोडतों. स्त्रीसुख हा समास कसा सोडवायचा यासंबंधी भविष्य लिहिणाऱ्या भास्कराचार्यांचा आणि माझा मतभेद असला, तरी त्यांच्या या वाक्याने मला मूठभर मांस चढतें ! 'स्त्री-सुख' याचा अर्थ बायकोपासून नवऱ्याला लाभणाऱ्या सुखापेक्षा बायकोच्या प्रपंचाच्या रामरगाडचांत मिळणारें सुख असाच मी करतों ! या भविष्याचा मी एवढाच फायदा मानतों की आतेसासूच्या मावस बहिणीची म्हैस मेल्याचें निमित्त सांगून आमची मोलकरीण निदान या आठवडचांत तरी गैरहजर राहणार नाही. सुभद्रेच्या नादांत दुधांत लिंबू पिळणाऱ्या अर्जुनाचें अनुकरण आमचे बल्लवाचार्य या सात दिवसांत तरी करणार नाहीत—आणखी असेच अंगवळणीं पडलेले शेंकडों सांसारिक अपघात या स्त्रीसुखाच्या आठवडचांत तरी आपल्या घरीं घडणार नाहीत !

अनुकूल भविष्यापासून लाभणारा असला आनंद हें क्षणभंगुर स्वप्नरंजन आहे, हें मी नाकबूल करीत नाहीं. पण स्वप्नरंजनाच्या मागे मनुष्य केव्हा लागतो ? सत्य सृष्टींतल्या सुखाला तो पारखा होतो, तेव्हांच ना ? आपल्या देशांत जन्मभर रुक्ष जीवन कंठणारीं जीं कोटचवधि माणसें आहेत, तीं भविष्यापासून मिळणाऱ्या क्षणिक आनंदाच्या मागे कांही उगीच लागत नाहीत ! भावनांचा फुलोरा फुलावा असें त्यांच्या आयुष्यांत

कधीच कांही घडत नाही ! तोच तो ठरलेल्या चाकोरींतून जाणारा नीरस जीवन-क्रम ! विठ्ठलराव घाटयांनीं 'कारकून' या शब्दचित्रांत त्याचें मोठचा सहानुभूतीनें चित्रण केलें आहे. त्यांचा तो कारकून निदान एकटा जीव तरी होता ! पण दहा फूट लांब आणि आठ फूट रुंद खोलींत संसार करणाऱ्या दुसऱ्या एखाद्या कारकुनाला आपल्या बायकोने नटावें, थटावें, आपण तिला घेऊन चांदण्यांत फिरायला जावें, अशी इच्छा काय होतच नसेल ? पण ती तृप्त होण्याची संधि त्याच्या तीस वर्षांच्या नोकरींत आणि तीन वर्षांच्या पेन्शनींत मिळते कुठे ? साहजिकच त्याला दुधाची तहान ताकावर भागवावी लागते ! साप्ताहिक भविष्याच्या ताकाइतकें स्वस्त पेय त्या बिचाऱ्याला दुसरें कुठलें मिळणार ?

भविष्यबंदीचा कायदा झाला तर चारी बाजूंनी नीरस झालेलें या माणसाचें जीवन अधिक भकास होईल. जीवितांत भव्य, रम्य, उत्कट किंवा उदात्त असें कांहीतरी असूं शकतें, याचा ज्यांना कधीच अनुभव येत नाही, त्यांना साप्ताहिक भविष्यें या आपल्या आयुष्यांतल्या फार महत्त्वाच्या गोष्टी वाटाव्यात, यांत नवल कसलें ?

लोकांनी व्यसनमुक्त व्हावें, प्रयत्नवादी बनावें, वगैरे वगैरे सरकारच्या सर्व सदिच्छा मला समजतात. पण केवळ कुठल्याहि सदिच्छेने मानवी जीवनांत क्रान्ति घडून येत नाही ! सर्वसामान्य मनुष्याच्या जीवनांतला सध्याचा यांत्रिकपणा नाहीसा झाला, त्याची सुप्त आत्मशक्ति फुलवूं शकणारी परिस्थिति त्याला लाभली, तर सरकारला असले कायदे करण्याचा प्रसंगच येणार नाही ! पण आजच्या स्थितींत असले कायदे करणें म्हणजे सामाजिक ढोंगाला प्रोत्साहन देण्यासारखेंच आहे. दारूबंदीचा कायदा पूर्णपणे अमलांत येण्याच्या आधीच अनेक ठिकाणीं गुप्त भट्टया जोराने चालू झाल्याचें आपण ऐकतों. भविष्यबंदीचा कायदा उद्यां अमलांत आला तर त्याची प्रतिक्रिया काय यापेक्षा निराळी होणार आहे ? ज्योतिषी आणि संपादक संगनमत करून लोकांना भविष्य सांगण्याच्या निरनिराळ्या युक्त्या हां हां म्हणतां काढतील. साप्ताहिक भविष्य सांगण्याकरितां

कुणी लघुकथा लिहितील ! युद्धकाळांत सांकेतिक लिपी वापरतात तशी कांही क्लृप्ति काढून कुणी सरकारवर मात करतील ! आणि मग असले सर्व गुन्हे शोधून काढण्यासाठी सरकारला एक नवें खातेंच निर्माण करावें लागेल !

मात्र सरकारने हा नवा कायदा अमलांत आणलाच, तर त्याच्यांतून आपली सुटका कशी करून घ्यावी, ही युक्ति मला नुकतीच सुचली आहे ! हा कायदा होतांच भविष्यें छापणाऱ्या साप्ताहिकांची व मासिकांची पुष्कळशी रद्दी मी खरेदी करून ठेवणार आहें. दर आठवड्याच्या आरंभीं या रद्दींतले कुठलेहि चारदोन अंक काढून, त्यांतलें आपल्या राशीचें भविष्य वाचलें की माझ्या मनाला हवा असलेला कैफ चढायला कांही अडचण येणार नाही ! यावर कुणी म्हणेल, 'माणसाला या जुन्या भविष्यांचा काय उपयोग आहे ?' मी त्याला एवढेंच उत्तर देईन, 'दारू जितकी अधिक जुनी तितकी अधिक चांगली, असं म्हणतात. भविष्य हें दारूसारखंच असतं, हें काय सांगायला हवें ! तें तसें नसतें तर दारूबंदीच्या पाठोपाठ भविष्यबंदीचा कायदा करण्याचा खटाटोप सरकारनं तरी कशाला केला असता ?'

१९४८

## १२

# व्युत्पत्ति

एक कविता करीत होतों मी !

हें वाचून तुम्हांला हसूं येईल. तुम्ही म्हणाल, 'कविता कधी करून होते का? वेलीवर जसें फूल उमलतें तशी ती कवीच्या मनांत निर्माण होते !'

हे सारें मीसुद्धा पुस्तकांत वाचलें आहे. तुमच्याइतकेंच तें मला पाठ आहे. 'कवि घडवितां येत नाहीत; ते जन्मालाच यावे लागतात !' काय सुंदर वाक्य आहे म्हणतां ! पण खरें सांगूं ? पुस्तकांचें जग निराळें आहे. लहान मुलांच्या जगासारखें आहे तें ! पुस्तकांतल्या पुष्कळ गोष्टी खऱ्या असतात; पण त्या पुस्तकापुरत्याच ! मग तें पुस्तक तत्त्वज्ञानाचें असो नाहीतर काव्याचें असो ! प्रत्यक्ष व्यवहार हा पुस्तकांपेक्षा फार निराळा असतो. इतर उदाहरणें कशाला हवींत ? अगदी गेला बाजार धरून प्रेमावर जगांत किती कथा आणि कविता झाल्या आहेत, याचा एखादा आकडेशास्त्रज्ञ हिशोब करूं लागला तर तो पुरा होण्यापूर्वीच त्याचें आयुष्य खलास होईल ! पण हें प्रेमवाङ्मय थोडेंसें वाचून त्या गोड,

नाजूक, स्वर्गीय भावनेविषयी आपली जी कल्पना होते तिचा व्यवहारांत कुणीं कितीसा अनुभव घेतला आहे ? पतीच्या मृत्यूनंतर सती जाणाऱ्या स्त्रीचें त्याच्यावर विलक्षण प्रेम असलें पाहिजे हें उघड आहे. पण असें दांपत्य चित्रगुप्तासमोर उभें राहिल्यानंतर राहून राहून यमराजाच्या त्या अव्वल कारकुनाला एकच प्रश्न सतावीत असला पाहिजे, 'हीं दोघें मृत्युलोकीं दररोज भांडत कां होतीं ?'

याचा अर्थ एवढाच की कविता हें बहुधा वेलीवर उमललेलें फूल नसतें, तें चिकटविलेलें फूल असतें !

मी जी कविता करीत होतों ती मी कशी लिहिली हें सांगण्याचा जाहीर प्रसंग आला तर अर्थातच ती अतिशय अद्‌भुत रीतीनें स्फुरली असेंच मी सांगेन. मला जन्मठेपीची शिक्षा झाल्यावर किंवा देशभक्त म्हणून मी फाशीं जात असतांना ती मला सुचली असें एखाद्या सभेंत सांगतां आलें तर फार मौज होईल; पण तें शक्य दिसत नाही. हरणें, मासे आणि सज्जन माणसें यांना या जगांत शत्रु फार असतात हें एक मोठा कवीच पूर्वी सांगून गेला आहे. तेव्हा सध्याच्या काळीं अद्‌भुत बोलायचें तें सुद्धा जरा जपूनच बोललें पाहिजे.

मात्र एके दिवशीं रात्रीं झोपेंतच ही कविता मला सुचली असें सांगायला कांहीच हरकत नाही ! हो, तिखटमीठ लावल्याशिवाय का पदार्थ खमंग होतो ? शिवाय या तिखटमिठाला दोन चव्वलसुद्धा खर्च होत नाहीत.

बस्स ! ठरलें. या कवितेचा इतिहास लोकांना असा सांगायचा— सुंदर सकाळ ! फक्कड चहा ! रात्रभर आपल्याला झोप आली नाही म्हणून बायको माझ्याकडे तक्रार करते. 'घरांत ढेंकूण फार झाले असतील !' असें हंसत हंसत मी म्हणतों. ती रागारागानें उद्‌गारतें, 'रात्रीं ढाराढूर झोपलां होतां तुम्ही ! आणि असें घोरत होतां—बिचारा कुंभकर्ण घोरत तरी नसेल !' मी उत्तर देतों, 'फुकट एवढ्या मोठ्या कवीची बायको तूं झालीस ! अग वेडे, रात्रीं मी घोरत नव्हतों. झोपेंत मला एक कविता सुचत होती. तिच्या ओळी मी गुणगुणत होतों. ऐक ती कविता.' असें म्हणून

सौभद्राच्या पहिल्या अंकांतलीं पदें म्हणणाऱ्या अर्जुनाच्या थाटांत मी तिला प्रस्तुत कविता म्हणून दाखवतों.'

सगळेंच मुसळ केरांत! मी ज्या कवितेविषयी हें सारें सांगत आहें आणि नाना प्रकारचीं मनोराज्यें करीत आहें, ती पुरी कुठे झाली आहे? फक्त एका शब्दासाठी अडली होती ती. 'शेतें' या अर्थाचा दुसरा शब्द हवा होता मला. 'शेतें' कांहीं शेवटच्या ओळींत नीट बसत नव्हता. माझ्या मनांत आलें, हीं वृत्तें शोधून काढणाऱ्याला आधीं फाशीं द्यायला हवें. गद्यापेक्षां काव्यांत या सोवळ्याओवळ्याच्या भानगडी फार! मृत्युशय्येवर पडलेल्या माणसाला एखादी मात्रा कमी झाली कीं जास्त झाली याची वैद्य कधी काळजी करणार नाही, पण ज्या कवितेची किंमत उधार पांच रुपयांपेक्षा अधिक नसते तिच्यांत एक मात्रा कांही कमी-जास्ती होऊन चालत नाही! लग्न ठरवितांना वधूवर अनुरूप नसले तरी कुणी कुरकुर करीत नाही; पण कवितेंतलें एखादें यमक नीट जमलें नसेल तर टीकाकार केवढी कावकाव करतात!

'शेतें' या शब्दाऐवजी कवितेंत कुठला शब्द वापरावा याचा डोकें खाजवून मीं खूप विचार केला. केसांतला सगळा खरबा बाहेर पडला तेव्हा कुठे मला 'कुरणें' हा शब्द सुचला. कसा अगदी फिट्ट बसत होता! वा रे वा! याला म्हणतात प्रतिभा!

शेतें आणि कुरणें अगदी जवळ असतात! असें असून इतका वेळ हा शब्द आपल्याला कसा सुचला नाही याचें मला आश्चर्य वाटूं लागलें. 'कुरणें' शब्द घालून कवितेची ओळ मीं पुनःपुन्हा म्हणून पाहिली. मोठी गोड लागली ती मला!

कविता तयार झाली या आनंदांत मी बायकोकडे चहा मागायला धावत जाणार होतों! इतक्यांत—

'अतिस्नेहः पापशंकी' असें कालिदासाने म्हटलें आहे तेंच खरें! स्वतःच्या कवितेविषयीं वाटणाऱ्या आपुलकीमुळे मी 'कुरणें' शब्दाचा अधिक विचार करूं लागलों. शंका हें विचाराचें औरस अपत्य आहे हें

तर जगजाहीरच आहे. माझ्या मनांत आलें, 'कुरणें' म्हणजे 'शेतें' असा अर्थ होऊं शकेल का?

माझी काव्यगाडी पुन्हा अडली!

माझा अर्जुन म्हणा नाहीतर हॅम्लेट म्हणा, कुणीतरी झाला खरा! एक मन म्हणे, असा अर्थ न व्हायला काय झालें? दुसरें म्हणे, छे! हा अर्थ गृहीत धरला तर उद्या पेरू म्हणजे केळें आणि चकली म्हणजे कडबोळें असे अर्थ सुद्धां मान्य करावे लागतील. हे अर्थ म्हणायचे कीं अनर्थ?

शेवटीं कोशाला शरण जायचें मी ठरविलें. घाईघाईनें मी कुरण शब्द काढला. त्याचा अर्थ वाचतांवाचतां माझे डोळे पांढरे झाले. कोशांत चक्क छापलें होतें, 'कुरण = गवतासाठी राखलेली जमीन!' कवितेंतल्या शेतांत तर मीं सोनें पिकविलें होतें! आतां काय करायचें? कुरण शब्दाची व्युत्पत्ति पहावी, निदान तिच्यांतून अनुकूल असें कांहीतरी निघेल अशी आशा मनांत निर्माण झाली. मी मोठ्या उत्सुकतेने ती व्युत्पत्ति पाहिली. अरे बाप रे! ती तर फारच भयंकर होती! कु + अरण्य! कु आणि अरण्य हे कुरणाचे आईबाप! गवत असलेलें शेत गेलें आणि त्याच्या जागीं भिकार रान आलें!

आता कुरण शब्द कवितेंत घालणे म्हणजे अरण्यरुदन करण्यासारखेंच होतें! ज्या शेतांचें वर्णन करायचें होतें तीं सस्यश्यामल होतीं. त्यांचा अरण्याशीं संबंध जोडणें हें अरण्यपंडितालाच शोभलें असतें!

नालापायी घोडा, घोड्यापायी स्वार आणि स्वारापायी राज्य गेलें ना तशी माझी स्थिति झाली. एका शब्दासाठीं माझी ती कविता अर्धवट राहिली. मंगळ असलेल्या मुलीचें लग्न जमूं नये तशी बापडीची स्थिति झाली!

कुरणाच्या या विचित्र व्युत्पत्तीमुळे माझें कुतूहल जागें झालें. मी कोश घेऊन दिसेल त्या शब्दाची व्युत्पत्ति शोधूं लागलों. 'जिव्हाळी' या शब्दाचा नखाच्या खालची नाजूक जागा एवढाच अर्थ मला ठाऊक होता. जीव. जिव्हाळा वगैरे मंडळींशीं या शब्दाचें जवळचें नातें असावें अशी

माझी कल्पना होती. पण कोशांत त्या शब्दाचा अर्थ मीं पाहिला मात्र ! माझ्या हातांतून तो ग्रंथराज धाडकन् खालीं पडला ! नखाच्या किंवा शिंगाच्या खालची जागा असा अर्थ तिथें चक्क दिला होता ! पडलेल्या पुस्तकाच्या आवाजाने मी माझ्या तंद्रींतून जागा झालों, तेव्हा कुठें शिंगांचा संबंध आपल्याशीं नसावा, हें माझ्या लक्षांत आलें.

कोशाचा दुसरा एक विभाग उचलला. हाताला येईल तें पान उघडलें. ‘टंचाई’ हा शब्द दिसला. त्याच्या अर्थाविषयी प्रश्न नव्हता, कारण या ना त्या रूपाने त्याचें दररोज दर्शन घडतच होतें ! पण त्याची व्युत्पत्ति कांही नीट लक्षांत येईना. मधे दहा वर्षें अन्नाची टंचाई अनुभवल्यामुळे या शब्दाविषयीचें कुतूहल शिल्लक होतेंच ! मी त्याची व्युत्पत्ति पाहूं लागलों.कोशकार म्हणाले, ‘तंगचाई’ हा शब्द पाहा. मी तो पाहूं लागलों. त्याच्यापासून बनलेले निरनिराळे शब्द आणि त्यांचे अर्थ बघत खाली गेलों तों थेट तमाशांतच ! पुढील दोन ओळी हंसतमुखाने माझें स्वागत करीत उभ्या होत्या तिथें—‘ उरीं दोन्ही गेंद गुलाबी संगीत । वर कंचुकी ल्याली तंगतंगीत.’ रेशनच्या काळांतील टंचाईची मीमांसा मी करीत होतों. सुंदर आणि सकस अन्न दुर्मिळ झालेल्या या काळाचा तंगतंगीत कंचुकीशीं काय संबंध होता ?

मी कोशाचे सर्व भाग एकावर एक रचून ठेवले. त्या पिराला साष्टांग नमस्कार घातला आणि पुन्हा कुठल्याहि शब्दाची व्युत्पत्ति शोधायची नाही, असा कानाला खडा लावून घेतला ! नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ शोधूं नये असें आपले पूर्वज सांगत आलेच आहेत. मी म्हणेन, शब्दांचेंहि मूळ शोधूं नये ! त्यांतून भलत्या भानगडी निघण्याचा संभव फार !

कुठल्याहि गोष्टीचें मूळ शोधणें हें विद्वत्तेचें लक्षण असेल; पण तें सुखाचें लक्षण नाही. मूळ शोधायच्या उद्योगांत वरचें हिरवेंगार झाड, त्याच्यावरचीं सुंदर फुलें आणि रसाळ फळें हें सारें जर नाहीसें होणार असेल तर त्या मुळाचा तरी काय उपयोग आहे ? गेल्या पन्नास वर्षांत शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र वगैरे शास्त्रें आपण पुष्कळ पढलों ! पण आपलें

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम क्रमांक ३२८७८ वि: निबंध
९३६६ नों: दि: २२/१/२१



शिक्षण सुधारलें का ? आपलीं मनें निर्मळ झालीं का ? मानसशास्त्राचे दोन प्राध्यापक तरी एकमेकांचीं खरींखुरीं मनें जाणतात का ? अंतर्मनाचा पत्ता लागल्यामुळे नवराबायको किंवा सास्वासुना परस्परांशीं वागतांना शहाणपणा दाखवीत आहेत काय ?

एवढीं मोठीं उदाहरणें तरी कशाला हवींत ? माझ्या त्या अपुऱ्या राहिलेल्या कवितेचीच गोष्ट घ्या ना ! 'कुरणें' शब्द कसा 'फिट्ट' बसत होता त्या ओळींत ! कोश पाहण्याची कुबुद्धि मला झाली नसती तर ती कविता एव्हांना कुठेही छापून आली असती ! चार विद्वानांकडून कदाचित् तिचें कौतुकहि झालें असतें !

तुम्ही विचाराल, 'कुरणें हा शब्द दडपून वापरला असूनसुद्धा तिचं कौतुक झालं असतं ?'

न व्हायला काय झालें ? जग कुठेहि फारसें खोलांत शिरत नाही म्हणूनच तें चाललें आहे. नाहीतर माझ्या कवितेप्रमाणे पावलापावलाला अडून बसलें असतें तें !

१९५४

## १३

# कल्पना

आपल्याला कुणीतरी हांक मारीत आहे, हें माझ्या लक्षांत यायला बराच वेळ लागला. तंद्रींतच मी रस्त्याने चाललों होतों म्हणानात ! एखाद्या स्वप्नांतून दचकून जागं व्हावें, तशी माझी स्थिति झाली. मी झटकन् थांबलों. मागे वळून पाहिलें. हरणाचा पाठलाग करणाऱ्या शिकारी कुत्र्याप्रमाणे चिंतोपंत माझ्या रोखाने येत होते.

जवळ येतांच पाठीवर एक सणसणीत थाप मारून ते म्हणाले, 'हल्ली वर्तमानपत्रांत वाचकांच्या तक्रारींचं एक सदर सुरू झालं आहे ना ? त्यांत आपल्या नगरपालिकेला एक गोष्ट सुचविणार आहें मी !'

चिंतोपंतांनी एखाद्या नवीन कल्पनेचें पिल्लूं बाहेर काढलें कीं मला बुद्धिबळांतल्या उंटाची आठवण होते, त्याची चाल जशी तिरकस तशी चिंतोपंतांची कल्पकताहि विचित्र ! मीं हंसत त्यांच्याकडे पाहिलें. ते गंभीरपणाने सांगूं लागले—सांगूं लागले कसले ?—व्याख्यानच देऊं लागले, 'वाहनं' रस्त्याच्या डाव्या बाजूनं हांकण्याचा नियम आहे ना ? तसा दुसरा एक नियम व्हायला हवा !'

मीं मधेच म्हटलें, ‘कवि आणि लेखक यांना उजव्या बाजूनं हांकावें !’

‘अं हं ! रहदारीच्या रस्त्यानं जाण्याची त्यांच्यावर बंदी असावी ! त्यांच्यामुळं अपघात वाढण्याचा संभव आहे. इकडं समोरून मोटार वेगानं येत असावी आणि तिकडं कविमहाराज कल्पनेंतल्या मीनाक्षीला नाहीतर मृगाक्षीला आळविण्यांत गुंग व्हावेत—’

मी ओरडलों, ‘अहो, कवितेचा आणि माझा घटस्फोट होऊन दहाबारा वर्षं झालीं !’

‘कविता नसली तर कादंबरी घोळत असेल डोक्यांत ! लिहायच्या कादंबरीचं चिंतन चाललं नसेल तर वाचीत असलेल्या कादंबरीचं चाललं असेल ! तुमच्या खाकेंतलं लठ्ठ पुस्तक पाहा ना ? कुठली तरी स्वस्त रशियन कादंबरी दिसतेय् ! या जगांत लठ्ठपणाचे तोटे माणसांना भोगावे लागतात; पण त्याचे फायदे मात्र पुस्तकांना मिळतात !’

आता स्वारी कवीवरून रशियावर घसरणार हें उघड होतें ! मी झटकन् खाकेंतलें पुस्तक चिंतोपंतांच्या हातांत देत म्हटलें, ‘नीट पाहा पंत हें. हीं रेल्वे-गाइडची नवी आवृत्ति आहे.’

‘कुठं परगावीं जाणार आहांत ?’

‘छे: !’

‘मग वहिनी जायच्या असतील माहेरीं.’

‘माहेर ही संस्था आता फार जुनी पुराणी झाली चिंतोपंत ! पगडी आणि बुगडी यांच्यासारखी !’

‘मग हा ग्रंथराज कशाला खरेदी केलांत ? ’

‘चाळायला .’

‘या चाळणींतून खालीं काय पडतं ?’ पंतांनी उपरोधपूर्ण स्वरानें प्रश्न केला.

‘आनंद. ’

‘रेल्वे-गाइड वाचून आनंद होतो तुम्हांला ?’

‘साधा आनंद नाहीं; ब्रह्मानंद !’

लेखक वेडे असतात, हा आपला आवडता सिद्धांत मला सुनावून चितोपंतांनी माझी रजा घेतली.

पण त्यांना मीं सांगितलें त्यांत खोटें काय होतें ? अनेकदा कंटाळा आला म्हणजे मी रेल्वे-गाइड चाळीत पडतों. त्यांतल्या अपरिचित स्टेशनांचीं नांवें वाचतांना आणि त्यांच्यावर निरनिराळ्या वेळीं थांबणाऱ्या आगगाड्यांचीं चित्रें डोळ्यांपुढें उभीं करतांना वेळ कसा निघून जातो, हें कळत नाहीं. केव्हां केव्हां काशी-प्रयागच्या स्टेशनांचीं पानें मी काढतों. मग त्या पानांवरून नाना प्रकारचीं रम्य, भव्य आणि रुद्र दृश्यें माझ्या डोळ्यांपुढून धांवूं लागतात. ही दुथडी भरून वाहणारी गंगामाई, तिच्यावरला हा प्रचंड पूल, त्या पुलावरून लहान मुलाप्रमाणे कर्कश शिटी घालीत आणि शांतपणें निजलेल्या मध्यरात्रीची झोंपमोड करीत जाणारी ही आगगाडी—अशा वेळीं डब्याच्या कोंपऱ्यांतून बाहेर डोकावून पहातांना मनांत भय, आश्चर्य आणि आनंद यांचें किती विलक्षण मिश्रण होत असेल ! निसर्गाच्या निकट सान्निध्यांतच माणसाला आपल्या जीवनाची उंची आणि खोली यांची जाणीव होते. हेंच खरें !

हा प्रचंड पूल कुणीं बरें बांधला असेल ? तो बांधणाऱ्या इंजिनियरचें नांव कदाचित् मोठ्या कष्टानें आपण शोधून काढूं. पण एखाद्या भयंकर वाघाला चाबकाच्या तालावर नाचवावें, त्याप्रमाणे या प्रक्षुब्ध प्रवाहावर प्रभुत्व गाजविणाऱ्या पुलाची उभारणी करण्यांत किती मजुरांचे श्रम खर्ची पडले असतील ! त्यांचीं नांवें इतिहाससंशोधकालाहि शोधून काढतां येणार नाहीत ! हा विचार मनांत आला कीं त्या शेंकडों अज्ञात व्यक्तींचे घामाने डबडबलेले आणि उन्हाने करपलेले चेहरे माझ्या डोळ्यांपुढून सरकूं लागतात. हा पूल बांधून चार पिढ्या तरी झाल्या असतील ! तीं सारीं माणसें धरणीमातेच्या कुशींत केव्हाच कायमचीं झोपीं गेलीं असतील. असें असूनहि त्या अज्ञात मित्रांविषयी एक प्रकारची कृतज्ञता मला वाटूं लागते.

लगेच मनांत येतें, जगांतला पहिला पूल कुणीं बरें बांधला असेल ?

व्यास-वाल्मीकि आणि मार्कोनी-एडिसन यांच्या पंक्तींत त्या व्यक्तीचें निःसंशय स्थान आहे. असें असून तिचें नांवसुद्धां आपल्याला ठाऊक असू नये, ही किती शरमेची गोष्ट आहे! सुंदर रूप किंवा गोड गळा यांचें देणें एखाद्या स्त्रीला निसर्गानें दिलें कीं लगेच तिचें नांव लाखों लोकांच्या जिभेवर नाचूं लागतें! आणि ज्यांनीं प्रगतीचा खडतर प्रवास करतांना मानवतेला मार्गदर्शन केलें त्यांची साधी माहितीसुद्धां सामान्य माणसाला असूं नये? मनुष्य स्वभावतः मूर्ख आहे कीं कृतघ्न आहे? जीवनांतील उथळ गोष्टींची पूजा करण्यांतच त्याला कां आनंद वाटतो? चिरंतना-पेक्षा क्षणभंगुरांतच तो कां रमतो?

क्षणार्धांत दुसऱ्याच दृश्यांत मी गुंग होतों. विशाल गंगाप्रवाहावर चांदणें नृत्य करीत आहे. मनुष्याच्या बुद्धीनें निसर्गावर मिळविलेल्या विजयाचें कौतुक करीत मी डब्याच्या खिडकींतून खालीं वांकून पाहत आहें. इतक्यांत माझ्या मनांत एक विलक्षण विचार येतो. पूर असाच वाढत राहिला तर एखादे वेळीं हा पूल पडेल! नाही कुणी म्हणावें? निसर्ग आणि मानव यांचे संबंध पिता-पुत्रासारखे आहेत. निसर्गाच्या मांडीवर मानवी जीव वाढतो. त्याच्या वात्सल्याच्या छायेंत तो जगतो. आपल्या पुत्राच्या सर्व लीलांकडे निसर्ग औदार्यानें पाहात असतो. पण रुस्तुमचा मुलगा असूनहि सोराब त्याच्या हातून शेवटीं मारला गेलाच ना? निस-र्गहि मनुष्याचा कधी कधी असाच घात करतो. अनेकदा जन्म, मृत्यु, प्रीति हे आयुष्यांतले जुगार ठरतात, ते निसर्गाच्या या लहरी आणि उद्दाम स्वभावामुळेच.

या विचारांत सत्य असलें तरी तो माझें मन संत्रस्त करून सोडतो. म्हणून रेल्वे-गाइडच्या मागलीं पुढलीं पानें चाळीत मी गंगेच्या उगमापासून मुखापर्यंत प्रवास करूं लागतों. तीं लहानमोठीं एका ठशांचीं स्टेशनें, रात्रीं अपरात्रीं डोळ्यांत तेल घालून तिथे कामें करणारे हे तरुण-वृद्ध कामगार, तीर्थयात्रेपासून मुलीचें लग्न जमविण्यापर्यंत निरनिराळ्या कारणांनी प्रवास करणारे नाना पेशांचे आणि स्वभावांचे हे उतारू, कडाक्याची थंडी

असो वा अंगांतून घामाच्या धारा गळत असोत, खारीच्या चपळपणानें धावपळ करणारे हे हमाल, या सर्वांच्या गर्दींत मी मिसळतों, विरून जातों, स्वत:ला विसरतों.

मग एकदम दुसरीच कल्पना मला गुदगुल्या करून हसत हसत निघून जाते. भगीरथानें गंगा पृथ्वीवर आणली अशी आपल्या पुराणांत कथा आहे. ध्येयवाद्यांचा गुरु शोभणारा तो राजर्षि कांहीतरी चमत्कार होऊन पुन्हा आज गंगेशीं गुजगोष्टी करण्याकरिता परत आला तर भोंवतालच्या भूप्रदेशाचें स्वरूप पाहून त्याची काय स्थिति होईल ? त्या गोंधळलेल्या भगीरथाला तसाच सोडून माझें मन पुढच्या क्षणीं रुंजी घालूं लागतें तें 'मुद्राराक्षस' नाटकाभोवती ! कॉलेजांत पाठ केलेला त्यांतला पहिला श्लोक आठवण्याचा मी प्रयत्न करतों. मोठा मजेदार आहे तो. संस्कृत साहित्यांतल्या संकेताप्रमाणें त्यांत शंकराचें स्तुतिपर वर्णन आहे. पण तें सरळ किंवा साधें नाही. शंकर-पार्वतीच्या प्रेमकलहानें तो श्लोक रंगला आहे. कुठल्याहि कुटुंबांत संशयकल्लोळ निर्माण व्हायला फाल्गुनरावासारखीं माणसेंच लागतात असें नाही ! देवादिकांच्या घरींसुद्धा तोच अनुभव नित्य येतो. शंकराच्या जटाभारांत लपून बसलेली गंगा पाहून पार्वतीच्या मनांत मत्सर जागृत होतो. 'ही कोण ?' असा ती पुन:पुन्हा पतीला प्रश्न करते. शंकर तिच्या प्रत्येक प्रश्नाचें द्व्यर्थी उत्तर देतो ! गंगावतरणाच्या वेळीं शंकराला मध्यस्थ करतांना आपण त्या भोळ्या देवाच्या संसारसुखांत विष कालवीत आहोंत, ही शंकासुद्धा बिचाऱ्या भगीरथाला आली नसेल !

रेल्वे-गाइडचें प्रत्येक पान पळापळाला मला अशा एका नव्या सृष्टींत घेऊन जातें. प्रचंड पक्ष्याच्या पंखावर बसून सिंदबाद रत्नामोत्यांनी भरलेल्या गुहेपाशी गेला, अशी एक अद्भुत कथा आहे ना ? आगगाडीचें गाइड हातांत घेतलें कीं मीसुद्धां सिंदबाद बनतों. पतंग उडविणाऱ्या पोराला हातांतल्या दोऱ्याची लांबी पाहून आपली क्रीडा करावी लागते. पण कल्पनेच्या क्रीडेला जगांत मर्यादा नाही. ज्या ज्या गोष्टीमुळे कल्पनेला पंख

फुटतात, ती ती मला अधिक आवडते, याचें कारण हेंच आहे.

पण हें सारें व्यवहारी चितोपंतांना कसें पटवून द्यायचें? चंद्रग्रहण आलें कीं पंचांग काढून ग्रहण केव्हा लागतें, त्यामुळे आपल्याला किती वेळ आधी जेवावें लागेल, इत्यादि गोष्टींचा ते विचार करूं लागतात. उलट ग्रहण ही मला मोठी आनंदाची पर्वणी वाटते.

परवा चंद्रग्रहणाच्या दिवशीं मराठी रंगभूमीचा उद्धार करण्याकरिता जन्माला आलेलें एक नवें नाटक पाहून व संध्याकाळीं नसलेली डोकेंदुखी पैदा करून मी रात्रीं दीड वाजतां घरीं आलों. माझा डोळा लागायला दोन वाजले. मी एकदम खडबडून जागा झालों. मला वाटलें, बाहेर पार उजाडून गेलें असेल! ग्रहण सुटलेंसुद्धा असेल! पण सुदैवाने पांचसाडेपांचच झाले होते. थंडी चावत होती. पण तिला न जुमानतां मी अंगणांत आलों आणि चंद्राकडे टक लावून पाहत राहिलों. क्षणार्धांत किती कल्पनांनी माझें मन पुलकित केलें म्हणून सांगूं? खग्रास ग्रहणांतून मुक्त होणारा तो चंद्रमा पाहून मोहजालांतून बाहेर पडूं पाहणाऱ्या मानवी आत्म्याची आठवण मला झाली. मग मनांत आलें, बालकांना चंद्र फार आवडतो, याचें कारण तो स्वतःच एक लहान मूल आहे. पाहा, पाहा, तीट लावण्याकरिता आईनें ठेवलेलें काजळ त्याने कसें तोंडाला फांसून घेतलें आहे तें! ग्रहण सुटूं लागल्यामुळे दिसूं लागलेला तांबसरपणा पाहून माझें मन म्हणूं लागलें, 'पंक्चरलेल्या रात्री'चें वर्णन करणाऱ्या आमच्या नवकवींनी हें दृश्य कधीच पाहिलें नसेल काय? अन्यायाने दडपून खाली ठेवलेल्या दलितवर्गाला आपल्या हक्कांची जाणीव झाली की त्याची जी मनःस्थिति होत असेल, तिचेंच प्रतिबिंब आता आकाशांत दिसत आहे!

रेल्वे-गाइड घेऊन एखाद्या कादंबरीप्रमाणे त्यांत रंगणाऱ्या या माझ्या मनाला हसणारीं चितोपंतांसारखीं हजारों माणसें जगांत असतील. त्या सर्वांचें समाधान मला करतां येईल कीं नाहीं, हें मीं सांगूं शकत नाहीं. पण कल्पना हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे, याविषयी मी निःशंक आहें. पशु आणि मनुष्य यांच्यांतली ती सीमारेषा आहे.

जीवनाच्या विकासाला भावना व विचार यांचा अधिक उपयोग होतो, हें मीं मान्य करतों. पण आजच्या मानवाच्या अनेक सात्त्विक भावनांचा आणि विचारांचा उगम आपण शोधींत गेलों तर तो कल्पनेंतच आहे, असें आढळून येईल.

म्हणून प्रवासांत वेळ जाण्यासाठी त्याच त्याच बातम्या छापणाऱ्या दैनिकांचा भारा खरेदी करणारे किंवा भूक नसतांना प्रत्येक स्टेशनावर कांहीतरी खाद्यपदार्थ घेऊन तो चघळीत बसणारे लोक पाहिले की मला हसूं येतें. हल्ली मी प्रवासांत लहानसें पुस्तकसुद्धा वर ठेवीत नाहीं. मुकाट्यानें खिडकीपाशी बसतों आणि बाहेर पाहूं लागतों. एखादा कांटेरी वृक्ष, एखादा पडका किल्ला, किंबहुना माझ्यासमोरच बसलेली एखादी वृद्धा यांच्याकडे पाहतां पाहतां सातारा केव्हा सुटलें आणि पुणें केव्हा आलें, हें मला कळतदेखील नाही.

१९५३

## १४

# घड्याळ

माझा देवावर विश्वास नाही. मात्र जगांत देव असायला हवा होता असें मला मनापासून वाटतें. ज्योतिषाच्या बाबतींतहि माझी स्थिति तशीच आहे. माणसाला अचूक भविष्यज्ञान होण्याची कांही सोय या पृथ्वीतलावर असती तर फार बरें झालें असतें असें अनेकदा माझ्या मनांत येतें. विशेषतः ज्या दिवशीं मला प्रवासाला जायचें असतें त्या दिवशीं हा विचार हटकून मला सुचतो. आगगाडीपेक्षाहि मोटारीच्या प्रवासांत या भविष्यज्ञानाचा मनुष्याला फार उपयोग झाला असता ! एस. टी. च्या प्रवासांत तर अधिकच ! कारण त्या गाड्यांत प्रत्येक बाकावर तीन तीनच जागा असतात. त्यामुळे प्रवाशाला आज आपल्या वांट्याला जगांतलीं कोणतीं दोन रत्नें येणार आहेत याची घरून निघाल्यापासून काळजी लागून राहते.

अशा चिंताग्रस्त मनःस्थितींतच काल मी मोटार-तळावर गेलों. उजवीकडच्या अगदी पहिल्याच बाकावर माझी जागा होती. ती पाहून मी अधिकच भयभीत झालों. त्या बांकावर अवघ्या दोनच जागा होत्या ! तेव्हा शेजारीं जो बडबड्या मनुष्य येऊन बसेल त्याला एकसारखें तोंड

देण्याची पाळी माझ्यावरच येणार हें उघड होतें. छे ! छे ! घरून निघ-तांना मी तर दुसऱ्याच मनोराज्यांत मश्गूल झालों होतों. एका चतुर प्रवाशाचें अनुकरण करायचें मीं ठरविलें होतें. तो अरण्यांतून वाहणाऱ्या एका नदीच्या कांठाने चालला होता. एका बाजूने वाघ आणि दुसऱ्या बाजूने सुसर त्याच्यावर अचानकपणें चाल करून आलीं. तो मोठा प्रसंगा-वधानी होता. अगदी बिरबलाचा थोरला भाऊ शोभण्याइतका ! त्याने एकदम जमिनीवर साष्टांग नमस्कार घातला. साहजिकच वाघाची उडी मगरीच्या तोंडांत पडली. त्यांचें द्वंद्वयुद्ध सुरू असतांनाच प्रवासी आपला जीव बचावून पुढे निघून गेला.

याच पद्धतीने बाकावरल्या दोन उतारूंना एकमेकांच्या तोंडीं द्यायचें आणि आपण स्वस्थ डुलक्या घेत बसायचें असा बेत करीत मी घरून निघालों होतों. पण फक्त दोनच जागा असलेलें बाक नशिबीं आल्यामुळे मी गड-बडलों. आता आपल्या शेजारीं कोण येऊन बसणार आहे याविषयी माझ्या डोळ्यांपुढे नानाप्रकारचीं कल्पनाचित्रें उभीं राहूं लागलीं. सारखें पान खाऊन पचक्-पचक् थुंकणारे म्हातारे बोवा, हातांत वर्तमानपत्र घेऊन त्यांतल्या वाक्या-वाक्यावर मल्लिनाथी करणारे पंचविशींतले तरुण गृहस्थ, जिचें सारें बळ जिभेंत साठलें आहे अशी प्रौढ गजघंटा, मोहरम-मधल्या वाघाप्रमाणें किंवा शिमग्यांतल्या सोंगाप्रमाणे आधुनिक प्रसाध-नांनी रंगून आलेली तरुणी—यांच्यापैकी कुणीहि माझी कायदेशीर दोस्ती करूं शकलें असतें. अशा जिगर दोस्तापेक्षा कट्टर दुष्मन् पुरवला असें वाटून मी धडधडत्या छातीने माझ्या शेजारच्या रिकाम्या जागेकडे पाहात बसलों.

एकदम तिथे एक साडीचा पदर निशाणाप्रमाणे फडफडला. ही युद्धाची सलामी आहे कीं तहाची सूचना आहे हें मला कळेना. मी मान वर करून पाहिलें. बाई तरुण होती. ती सावंतवाडीच्या लाकडी फळांप्रमाणे रंगलेली नाही हें पाहून मला अधिकच आनंद झाला. आणि बसतां बसतां तिने 'आपण खांडेकर ना ?' म्हणून प्रश्न केला तेव्हा तर तो आनंद गगनांत

मावेना. माणसाचा अहंकार किती अंधाशी असतो !

पांच दहा मिनिटें आम्ही इकडच्या तिकडच्या गोष्टी बोललों. पण गाडी सुटण्याचें कांही लक्षण दिसेना. ती तरुणी अगदी उतावीळ होऊन म्हणाली, 'केव्हां सुटणार आहे गाडी मेली कुणाला ठाऊक !' लगेच तिने आपल्या डाव्या मनगटावर बांधलेल्या नाजूक सोनेरी, घड्याळाकडे पाहिलें. पुढल्याच क्षणीं तिने 'अय्या' असा जो भीतिदर्शक उद्गार काढला त्यावरून आमच्या मोटारींत एखादा अजगर शिरून त्याने तिच्या पायाला विळखा घातला असावा किंवा आमच्या गाडीवर अॅटमबॉंब पडला असावा अशी माझी क्षणभर समजूत झाली. मग माझ्या लक्षांत आलें. आपल्या घड्याळाची हृदयक्रिया बंद पडल्यामुळे ती शोक करीत आहे !

घड्याळ लावण्याकरिता माझ्याकडे वळून ती म्हणाली, 'किती वाजले ?'

'माझ्यापाशी घड्याळ नाही', मी शांतपणाने उत्तरलों.

ती माझ्याकडे मोठ्या आश्चर्याने पाहूं लागली. जणू कांही मीं तिला म्हटलें होतें 'माझ्यापाशीं डोकं नाही.'

आश्चर्याचा पहिला भर ओसरल्यावर ती उद्गारली 'तुम्ही साहित्यिक तर अगदी घड्याळ लावून लिहितां म्हणे ! इतक्या तासांत इतकीं पानं–' लगेच स्वतःशीं स्मित करीत ती म्हणाली, 'तुम्ही कारवारच्या संमेलनाला आलां नव्हतां वाटतं ?'

मीं नकारार्थी मान हलविली. मात्र तिच्या मुद्रेवरलें हास्य पाहून मी नकळत नंदीबैलाचा अभिनय तर केला नाही ना अशी शंका माझ्या मनांत आली.

ती हसत पुढे म्हणाली, 'तरीच ! अहो, कारवारला साहित्यिक आले होते ना ? त्यांतले पुष्कळ परत येतांना गोवें पाहायला गेले आणि येतांना नवीं घड्याळं हातावर बांधून आले. जकात चुकवून !'

मी गंभीरपणाने तिला म्हणालों, 'कोल्हटकरांचा चोरांचं संमेलन' हा लेख तुम्ही वाचा. म्हणजे तुम्हांला यांत कांही नवल वाटणार नाही. चोरांचं व लेखकांचं संमेलन एकत्र भरविण्यांत यावं असा ठराव त्या

संमेलनांत मंजूर झाला तो कांही उगीच नाही !'

'तें जाऊं दे मेलं. पण तुमच्यासारख्या लेखकाजवळ घड्याळ नसावं याचं मला भारी आश्चर्य वाटतं बाई !'

इतक्यांत गाडी सुटली म्हणून बरें झालें. नाहीतर त्या तरुणीचें ' घड्याळाचे एक हजार एकशें एक उपयोग ! ' या विषयावरलें एखादें लांबलचक व्याख्यान मला ऐकावें लागलें असतें. आणि मीं घड्याळावर बहिष्कार कां टाकला आहे हें कितीहि जीव तोडून सांगितलें असतें तरी तें तिला पटलें नसतें. कारण घड्याळ हासुद्धा एक दागिना आहे. दागिना म्हटलें की त्याच्यावर बहिष्कार घालण्याची कल्पनाच स्त्रीमनाला सहन होत नाही. कवितेप्रमाणे स्त्रीहि स्वभावतः अलंकारप्रिय असते. मग ती किती का आधुनिक असेना ! त्या दृष्टीने पुरुष म्हणजे शुद्ध गद्य.

या गद्यवृत्तीमुळेच कीं काय बाळपणापासून मला दागिन्यांचा तिटकारा वाटत आला आहे. चाळीस वर्षांपूर्वी आपल्याकडे लहान मुलाच्या कानांत भिगबाळी घालण्याची पद्धत होती. त्याप्रमाणे या बयेने माझाहि कान पकडला होता. पण मला तें भिगबाळी घातलेलें स्वतःचें ध्यान बिलकुल आवडत नसे. कानफाट्या होण्याची भीति नसती तर मीं ती कानांतून ओढूनच काढली असती. नाना फडणविसांच्या मुत्सद्दीपणाबद्दल मनांत आदर असूनहि मी त्यांचें चित्र घरांत कधींहि लावणार नाहीं. नानांच्या कानांत भिगबाळी नसती, मोठेमोठे मुत्सद्दीसुद्धा अलंकारप्रिय असतात हें दृश्य दुसऱ्या बाजीरावाला दिसलें नसतें, तर पेशवाईचा इतिहास अगदी निराळा झाला असता असें मला वाटतें !

खाडिलकरांचें मानापमान नाटक प्रसिद्ध झालें तेव्हा मी तेरा-चौदा वर्षांचा असेन. त्या वेळीं कोल्हटकर हें माझें अधिदैवत होतें. असें असूनहि मी मानापमानाचा चाहता झालों. याचें मुख्य कारण त्यांत लक्ष्मीधराचें पात्र रंगवून पुरुषांच्या दागिन्यांच्या हौसेची नाटककाराने जी रेवडी उडविली आहे तेंच असावें.

मला घड्याळ आवडत नाही याचें एक कारण हें आहे. तुम्ही म्हणाल,

सारे लेखक डॉन क्विझोटचे शिष्य असतात हेंच खरें. घड्याळ हा दागिना आहे हें गृहीत धरून तुम्ही त्याच्यावर हल्ला चढवीत आहां. पण वस्तु-स्थिति तशी मुळीच नाही. घड्याळ हा नुसता शोभेचा अलंकार नाही. ती अत्यंत उपयुक्त वस्तु आहे. या विसाव्या शतकांतली देवता म्हणानात. क्षणाक्षणाला आपलें मार्गदर्शन करणारी, माणसांतल्या कुंभकर्णाला जागृत करून त्याला देवपदाकडे नेणारी, वेळेचा सदुपयोग कसा करावा हें प्रत्येकाला शिकविणारी !

हें घड्याळ-स्तोत्र मीं अनेकदा ऐकलें आहे. पण तें मला पटत नाही. पुराणांतल्या देवतांच्या स्तोत्रांप्रमाणेच तें मला वाटतें. या वर्णनांत वास्तवतेपेक्षा भाविकतेचाच भाग अधिक आहे. घड्याळें घरोघर दिसूं लागल्यापासून प्रत्येक मनुष्य जर मंडलीकांचा अवतार झाला असता तर या घड्याळप्रशंसेंत कांही तरी तथ्य आहे हें मी मान्य केलें असतें. पण सुंदर, नाजूक सोनेरी घड्याळें हातांत बांधून मिरवणारीं अनेक माणसें—बायका आणि पुरुष—मीं पाहिलीं आहेत. उभ्या आयुष्यांत उपयुक्त असें कांही त्यांना करतां आलेलें नाही. अशा स्थितींत घड्याळामुळे माणूस आपल्या प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करायला शिकतो या थापेवर निदान मी तरी विश्वास ठेवणार नाहीं. पूर्वीं दारूची तलफ भागविण्याकरिता डॉक्टरांनी औषध म्हणून ती घ्यायला सांगितली आहे, अशी आपली कैफियत देणारे लोक असत ना ! सारे घड्याळभक्त त्यांच्यासारखेच वाटतात मला ! घड्याळाचा शोध लागला नव्हता तेव्हासुद्धा या जगांत उद्योगी माणसें होतींच !

मात्र मी घड्याळावर रुष्ट असण्याचें दुसरें कारण यापेक्षाहि मोठें आहे. तें म्हणजे घड्याळ हें एक यंत्र आहे हें होय. यंत्र आणि संत यांच्यांत मोठें साम्य आहे. दोघेहि जगाची सेवा करण्याकरिता जन्माला येतात आणि दोघेहि ज्याच्याशीं संबंध येईल त्याला तत्काळ आपल्यासारखा करतात. या दुसऱ्या गुणामुळेच यंत्रापासून माणसाने नेहमी दोन हात दूर राहावें असें मला वाटतें. यंत्राच्या सहवासांत मनुष्यहि यंत्र होतो असा

निदान माझा तरी अनुभव आहे. गिरणी मालकासारखे मोठमोठे भांडवलदार लोक तुमच्याआमच्या दृष्टीने माणसाचा विचार करीत नाहीत याचें दुसरें कारण काय आहे ? अवाढव्य, राक्षसी यंत्राच्या सहवासांत ते नित्य वावरत असतात. साहजिकच तेहि तसेच बनतात, भावनांना पारखे होतात.

घड्याळाचीच गोष्ट घ्या. तें हातावर बांधणारा पुरुष एकांतांत प्रियकरणीशीं गुजगोष्टी करीत असो किंवा कुणातरी प्रिय व्यक्तीचें सांत्वन करण्याकरिता गेलेला असो, त्याचें लक्ष नकळत आपल्या हातावरच्या यंत्राकडे जातें. साहजिकच त्याला आपल्या पुढल्या कामांची आठवण होते. असा मनुष्य प्रेमालाप कसले करणार कपाळाचे ! रामाच्या वेळीं घड्याळें असतीं आणि कैकेयीने आपल्या अटी थोड्या सैल करून त्याला एखादें घड्याळ वनांत बरोबर घेऊन जाण्याची परवानगी दिली असती, तरी केले याहून राम आणखी कोणते पराक्रम करणार होता ? घड्याळ जवळ नसतांनाच दंडकारण्यांत चौदा सहस्र राक्षस त्याने मारले ! मात्र कनवटीला घड्याळ लावून तो गेला असता, तर त्याचें आणि सीतामाईचें आयुष्य अधिक दुःखी झालें असतें याविषयी मला बिलकुल शंका वाटत नाही. त्या वनवासांतला अत्यंत आनंदाचा भाग म्हणजे राम आणि सीता यांच्या रात्रभर चालणाऱ्या गुजगोष्टी. ‘अविदित गतयामा रात्रिरेव व्यरंसीत्’ या अमर चरणांत भवभूतीने अमरांनाहि दुर्लभ असें तें सुख किती सुंदर रीतीने सूचित करून ठेवलें आहे. पण पर्णकुटिकेंत घड्याळ नव्हतें म्हणूनच राम आणि सीता यांना या स्वर्गीय सुखाचा लाभ झाला. एखादें घड्याळ—मग तें सीतेच्या मनगटावरलें ललनाघड्याळ असो अथवा विश्वामित्राच्या यज्ञरक्षणाच्या वेळीं रामाने वापरलेलें टाइमपीस असो—त्यांच्या सोबतीला असतें तर त्यानें त्या दंपतीला क्षणार्धांत स्वर्गांतून पृथ्वीवर ढकलून दिलें असतें ! मधेंच घड्याळाकडे लक्ष जाऊन बारा वाजलेले दिसतांच राम उद्गारला असता ‘ प्रिये, अजून खूप खूप बोलायचंय् मला तुझ्याशीं. पण ते घड्याळांतले काटे पाहिलेस का ? छे ! आता जागून

उपयोग नाही. या गोदावरीच्या पाण्यानं आधीच तुला पडसं झालं आहे—त्यांत जागरणाची भर पडली म्हणजे—चल, झोंप जा!' कदाचित् बोलण्याच्या रंगांत आल्यामुळे रामाचें लक्ष घड्याळाकडे गेलें नसतें तरी सीतेचें गेलेंच असतें आणि ती दचकून म्हणाली असती, 'आर्यपुत्र, ते घड्याळांतले कांटे पाहिलेत का? आज शिकारीकरिता खूप लांब जाणं झालं होतं. झोपावं आपण आता, किती वेडी आहें मी! उगीच बारा वाजेपर्यंत बडबडत बसलें!'

मी घड्याळ कां बाळगीत नाहीं याचें कारण हें आहे. मला यंत्र हवें; पण यंत्राची गुलामगिरी नको! लहर आली की मी लिहायला बसतों. मन रमेल आणि शरीर साथ देईल तितका वेळ मीं लिहीत सुटतों; त्यामुळे एखादे दिवशीं मी दहा तास लिहितों आणि प्रसंगीं दहा दहा दिवस कागदावर रेघसुद्धा ओढीत नाहीं. या तऱ्हेनेच लेखनांतला खरा आनंद लुटतां येतो असें मला वाटतें. ठराविक वेळीं टिपून येणाऱ्या माणसाने यायचें, त्याला आपण मोजके दोन तास मजकूर सांगायचा आणि त्याची जाण्याची वेळ झाली की, कथा तिथेच थांबवावयाची—मग अर्धवट राहिलेला प्रसंग पित्याला न सांगतां नायकाबरोबर जावें कीं नाही या नायिकेच्या मनांतल्या अंतःकलहाचा असो किंवा तिच्या अपत्याच्या मृत्यूचा असो—हें उभ्या जन्मांत मला साधणार नाही. लेखनाचीच गोष्ट कशाला हवी? जेवणें, फिरणें, वाचणें, व्याख्यान देणें, प्रेम करणें इत्यादि गोष्टींना रंग यायला हवा असेल तर घड्याळ नांवाची एक वस्तु या जगांत आहे हें माणसाने विसरून गेलेंच पाहिजे. पण मनगटावर घड्याळ बांधलें की मग तो विसर पडणें अशक्य होतें. खांद्यावर टाकलेलें मूल जसें रस्त्याने कांही ना कांही प्रश्न विचारीत राहतें, तसें मनगटावरलें घड्याळ टिकटिक करून एकसारखें आपलें अस्तित्व दर्शवीत सुटतें. घड्याळाच्या या कर्कश पुटपुटण्याला टिकटिक शब्द प्रथम कुणी वापरला कुणाला ठाऊक! ती खरोखर क़िटकिट असते.

कुठल्याहि जीवनरसाचा आस्वाद उत्कटतेने घ्यायला घड्याळाचा

विरोध कसा होतो हें काय सांगायलाच हवें ? ' अरेबियन नाइटस् ' मधल्या कथांप्रमाणे गप्पांतून गप्पा निघाव्यात तेव्हा कुठे संभाषणाला रंग येतो. अशा गप्पा कधी घड्याळ पाहून तास अर्ध्या तासांत मारतां येतील होय ? घड्याळाकडे पाहून मीं वाचन केलें असतें, तर माझ्या जीवनांतल्या आनंदाचा केवढा तरी मोठा झरा अगदी रोडावला असता. पुस्तक एकदा हातीं घेतलें की तें संपविल्याशिवाय उठायचें नाहीं किंवा झोंपायचें नाही हा माझा खाक्या आहे. या पद्धतीमुळे माझ्या डोळ्यांपुढे त्या त्या पुस्तकांतलीं पात्रें सजीव होऊन उभीं राहतात. इब्सेनचीं नाटकें मीं पाहिलीं आहेत तीं अशींच माझ्या मनाच्या रंगभूमीवर. हार्डीच्या कादंबऱ्यांचीं सुंदर नाटकांत रूपांतरें झालीं आहेत तीं इथेच माझ्या कल्पनाचक्षूंपुढे आणि किती थोड्या वेळांत म्हणतां ? उत्तररामचरित्राच्या पहिल्या अंकाच्या शेवटीं आलेला तो हृदयंगम प्रसंग—सीतेला झोप येऊं लागते. जवळपास उशी नसते. रामचंद्र तिला म्हणतो, ' माझा डावा बाहु हीच तुझी उशी ', सीता मोठ्या प्रेमाने या उशीवर डोकें टेकून झोपी जाते. इतक्यांत गुप्त हेर दुर्मुख येतो. तो सीतेच्या पावित्र्याविषयी लोकांत चाललेली चर्चा सांगतो. राम मोठ्या दुःखाने सीतेचा त्याग करायचें ठरवितो—जणु कांही भवभूति आपल्याला वाचून दाखवीत आहे असा मला अनेकदा भास होतो. पांच सात वेळां एका बैठकींत मी उत्तररामचरित संपविलें नसतें तर या प्रसंगांतलें अपूर्व नाट्य आणि सौंदर्य मला सध्याइतकें प्रचीत झालेंच नसतें !

माझ्या मतें उत्कटता हा जीवनाचा आत्मा आहे. यंत्र—मग तें कितीहि उपयुक्त असो व सुंदर दिसो—त्या उत्कटतेला थोडा ना थोडा बाध आणतेंच. म्हणूनच घड्याळापासून मी नेहमी दोन हात दूर राहत आलों आहें. माझ्या या व्रताचा भंग होण्याची वेळ आयुष्यांत दोनदा आली. एकदा माझ्या कांही विद्यार्थ्यांनी एक सुंदर घड्याळ मला नजर केलें. प्रेम म्हणून दिलेली भेट मला नाकारतां येईना. मी ती घेतली. पण ही वस्तु फार दिवस घरांत बाळगणें धोक्याचें आहे हें जाणून मीं लवकरच तिच्या तावडींतून

सुटण्याचा मार्ग शोधूं लागलों. सुदैवाने तो मला सांपडला. माझे एक अतिशय अनियमित वागणारे मित्र होते. त्यांना मीं तें घड्याळ वाढदिवसाची भेट म्हणून दिलें. त्यांच्या पत्नीनें या भेटीबद्दल मला अशी शाबासकी दिली म्हणतां ! एका धोंड्याने दोन पक्षी मारणे या म्हणीचा अर्थ त्या दिवशीं पुरापुरा कळला मला !

दुसरा प्रसंग चित्रपटाच्या निमित्ताने माझ्यावर ओढवला. एका चित्र-पटाबाबत आम्हां कांहीं कलावंतांचा सत्कार व्हावयाचा होता. त्या सत्कार-प्रसंगीं मला घड्याळ द्यायचें समारंभाच्या चालकांनी ठरविलें आहे अशी कुणकुण माझ्या कानांवर आली. माझ्यांत कधीहि न आढळणारा धूर्तपणा त्या क्षणीं कुठून आला कुणाला ठाऊक. मी त्या चालकांना हसत हसत म्हटलें, ‘घड्याळ कितीहि सुंदर झालं तरी तें यंत्र आहे. एखाद्या शास्त्र-ज्ञाचा सत्कार करतांना भेट म्हणून द्यायला तें फार चांगलं. पण कलावंताला भेट द्यायची ती त्याला शोभेल अशीच हवी. तुम्ही मला एखादा बाजा द्या—अगदी दोन आण्यांचा दिलात तरी चालेल !’

त्यांनीं मला दौत टांक वगैरे चांदीचें साहित्य दिलें. बाजा दिला नाही ! अर्थातच त्या समारंभांत मीं तो वाजविला नाहीं ! पण हातांत घड्याळ बांधून त्याची कटकट ऐकत बसण्यापेक्षा हातांत बाजा घेऊन तो वाजविणें आणि त्या नादब्रह्मांत स्वत:ला विसरून जाणे मला केव्हाहि अधिक आवडेल.

यापुढेहि मी कधी घड्याळ मनगटावर बांधणार नाहीं हें उघड आहे. मात्र त्याची उणीव एखादे वेळीं मला तीव्रतेने जाणवते. रिकामटेकडीं माणसें येऊन बैठकींत बसलीं म्हणजे त्यांना रजा कशी द्यायची हें मला कोडें पडतें. अशा वेळीं वाटतें, आपल्या मनगटावर एखादें छानसें घड्याळ असतें तर काय बहार झाली असती. मग त्याच्याकडे कटाक्ष फेंकीत आपण दचकण्याचें नाटक केलें असतें आणि त्या मंडळींना म्हटलें असतें, ‘मला आताच त्या यांच्याकडं जायचंय्. क्षमा करा हं !’

१९५१

१५

# सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्

सकाळीं अंथरुणांतून उठल्यापासून मी जरा अस्वस्थच होतों. या बेचैनीचा माझ्या प्रकृतीशीं कांही संबंध नव्हता हें सांगून टाकलेलें बरें ! प्रकृतीपुढे पुरुषाचें कांही चालत नाही, हें वेदान्ताइतकेंच व्यवहारांतहि खरें आहे ! पण माझी प्रकृति ही इतिहासांतल्या एखाद्या लहरी राणीपेक्षा किंवा इंग्लंडमधल्या हवामानापेक्षा अधिक चंचल आहे असा उगीच लोकांचा समज होऊन बसलेला आहे ! वर्तमानपत्रांपासून होणारे अनेक फायदे मला मान्य आहेत; पण पराचा कावळा करण्याच्या बाबतींत त्यांचा हात कुणी धरूं शकणार नाही, हेंहि तितकेंच खरें आहे !

माझें डोकें दुखत नव्हतें ! नाक वाहत नव्हतें ! घसा खवखवत नव्हता ! साडेतीन हात शरीराला त्रास देणाऱ्या साडेतीनशें तक्रारींपैकी एकहि मला जाणवत नव्हती ! कोवळ्या उन्हांत हसणाऱ्या घराशेजारच्या हिरव्यागार झाडाइतकी माझी प्रकृति आज उत्तम होती ! अस्मादिकांचा पहिला चहा झाला होता. अगदी वेळेवर झाला होता. जसा हवा तसा झाला होता ! जो अरुणोदय पाहून होनाजीबाळाला ‘ घन:श्याम सुंदरा ’

सारखी रसाळ भूपाळी स्फुरली, तो पाहत पाहत मी लज्जतदार चहाचे घुटके घेतले होते ! या चहाकरिता रात्रीं दारांत काढून घेतलेलें दूध वर साय येते न येते इतकेंच तापवायचें, असा गृहराज्ञीचा दंडक आहे ! सुंदर पदार्थाभोवती गुंडाळलेल्या नाजुक कागदासारखा किंवा सुरेख तरुणीने मुखचंद्रावर घेतलेल्या मखमली बुरख्यासारखा सायीचा तो पातळ तवंग मला वाटतो ! त्याच्यावर मुक्तछंदांत मीं एक कवितासुद्धां लिहिली आहे ! असें काव्यमय दूध मिळत असल्यामुळे पहिला बेचव चहा प्यायची पाळी माझ्यावर कधीच येत नाही. साहजिकच विडा जमला की माझे आजोबा जसे खुषींत येत असत, तसा सकाळीं सहासातच्या सुमाराला पहिला चहा घेऊन मी मोठ्या प्रसन्न मनःस्थितींत कामाला लागतों !

पण आजचा दिवस त्याला अपवाद होता. तोंड धुतांनाच रात्रीं पत्नीने सांगितलेल्या कामाची मला आठवण झाली. काम कांही तसें अवघड नव्हतें. गुलबकावलीचें फूल आणावयाचें नव्हतें ! समुद्रावर सेतु बांधायचा नव्हता ! आग्र्याहून शत्रूच्या नजरकैदेतून सुटायचें नव्हतें ! किंवा पंचवार्षिक योजनेकरिता पैसाहि पैदा करायचा नव्हता ! आमच्या लोण्याच्या दुकानदाराकडे जाऊन दोन शेर लोणी आणायचें, एवढेंच काम होतें !

दुकानदाराची उधारी बिधारी कांही राहिली नव्हती ! तेव्हां भीति वाटण्याजोगें या कामांत तसें कांही नव्हतें. असें असूनहि बायकोने डबा घातलेली पिशवी जेव्हा माझ्यापाशीं आणून ठेवली तेव्हा तिच्याकडे (म्हणजे पिशवीकडे, बायकोकडे नव्हे !) पाहून माझें मन अगदी नाराज होऊन गेलें. दुकानदाराला सांगायचा निरोप सौभाग्यवतीने रात्रींच माझ्याकडून पाठ करून घेतला होता ! त्या निरोपाचा आशय एवढाच होता कीं, 'मागच्या खेपेचं तीन शेर लोणी कांही चांगलं नव्हतं !' आज लोणी घेतांना हा निरोप त्या महात्म्याला सांगणें आवश्यक होतें. त्यामुळे निदान आज तरी चांगलें लोणी मिळण्याचा संभव होता. त्या सद्गृहस्थाला जें सांगायचें होतें तें सत्य होतें ! चांगलें लोणी मिळण्याच्या दृष्टीने तें सांगणें जरूर होतें ! पण हा निरोप सांगायची पाळी माझ्यावर आली नसती

तर फार बरें झालें असतें असें मला राहून राहून वाटत होतें !

कालिदासाने विरही यक्षाचा गोड निरोप त्याच्या प्रियेला सांगण्याची कामगिरी मेघावर सोपविली म्हणून त्यानें ती मान्य केली. 'मागच्या खेपेचं लोणी चांगलं नव्हतं !' असला निरोप तो यक्ष सांगूं लागला असता तर तो ऐकून घ्यायला मेघ आपल्या जागीं पळभरसुद्धा राहिला नसता !

'सत्यं ब्रूयात्' हा श्लोक मी पंचेचाळीस वर्षांपूर्वी इंग्रजी पांचवींत पाठ केला. या श्लोकांत 'खरें बोलावें' या उपदेशाला 'गोड बोलावें' अशी पुस्ती जोडलेली आहे. इतकेंच नव्हे, तर अप्रिय सत्य सांगूं नये असें- सु ा या श्लोककर्त्यानें स्पष्ट केलें आहे. या सर्व गोष्टी मला मान्य आहेत. पण त्या अंमलांत कशा आणायच्या, हें मात्र उभ्या आयुष्यांत मला कधीच कळलें नाही ! आजहि तें कळेना ! काटा नसलेला गुलाब, छाया नसलेला प्रकाश आणि कटुता नसलेलें सत्य हे पदार्थ या जगांत कुठे मिळतात, देव जाणे !

पण ही अडचण बायकोला कशी सांगायची ? तिने ताडकन् शेरा मारला असता, 'मुलखाचे भित्रे आहांत तुम्ही. एवढ्या कथा-कादंबऱ्या लिहितां, जाडीं जाडीं पुस्तकं वाचतां, लांबलचक व्याख्यानं देतां नि त्या लोणी-विक्याला खरी गोष्ट सांगायला भितां ? तो काय आपला काका-मामा आहे, का त्याच्याशिवाय दुसरीकडं कुठं लोणी मिळणार नाही असं छापून आलंय् ?'

पत्नीच्या पांच मिनिटांच्या नेपथ्य पाठांत राजकीय पुढाऱ्यांच्या शंभर व्याख्यानांचा जोष असतो, हा अनुभव बहुतेक नवऱ्यांच्या परिचयाचा आहे ! म्हणून दुकानदाराला सांगायच्या निरोपाविषयीं कसलीहि चर्चा न करतां बायकोने दिलेली पिशवी घेऊन मी घराबाहेर पडलों. चालतां चालता तो निरोप दुकानदाराला केव्हा व कोणत्या शब्दांत सांगावा याचा मी विचार करूं लागलों. दुकानांत पाऊल टाकल्याबरोबर जर आपण हा विषय काढला तर मानसशास्त्राच्या दृष्टीने ती मोठी चूक होईल. डेल कार्नेजीच्या 'मित्र कसे मिळवावेत ?' या पुस्तकाचीं पारायणं

आपण दहा वर्षांपूर्वी केलीं तीं काय उगीच ? छे: ! आरंभीं हा विषय काढणं बिलकुल योग्य होणार नाही. तसें केलें तर दुकानदार चडफडेल, रागावेल आणि त्याच्या घुश्श्याचा परिणाम तागडीवर होऊन आजच्या लोण्यांतहि आपलें नुकसान होईल ! त्यापेक्षा पहिल्यांदा त्याच्याशी हवा-पाण्याच्या गोडगोड गोष्टी कराव्यात आणि शेवटीं उठतां उठतां सहज आठवण झाल्याचा अभिनय करीत बायकोचा निरोप त्याच्या कानांवर घालावा !

छे ! तसें केलें तर आजच्या लोण्यावर त्याचा कांहीच परिणाम होणार नाही ! हा निरोप सांगायचा तो आजचें आणि यापुढचें लोणी शक्य तितकें चांगलें मिळावें म्हणून तेव्हा, आजच्या लोण्याचें वजन करण्या-पूर्वीच मागचें लोणी चांगलें नसल्याची जाणीव दुकानदारसाहेबांना करून द्यायला नको का ?

सौभाग्यवतीची तक्रार दुकानदाराच्या कानांवर केव्हा घालावी, हा मोठा विकट प्रश्न माझ्यापुढे दत्त म्हणून उभा राहिला. प्रत्येक गोष्टीसाठी मुहूर्त शोधणारे आपले पूर्वज निःसंशय दूरदृष्टीचे होते ! ही तक्रार कोणत्या शब्दांत दुकानदार महाशयांच्या कानांवर घालावी, याचाहि निर्णय मला करतां येईना. कवितेच्या पांच-पन्नास ओळी जुळविणें सोपें, पण हा दोन वाक्यांचा निरोप सांगणें नको ! असें मला वाटूं लागलें. ' हें पाहा शेटजी, मागच्या खेपेचं लोणी वाईट होतं, ' असं म्हटलं तर ? छे: छे: ! महा-भारतकारांनीच सांगितलं आहे ना ? ' न ब्रूयात् सत्यमप्रियम् । ' न आवडणारे सत्य कधी बोलूं नये ! ' लोणी वाईट होतं ' असं म्हणण्या-पेक्षा ' लोणी चांगलं नव्हतं ', असे शब्द वापरले तर ? हा बदल तसा वाईट नाही. पण दोन्ही वाक्यांचा अर्थ जवळ जवळ एकच होतो की ! मागून पुढून बाप नवरा !

विनोबासारखे अनेक सत्पुरुष सांगतात, ' माणूस मुळांत वाईट नसतो !' त्यांचें म्हणणें मला शंभर टक्के पटतें असें नाही पण त्यांत सत्यांश आहे, असें मात्र वाटतें. खरें सांगूं ? वर्तमानपत्रांत खुनांच्या, दरोड्यांच्या,

बायकोनें नवऱ्याच्या डोक्यांत दगड घातल्याच्या आणि नवऱ्यानें कुऱ्हाडीनें बायकोचीं खांडोळीं केल्याच्या बातम्या मी नेहमी वाचतों. या बातम्या खोट्या असतात असें नाही; पण वाचतांना माझी स्थिति अद्‌भुत कथा वाचणाऱ्या मुलासारखी होते. आपण जें वाचीत आहों, तें चित्तथरारक असलें तरी आपला त्याच्याशीं कांही संबंध नाही, अशी माझी भावना असते !

प्रत्येक माणसाचें भावनेचें जग निराळें आणि मर्यादित असतें, हेंच खरें ! माझ्या या जगांत राक्षसी माणसांना आणि अंगावर कांटा उभा करणाऱ्या घटनांना सहसा जागा मिळत नाही. शेक्सपिअरच्या 'मॅक्बेथ' पासून भाव्यांच्या 'पुतळा' गोष्टींतल्या सखारामपर्यंतचीं हरतऱ्हेचीं तीव्र मनोवृत्तीचीं माणसें माझ्या बुद्धीच्या कक्षेंत येऊं शकतात. मात्र, माझ्या भावनेच्या जगांत त्यांच्या संचाराला बंदी आहे ! माझ्या भावनेच्या जगांतलीं माणसें बहुधा सामान्य—फार चांगलीं नाहीत नि फार वाईट नाहीत अशीं—असतात. तीं मेणाचीं बाहुलीं असतात म्हणाना ! पाषाणाचा पुतळा त्यांत तुम्हांला सापडायचा नाही !

मी मोठा सज्जन मनुष्य असल्यामुळे माझ्या भावनेच्या जगांत अमानुष माणसांना प्रवेश मिळत नाही, असें मात्र नाही ! बाह्यतः हा माझा सज्जनपणा असेल ! पण वरचा एक थर खरवडला, तर या सज्जनपणाच्या खाली दुबळेपणाच लपला आहे, असें दिसून येईल. माझा मलासुद्धा तो जाणवतो. लोण्याच्या दुकानदाराला बायकोचा निरोप सांगणें, ही गोष्ट आइन्स्टीनचा सापेक्षतेचा सिद्धान्त समजावून घेण्यापेक्षा मला अवघड वाटत होती, याचें मूळ माझ्या या स्वभावसिद्ध दुबळेपणांतच होतें !

मी मनांत म्हणत होतो, 'या वेळीं दुकानांत खूप गिऱ्हाइकं असतील. त्यांच्या समोर दुकानदाराला 'तुमचं मागचं लोणी चांगलं नव्हतं' असं सांगणं म्हणजे त्याचा अपमान करण्यासारखं होईल'! सकाळच्या वेळीं आम्हां दोघांना पूर्ण एकांत मिळावा म्हणून एकहि गिऱ्हाईक दुकानाकडे फिरकणार नाही, असें कसें घडेल ? तसले एकांत नाटकें कादंबऱ्यांत

आढळतात आणि तेहि फक्त नायक-नायिकांनाच लाभतात! शिवाय, ज्या लोण्याचं तूप आम्हीं खाऊन संपविलें होतें, तें चांगलें नव्हतें, असें म्हणून कोळसा उगाळीत बसण्यांत फायदा तरी काय होता? 'गतम् न शोचेत्', 'गेलं तें गंगेला मिळालं' इत्यादि म्हणी काय पिढ्यान् पिढ्या उगीच लोकांच्या तोंडीं घोळत राहिल्या आहेत?

या सर्व आपत्तींतून सुटण्याचा एक सोपा मार्ग होता. दुकानदाराला कांही बोलायचें नाही. त्याला अवाक्षराने दुखवायचें नाही! घरीं आल्यावर बायकोने विचारलें तर, (आणि ती विचारणारच! अशा बाबतींत बायकांची स्मरणशक्ति फार तीव्र असते!) 'तुझा निरोप जसाच्या तसा सांगितला' म्हणून एक चांगली लोणकढी थाप ठोकून द्यायची! अशा थापा मारल्याशिवाय का आपल्या सारख्यांचा या जगांत निभाव लागणार आहे? माणसाने थापा मारण्यांत कांही कमीपणा मानण्याचें मुळीच कारण नाही. आजच्या जगांतला तो एक प्रतिष्ठित व्यवसाय आहे! शस्त्रसंन्यास-परिषदेच्या जगप्रसिद्ध वृद्ध सभासदापासून चोरून प्रेम करणाऱ्या तरुण पोरीपर्यंत बहुतेक लोक थापा मारल्याशिवाय दुसरें काय करीत असतात?

दुकानदाराशीं मागच्या लोण्याबाबत चकार शब्द काढायचा नाही या निर्णयाने माझा जीव भांड्यांत पडला. पण तो क्षणभरच! लगेच इंग्रजी पांचवीपासून माझी पाठ पुरवीत आलेला तो श्लोक आठवला— 'सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्'! 'खरें बोलावें आणि गोड बोलावें!'

आली पंचाईत! बायकोशीं खरें बोलायचें म्हटलें, तर दुकानदाराचें मन दुखवावें लागतें! त्याला नाराज करायचें नाही म्हटलें तर पत्नीशीं प्रतारणा करावी लागते! 'बायकोची अशा रीतीने केलेली फसवणूक हें संसाररथाच्या चाकांचें वंगण आहे', हें प्रो. धोंडोपंत बर्वे यांचें 'स्मृति-लहरीं'तलें मत माझ्या मदतीला धावून आलें! पण त्याने माझें कांही केल्या समाधान होईना. अशा साध्या गोष्टींत बायकोशीं खोटें बोलायचें? छे:, अगदी अशक्य आहे तें! मग स्वप्नांत राज्यदान करणाऱ्या हरिश्चंद्रा-

पासून राघोबादादाला देहान्त प्रायश्चित्त सुनावणाऱ्या रामशास्त्र्यांपर्यंत सर्व सत्य-पूजकांची आपण आजपर्यंत मनांतल्या मनांत पूजा करीत आलों, ती कशासाठी ? बायकोला फसविण्यापेक्षा जिवाचा धडा करून दुकानदाराला तिचा निरोप सांगावा आणि मनावरला हा विचित्र भार हलका करावा, हें बरें !

दुकान जसजसें जवळ येऊं लागलें तसतशी कुरुक्षेत्रावर अर्जुन कसा किंकर्तव्यमूढ झाला असेल, याची मला स्पष्ट कल्पना येऊं लागली ? दुकानाच्या पायऱ्या चढतांना तर मी चोहींकडे व्याकुळ दृष्टीने पाहिलें. पण या संकटांतून मला पार पाडूं शकेल, असा श्रीकृष्ण कुठेच दिसेना ! मीं मुकाट्याने दुकानदाराकडे दोन शेर लोणी मागितलें. दुकानदार लोण्याचें वजन करूं लागला. त्याची नजर माझ्याकडे नाही असें पाहून नाटकांतल्या पात्राने स्वगत भाषण करावें तसें मी म्हटलें, ' मागच्या खेपेचं लोणी नेहमीसारखं उतरलं नाही, असं कांहीतरी वहिनी म्हणत होत्या !'

दुकानदार मान वर करून माझ्याकडे रोखून पाहूं लागला. मी चटकन् पुढे बोलून गेलों, ' पावसाळ्यांतल्या चाऱ्यामुळं तसं झालं असेल !'

तो हसून उत्तरला, ' हां ! बराबर बोललांत. आतां हें लोणी कसं उतरतं बघा अगदी फस्क्लास् !'

१९५७

# १६

# आत्मचरित्रें

पुस्तकें आणि पेयें यांच्यांत फार साम्य आहे, असें मला नेहमीच वाटतें. सकाळचा चहा वेळेवर मिळाला नाही, तर आपल्याला क्षणोक्षणीं कसें चुकल्यासारखें होतें. अगदी याच मन:स्थितीचा अनुभव झोपतांना पुस्तकांच्या बाबतींतहि मला येतो. उभ्या दिवसांत तास-दोन तासांची सवड मिळून कुठल्याहि नव्या पुस्तकाचीं पांच-पन्नास पानें माझ्या हातून वाचून झालीं असलीं, म्हणजे अंथरुणावर पडतांच मोठ्या प्रसन्न मनाने मी झटकन् झोपी जातों. तोंडांत चाकोलेट चघळत बालकाने पाळण्यांत निजावें ना ? अगदीं तस्सा ! वाचलेला मजकूर मला आवडला नसला तरी चालतें. पण मनाला स्वंथ करायला कांहीतरी हवें असतें. तें त्या वाचनांतून मला मिळतें. एखादे दिवशीं निरनिराळ्या कामांच्या धांदलींत कुठलेंहि पुस्तक उघडायला वेळ मिळाला नाही, तर रात्रीं दहा-साडेदहापर्यंत मला त्याचें कांही वाटत नाही. मात्र अंथरुणावर अंग टाकलें की मला पुस्तकांची आठवण होऊं लागते. कापूसकाड्यांनी बनविलेल्या इवल्याशा घरट्यांतून चिमणीच्या पिलाने बाहेर डोकावून पाहावें तसा

माझ्या मनाचा चाळा सुरू होतो. कुणालाही सांगतां न येण्यासारख्या लहानसहान असंख्य सुखदु:खांची सहभगिनी असलेली माझी मऊ मऊ उशी मला रुतूं लागते—अगदीं नकोशी होते. एखाद्या दगडावर डोकें टेकून आपण झोपलों आहों असें वाटून मी ताडकन् उठून बसतों. अकरा वाजायला आले असले तरी, अर्धा तास कां होईना, वाचीत बसावें अशी तीव्र इच्छा माझ्या मनांत उत्पन्न होते. एकीकडे शिणलेलें शरीर निद्रेच्या बाहुपाशांत जाण्याकरिता धडपडूं लागतें. दुसरीकडे असंतुष्ट मन त्या पाशांतून मुक्त होण्याकरिता धडपडत असतें. मन आणि शरीर यांच्या झगड्यांत बहुधा शरीराचाच विजय होतो. पण अशा स्थितींत माझें शरीर अंथरुणावर झोपलें असलें तरी मन निरनिराळ्या आवडत्या पुस्तकांतून भ्रमत राहतें. उत्तररामचरिताचे प्रयोग मराठी रंगभूमीवर कधी काळीं झाले आहेत की नाही हें मला ठाऊक नाही. तें करुणोदात्त नाटक कुठल्याहि कंपनीने केलेलें कांही मला आठवत नाही. पण त्याच्या पहिल्या अंकाचे प्रयोग स्वप्न-सृष्टींतल्या रंगभूमीवर माझ्या मनाने अनेकवार पाहिले आहेत. त्यांतल्या अनेक रम्य दृश्यांचा मला कधीच विसर पडणार नाही. ती झुळझुळ वाहणारी पुण्यसलिला गोदावरी, ती निसर्गसुंदर पंचवटी, एखाद्या बालतपस्विनी-प्रमाणे भासणारी ती पर्णकुटिका, तिच्या अंतरंगांत चाललेली सीतारामांची ती मधुर कुजबुज—जागेपणींसुद्धा हें चित्र अनेक वेळां माझ्या डोळ्यांपुढे उभें राहतें.

ऋतुमानाप्रमाणे किंवा दिवसांतल्या विविध वेळांप्रमाणे आपण निरनिराळीं पेयें घेत असतों. पुस्तकांचेंहि तसेंच आहे. थंडीच्या दिवसांत सकाळीं कुणी बर्फ घातलेलें लिंबाचें सरबत घेईल का? पण तेंच सरबत उन्हाळ्यांतल्या तिसऱ्या प्रहरीं, चारदोन घटकांच्या वामकुक्षीनंतर तगमगणाऱ्या शरीराला किती सुखकारक वाटतें! कादंबरीवाचनाच्या बाबतींत मला नेहमी हाच अनुभव येतो. खूप खूप काम करण्याइतका उत्साह ज्या वेळीं माझ्या अंगीं असतो, त्या वेळीं आदल्या दिवशीं अपुरी राहिलेली एखादी चटकदार कादंबरी घेऊन ती वाचीत पडावें, असें मला कधीच

वाटत नाही. कांहीतरी लिहीत बसण्यांत अथवा एखादें शास्त्रीय पुस्तक वाचून त्याचीं टिप्पणें करण्यांत अशा वेळीं मला आनंदाचा लाभ होतो. पण कामाने, हवेने, अथवा आजाराने जेव्हा मी गळून जातों, तेव्हा मला कथाकादंबऱ्यांखेरीज दुसरें कांहीहि रुचत नाही. अलीकडे मनुष्याने दिवसा काव्य वाचूं नये अशा मताचा मी बनत चाललों आहें. पोलिस-शिपाई जेव्हा गावांत गस्त घालीत असतात ती वेळ—म्हणजे रात्रीं अकरा ते पहाटें चार ही वेळ—काव्यवाचनाला फार उत्तम असते असा माझा हल्लीचा अनुभव आहे. जातिवंत कवीच्या शब्दांचा नाजूकपणा, त्याच्या भावनांचा कोमलपणा आणि त्याच्या जीवनदर्शनांतला सूक्ष्मपणा दिवसाच्या दंग्यांत, धांदलींत आणि धबडग्यांत आपल्या अंतःकरणापर्यंत पोचूंच शकत नाही. जिकडेतिकडे ढोल आणि नगारे यांचा धांगडधिंगा सुरू असतांना एकतारीवर कुणी कितीहि गोड भजन आळवूं लागला तरी त्याच्याकडे लोकांचें लक्ष लागावें कसें ?

कोणत्या वेळीं काय वाचावें या गोष्टीइतकाच कोणत्या वयांत काय वाचावें हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. मात्र त्या प्रश्नाचें उत्तर सर्वस्वीं आपल्यावर अवलंबून नसतें असें मला वाटतें. लहानपणीं मी 'अरबी भाषेंतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' मोठ्या आवडीने वाचीत असें. त्या गोष्टींतल्या चाळीस चोरांच्या वंशजांनी आज सारें जग पादाक्रांत केलेलें दिसत असलें, तरी त्यांतला जादूचा दिवा मला आज कुठेच आढळत नाही. त्यामुळे त्या पुस्तकाविषयी मला आता पूर्वींइतकें प्रेम वाटत नाही. मात्र त्या वेळीं माझी जिवलग मैत्रीण असलेली इसापनीति अजूनहि मला बाळपणीइतकीच आवडते. इंग्रजी शाळेंत गेल्यावर नाटकेंकादंबऱ्यांच्या जोडीने मी चरित्रेंहि खूप वाचलीं. बाल्य आणि यौवन यांच्या मधल्या प्रदोष-कालांत प्रत्येक मोठ्या मनुष्याचें चरित्र वाचतांना त्याच्यांतले कोणते कोणते गुण आपण अंगीं आणायचे याची मी यादी तयार करीत असें. किती सोपी आणि सहजसाध्य गोष्ट वाटत असे ती तेव्हा ! पुढे योग्य वेळीं त्या ग्रंथमालिकेंत शोभेल असें आपलेंहि एक जाडजूड चरित्र प्रसिद्ध

होणार आहे, अशी तेव्हा माझी बालंबाल खात्री होती. त्यामुळे प्रत्येक मोठ्या मनुष्याच्या बाळपणाशीं मी माझ्या लहानपणाची तुलना करून पाहीं आणि दोन्हींत कुठेतरी साम्य आढळलें कीं माझा आनंद गगनांत मावेनासा होई. माझ्या वयाच्या आठव्या-नवव्या वर्षी माझे वडील अर्धांगवायूने आजारी पडले; त्या वेळेपासून गरिबीचे चटके कसे असतात, याची मला पुरेपूर कल्पना येऊं लागली. अशा स्थितींत बाराव्या वर्षी माझ्या हातांत आगरकरांचें एक छोटें चरित्र पडलें. त्यांत त्यांच्याहि वांटचाला आलेलें भीषण दारिद्र्य पाहून मला काय विलक्षण आनंद झाला म्हणता ! या एका साम्याच्या बळावर पुढे वर्षानुवर्षे मी आगरकर होण्याच्या स्वप्नांत अगदी धुंद होऊन गेलों होतों !

आता ती धुंदी साफ उतरली आहे. मोठ्या लोकांचीं चरित्रें हल्ली मी क्वचितच वाचतों. महापुरुषांच्या पावलांवर पाऊल टाकून आपला जीवनक्रम आखणें आणि तो पार पाडणें हें येरागबाळाचें काम नाही हें मला आता अनुभवाने पटलें आहे हें तर खरेंच. पण त्याशिवाय त्या वेळीं मुळीच न कळलेली एक गोष्ट आता मी पन्नाशीच्या घरांत आल्यामुळे माझ्या ध्यानांत येऊन चुकली आहे. ती म्हणजे माणसाचा मोठेपणा त्याच्या पावलांवर अवलंबून नसून त्याचा उगम त्याच्या बुद्धींत, अंतःकरणांत, प्रतिभेंत आणि प्रज्ञेंत असतो ही होय.

मात्र मी पन्नाशी गाठली आहे यावरून आतां मी वेदांताचें वाचन सुरू केलें असावें असा जर कुणीं कयास केला तर तो सर्वथैव चुकीचा ठरेल. मला महर्षि वसिष्ठ, आद्य शंकराचार्य, लोकमान्य टिळक वगैरे श्रेष्ठ पुरुषांविषयी नितांत आदर आहे. वसिष्ठांची सात्त्विकता, शंकराचार्यांचें वैराग्य, आणि टिळकांचें वीरत्व या गोष्टी मला नेहमीच वंद्य वाटतात. पण एवढ्यावरून माझ्या पुस्तकांच्या कपाटांत योगवासिष्ठ, शांकरभाष्य, गीतारहस्य वगैरे ग्रंथ जर कुणी शोधूं लागला तर त्याची फार निराशा होईल. शांकरभाष्य शोधतांशोधतां त्याच्या हाताला डोरोथी पार्करच्या कवितांच्या चुटक्यांचें पुस्तक लागेल आणि त्यांतल्या खालील कवितेवर

'जी' असा एकाक्षरी इंग्रजी शेरा मारून मीं तिची स्तुति केलेली पाहून तर तो चकितच होईल! या दोन कडव्यांच्या कवितेचें नांव आहे, 'स्त्रीमन.' पहिल्या कडव्यांत ही स्त्री म्हणते,—'मी जेव्हा रोममध्ये असतें, तेव्हा मातृभूमीच्या दर्शनाकरिता माझें ओढाळ मन कसें आतुर होतें. पण मी घरीं परत आलें की मला रोमची राहून राहून आठवण होऊं लागते—तिकडे परत जाण्याकरिता माझा जीव तळमळूं लागतो.'

पुढे दुसऱ्या कडव्यांत ती आपल्या प्रियतमाला म्हणते, 'जिवलगा, तूं जवळ असलास म्हणजे मला तुझा कंटाळा येतो. तुझ्या सहवासांतला क्षण मला प्रहरासारखा वाटूं लागतो. पण मला सोडून तूं दूर गेलास म्हणजे माझें हृदय तुझ्यासाठी हुरहुरत सुटतें. तुझ्या विरहाचा प्रत्येक क्षण मला युगासारखा भासतो. प्रियकरा, हें असं कां होतं रे? प्रीतीची रीत अशी उफराटीच असते काय?'

पन्नाशींत या चुटक्यावर खूष असणाऱ्या मनुष्याच्या संग्रहीं उपनिषदें तर सोडाच, पण मनाचे श्लोकसुद्धा सांपडण्याचा संभव नाही हें काय मीं मुद्दाम सांगायला हवें? पण याचा अर्थ मी अजून ऐन पंचविशीला शोभणारेंच वाङ्मय वाचीत राहिलों आहें असा मुळींच नाही. माझ्या कुणाहि मित्राच्या चटकन् लक्षांत येईल असा एक मोठा फरक अलीकडे माझ्या ग्रंथसंग्रहांत पडला आहे. त्यामुळेच तर परवा माझा एक जिगरदोस्त सपशेल फसला. माझीं अतिशय आवडतीं पुस्तकें मी नेहमी एका निराळ्या कपाटांत ठेवतों, हें त्याला पूर्वीपासून ठाऊक आहे. परवा चार दिवस तो आमच्याकडे राहायला आला, तेव्हा तें कपाट उघडीत उघडीत तो मला म्हणाला, 'आगरकर, कोल्हटकर, गडकरी हीं तुझीं पहिलीं दैवतं होतीं; मग तिथं इब्सेन, चेकॉव्ह, आणि टर्जीनिव्ह यांची स्थापना झाली; त्या देवांचा काळ संपल्यावर झ्वाइग, कॅपेक, जिब्रान यांच्या प्रतिष्ठापनेचा समारंभ पार पडला. मोटारीचं लेटेस्ट मॉडेल असतं ना? तसा तुझा अगदीं १९४७ चा आवडता लेखक कोण आहे, हें पाहण्याकरिता मी हें कपाट उघडतोंय्.'

त्याला अवाक्षरानेहि उत्तर न देतां मी स्वस्थ बसलों. पांच-दहा मिनिटें सारीं पुस्तकें चाळून तो एकदम माझ्याजवळ आला आणि माझ्या पाठीवर थाप मारीत म्हणाला, 'तूं सध्या काय लिहितोयस् तें ओळखलं मीं!'

'मोठा मनकवडा आहेस म्हणायचा तूं!' मी हसत हसत उत्तर दिलें.

'तें कांही कां असेना! तूं आत्मचरित्र लिहायला सुरुवात केली आहेस!'

'अं हं!' मी हसत उत्तरलों. 'आत्मचरित्र लिहायला मनुष्य मोठा असावा लागतो—निदान आपण कुणीतरी मोठे गृहस्थ आहोंत असा भ्रम तरी त्याला उत्पन्न व्हावा लागतो! या दोन्ही गोष्टी माझ्यापाशी नाहीत!'

कपाटांतून एकामागून एक पुस्तक काढीत आणि मला दाखवीत तो म्हणाला, 'मग हीं 'स्मृतिचित्रं', या 'आमच्या आयुष्यांतील आठवणी', हें झ्वाइगचं 'कालचं जग', हें इझाडोरा डंकनचं 'माझं जीवन', हें डेव्हि-सचें 'एका अट्टल भटक्याचं आत्मचरित्र'—हीं साठसत्तर आत्मचरित्रं गोळा करून आपल्या आवडत्या पुस्तकांच्या कपाटांत तूं कशाला ठेवलीं आहेस?'

'हें औषधांचं कपाट आहे गृहस्था, पुस्तकांचं नाही. प्रौढपणीं शरीरा-प्रमाणे मनाच्याहि तक्रारी सुरू होतात त्या दूर करण्याकरिता—'

त्याला माझें हें बोलणें थट्टेचें वाटलें. मी चोरून आत्मचरित्र लिहीत आहें असा आरोप त्यानें माझ्यावर ठेवायचा तो ठेवलाच!

मी स्वस्थ बसलों. जगांत कांही कांही आरोपांचा खोटेपणा सिद्ध करणें कठिण असतें. मी त्याला सांगत होतों तें खरें असलें तरी त्याची समजूत कशी घालायची तें मला कळेना. तीनचार वर्षांपूर्वी आत्मवृत्तपर ग्रंथाविपयी मला विशेष असें प्रेम मुळीच वाटत नव्हतें. त्यांतलीं जीं वाङ्मय-गुणांच्या दृष्टीनें विशेष चांगलीं अशीं पुस्तकें होतीं त्यांचाच काय तो मी चाहता होतों. पण आत्मचरित्रांचा वाङ्मयापेक्षा जीवनाशीं अधिक संबंध आहे आणि आयुष्याच्या उतरणीवर असलेल्या मनुष्याच्या मनाला जी शांति तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांतूनसुद्धा प्राप्त होत नाही, ती आत्मचरित्रांच्या

वाचनानें लाभते असें जर त्या वेळीं मला कुणीं सांगितलें असतें तर मी त्याची खास वेडयांत गणना केली असती.

पण अनुभवाशिवाय दुसऱ्यांना वेडे ठरविणारे बहुधा स्वतःच वेडे असतात हा अनुभव या बाबतींत मला आला. गेल्या तीनचार वर्षांत पन्नाशीच्या झुळका भराभर माझ्या अंगावरून जाऊं लागल्या. एखाद्या सरडयाचे रंग बदलावे तसे फरक माझ्यांत पडूं लागले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर माझ्या केसांच्या काळेपणाचें फार कौतुक करीत असत. काळिमासुद्धा गुण होऊं शकतो असें ते विनोदानें म्हणायचे. पण ते काळे केस—शेतांत मधूनमधून पांढरीं शुभ्र कणसें दिसूं लागावींत तसें माझ्या डोक्याचें सध्याचें स्वरूप आहे. दाढी करायला मी बसलों कीं हटकून या गोऱ्या गृहस्थांचें मला दर्शन होतें. त्यांच्या बाबतींत 'चले जाव' ची चळवळ करण्याची कल्पनासुद्धा माझ्या मनांत चमकून जाते. लगेच चिमटयानें पांढरे केस उपटणारा 'विद्याहरणां'तला मूर्ख शिष्यवर मला आठवतो. कलप लावणाऱ्या लोकांच्या केसांचा कृत्रिम तुकतुकीतपणा किती विचित्र दिसतो, हेंहि माझ्या लक्षांत येतें. निसर्गापुढे मस्तक नम्र करणें हाच सर्वांत शहाणपणाचा मार्ग आहे, असें माझें मन म्हणतें, आणि माझ्या काळ्या केसांइतकाच पांढऱ्या केसांचाहि मी दोस्त बनतों. उद्या मला टक्कल पडलें तरी टक्कल हें भाग्याचें लक्षण आहे या जुन्या समजुतीवर विश्वास ठेवून त्याचें मी निःशंकपणानें स्वागत करीन.

मात्र या पांढऱ्या केसांकडे पाहतांना मनांत जे दुसरे विचार उत्पन्न होतात त्यांनीच मला हल्ली अधिक अस्वस्थ करून सोडलें आहे. प्रत्येक पांढरा केस मला पांढऱ्या निशाणासारखा वाटतो. पांढरें निशाण हें शरणागतीचें चिन्ह असल्यामुळे माझ्या मनांत येतें,—'माझें शरीर मृत्यूला शरण जायला निघालें आहे. त्याकरिता तें हीं निशाणं उभारीत आहे.' या पांढऱ्या केसांकडे पाहतांपाहतां लहानपणीं वरचा नंबर मिळविण्याकरिता पाठ केलेली मोरोपंतांची 'कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागली' ही ओळ मला आठवूं लागते. आता कुठे तिचा अर्थ मला पूर्णपणें

कळतो ! राहूनराहून वाटतें, आयुष्याचा ग्रंथ किती विचित्र आहे ! पूर्व वयांत आपण त्यांतले नुसते शब्द वाचायला शिकतों—आणि या ग्रंथाचें सार आपल्याला पुरेपूर कळलें आहे अशा भ्रमांत त्याच्यावर भाष्यें करूं लागतों. पण त्यांतल्या एकेका शब्दाचा खराखुरा अर्थ पन्नाशींतच माणसाला कळूं लागतो. काव्य, प्रेम, त्याग, सेवा, सौंदर्य, मृत्यु—असल्या एकेका शब्दाच्या मागें अनंत अनुभूतींचीं चित्रविचित्र विश्वें लपलेलीं असतात. हें मनुष्याला केव्हा कळतें ? तर काळ त्याच्या डोक्यावर पांढऱ्या केसांच्या रूपाने घणाचे घाव घालून हें ज्ञान त्यांत ठोकून बसवूं लागतो तेव्हा !

मृत्यूचीच गोष्ट पाहा ना ! माझ्या लहानपणीं सांगलींत एक काबुली लोकांची टोळी आली होती. ती लहान लहान मुलें पळवून नेते असा त्या वेळीं प्रवाद होता. त्यामुळे मृत्यु हा त्या टोळींतल्या एका क्रूर, धिप्पाड माणसासारखाच असला पाहिजे अशी त्या वेळीं माझी समजूत होऊन बसली होती. पुढे कॉलेजांत गेल्यावर मी जेव्हा मृत्यूविषयी विचार करूं लागलों तेव्हा माझ्या डोळ्यांपुढे एकच चित्र उभें राही. एका रमणीय उद्यानांतल्या लताकुंजांत एक युवक आणि एक युवती एकमेकांच्या बाहुपाशांत प्रथमच बद्ध होऊन बसलीं आहेत. त्या पहिल्यावहिल्या आलिंगनाच्या अमृतलहरींनी त्यांचे देह महिरून गेले आहेत. वल्लभेचें मुख वर करून तिचें चुंबन घेण्याचें भानसुद्धा त्या युगुलांतल्या रमणाला राहिलेलें नाही. थोड्या वेळाने एक फुलपाखरूं भ्रमत भ्रमत त्या कुंजांत येतें आणि त्याच्या प्रियतमेच्या केशपाशावर बसतें. हिऱ्यामोत्यांचा हा नवा अलंकार आपल्या प्रियतमेच्या केशकलापांत कुणीं खोंवला हें पाहण्याकरिता वल्लभ आपल्या समाधींतून जागा होतो. त्याच्या हाताचा स्पर्श होतांच तें फुलपाखरूं उडून जातें. तो स्वत:शींच हसतो आणि चुंबन घेण्याकरिता तिची हनुवटी वर उचलूं लागतो. इतक्यांत निरभ्र निळ्या आकाशांतून वीज कडकडत खालीं येते आणि लताकुंजांतल्या त्या प्रणयी युग्माला दग्ध करून टाकते.

मत्यूविषयीच्या मनुष्याच्या कल्पना अशा दशकादशकाने बदलत

असतात ! त्यामुळे पन्नाशीची झुळूक लागून डोक्यावरले केस पांढरे होऊं लागतांच जेव्हा मी मृत्यूचा विचार करूं लागलों तेव्हा तो अगदीच निराळ्या स्वरूपांत माझ्यापुढे प्रकट झाला ! मृत्यु हा क्रूर पठाण नाही, गुप्त मारेकरी नाही, संभावित याचक नाही किंवा लुच्चा सावकार नाही. तो जगांतल्या सर्वांत मोठा पण सर्वांत लहरी असा अतिथि आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत ही कल्पना माझ्या मनांत अगदीं दृढमूल होऊन गेली आहे. एखाद्या मध्यरात्रीं त्याची अस्पष्ट चाहूल मला ऐकूं येते; नाही असें नाही. आज ना उद्या हा स्वच्छंदी पण स्थितप्रज्ञ अतिथि आपलें दार ठोठावणार याची जाणीव मला होते. त्याचें स्वागत करण्याकरिता हसतमुखाने आपण दाराकडे धांवलें पाहिजे असें मी मनाला बजावतों. लगेच मन म्हणतें— नुसत्या स्मिताने अतिथीचा सत्कार होत नाही. त्याला आवडणारे पदार्थ आपण त्याच्यापुढे ठेवले पाहिजेत. मी मनाशीं विचार करूं लागतों— मृत्यूला काय आवडत असेल ? शिकंदरापेक्षा बुद्धाला अधिक वंद्य मानणाऱ्या या अतिथीला प्रसन्न करायचें म्हणजे—

शरमेनें मी माझी मान खालीं घालतों. मृत्यूच्या ताटांत वाढण्याजोगें एकहि पक्वान्न मी पन्नास वर्षांत तयार करूं शकलों नाहीं, म्हणून माझा मलाच राग येतो. साहजिकच माझे सारे अवगुण शतगुणित होऊन माझ्या डोळ्यांपुढे उभे राहतात. हा माझ्या अंगीं असलेला राग—हा पोरकट आळस—तो अंध उन्माद—हा मूर्ख मत्सर—तो खुळा मोह—या प्रत्येक अवगुणाचीं आयुष्यांतलीं उदाहरणें आठवून माझें मन उदास होऊन जातें. आपण व्यर्थ जन्माला आलों, पन्नास पावसाळे पाण्यांत कागदी होड्या सोडीत एखाद्या लहान मुलाप्रमाणे आपण खेळत बसलों, ही रुखरुख माझ्या मनाला असह्य होते. जीवनाच्या विफलतेचें शल्य माझ्या हृदयांत तीव्रतेने सलूं लागतें.

आत्मचरित्रांत केवढी संजीवनी भरलेली असते, याचा अनुभव अशा मन:स्थितींतच एके दिवशीं मला आला. त्या दिवशीं माझ्या हातून झालेल्या एका गोष्टीबद्दल राहून राहून मला वाईट वाटत होतें. एक तर बायकोवर

मी खूप रागावलों होतों—आणि रागाच्या भरांत एक अतिशय गैर शब्द माझ्या तोंडांतून बाहेर पडला होता. तो शब्द निखाऱ्यासारखा माझ्या मनाला चटके देत होता. माझ्या तोंडांतून तो बाहेर पडला तरी कसा याचें माझें मलाच पुन:पुन्हा नवल वाटत होतें. फार पूर्वीची एक आठवण होऊन तर—

माझ्या लग्नानंतर थोड्या दिवसांनी एका नामांकित ज्योतिषानें माझी जन्मवेळ मुद्दाम मागून घेऊन मला जी पत्रिका तयार करून पाठविली होती तिच्याविषयीची ही आठवण होती. ती पत्रिका माझ्या हातांत पडल्यापासून पुढे किती तरी दिवस मीं मनाच्या विलक्षण तगमगींत घालविले. त्या भास्कराचार्यांनी पत्रिकेंत मला लवकरच द्विभार्यायोग आहे असें चक्क लिहिलें होतें. पहिली बायको जिवंत असूनहि द्विभार्यायोग असणारे पुरुष जगांत नसतात असें नाही; पण मी त्या पंथापैकी नाहीं अशी माझी खात्री असल्यामुळे या भविष्याचा अर्थ माझ्या दृष्टीने एकच होत होता. तो म्हणजे माझी पत्नी लवकरच मृत्यु पावणार हा होय. फलज्योतिषावर फारसा विश्वास नसूनहि या भविष्याने मला अगदी अस्वस्थ करून सोडलें. तें वाचल्यापासून मी पुन:पुन्हा माझ्या बायकोच्या तोंडाकडे पाहीं आणि मनांत म्हणें, 'आज ही इथं माझ्यासमोर उभी आहे. पण उद्या—' मी असा टक लावून पाहूं लागलों म्हणजे ती म्हणायची, 'असं पाहत काय राहतां एकसारखं? लोक काय म्हणतील तुम्हांला?' त्या महिना-पंधरा दिवसांत मी जे वेडे चाळे केले, त्यांना फक्त 'विक्रमोर्व-शीय' नाटकाच्या चौथ्या अंकांतच तोड मिळेल. त्या नाटकाचा नायक राजा पुरूरवा आपल्या प्रियतमेला शोधण्याकरिता रानावनांत भटकत असतो. तो हंसाला म्हणतो, 'तूं उर्वशीची गति चोरली आहेस. त्या अर्थी ती तुझ्यापाशीच असली पाहिजे. बऱ्या बोलानं माझी सखी परत कर नाही तर—' भ्रमरालाहि तो अशीच कांहीतरी तंबी देतो! त्या वेळीं मीहि नकळत या राजाचें अनुकरण करीत होतों. सावित्रीने सत्यवानाचे प्राण परत आणले तसें आपल्यालाहि कांही करतां येईल कीं काय हें

पाहण्यापर्यंत माझी त्या दिवसांत मजल गेली होती.

जिच्यावर माझें इतकें प्रेम होतें, त्याच बायकोवर मी दुर्वासासारखें रागवावें आणि तिच्या वर्मीं लागतील असे शब्द उच्चारावे ही किती विचित्र गोष्ट होती. पण ती माझ्या हातून त्या दिवशीं घडली होती खरी ! तो सारा दिवस या प्रसंगामुळे मी स्वत:वर चिडून गेलों होतों. रात्रीं अंथरुणावर जाऊन पडलों,—पण कांही केल्या झोंप येईना. रागारागाने मी उठलों आणि टेबलावर जीं नवीं पुस्तकें ठेवलीं होतीं त्यांतलें एखादें चाळीत बसावें म्हणून मी तिकडे गेलों. वरच सौ. बाया कर्वे यांचें ‘ माझें पुराण ’ होतें. महर्षि कर्व्यांच्या पत्नीच्या या आत्मवृत्तांत आपल्याला ठाऊक नसलेले त्यांच्या जीवनांतले अधिक उदात्त प्रसंग पाहायला मिळतील या कल्पनेनें मी तें पुस्तक चाळू लागलों. चाळतांचाळतां बहात्तर पानावरल्या पहिल्या ओळीकडे सहज माझी नजर गेली, ‘ नाही म्हणायला कर्व्यांना एकच खोड आहे आणि ती म्हणजे तुपाची !’ हें वाक्य वाचून मोठी गम्मत वाटली मला ! एवढा हा त्यागी, संयमी, सेवाशील, धीरगंभीर, महापुरुष ! पण त्यालाहि एक खोड आहे हें वाचून मला थोडें बरें वाटलें. ती खोड म्हणजे कांही बुद्धीची अथवा भावनेची लहर नव्हे; तर जिभेचा म्हणा अथवा नाकाचा म्हणा हट्ट आहे. मी मोठ्या उत्सुकतेनें पुढचा मजकूर वाचूं लागलों, ‘ त्यांना तूप साजूक असेल तर थोडेसें चालतें. वाशेळें असलें कीं अगदी डोकें फिरून जातें त्यांचें ! एकदा मीं चुकून जास्त तूप वाढलें. म्हटलें, जरा जाऊं दे यांच्या पोटांत. पण भात कालवून घांस घेण्याच्या आंतच ते ओरडले, ‘ दगडे, म्हारणी, किती तूप वाढलेंस हें ?’ चोरून चुकवून त्यांच्या पोटांत अन्न जावें म्हणून मीं धडपडें व असे ओरडून घेण्याचे प्रसंग बरेच वेळां येत. कर्व्यांच्या तोंडांत ‘ दगडे ’ व ‘ म्हारणी ’ हेच सर्वांत वाईट शब्द ! यांखेरीज दुसरी कोणतीहि शिवी मीं आजपर्यंत त्यांच्या तोंडांतून ऐकली नाहीं ! ..’

त्या आत्मचरित्रांतला एवढा मजकूर मीं वाचला मात्र ! दिवसभर कोंडमारा झालेल्या माझ्या मनाला कसें एकदम मोकळें वाटूं लागलें. मी

पुस्तक मिटून लगेच अंथरुणावर जाऊन पडलों. हां हां म्हणतां मला झोंप लागली.

वरील हकीगत वाचल्यापासून मला कर्व्यांविषयी वाटणारा आदर कमी झाला आहे असें मुळींच नाही. उलट त्या आदराला आपुलकीची जोड मिळाली आहे. पूर्वी मला त्यांच्या त्यागाची, सेवेची आणि संयमाची एक प्रकारची भीति वाटे. ते नुसते देव आहेत असें मनांत येई. सौ. बायाने वर्णन केलेल्या या प्रसंगामुळे ते जसे देव आहेत तसेच माणूसहि आहेत हें मला कळून चुकलें. त्यामुळेच ते मला अधिक जवळचे वाटूं लागले.

चरित्रांत माणसाचें मोठेपण हरत-हेने वर्णन केलेलें असतें. त्या मोठेपणाला बाध येईल कीं काय या शंकेनेच अनेक चरित्रकार आपले नायक हीं माणसें होतीं हें सांगायला सोइस्करपणाने विसरतात. चरित्रांत मनुष्याची उज्ज्वल बाजू तेवढी अधिक रंगविली जाते. काव्यांत भावनांच्या उत्कटतेवर फाजील भर दिला जातो. कथा-कादंबऱ्यांत निवडक माणसें व त्यांच्या निवडक कृतीच रंगविल्या जातात. त्यामुळे हें सारें वाङ्मय आत्मचरित्राच्या मानाने कृत्रिम ठरतें. साहित्याच्या कुठल्याहि विभागापेक्षा आत्मचरित्रांत मनुष्य हा मनुष्य म्हणून आपणांपुढे उभा राहतो. इतकेंच नव्हे तर असामान्य व्यक्तींचे कांही गुणविशेष वगळल्यास तीं माणसेंच असतात अशी खात्री होऊन सामान्य माणसांना आपल्या वैगुण्याकडे उजळ माथ्याने पाहण्याचा धीर येतो. गायत्री मंत्राचा द्रष्टा असलेला विश्वामित्र महर्षि हा रस्त्यावरल्या भिकाऱ्याचा कधीच स्नेही होणार नाही ! पण दुष्काळांत चांभाराच्या घरीं चोरून शिरून तिथे पडलेली कुत्र्याची तंगडी चघळणारा विश्वामित्र हा दुनियेंतल्या हरएक सामान्य व्यक्तीचा मित्र होऊं शकतो. 'वॉर अँड पीस' किंवा 'अॅना कॅरेनिना' सारख्या प्रचंड व प्रभावी कादंबऱ्या लिहिणाऱ्या टॉलस्टॉयविषयी कचेरींतल्या कारकुनाला जिव्हाळा वाटण्याचा फारसा संभव नाही. पण विषयलोलुपता हा माणसाचा मोठा दोष आहे हें कळत असूनहि साठी उलटल्यावर, नव्हे सत्तरीकडे झुकल्यावरहि, पत्नीकडून शरीरसुखाची अपेक्षा

करणारा टॉलस्टॉय हा जगांतल्या प्रत्येक सामान्य जीवाला आपला जिगरदोस्त वाटतो. असल्या गोष्टी चरित्रांत आणि इतिहासांत कुणी सहसा नमूद करीत नाही. त्या फक्त आत्मचरित्रांतच आपल्याला आढळतात ! आत्मचरित्राचें मोठेपण यांतच आहे. त्यांतलें जीवन प्रसंगीं सुंदर नसेल; पण तें सत्य असतें.

म्हणूनच हल्ली माझ्या मनांत येतें—जगांतले सर्व प्रचलित कायदे नाहीसे करावेत आणि त्यांच्या जागीं रूसो, गांधी, कर्वे, झ्वाइग, टॉलस्टॉय, इझाडोर, डंकन इत्यादिकांच्या आत्मचरित्रांची स्थापना करावी. न्याय-अन्यायांचे आणि पापापुण्याचे सर्व निर्णय या आत्मचरित्रांच्या आधाराने देण्यांत यावेत. असें झालें तरच जग सुखी होण्याचा संभव आहे.

१९४९

## १७

# पांच मिनिटें आणि एक तरुणी

प्रचलित शिक्षणक्रमांत कोणकोणत्या सुधारणा कराव्यात, यासंबंधी भारत सरकार सध्या जोरजोराने विचार करीत आहे. या बाबतींत सभा, समित्या, साक्षी, संमेलनें वगैरे सर्व परंपरागत विधि यथासांग पार पडतीलच. पण ही सुधारणासमिति माझ्यासारख्या सामान्य मनुष्याची साक्ष सहसा घेणार नाही, म्हणून मीच तिला एक पत्र पाठवून दोन महत्त्वाच्या सूचना करणार आहें. त्यांतली पहिली प्रत्येक भारतीय भाषेंतल्या क्रमिक पुस्तकांत 'छत्रीचे उपकार' या कोल्हटकरांच्या कवितेचा समावेश अवश्य केला पाहिजे ही होय. त्याशिवाय देशाची सुधारणा होणें अगदी अशक्य आहे!

या कवितेचा प्रारंभच किती वास्तव आहे तें पाहा. तेहतीस कोटी देवांच्या बायका या व्याकरणाच्या दृष्टीने देवी आहेत, हें कवीला मान्य आहे. पण अहोरात्र अमृत पिणाऱ्या आणि नंदनवनांतल्या महिलामंडळांत नवरे मुठींत कसे ठेवावेत या विषयाचा काथ्याकूट करणाऱ्या या स्त्रियांत जिची पूजा करावी अशी एकहि देवता कवीला दिसत नाही. तो म्हणतो,

'या जगांत खरी देवता एकच आहे— ती म्हणजे छत्री!' साहजिकच तो गाऊं लागतो—

छत्री गे मानितों तुला मी
माझि खरी माउली
कृपेची करिसि बरी साउली

या नमनानंतर छत्रीमाता मानवावर करीत असलेले अगणित उपकार कवीने सविस्तर वर्णन केले आहेत. तें वर्णन मला पावलोपावलीं पटतें. छत्री ही माझी घराबाहेरची कायमची सहचारिणीच आहे म्हणानात! कविमंडळी कधी कधी कवितेला माता मानतात, कधी कधी पत्नी समजतात. त्यांतलाच माझा हा छत्रीचा प्रकार आहे. कधी हात हातांत घेऊन तर कधी डोक्यावर बसून छत्री माझ्यावरलें आपलें उत्कट प्रेम व्यक्त करीत असते. तिचें प्रेमळ छत्र माझ्या डोक्यावर नसतें तर उन्हाळ्यांत ऊन लागून किंवा पावसाळ्यांत न्युमोनिया होऊन एव्हाना मला कैलासावरल्या नागरिकाचे सर्व अधिकार प्राप्त झाले असते!

पुण्यापासून उज्जैनपर्यंतच्या अनेक जुन्या वाड्यांतले अंधारी जिने उतरूनहि माझे हातपाय अद्यापि शाबूद आहेत, आणि कोल्हापुरांतल्या गेल्या वीस वर्षांच्या वास्तव्यांत रस्त्यावरून अनिर्बंध संचार करणाऱ्या असंख्य म्हशींपैकी एकीचेंहि शिंग अजून माझ्या पोटांत गेलेलें नाही, याचें श्रेय मी माझ्या छत्रीलाच देतों. नको असलेलीं माणसें—यांत कुठल्या तरी खऱ्याखोट्या संस्थेसाठी भररस्त्यांत देणगी मागणाऱ्या गृहस्थापासून प्राथमिक शाळेंत उन्हाळ्यानिमित्त आणलेल्या माठाचें उद्घाटन करण्याकरिता बोलवायला येणाऱ्या सज्जनापर्यंत सर्वांचा समावेश होतो— टाळण्याचा सर्वांत सुलभ उपाय म्हणजे छत्री! ती उघडली कीं, आठ-वड्याच्या बाजारांतसुद्धा स्वतःचें एक निराळें जग निर्माण होतें. जिथे कुणीहि प्रवेश करूं शकत नाही असें कवि-कल्पनेचें एक जग असतें ना? अगदी तस्सें! मात्र हीं नको असलेलीं माणसें एखादे वेळीं बसमध्येसुद्धा अचानक भेटतात. शिवाजीने शाहिस्तेखानावर घातलेला छापा इतिहास-

प्रसिद्ध आहे. त्याच पद्धतीने तीं आपल्यावर हल्ला चढवितात. म्हणून बस, विमान, आगगाडी वगैरे वाहनांत देखील छत्री उघडण्याची परवानगी असावी असें मला मनःपूर्वक वाटतें. त्यामुळें नेत्रवैद्यांच्या धंद्यालाहि बरकत येईल !

'छत्रीचे उपकार' ही कविता सर्व क्रमिक पुस्तकांत असावी असें मी म्हणतों याचें कारण मात्र इतकें गहन नाही. तें अगदीं सिधेंसाधें आहे. ऊन आणि पाऊस यांच्यापासून स्वतःचें रक्षण करण्याचें छत्री नांवाचें एक साधन जगांत उपलब्ध आहे याचा हल्लीच्या तरुणमंडळींना विसर पडत चाललेला दिसतो. माझा कालचाच अनुभव पाहा ना ! सात-वीसची बस गाठण्याकरिता छत्रीसह मी घराबाहेर पडलों. आभाळ भरून आलें होतें. तेव्हा तिची गरज होतीच. बसस्टँडवर एक सुखवस्तु तरुणी—ती सुंदर नव्हती हें आरंभींच सांगितलेलें बरें—उभी होती. सुंदर दुपट्यांत गुडाळलेलें चारसहा महिन्यांचें मूल घेऊन ती बसची वाट पाहात होती.

आकाशाला कुणीं कवीची उपमा दिली आहे की नाही हें मला ठाऊक नाही. पण जगांतल्या साऱ्या कवींचा लहरीपणा त्याच्यांत एकवटला आहे असें मला वाटतें. त्याला केव्हा, कोणता 'मूड' येईल हें सांगतां येणार नाही. पावसाळ्यांत तर क्षणाक्षणाला त्याची लहर बदलत असते. मी बसस्टँडवर पोचून मिनिट अर्ध मिनिट झालें असेल नसेल ! एकदम झिम-झिम पाऊस पडू लागला. मी त्या तरुणीकडे पाहिलें. तिचें तान्हें बाळ भिजूं लागलें होतें. पावसाचा रंग दिसत असतांनाहि घरांतून बाहेर पडतांना तिने छत्री बरोबर घेतली नव्हती. मला तिचा—तिचाच नव्हे तर साऱ्या तरुण पिढीचा राग आला. उपयुक्त वस्तुसुद्धा या पिढीला लोढण्यासारख्या वाटूं लागल्या आहेत ! तिला कुठलेंहि बंधन नकोय् ! क्रांतीनंतर रशियांत एक बाई मॉस्कोच्या रत्स्यांतून हवी तशी नाचत चालली होती. रस्त्यावरून चालण्याचे सर्व नियम मोडणें हा तिच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ होता. त्या बाईच्या भुताने आमच्या तरुण पिढीला झपाटलंय् की काय देव जाणे !

ती तरुणी एकटीच असती तर स्त्रीदाक्षिण्याच्या सर्व कल्पना बाजूला

ठेवून पर्जन्यराजाचा तिच्याशीं चाललेला अतिप्रसंग पाहात मी स्वस्थ उभा राहिलों असतों. पण पाऊस पडत असतांना आपण छत्री उघडून उभें राहावें आणि शेजारींच एक तान्हें मूल पावसांत भिजत असावें, हें कांही केल्या मला बरें वाटेना. मीं मुकाटचानें माझी उघडलेली छत्री त्या तरुणीपुढे केली. ‘ नको, नको ’ म्हणत तिने ती घेतली. मी पावसांत भिजूं लागलों; आणि थोडासा पश्चात्तापाने पोळूं लागलों ! तथापि आज सकाळींच निरपेक्ष बुद्धीने आपण एक सत्कृत्य केलें आहे या भावनेच्या उदात्तपणामुळे भिजूं लागलेल्या कपडचांची आणि वाजूं लागलेल्या थंडीची मीं पर्वा केली नाहीं. मात्र जसजसा मी अधिक अधिक ओलाचिंब होऊं लागलों तसतशी माझ्या परोपकारांतली उदात्तता आणि मुसळधार पावसांत प्रियकराला भेटायला जाणाऱ्या वसंतसेनेच्या चित्रणांतली काव्यात्मता हळूहळू ओसरूं लागली.

सुदैवाने मनुष्य निसर्गाइतका लहरी असत नाही—तितकें लहरी होऊन त्याचें चालणारच नाही. त्यामुळें ड्रायव्हरसाहेबांनी बस वेळेवर सोडली. आपली सत्त्वपरीक्षा अधिक वेळ झाली नाही म्हणून मीहि मनांत आनंदलों. त्या तरुणीने छत्री मिटून अस्मादिकांच्या हातांत दिली आणि गाडींत चढतां चढतां मागे वळून तोंडाचा चंबू करीत ती पुटपुटली, ‘ थँक्यू.’

लहानपणीं मला चंबूचा आकार फार आवडत असे. घरांत असलेला एकच एक चंबू जेवतांना माझ्या पानापाशीच असला पाहिजे, असा हट्ट धरून मीं वडील भावाशीं अनेकदा मारामारी केल्याचें अजून मला आठवतें. लहान मूल रुसलें आणि अल्लड तरुणी संभ्रमित झाली म्हणजे त्यांचे किंचित् पुढे आलेले ओढ मोठे मोहक दिसतात हेंहि मला मान्य आहे. पण उठल्यासुटल्या ‘ थँक्यू ’ करणाऱ्या माणसांच्या तोंडाचा चंबू मात्र मला आवडत नाही. भारत सरकारच्या क्रमिक पुस्तकांत ‘ छत्रीचे उपकार ’ ही कविता समाविष्ट करणें जितकें आवश्यक आहे, तितकेंच आपल्या भावना भारतीय पद्धतीने व्यक्त करण्यांत अधिक औचित्य आणि सौंदर्य आहे हें स्पष्ट करणारा एखादा धडाहि घालणें जरूर आहे.

या ‘ थँक्यू ’चीच गोष्ट घ्या. गत वर्षी आमचे म. म. दत्तोपंत पोतदार रोमपत्तनाची यात्रा करून आले. त्या यात्रेंत या ‘ थँक्यू ’नें त्यांना असें भंडावून सोडलें, की सांगून सोय नाही. चहा पितांना आपल्या पेल्यांत साखर घेऊन तें भांडें शेजारच्या इसमाकडे सरकविलें की तो म्हणणार, ‘ थँक्यू ’, दुकानांत जाऊन शर्टचीं बटणें घेतलीं आणि त्याचे पैसे दिले की ते घेतां घेतां दुकानदार तोंडाचा चंबू करून उद्‌गारणार, ‘ थँक्यू ’, ‘ ही बस कुठें जाते ? ’ असें आपण एखाद्याला विचारलें तर त्याचें उत्तर कानांवर पडतांच आपण लगेच अदबीने म्हटलें पाहिजे, ‘ थँक्यू ’ ! माणसाने देवाचें नांव अष्टौप्रहर घ्यावें—रात्रीं झोपतांना, पहाटें उठतांना, दुपारीं जेवतांना, इतकेंच नव्हे तर मध्यरात्रीं स्त्रीपुरुषांनीं विलाससुखांत मग्न असतांना सुद्धां तें घ्यावें—असा प्राचीन काळीं आपल्याकडे एक संकेत होता. पश्चिमेकडून आलेलें हें ‘ थँक्यू ’ प्रकरण त्याच मासल्याचें आहे ! मधुचंद्राच्या पहिल्या रात्रीं दिलेल्या आणि घेतलेल्या प्रत्येक चुंबनाच्या वेळीं सुद्धा ‘ थँक्यू ’ म्हणायची पाश्चात्य देशांत पद्धत आहे कीं काय कुणाला ठाऊक !

तें कांही असो. मीं दिलेल्या छत्रीबद्दल त्या बसस्टँडवरच्या तरुणीने ‘ थँक्यू ’ म्हणायला नको होतें. नुसत्या मानेने तिला माझा निरोप घेतां आला असता. अशा सहजसुंदर मूक निरोपाने तिची कृतज्ञता अधिक चांगल्या रीतीने प्रकट झाली नसती का ? अशिक्षित बायका परक्या पुरुषांशीं बोलायला संकोचतात. तेव्हां आपणहि सुशिक्षित आहों हें सिद्ध करण्या-करिता ती ‘ थँक्यू ’ म्हणाली असेल ! पण कृतज्ञता स्वभावतःच मुकी असते; आणि ती बोलकी झाली तरी तिने खास आपल्या अशा भाषेंत बोलायला हवें ! तरच ती अंतःकरणाचा वेध घेऊं शकेल. ‘ बराय् ’ एवढें म्हणून ती बसमध्य चढली असती तर तिच्या ‘ थँक्यू ’ पेक्षा ते शब्द मला शतपटींनी आनंददायक वाटले असते.

असें वाटण्याला तसेंच कारण आहे. आपली स्वागताची, निरोप घेण्याची, अभिनंदनाची, आशीर्वादाची, इतकेंच नव्हे तर दुःख व्यक्त

करण्याची पद्धतसुद्धा पाश्चात्यांपेक्षा सर्वस्वीं भिन्न आहे. निरोप घेतांना आपण 'गुडबाय' तर सोडाच, पण साधें 'जातों' सुद्धा म्हणत नाही; 'येतों' म्हणतों. वडिलांना पत्र लिहितांना 'माय डिअर फादर'चें रूपांतर 'प्रिय बाबा' असें करून भारतीय मनाचें समाधान कधीच होत नाही. 'तीर्थरूप बाबा' हे शब्द वापरले कीं त्या संबोधनांत कांही निराळा गोडवा उत्पन्न होतो. एखादा मनुष्य मेला हें सांगतांना देखील आपण त्या दुःखद घटनेला काव्याची किंवा तत्त्वज्ञानाची जोड देतों. 'तो देवाघरीं गेला' किंवा 'त्याला देवाज्ञा झाली' असें आपण म्हणतों. रस्त्यांत कुणी तोंड-ओळख असलेला मनुष्य भेटला तरी आपण 'कसं काय? बरं आहे ना?' असें त्याला विचारतों. इंग्रज मनुष्य असल्या तोंडओळखीचें स्वागत तोंड उघडून कधींच करणार नाहीं, आणि प्रसंगीं कुणी जीवश्चकंठश्च मित्र भेटला तरी 'हाउ डू यू डू?'—पेक्षा पलीकडचा शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडणार नाही.

पश्चिमेकडलें हस्तांदोलन आणि आपला नमस्कार यांत किती अंतर आहे! पाश्चात्य संस्कृतींत प्रदर्शनाचा भाग फार आहे. ती अबोलीच्या फुलासारखी आहे. उलट सूचकता हा आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. ती प्राजक्ताच्या फुलासारखी आहे. तळहाताच्या उबेनेसुद्धा ती कोमेजून जाते. त्या तरुणीने बसमध्ये चढतां चढतां म्हटलेल्या 'थँक्यू' वर मी जो मनांतल्या मनांत चिडलों तो याचमुळे. आपल्या भावनेचें तिने प्रदर्शन केल्यामुळे!

भारतीय भावनेला असलीं प्रदर्शनें मुळीच आवडत नाहीत. ती स्वभा-स्वतःच कुलवधू आहे. तिने नट्टापट्टा करायचें ठरविलें तरी तो तिला जम-णार नाही. मग नटीच्या कृत्रिम हावभावांचें अनुकरण तिला कसें साधणार? उलट जों जों भावना अधिक गाढ तों तों ती अधिक मुकी होते, असा आपला अनुभव आहे. मागें माझे एक पितृतुल्य आप्त वारले. त्यांच्या मुलाची समजूत कशी घालावी याचा मीं खूप विचार केला. तत्त्वज्ञानाचीं अनेक सुंदर वाक्यें मनांत तयार ठेवलीं. पण त्या मुलाला मी भेटायला गेलों

तेव्हा त्यांतलें एक वाक्यसुद्धा मला आठवेना ! आम्हीं दोघांनी क्षणभर एकमेकांकडे पाहिलें. दोघांच्याहि नजरा एकदम खाली वळल्या. लगेच मी त्याच्यापाशी जाऊन बसलों, आणि त्याच्या खांद्यावर माझा थरथरणारा हात ठेवला. जें मला तोंडानें बोलतां आलें नाही किंवा डोळ्यांनी सांगतां आलें नाही तें त्या स्पर्शानें क्षणार्धांत व्यक्त केलें. पुढल्या क्षणीं आम्ही दोघे मोकळेपणानें बोलूं लागलों.

दुःखाप्रमाणे सुखांतहि हा अनुभव सदैव येतो. कवि कारे यांनीं 'निःस्तब्ध राहा आतां प्रणया' या ओळीनें प्रारंभ होणारी एक मोठी सुरस कविता लिहिली आहे. ती कितीहि वेळां वाचली किंवा ऐकली तरी माझी तृप्ति होत नाही, याचें कारण हेंच आहे. त्या कवितेंत काऱ्यांनी प्रणयाची जी उत्कट अनुभूति चित्रित केली आहे ती चित्रपटांत आणि कादंबऱ्यांत आपल्याला सहसा दिसून येत नाही. आमच्या चित्रपटांतलीं पात्रें प्रेमांत पडलीं की तीं अधिकच बडबड करू लागतात. 'प्रिये', 'प्राणनाथ', 'सजणा', 'साजणी' असल्या शब्दांशिवाय तीं एक पाऊल पुढे टाकीत नाहीत. तिथे 'दिल' आणि 'दर्द' यांच्याशिवाय दुसरी बात आढळत नाही. तो दर्द सर्व रोगांचा राजा असतो; आणि 'दिल'? त्याचे तर क्षणाक्षणाला कणाकणाएवढे तुकडे होत असतात. पण असल्या खोट्या, नाटकी, दिखाऊ, प्रेमाच्या दृश्यांकडून आपण काऱ्यांच्या कवितेकडे वळलें की मन कसें प्रसन्न होतें. खरें प्रेम नकळत कसें मुकें होतें, याचें वर्णन करतांना ते म्हणतात,

'मौन न हें, संगीतपरिणति
हृदयकलशिं हो स्वरजलभरती
उसव न आतां उद्‌गारांप्रति'

मौनांतल्या या संगीताचा—मी त्याला आत्मसंगीत म्हणतों—आपल्यांतल्या मोठमोठ्या लोकांनासुद्धा विसर पडूं लागला आहे. अगदी प्रत्येक क्षेत्रांत ! अशा स्थितींत त्या बिचाऱ्या तरुणीलाच तिच्या प्रदर्शनाच्या प्रवृत्तीबद्दल दोष देण्यांत काय अर्थ आहे ? पण एक गोष्ट निश्चित आहे.

'आपण वेंगरूळ दिसूं' य: सध्यांच्या शिष्टसंमत कल्पनेला बळी न पडतां तिने आपल्या बरोबर छत्री आणली असती किंवा माझी छत्री परत करतांना नुसती मान हलवून माझा निरोप घेतला असता तरी मला फार आनंद झाला असता. त्यामुळे मी माझ्याच देशांत आहें अशी माझी खात्री झाली असती.

१९५७

## १८

# तीन लाख सुनीतें

खोलींत पाऊल टाकलें न टाकलें तोंच पंतांनी हातांतलें पुस्तक माझ्या-पुढे आपटलें, एखादी मोठी आपत्ति यावी तशी मुद्रा करून ते मटकन् खुर्चींत बसले.

कांही कांही माणसांना सुईचा सूळ करायची खोड असते. आमचे चिंतोपंत त्यांतलेच होते. म्हणून मी हसतच प्रश्न केला, 'काय झालंय् असं आज पंत ? या बिचाऱ्या पुस्तकावर कां रागावलांत इतके ? वैनींच्यावर वेळीं अवेळीं रागावणं ठीक आहे. त्या रागाचा मोबदला लगेच पदरांत पडतो.– गोड शब्द, नाहीतर गोड पदार्थ ! पण—'

त्या फेकून दिलेल्या पुस्तकाकडे तुच्छतापूर्ण कटाक्ष टाकून पंत म्हणाले, 'काल संध्याकाळीं सहज तुमच्याकडनं हें पुस्तक नेलं. पण त्यानं माझ्या झोपेचं खोबरं केलं !'

'म्हणजे ? इतकं चटकदार आहे हें पुस्तक ? मला नव्हती बुवा ही कल्पना ! रात्रभर वाचीत बसला होतां वाटतं ?'

'छे, छे, छे ! अहो, कडु कारल्याची भाजी कुणी मिटक्या मारीत

खातो का? रात्रीं अंथरुणावर पडल्या पडल्या पुस्तक सहज उघडलं. जें पान निघालं तें वाचूं लागलों, पण तें पान कांही पुरं करवलं नाही मला.'

'मोठं आश्चर्य आहे बुवा. ही कांही दहावीस खून असलेली रहस्य-कथा नाही किंवा भूतपिशाच्चाची भयंकर गोष्ट नाही! लहानपणीं 'कालिकामूर्ति'सारखी कादंबरी वाचली म्हणजे माझी झोप उडत असे. पण आता तुम्ही आम्ही पन्नास साठ पावसाळे पाहिलेलीं माणसं आहोंत पंत! त्यांतून हें पुस्तक म्हणजे नुसता वाङ्मयाचा इतिहास आहे. विचारतों म्हणून रागावूं नका हं! तुम्ही जें पान वाचूं लागला त्याच्यावर एखाद्या अश्लील कादंबरीचं कथानक नव्हतं ना?'

पंत उत्तरले, 'अहो, तें असतं तर बरं झालं असतं. लांच खाऊं नये असा उपदेश करणारे या नाही त्या मार्गानं आपले खिसे गरम करीत असतातच! अश्लीलतेचंहि तसंच आहे. चार लोकांत अश्लील गोष्टींना नाक मुरडायचं असतं; एकांतांत नाही! पण मीं या पुस्तकांत वाचलं तें फारच निराळं! फारच भयंकर आहे तें!'

पंतांचा रोख कशावर आहे हें कांही केल्या माझ्या लक्षांत येईना. मीं अधीर होऊन विचारलें, 'आता हें उखाण्यांतलं बोलणं राहूं द्या. तुमची झोप कां उडाली हें सरळ सरळ सांगा मला."

पंत खुर्चींत नीट सावरून बसत म्हणाले, 'अहो, पेट्रार्च नांवाचा कुणी कवि होता ना? तुमची तीं सुनीतं कां फिनीतं लिहिणारा. त्याच्या त्या सुनीतांचं पुढं साऱ्या युरोपांत अनुकरण झालं म्हणे! या पुस्तकांत असं लिहिलंय् कीं, त्याच्यामागून तशीं तीन लाख सुनीतं लिहिलीं गेलीं!'

'बरं मग?'

'आता काय सांगूं तुम्हांला कपाळ? अहो, रात्रभर मी या एकाच गोष्टीचा विचार करीत होतों. हीं तीन लाख सुनीतं लिहिण्याच्या कामांत किती लोकांचा किती वेळ वाया गेला असेल! ह्या तीन लाख कविता वाचण्यांत किती वाचकांचं अमोल आयुष्य खर्ची पडलं असेल. छे, छे, छे! तीन लाख सुनीतं! आपल्याला तर कल्पना करवत नाहीं बुवा!'

पंत पडले पुराणमतवादी ! तेव्हा जातां जातां त्यांना एक चिमटा घ्यावा म्हणून मी म्हणालों, ' या तीन लाख सुनीतांचं तुम्हांला भय वाटतं पण सगर राजाला साठ हजार मुलगे होते ही पुराणांतली गोष्ट मात्र तुम्ही मिटक्या मारीत वाचतां. अहो राजा झाला म्हणून काय झालं ? साठ हजार मुलगे म्हणजे काय थट्टा आहे ? किती डोहाळे, किती डोहाळजेवणं, किती बाळतपणं, किती बारशीं, किती दुपटीं, किती बाळंतविडे, किती बाळंतकाढे—राजाचंसुद्धा दिवाळं निघायचं इतक्या बाळंतपणांनीं ! सगर राजाच्या राजवाड्यावर प्रसूतिगृहाचीच पाटी होती की काय कुणाला ठाऊक ! आपल्या रघुनाथपंत कर्व्यांसारखा ऋषि हवा होता त्या वेळीं. म्हणजे त्यानं या राजाची चांगली कानउघाडणी केली असती !'

किंचित् ओशाळल्यासारखें करून पंत म्हणाले, ' पुराणांतल्या गोष्टी अन् पुराणांतलीं वांगीं तिथल्या तिथंच ठेवायचीं असतात. पण तुमची हीं तीन लाख सुनीतं मात्र–'

मीं म्हटलं, ' अहो, तीन लाख काय आणि सहा लाख काय, लिहिणाऱ्यांनी लिहिलीं. कोण बिचारे वाचणारे होते त्यांनी तीं वाचलीं. काळाच्या ओघांत तीं वाहून गेलीं. त्या तीन लाखांतलीं तीन सुनीतं तरी आता कुणी वाचीत असेल का ?'

' तेंच, तेंच म्हणतोंय् मी !' चिंतोपंत उसळून विजयी मुद्रेने म्हणाले, ' हा सारा अपव्यय कशासाठी ? कागद, शाई, वेळ, बुद्धि या सर्वांचा हा निष्कारण नाश नाही का ?'

' पण पंत, तुम्ही म्हणतां तो अपव्यय सर्व काळीं, सर्व स्थळीं, सदैव होत असतो. पूर्वी आपल्याकडंसुद्धा कवितेची अशीच भरमसाट निपज होत नव्हती का ? ' कविता गवताऐसी उदंड वाढली असे ' असे रामदासांनी म्हटलंय् तें काय उगीच ? नि तुमची ती दासोपंताची पासोडी ! हल्ली किती लोकांना तिची ऊब मिळते कोण जाणे ! तुमच्या मोरोपंतांनी काय थोडंथोडकं लिहिलंय् ? तें सगळंच काय मोठं सुंदर काव्य आहे ? मधल्या काळांत आपल्याकडं जे शेदोनशे संतकवि झाले त्यांतल्या किती

लोकांचे कितीसे अभंग आज लोकांच्या स्मरणांत आहेत ?'

बाजू आपल्या अंगावर उलटत आहे असें पाहून चिंतोपंतांनी हा विषय सोडून दिला. इकडल्या तिकडल्या गप्पा मारून ते निघून गेले. पण माझें मन मात्र कुठे तरी केव्हातरी लिहिल्या गेलेल्या तीन लाख सुनीतांनी त्यांची झोप कां उडावी याचा विचार करूं लागलें. मला गडकऱ्याच्या 'चिंतातुर जंतु' या कवितेची आठवण झाली.

या कवितेंत गडकऱ्यांनी चिंतोपंतांसारखींच पांच माणसें चित्रित केलीं आहेत. त्यांतला पहिला म्हणतो, 'रात्रीं सारं जग झोपल्यावर ईश्वर आकाशांत या चांदण्या उगीच जळत कशाला ठेवतो ?' या शहाण्याला वाटत असावं, चांदण्या रात्रीं नगरपालिका रस्त्यावरील विजेचे दिवे बंद करून आपल्या खर्चांत थोडी काटकसर करते ना, तसं देवाने कां करूं नये ? हो, परमेश्वर झाला म्हणून काय झालं ? त्याला तरी असं बेहिशोबी वागून परवडेल का ? उद्या नादार व्हायची पाळी येईल त्याच्यावर !

दुसऱ्या चिंतातुराची तक्रार याच प्रकारची आहे. उजाड माळरानावर जिकडेतिकडे ऊन पसरलेलें पाहून तो दुःखी होतो ! सूर्य म्हणजे देवाच्या दौलतींतला सर्वांत मोठा दिवा—खर्व निखर्व कँडल पॉवरहि ज्याच्या प्रकाशाच्या पासंगाला लागणार नाही असा दिवा ! तो प्रकाश असा काय केरावारी फुकट घालवायचा ? तिसऱ्याला झाडांवरलीं असंख्य हिरवीं पानें पाहून त्यांचा कांही उपयोग नाही म्हणून दुःख होतें ! चौथा महापुराचें पाणी फुकट जात असलेलें पाहून तळमळतो ! पांचव्याला तर जगांत माणसांची लोकसंख्या वाढत असलेली पाहून या मूर्खांच्या बाजारांत ईश्वर अशी सारखी भरती कां करीत आहे हें कोडें उलगडेनासें होतें ! ईश्वराचा बरोबर पत्ता त्याला ठाऊक नाही म्हणून बरें ! नाहीतर कुटुंबनियोजनाचीं सर्व साधनें व्ही. पी. ने त्याने त्याच्याकडे पाठवून दिलीं असतीं !

आमचे चिंतोपंतहि याच चिंतातुरांच्या माळेंतले. म्हणून तर त्यांना त्या तीन लाख सुनीतांची इतकी भीति वाटली. त्यांचें मन त्या आकड्यानेच हबकून गेलें ! तीं तीन लाख सुनीतें वाचायची पाळी आली असती तर

त्यांनी बहुधा आत्महत्याच केली असती !

पण जीवनाकडे पाहण्याची ही दृष्टि मुळांतच चूक आहे असें मला वाटतें. ठिकठिकाणीं पोरें क्रिकेट खेळत असतात. प्रसंगीं आईच्या धुण्याच्या काठीचे तीन तुकडे करून हीं मुलें त्यांच्या यष्टि बनवतात ! चिंध्यांच्या चेंडूपासून अस्सल क्रिकेटच्या चेंडूपर्यंत मिळेल तो वाटोळा पदार्थ घेऊन आपल्या क्रीडेंत तीं मग्न असतात. त्यांना क्रिकेटसाठी स्वतंत्र जागा लागत नाही ! भररस्त्यांत त्यांचा खेळ सुरू असतो. टांगे, मोटारी, सायकली, फटफटचा, मालवाहू मोटारींचीं धुडें इत्यादि वाहनें आजूबाजूनें जात येत असतातच ! पण त्यांचें अस्तित्व या बाळगोपाळांच्या गांवींहि नसतें.

रस्त्यानें जातांयेतांना अशा मुलांचा खेळ पाहण्याचा मोह मला अनावर होतो. या खेळाडूंतून एखादा मुस्ताक, मर्चंट, मंकड किंवा मे, हॅमंड, हटन निर्माण होण्याचा संभव असतो असें मुळीच नाही ! त्या मुलांपैकीं एखाद्याला तसलें शेखमहंमदी स्वप्न पडत असेल ! नाही असे नाही. पण मी त्यांच्या खेळाकडे पाहतों, तो केवळ निर्मितीच्या आनंदाचा एक अनामिक आविष्कार म्हणून. स्वत:ला विसरून जाऊन माणूस कुठल्याहि निर्मितींत रंगला की तिथे ब्रह्मानंद आपणहून अवतार घेतो. क्रिकेटचीच गोष्ट कशाला हवी ? हल्ली गल्लोगल्लीं संगीतशिक्षणाचे वर्ग निघाले आहेत. कुणी गायला शिकतो, कुणी पेटीला गुदगुल्या करतो, कुणी सतार मांडीवर घेऊन तिला कुरवाळीत बसतो. हें सारें मी पहातों, ऐकतों. संगीतासारख्या अवघड कलेच्या मागे लागलेल्या या मुलांमुलींतून कुणी रहिमतखां, हिराबाई, बालगंधर्व किंवा रविशंकर निर्माण होणार आहे अशी आशा माझ्या मनाला कधीच स्पर्श करीत नाही. पण नादब्रह्माच्या उपासनेंत तल्लीन झालेली ही मंडळी मला आवडतात. अशा एखाद्या संगीतवर्गाच्या संमेलनाचें अध्यक्षस्थान मला मिळालें तर त्या भाषणांत मी जोरजोरानें म्हणेन, ‘विद्यार्थीमित्रांनो, या कलेची उपासना अशीच चालू ठेवा. तुमच्यांतूनच एखादा अब्दुलकरीम, भाऊराव कोल्हटकर किंवा मलका-

जान निर्माण होणार आहे हें विसरूं नका. तुम्ही उद्याच्या संगीताचे शिल्पकार आहांत.'

मात्र माझ्या या भाषणांतलें एक अवाक्षरहि खरें असणार नाही ! तसें पाहिलें तर कुठला अध्यक्ष किंबहुना कुठला वक्ता कधी खरें बोलत असतो ? असें असलें तरी माझ्या समोर बसलेल्या विद्यार्थ्यांविषयीं उपेक्षेची किंवा अनादराची भावना क्षणभरहि माझ्या मनांत येणार नाही. माझ्याऐवजी चितोपंतांना जर अध्यक्षस्थान दिले तर ते भाषणांत म्हणतील, ' विद्यार्थीमित्रांनो, तुम्ही या संगीताच्या भानगडींत कां पडलां आहां तें मला कळत नाही. तुमच्यापैकी कुणीहि कधीं काळीं या कलेंत नांव गाजवील असें मला वाटत नाही. चिलटानं गरुड होण्याची हांव कां धरावी ? तबला वाजवून फुकट हात दुखवून घेण्यापेक्षा घरांतलीं लांकडं फोडलेलीं काय वाईट ? घरखर्चांत तेवढीच बचत होईल ! अलगूज वाजविण्यापेक्षा चूल फुंकणं फार चांगलं असं माझं मत आहे. सतारीचा भोपळा तास नि तास मांडीवर घेण्यापेक्षा भोपळ्याचा वेल घरावर सोडला, तर पावसाळ्यांत पांचपंचवीस भोपळे तरी मिळतील ! मित्रहो, वेळ, शक्ति, पैसा यांचा हा अपव्यय कृपा करून करूं नका.'

हा अपव्यय आहे हें पंतांचें म्हणणेंच मला मान्य नाही. जग फार मोठें आहे म्हणून प्रत्येक मनुष्याने मोठें झालेंच पाहिजे हा कोणत्या मुलुखांतला हट्ट ? गवत ताडमाड वाढत नाही. तथापि खास त्याचें असें कांही सौंदर्य आहेच की नाही ? बड्या माणसांशिवाय इतर सर्व माणसें जगांत जगायला नालायक आहेत असें म्हटलें, तर शिरच्छेदाच्या पहिल्या यादींत आरंभींच चितोपंतांचें आणि माझें नांव घालावें लागेल ! पुष्कळ माणसांना प्रयत्न करूनहि मोठें होतां येत नाही ! पण या छोट्या माणसांना या भल्या मोठ्या जगांत छोटींमोठीं दुःखें भोगावींच लागतात. त्या दुःखांना तोंड देण्याकरिता आनंदाच्या चिमुकल्या पण सुरक्षित जागा त्यांच्या त्यांना शोधून काढाव्याच लागतात ! प्रत्येक मनुष्य आपापल्या आवडीप्रमाणे ही जागा शोधून काढतो आणि तिथे विसावतो ! कुणी कविता रचतो,

कुणी क्रिकेट खेळतो, कुणी पेटी वाजवितो, कुणी प्रवास करतो. आपापल्या परीने जो तो आपलें मन रमवितो. हें करतांना आपण कांहीतरी नवें निर्माण करीत आहों या गोड भासांत तो गुरफटून गेलेला असतो! मग ती निर्मिति शब्दांची असो अथवा सुरांची असो, तें क्रीडाकौशल्य असो किंवा कला-नैपुण्य असो! त्या निर्मितीला कुठलाहि दर्जा नसला तरी ती निर्मितीच असते. राणीचें आईपण आणि दासीचें आपण यांत आई होण्याच्या आनंदापुरता असा काय मोठा फरक आहे? नवनिर्मितीची धडपड आणि त्या धडपडींत मिळणारा आनंद ह्याच मानवाच्या जीवनासक्तीचा प्रमुख आधार आहे. तो आनंद भावनेने पाहावयाचा असतो. रुपये-आणे-पैंत किंवा दुसऱ्या मोठेपणाच्या मापांनी तो मोजतां येणार नाही.

मात्र जातां जातां एकच गोष्ट मला कबूल केलीच पाहिजे. तीं तीन लाख सुनीतें लिहिणारे सर्व कवि आपली ही निर्मिति मला वाचून दाख-विण्याकरिता आणि तिच्यावर माझा अभिप्राय घेण्याकरिता (अर्थात् अनु-कूलच! कोणता कवि स्वतःला महाकवि समजत नाहीं?) माझ्याकडे आले असते तर क्षणाचाहि विलंब न लावतां 'कोण आहे रे तिकडं? माझी संन्यासाची तयारी करा' असें मी ओरडलों असतों!

१९५९

## १९

# उंच उडी

माझ्या मतें वक्ते दोन प्रकारचे असतात. पहिल्या वर्गांत मी जन्मसिद्ध वक्त्यांची गणना करतो. दुसऱ्या वर्गांत मारून मुटकून बनविलेले वक्ते येतात. उदाहरणार्थ, अस्मादिकांची स्वारी !

हें केवळ थट्टेनें सांगत नाहीं मी ! माझा स्वभाव मूळचाच भित्रा आहे. मागच्या जन्मीं मी ससा होतों कीं काय देव जाणे ! शाळेंत असतांना मी हुशार विद्यार्थी होतों—अगदी स्कॉलर होतों ! मास्तरांची भीति बाळगण्याचें मला कांही कारण नव्हतें ! पण कांही कामासाठी शिक्षकांना किंवा मुख्याध्यापकांना भेटायची पाळी आली की मला दरदरून घाम सुटे. शाळेंतल्या एका समारंभांत बक्षीस घेऊन तें देणाऱ्या पाहुण्यांना नमस्कार करायचा आणि मुकाट्यानें समोरच्या दरवाजांतून बाहेर पडायचें, एवढीच भूमिका माझ्याकडे होती, पण ती पार पाडतांना माझे पाय कसे लटलट कांपत होते हें अजून मला आठवतें.

कांही माणसें गर्दींत फुलतात. सूर्यफुलासारखीं असतात तीं ! सहस्र-करांनी स्वागत करणारा जनसमुदाय त्यांना सूर्यासारखा संजीवक वाटतो.

पण माझी वृत्ति अगदी निराळी आहे. मी स्वभावतःच संकोची आहें, लाजरावुजरा आहें. गर्दीच्या असंख्य डोळ्यांचे ओझरते कटाक्ष माझ्यावर पडले की लाजाळूच्या झाडाप्रमाणे माझ्या मनाचीं हंसरीं पानें लगेच संकोच पावतात !

सांगितलें तर खरें वाटणार नाहीं कुणाला ! पण सांगतोंच ! नाइला-जानें अनेक सभा-संमेलनांचीं निमंत्रणें मला स्वीकारावीं लागतात. व अशा रीतीने—जवळजवळ सक्तीनेच म्हणानात—मीं पुष्कळ भाषणें केलीं असलीं, तरी प्रत्येक नव्या सभेच्या वेळीं माझी स्थिति मोठी विचित्र होते—रंगभूमीवर प्रथमच प्रवेश करणाऱ्या नवख्या नटासारखी. उंबरठ्या-वरल्या मापाला हळूच पाय लावून कावऱ्याबावऱ्या नजरेने अपरिचित घरांत पाऊल टाकणाऱ्या नववधूसारखी !

त्या दिवशींहि असेंच झालें. सभा कांही तशी विद्वानांची नव्हती. एका माध्यमिक शाळेचें संमेलन होतें तें ! पण शाळा मोठी होती. सहा-सातशें विद्यार्थी होते तिच्यांत. आपल्या मुलाला बक्षीस मिळालेलें पाहू-ण्यांत मोठा आनंद असतो. अगदी अपत्यजन्माइतकाच म्हणानात ! या अपूर्व आनंदाचा आस्वाद घेण्याकरितां शेपन्नास पालक आले होते. त्या पालकांत श्रवणभक्तीचें सुख लुटणाऱ्या गावांतल्या वाङ्मयप्रेमी आणि रिकामटेकड्या अशा दोन्ही प्रकारच्या नागरिकांची भर पडली होती. अशा रीतीने हजारांच्या आसपास जमलेली ती गर्दी पाहून मी नेहमी-प्रमाणें बेचैन होऊन गेलों होतों. रामदास बोहल्यावरून पळाला, तो प्रपं-चाच्या पाशाला भिऊन की लग्नमंडपांतल्या गर्दीला भिऊन हें कोडें सोड-विण्याचा मी मनांतल्या मनांत प्रयत्न करीत होतों.

बोहल्यावरून काय, व्यासपीठावरून काय किंवा रंगभूमीवरून काय अचानक पळून जायलासुद्धा अंगीं असामान्य धैर्य असावें लागतें. तें माझ्या ठिकाणीं नसल्यामुळें, बक्षीससमारंभ संपल्यावर, अध्यक्ष म्हणून भाषण करण्याकरिता मला उठावेंच लागलें ! मी बोलूं लागलों. पांच मिनिटें झालीं, दहा मिनिटें झालीं, पंधरा मिनिटें झालीं; पण माझ्या बोलण्याला

रंग चढेना—त्यांत रस निर्माण होईना. इतर लोक सांगतात त्याच गोष्टी त्याच पद्धतीने मी विद्यार्थ्यांना सुनावीत होतों.

बोलतां बोलतां मी बोलून गेलों, ' माझ्या तरुण मित्रांनो, आयुष्यांतल्या यशाची गुरुकिल्ली एकच आहे. ती म्हणजे उंच उडी. आपल्या कालच्या उडीपेक्षां आजची उडी अधिक उंचीवरून जाते कीं नाहीं हें तुम्हीं डोळ्यांत तेल घालून पाहिलें पाहिजे. '

हे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडले मात्र ! रुक्ष वाळवंटांत हिरवळ दिसावी तसें माझें मलाच वाटलें. माझ्या भाषणाला आता दिशा मिळाली होती. बोथट बाण टोकदार झाला होता. प्रवाहाबरोबर मजेंत पोहत जाणाऱ्या माणसाप्रमाणें मी हां हां म्हणतां भाषणांत रंगून गेलों. आता माझ्यासमोर हजार लोक बसले नव्हते, फक्त एकच तरुण, जिवलग मित्र कान देऊन माझें कळकळीचें बोलणें ऐकत होता. मी मोठ्या तळमळीने माझे उंच उडीचें तत्त्वज्ञान सविस्तर समजावून सांगूं लागलों. तें सांगतां सांगतां गत वर्षी कटकच्या क्रीडामहोत्सवांत घडलेली एक गोष्ट मला आठवली. ती गोष्ट उंच उडीविषयीचीच होती.

त्या उत्सवांत भाग घेण्याकरिता केरळमधील एक विद्यार्थिनी आली होती. मागच्या वर्षीचें उंच उडीचें बक्षीस तिला मिळालें होतें. यंदाचेंहि पारितोषिक आपणच पटकावणार, या ईर्ष्येने ती खूप तयारी करून आली होती. तिची जिद्द निराधार नव्हती, शेवटीं तिलाच तें बक्षीस मिळालें. पण तें घेतांना मात्र तिला रडूं कोसळलें. मागच्या वर्षापेक्षा आपली उडी एक इंच तरी अधिक गेली पाहिजे, म्हणून तिने शिकस्तीचा प्रयत्न केला. पण तें तिला जमलें नाही. मागच्या वर्षाइतक्याच उंचीवरून तिची उडी गेली होती. हा कांही तिचा पराभव नव्हता, पण तो विजयहि नव्हता. त्यामुळेच पारितोषक मिळूनहि, त्या महत्त्वाकांक्षी मुलीच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले होते.

उंच उडीचें हें तत्त्वज्ञान सांगतां सांगतां मी रंगून गेलों. शेवटीं भाषण संपवितांना मी म्हणालों, ' माझ्या प्रिय मित्रांनो आणि मैत्रिणींनो, त्या

मुलीच्या डोळ्यांतून खाली पडलेला प्रत्येक अश्रुबिंदु हा तुमच्या आयुष्यांतला ध्रुवतारा आहे हें विसरूं नका. तुमच्या जीवनांत केवढेंहि भयंकर वादळ येवो, धैर्याची नौका त्यांत डळमळूं लागो, या ध्रुवताऱ्यावरली आपली नजर ढळूं देऊं नका.'

टाळ्यांच्या कडकडाटांत मी खुर्चीवर बसलों. मला एक प्रकारची धुंदी चढली होती. कांहीतरी सरस लिहून झालें, एखादी चांगली कादंबरी वाचून हातावेगळी केली, एखादें भावपूर्ण गीत ऐकायला मिळालें, एखादा चुरशीचा क्रिकेटचा सामना पाहण्याची संधि लाभली, की अशा प्रकारच्या धुंदीचा मला प्रत्यय येतो. जीवनाला रुचि आणणाऱ्या गोष्टींत ही धुंदी मी फार महत्त्वाची मानतों. मात्र ती मागून मिळत नाही, हुकमेहुकूम आणतां येत नाही. 'प्रीती मिळेल का हो बाजारीं ? प्रीती मिळेल का हो शेजारीं ?' असा केशवसुतांनीं मोठा मार्मिक प्रश्न केला आहे. ही धुंदी प्रीतीसारखीच असते. ती कुठल्याहि कृत्रिम उपायांनी निर्माण करतां येत नाही. मात्र ती अचानक चमकून जाणाऱ्या विजेसारखी मनाला स्पर्श करून जाते; आणि मग त्या क्षणिक प्रकाशाची मानसपूजा करीत आणि त्याच्या लहरी साक्षात्काराची वाट पाहत मी पुढला काळ आनंदाने घालवूं शकतों.

आजच्या भाषणांत अगदी अनपेक्षितपणे तो साक्षात्कार मला झाला होता. म्हणून मी मोठ्या खुषींत होतों.

सभा संपत आली. मुख्य अध्यापकांचें आभारप्रदर्शन सुरू झालें, त्यांचे शब्द माझ्या कानांवर पडत होते. पण त्या शब्दांचा अर्थ मला नीटसा कळत नव्हता. अजून माझें मन त्या धुंदीच्या लाटांवर तरंगत होतें !

इतक्यांत कुणीतरी एक चिठ्ठी हळूच माझ्या हातांत दिली. मीं ती उघडून पाहिली. 'आपले शाळेंतील वर्गबंधु बाबुराव टिळक इथं आले आहेत. अतिशय आजारी आहेत. आपल्याला भेटायची फार फार इच्छा आहे त्यांना. ' एवढाच मजकूर त्या चिठ्ठींत होता.

बाबुराव नि इथे ? तो केव्हा आला ? तो तर मुंबईला असतो ! तीस चाळीस वर्षांत कधी त्याची गाठ पडली नव्हती. पण तो एक बडा व्यापारी

झालों आहे हें मीं अनेकांकडून ऐकलें होतें. आपला बालमित्र श्रीकृष्ण द्वारकेसारख्या सुवर्णनगरींत राहत आहे हें ऐकून सुदाम्याला जो आनंद झाला असेल, त्याचा अनुभव बाबूरावांविषयींच्या अद्‌भुत गोष्टी कुणा-तरी मित्राकडून ऐकतांना मींहि घेतला होता. पण त्याचा धंदा निराळा, माझा धंदा निराळा, शिवाय बाबूराव मूळचा वेफाट. पुढे पुढे तर तो अफाट श्रीमंत झालेला. माझ्यासारख्या बालमित्राला तो ओळखील की नाही अशी धागधूग मला वाटायची ! त्यामुळे आतांपर्यंत त्याला भेटायचा मीं कधीच प्रयत्न केला नव्हता !

रात्रीच्या गाडीनें मला परतणें जरूर होतें. पण बाबूरावासारखा बाल-मित्र—आणि तोहि आजारी असलेला—बोलावीत असतांना त्याला न भेटतां कसें जायचें ? 'वंदे मातरम्' होतांच ती चिठ्ठी आणणाऱ्या मनुष्याची मी चौकशी केली. तो भीत भीतच माझ्यापुढे आला. तो बाबूरावांच्या घरचा गडी असावा असें मला वाटलें. पण लगेच माझी चूक मला कळून आली. तो त्यांचा थोरला मुलगा होता.

कसाबसा चहा घेतला आणि टांगा करून बाबुरावांच्या मुलाबरोबर निघालों.

कांहीतरी बोलायला हवें म्हणून वाटेंत मीं त्याला विचारलें, 'काय होतंय् बाबुरावाला ?'

तो चांचरत उत्तरला, 'तसं कांही होत नाही. पण—पण—डोकं फिरल्या-सारखं झालंय् !'

'डोकं फिरलंय् ? तें कशानं ?'

'सट्ट्यांतल्या ठोकरांनी !'

'म्हणजे ? बाबूराव सट्टे खेळत होता ?'

तो खाली मान घालून म्हणाला, 'हजाराचे दहा हजार आणि दहा हजारांचे लाख होईपर्यंत दादा सावधपणानं व्यापार करीत होते. पण पुढं त्यांना कैफ चढल्यासारखं झालं. सट्टे खेळून ते दहावीस लाखांचे मालक झाले. मग तर त्यांचा तोलच गेला. धर्मराजाने शेवटीं द्रौपदीसुद्धा पणाला

लावली ना ? तसं झालं दादांचं ! तें रत्नजडित अंबारींत बसायला गेले आणि शेवटीं आमच्या हातांत उलटी अंबारी आली ! फार परिणाम झालाय् याचा त्यांच्या डोक्यावर !' त्याला पुढें बोलवेना. डोळ्यांत उभें राहिलेलें पाणी तो बोटानें निपटूं लागला.

मी सुन्न होऊन हें सारें ऐकत होतों. बाबुरावाचा मुलगा मला गड्या-सारखा कां वाटला हें आता माझ्या लक्षांत आलें. मीं त्याला विचारलें, 'पण—पण—बाबुराव मला ओळखील ना ?'

तो म्हणाला, 'त्यांनीच तर आजच्या संमेलनाची निमंत्रणपत्रिका पाहून तुम्हांला बोलवावयाला सांगितलं मला !'

एखाद्या घरचें मनुष्य गेलें म्हणजे तेथे समाचाराकरिता जातांना मन कसें उदास होतें ! आतां माझी मनःस्थिति तशीच झाली होती.

शेवटीं टांगा, एका बोळांत थांबला. एका बैठ्या मातीच्या घरांत आम्ही शिरलों. समोरच बाबुराव बसला होता. मी झटकन् पायऱ्या चढून त्याच्याजवळ जाऊन बसलों आणि त्याचा हात हातांत घेऊन घट्ट घट्ट दाबला. तो माझ्याकडे टक लावून पाहूं लागला. मोठी भकास नजर होती त्याची. काळोखानें भरलेल्या गुहेसारखी !

त्याने मला ओळखलें की नाही हें मला कळेना. शाळेंतली एखादी आठवण काढून मी त्याच्याशीं बोलूं लागणार होतों. इतक्यांत पुढ्यांत पडलेली पाटी त्यानें उचलली. तिच्यावर साधारणपणे घोड्या-सारखा दिसणारा एक प्राणी काढला होता. तो मला दाखवीत आणि हातानें 'कान इकडं कर' असें खुणावीत बाबूराव मला बिलगला आणि कानांत कुजबुजला, 'नीट लक्षांत ठेव. हा घोडा शर्यत जिंकणार ! अगदी गुप्त बातमी आहे ही ! स्वर्गातली ! नारदमुनींनी सांगितलेली ! तूं माझा लहानपणचा दोस्त ! म्हणून तुला हें गुपित सांगतोंय् मी ! सारे पैसे या घोड्यावर लाव. मग बघ—उद्यां अमेरिका विकत घेशील तूं !'

जवळ जवळ अर्धा तास मी बाबूरावापाशी बसलों. त्याने मला ओळखलें होतं. अधून मधून लहानपणीच्या एक-दोन गोष्टी त्याने अचूक सांगि-

तल्या पण त्याचें बरेचसें बोलणें विचूक होतें. भयंकर श्रीमंत होण्याच्या इच्छेने त्याच्या बुद्धीच्या सर्व बाजू जणुं बधिर करून टाकल्या होत्या. अमर्याद महत्त्वाकांक्षा माणसाला राक्षस कसा बनवितें हें शेक्स्पीअरने मॅक्बेथमध्ये उत्तम रीतीने दाखविलें असेल. पण तिच्यामुळे माणसाचें भूतांत रूपांतर कसें होतें हें मी आता डोळ्यांनी पाहत होतों.

मी बाबुरावाच्या घराच्या पायऱ्या उतरलों तो उदास मनःस्थितींतच ! मघांशी मला चढलेली भाषणाची धुंदी कुठल्या कुठे नाहींशी झाली होती. मोठ्या ऐटीने जाणारे विमान उंच डोंगराच्या कड्याला आपटून एकदम खालच्या दरींत कोसळलें होतें.

रात्रीं गाडींत पहिल्या वर्गांतल्या खालच्या बर्थवर आरामांत पडूनहि माझा डोळा लागेना. मी पुनःपुन्हा विचार करीत होतों—बाबूरावाची अशी दुर्दशा कां व्हावी ? अधिक श्रीमंत होण्याचें त्याचें तत्त्वज्ञान सर्वस्वीं चूक होतें असें कसें म्हणतां येईल ? तो उंच उडी मारायला गेला. ती उडी फसली ! पण तेवढ्यामुळे तो असा भ्रमिष्ट कां व्हावा ?

या प्रश्नाचें उत्तर कितीतरी वेळ मी शोधीत होतों. मधेच मला डुलकी लागली. त्या डुलकींत मला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत एक मुलगी उंच उंच उड्या मारीत होती. प्रत्येक वेळीं ती अधिक अधिक उंच उडी मारी आणि विजयी मुद्रेने माझ्याकडे पाही. मधेच ती माझ्याकडे वळली आणि हसत म्हणाली, ' मी आता उंच उडी मारून चंद्र घेऊन येतें खाली !' एवढें बोलून तिने उडी मारली. ती उंच उंच गेली. हां हां म्हणतां ढगांत दिसेनाशी झाली. मी चकित होऊन वर पाहत होतों. पण पुढच्याच क्षणीं आकाशांतून तुटून पडणाऱ्या उल्केप्रमाणे ती खाली येऊं लागली. हां हां म्हणतां ती जमिनीवर येऊन आदळली ! तिच्या आकांक्षेचाच नव्हे तर शरिराचाहि चेंदामेंदा झाला होता ! धडधडत्या छातीने मी तिच्या जवळ गेलों. पाहतों तों बाबूराव लोळागोळा होऊन तिथे पडला होता.

या दृश्याने मी दचकून जागा झालों. कटकच्या क्रीडामहोत्सवांतली मीं न पाहिलेली मुलगी आणि मघाशी पाहिलेले बाबूराव यांची आलटून

पालटून मला आठवण होऊं लागली. अधिक उंच उडी मारतां आली नाही, म्हणून त्या मुलीच्या डोळ्यांत उभे राहिलेले अश्रु जितके अर्थपूर्ण होते, तितकेच उंच उडी मारतां मारतां साऱ्या कुटुंबाचा सत्यानाश करणाऱ्या बाबुरावांच्या मुलाच्या डोळ्यांतील अश्रुहि आशयपूर्ण होते. मला वाटूं लागलें, 'उंच उडी मारा' या सुभाषिताइतकेंच 'उंच उडी मारूं नका' हें सुभाषितहि सत्य असलें पाहिजे !

मानवी जीवनांतलें खरें दुःख हेंच आहे. दोन परस्परविरोधी तत्त्वें मिळून जीवनाला पोषक होऊं शकणारें एक सत्य निर्माण होतें. पण सत्याचें हें संमिश्र स्वरूप माणसाला समजत नाही, उमजत नाही ! घाटांतली गाडी जशी एका दिशेने धावून मग अगदी उलट दिशेने जाऊं लागते, तशीच जीवनांतल्या अनेक प्रत्येक सत्याची गति असते. भोग आणि त्याग, आसक्ति आणि विरक्ति, ऊन आणि पाऊस, दिवस आणि रात्र, प्रेम आणि द्वेष, शरीर आणि आत्मा, जन्म आणि मृत्यु हीं जीवनांतलीं द्वंद्वें नाहीत; ते द्वंद्वसमास आहेत ! बिचाऱ्या बाबुरावाला हें कळलें नाही !

मागच्या वर्षीपेक्षा यंदा आपण अधिक उंच उडी मारूं शकलों नाही म्हणून दुःखी होणाऱ्या त्या मुलीला पंचविशीपर्यंत हें कळूं नये, मात्र पंच-विशी उलटतांच तें चटकन् तिच्या लक्षांत यावें अशी—तिची ओळख नसतांनाहि—मनांतल्या मनांत मी प्रार्थना करूं लागलों.

१९५८

## २०

# आवाज

तो भयंकर विचित्र आवाज कसला आहे तें मला कळेना. तो केव्हा थांबणार हें समजेना. तो ऐकून छाती धडधडूं लागली, पाय लटपटूं लागले. शेरपा तेनसिंगाच्या पावलावर पाऊल टाकून मी एव्हरेस्टच्या शिखरापर्यंत पोचलों होतों. माझ्या हातांतला तिरंगी ध्वज तिथे रोवून 'जय हिंद' अशी घोषणा मी करणार होतों. एखाद्या सम्राटाच्या चरणांवर मस्तक ठेवून त्याला अभिवादन करणाऱ्या मांडलिकाप्रमाणे दिसणाऱ्या मेघांच्या मालिकेकडे मी मनसोक्त पाहणार होतों. इतकेंच नव्हे तर त्यांतल्या एखाद्या मेघाला दूत करून मी घरीं माझें क्षेमकुशल कळविणार होतों!

पण त्या कठोर, कर्णकटु आवाजाने या साऱ्या संकल्पांच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडविल्या. ज्या शिखरावर मी उभा होतों त्याचे कडे धडाधड कोसळून खाली पडत आहेत असें मला वाटूं लागलें.

खणणणणणण —

छे! इतकें उंच चढून हीं कुठलीं पोरें हुतूतू खेळत आहेत?

माझ्या मनाचीं दारें एकदम उघडलीं. तो गजराच्या घड्याळाचा

आवाज आहे हें माझ्या ध्यानांत आलें. हिमालयाच्या शिखरावरल्या त्या उच्च भूमिकेवरून खाली खेचून आणणाऱ्या या आवाजाचा मला संताप आला. पण मी मुकाटचाने अंथरुणावर पडून राहिलों. वार्षिक परीक्षा जवळ आल्या होत्या. पहाटे अभ्यासासाठी उठण्याकरिता मुलांपैकी कुणीतरी गजर लावला असावा ! इतक्या उदात्त हेतूने लावलेल्या गजराने झोपमोड झाली तरी त्याच्यावर रागावून कसें चालेल ?

गजर थांबला. किलबिल आणि गडबड सुरू झाली. मुलें एकमेकांना उठवींत होतीं. जो तो आळसावलेल्या स्वराने 'पांच मिनिटांनी उठतों हं !' असें दुसऱ्याला सांगत होता. पैसे उसने नेणारा मनुष्य वायदे करतो ना ? हीं पांच मिनिटें त्यांपैकीच होतीं. पांचाचीं दहा आणि दहाचीं वीस मिनिटें झालीं तेव्हा कुठे सारीं मुलें उठलीं. मग न्हाणीघराचें दार धाड्-धाड् वाजूं लागलें. सूं-फर्र करून स्टोव्हने आपला घसा साफ केला. तो घनश्यामसुंदर चहाची भूपाळी आळवण्यांत गुंग झाला. कपबशांचा प्रेम-कलह पुनःपुन्हा कानांवर पडूं लागला. या साऱ्या गोंधळांत माझी झोप पार उडून गेली. एखाद्या काचेच्या नाजूक पेल्याचे तुकडेतुकडे व्हावेत तशी तिची स्थिति झाली.

नाही म्हटले तरी मनांतून मुलांचा असा राग आला होता म्हणतां मला ! पण माझ्यांतल्या दुर्वासाच्या दाढीला हात लावून जपजाप्य करीत तो गप्प बसेल अशी व्यवस्था मीं केली. आर्थिक दृष्टीनेहि मीं या गोष्टीचा विचार केला. झोपमोडीमुळे होऊनहोऊन काय होईल ? माझी प्रकृति बिघडेल आणि डॉक्टरांचें पांचपंचवीस रुपयांचें बिल भरावें लागेल. पण परीक्षा जवळ आली असून पोरें पहाटे अभ्यासाला उठलीं नाहीत तर ? तर तीं सारीं नापास होतील ? शेकडो रुपये पाण्यांत पडतील. त्यापेक्षा आपण निद्राभंगाचें दुःख भोगलेलें फार बरें !

असा विचार करून चारदोन दिवस पहाटेची झोपमोड मीं सहन केली. पण पैसा, प्रेम आणि झोप यांची खरी किंमत पूर्ववयापेक्षा उत्तर वयांत कळते हेंच खरें. झोप अर्धवट झाल्यामुळे मी अधिकच चिडचिडा बनलों.

दुपारीं काम करतांना पेंगूं लागलों. परवापरवापर्यंत कवि, वीर, संत वगैरे लोकांविषयी मला फार आदर वाटत असे. पण झोपमोडीचा हा नवा त्रास सुरू झाल्यापासून आगगाडीचे ड्रायव्हर, गार्ड आणि रात्रीं-अपरात्रीं जागें राहून अशाच प्रकारचीं कामें करणारे लोक हे फार श्रेष्ठ पुरुष असले पाहि-जेत, अशी माझी खात्री होऊन चुकली.

पण माणसाच्या सहनशक्तीला कांही मर्यादा म्हणून आहेच ? पांचव्या का सहाव्या दिवशीं माझ्यांतला दुर्वास जागृत झाला. दुसऱ्याच दिवशीं त्या दुर्वासाचें जमदग्नींत रूपांतर झालें. मग माझ्या झोपमोडीचा विचार करण्याकरिता आमची कुटुंबपरिषद भरली. मुलांच्या आईने त्यांची बाजू घेतली. 'न मातु: परदैवतम्' असें कुणींतरी म्हटलें आहे तें काय उगीच ?

मुलांचा अभ्यास आणि बापाची झोप यांचा मेळ कसा घालायचा ? जगांत शांति निर्माण करण्यापेक्षाहि हा प्रश्न बिकट आहे असें मला वाटूं लागलें. आमच्या कुटुंबपरिषदेच्या सभासदांनी नाना प्रकारच्या सूचना पुढे आणल्या. सौभाग्यवती साळसूदपणाने मला म्हणाली, 'झोपतांना कानांत बोळे घालून निजावं म्हणजे गजरानं झोपमोड होणार नाही.' मी ताडकन् उत्तरलों, 'छान ! उत्तम उपाय ! म्हणजे रात्रीं घरांत चोर शिरला नि कुठं खाट्खूट् झालं तर तेंहि ऐकूं यायला नको ! चोरी झाली म्हणजे बसा मग ओरडत नि पोलीस कचेरींत हेलपाटे घालीत.'

माझें उत्तर ऐकून गृहिणी गप्प बसली. पण गृहरत्नें बोलतच होतीं. सर्वांत धाकट्याने वडिलांना झोपेच्या गोळ्या देण्याविषयी आईला सुचविलें. सानेगुरुजीसुद्धा त्या घेत असत, असें त्याने कुठेतरी वाचलें होतें म्हणे ! मोठी मुलगी सिनेमाप्रेमी होती. बाबांची खोली साउंडप्रुफ करून घ्यावी असा तिचा सल्ला मिळाला. मधल्या चिरंजिवांना तिसरीच शक्कल सुचली. परीक्षा संपेपर्यंत बाबांनी शेजारींपाजारीं कुठेतरी झोपायला जावें असा त्याने बूट काढला ! मुंबईला पुष्कळ माणसें फूटपाथवर निजतात हें त्यांनी उदाहरणादाखल सांगितलें नाही हें माझें नशीब ! उरलेल्या रत्नाच्या

तोंडून कोणतीं मुक्ताफळें बाहेर पडतात या विवंचनेंत मी होतों. पण त्याने तडजोडीचा उत्तम मार्ग शोधून काढला. त्याच्या एका मित्राच्या घरीं म्हणे गजराचें नवें घड्याळ आणलें होतें. फार नाजुक आणि मंजुळ आवाज होता त्याचा. ज्याच्या उशाशीं तें ठेवतात तोच त्याच्या आवाजाने जागा होतो नि तोहि कसा? अगदी गुदगुल्या केल्यासारखा! किंमतहि फार नाही! फक्त पंचवीस रुपये!

घरांतल्या कर्त्या मनुष्याच्या कोटाच्या नाहीतर जाकिटाच्या खिशांत पैशाचें झाड असतें अशीच आम्हां मध्यमवर्गांतल्या बायकापोरांची समजूत असावी! म्हणे, फक्त पंचवीस रुपये! लेकांनो, ते पंचवीस रुपये मिळवितांना तुमच्या बापाला किती राबावें लागतें हें ठाऊक आहे का तुम्हांला? छे! छे! छे! मुरारजीभाईंनी द्विभार्याबंदीप्रमाणे द्विघड्याळ-बंदीहि केली असती तर बरें झालें असतें असा विचारसुद्धा माझ्या मनांत येऊन गेला.

पण कुठलीहि गोष्ट अंगावर आली की ती शिंगांवर घ्यावीच लागते. दररोज पहाटे झोपमोड होऊन सारा दिवस पेंगत काम करण्यापेक्षा पंच-वीस रुपये गमावणें अधिक फायदेशीर असें ठरवून तें घड्याळ मीं लगेच विकत आणलें.

गृहप्रवेशानंतर लगेच त्या घड्याळाकडून गजराची रंगीत तालीम आम्हीं करून घेतली. ती मोठी सुंदर वठली. एखाद्या झऱ्याच्या झुळझुळीने सुद्धा लाजावें अशा मधुर स्वरांत तें घड्याळ गजर करीत होतें. आमचें पहिलें घड्याळ भसाड्या आवाजांत तानांवर ताना घेत सुटणाऱ्या गवयाची आठवण करून देई. हें नवें घड्याळ एखाद्या भावगीतगायिकेसारखें होतें. मीं मुद्दाम डोळे मिटून दोनतीनदां त्याचा गजर ऐकला. तो ऐकतांना आपलें आवडतें माणूस बिछान्यापाशीं येऊन मृदुमधुर स्वराने, 'ऐकलं का? उठणार ना? चहा होत आलाय्! इश्श! असली कसली मेली ही झोप? हं, आता कळलं! झोपेचं सोंग घेतलंय् स्वारीनं. उठायचं ना गडे! असं काय बरं? आता काय गाणं म्हणूं तुम्हांला जागं करायला?'

असें कांहीतरी कानांशीं कुजबुजत आहे असा मला भास झाला. आपले पंचवीस रुपये पूर्णपणें सार्थकीं लागले अशी माझी खात्री झाली. मोठ्या मुलीने आपल्या बिछान्यापाशी ही नवी मधुरभाषिणी घड्याळिका ठेवावी, जाग आल्यावर हळूच तिने दुसऱ्याला उठवावें, न्हाणीघराचें दार उघडतांना कुणीहि फाजील वीरश्री दाखवू नये आणि चहाचा समारंभ माजघरांत न करतां बाहेरच्या खोलींत पार पाडावा असा दोन्ही पक्षांची सोय पाहणारा तहनामा सौभाग्यवतीने तयार केला. आता उद्या सकाळीं सात वाजेपर्यंत ताणून द्यायला हरकत नाही, म्हणून समाधानाचा सुस्कारा सोडीत मीं त्या रात्रीं अंथरुणावर अंग टाकलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मीं डोळे उघडले तेव्हा खिडकींतून उन्हें आंत येऊं लागलीं होतीं. घरांत कुठेहि गडबड किंवा आरडाओरडा ऐकूं येत नव्हता. सारीं मुलें शांतपणाने अभ्यास करीत बसलीं असावींत. त्या नव्या गोड घड्याळाला शतशः धन्यवाद देत मी न्हाणीघरांत गेलों.

मी तोंड धुवून आलों तरी मुलांची हालचाल कुठे दिसेना. तें नवें घड्याळ ह्या शांतीचा खराखुरा प्रेषित आहे याची मला खात्री पटली.

पण केवळ शांतीमुळे कांही माणसाच्या सर्व गरजा भागत नाहीत. त्याला आत्मा हवा तशी भाकरीहि हवी ! चहाची तलफ मला मिनिटामिनिटाला बेचैन करून सोडीत होती. बायकोला रक्तदाबाचा त्रास असल्यामुळे तिला उठविण्यांत अर्थ नव्हता. मुलांपैकीच कुणाला तरी चहा करायला सांगावें म्हणून मी माजघरांत आलों. पाहतों तो तिथे धाकटीं दोघें डाराडूर झोपलेलीं ! बाहेरच्या खोलींत प्रवेश केला तिथेहि तोच देखावा दृष्टीला पडला. मोठ्या चिरंजीविनीच्या उशाशीं तें नवें घड्याळ एखाद्या ध्यानस्थ साधूप्रमाणे स्वस्थ बसलें होतें आणि ती जगदंबा मध्यरात्र झाल्यासारखी घोरत होती. तिचे बंधुराजहि——

मीं रागारागाने सर्वांना उठविलें. 'दुकानदाराने नादुरुस्त घड्याळ तर आपल्या गळ्यांत बांधलें नाही ना', या शंकेने गजर झाला आहे की नाही हें पाहिलें. त्या बिचाऱ्या घड्याळाने आपलें काम व्यवस्थित पार

पाडलें होतें. पण आमची कन्यका कुंभकर्णाच्या वंशांतली होती ना !

क्रमाक्रमाने प्रत्येक मुलाने गजर लावून तें नवें घड्याळ आपल्या उशाशीं ठेवलें. पण कुठल्याहि पहाटे कुणीहि उठलें नाही. गजराची किल्ली संपलेली असे यावरून प्रत्येक दिवशीं घड्याळाचा गजर होत असे हें उघड होतें. शेवटीं मीं तें घड्याळ माझ्या उशाशीं ठेवून पाहिलें. पण त्याचा गजर ऐकून मीसुद्धा उठलों तो सात वाजतांच !

एक बिकट प्रश्न सोडविण्याकरिता मीं पदराला पंचवीस रुपये खार लावून घेतला होता. पण तो प्रश्न आता दुसऱ्या बिकट स्वरूपांत दत्त म्हणून पुढे उभा राहिला. मुलें पहाटे अभ्यासाला कशीं उठणार ? तें घड्याळ सुंदर होतें, त्याचा आवाज मंजुळ होता, नर्तिकेच्या पैंजणांनासुद्धा त्याच्या आवाजाचा हेवा वाटला असता, त्या घड्याळामुळे झोपमोड होण्याचा बिलकुल संभव नव्हता. हें सारें खरें होतें. पण त्या बहुगुणी घड्याळांत एक मोठा अवगुण होता. ज्याच्या उशाशीं तें ठेवावें तोसुद्धा त्याचा गजर ऐकून जागा होत नव्हता !

नाजूक आवाज ही मोठी सुंदर देणगी आहे यांत संशय नाही. शेक्स्‌पिअरच्या पोलोनिअसने आपल्या मुलाला केलेल्या उपदेशांत, 'शक्य तेवढ्या नाजूक आवाजांत बोलत जा. मोठ्या आवाजांत बोलणं हें सभ्य गृहस्थाचं लक्षण नाही', अशा अर्थाचा कांही भाग आहे की नाही हें मला आठवत नाही. तो छापील प्रतींत नसला तरी शेक्सपिअरच्या मूळच्या हस्तलिखितांत असला पाहिजे अशी माझी खात्री आहे. कारण, नाजूक आवाज ही साजूक लोण्याप्रमाणेच सर्वांना सर्वकाळ आवडणारी गोष्ट आहे. सुंदर स्त्रीचें वर्णन करतांना आपले संस्कृत कवि 'कोकिळकंठी' असें विशेषण वापरतात तें कांही गळ्याच्या रंगासाठी नव्हे; आवाजाच्या गोडव्याकरिताच.

पण एखादी गोष्ट केवळ सुंदर, काव्यमय किंवा तात्त्विक दृष्ट्या बरोबर असून काय उपयोग ? तिचा व्यवहारांत उपयोग व्हायला नको का ? नदीवर फुलांचे पूल बांधून चालत नाही, ते दगडांचेच असावे लागतात !

त्या सुंदर घड्याळाचा तो मंजुळ गजर ऐकून आमच्या घरांत कुणी जागेंच होत नव्हतें त्याला त्या बापड्याने काय करावें ? फार झालें तर तें घड्याळ तयार करणाऱ्या कंपनीनें कॅटलॉगमध्ये ' सदरहू घड्याळ कुंभ-कर्ण आणि मंडळीसाठी नाही ' असें छापून टाकावें. म्हणजे कुणाला फस-विल्याचें पाप तिला लागणार नाही ! ज्याची झोप सावध असेल त्याला हें घड्याळ फार चांगलें ! ज्याला विद्येची आंच असेल त्याला छडीची जरुरी नाही ! आणि ज्याची सद्सद्विवेकबुद्धि जागृत असेल त्याच्या बाबतींत हृदयपरिवर्तनाचा उपायहि उत्तम ! तसेंच हें आहे. पण अशीं माणसें जगांत असूननसून असतात किती ? तीं अधिक प्रमाणांत निर्माण करण्याविषयी परमेश्वराची प्रार्थना करणें एवढेंच आम्हां झोपाळू पामरांच्या हातीं शिल्लक राहतें.

त्या अनंतकोटि ब्रह्मांडनायकाला तशी प्रार्थना करून मीं तें नवें सुंदर घड्याळ माझ्या टेबलावरल्या शोभेच्या वस्तूंत ठेवलें आणि दुसऱ्या दिवशीं-पासून पहिल्या घड्याळाचाच गजर लावीत चला असें मुलांना फर्माविलें. तें ऐकतांच सौभाग्यवती म्हणाली, ' पण इकडली झोपमोड होईल ना ? '

' ती व्हायलाच हवी ! '

' म्हणजे ? '

' मलाहि हिंदीचा अभ्यास करायचाय् ! '

' तो पहाटे उठून करणार ? '

' हो. संसाराच्या घाण्याला जुंपलेल्या बैलाला एरवी रिकामा वेळ केव्हा मिळणार ? '

मीं तिला असें तिरशिंगरावासारखें उत्तर दिलें. यावरून दुसऱ्या दिवशीं पहाटेपासून मी ' हम्तुम् ' करूं लागलों असें मुळीच नाही. एंजिनाला वाफ सोडण्यासाठी एक जागा असते ना ? तसें माणसालाहि आपला राग काढायला कुणी ना कुणी लागतें. म्हणून तर नवरा नित्य बायकोला टाकून बोलतो आणि बायको तिन्ही-त्रिकाळ त्याच्यावर रुसते, फुरंगटून बसते, रागावते, तावदारते, वगैरे वगैरे.

मात्र मुलांबरोबर पहाटें उठून हिंदीचा अभ्यास करण्याचा माझा बेत कायम आहे. त्या जुन्या घड्याळाच्या खणखणाटाने मी हल्ली थोडाफार जागा होतों आणि या कुशीवरून त्या कुशीवर वळतांना ' साखरझोप " हा शब्द हिंदींत कसा लिहायचा याचा विचार करतों. हिंदींत साखर म्हणजे शक्कर आणि झोप म्हणजे नींद. तेव्हा साखरझोप म्हणजे शक्करनींद !

छे ! हें काय हिंदी आहे की हिंदीचें सोंग आहे ? या गजराने मी अर्धवट जागा होतों हें बरें नव्हे ! याच्यापेक्षा मोठ्या आवाजाचें घड्याळ बाजारांत मिळतें की काय तें पाहायला हवें. जितका आवाज मोठा तितकी जागृति अधिक ! त्या घड्याळाचा गजर सुरू होतांच घराला आग लागली आहे की काय असें वाटून माणसाने ताड्कन् अंथरुणावरून उठायला हवें ! असें घड्याळ मिळालें म्हणजे आपोआप माझा आळस जाईल आणि हिंदीचा अभ्यास सुरू होईल. शिवाय मुलें हटकून पहाटें उठतील आणि हमखास परीक्षांत पास होतील हा फायदा निराळाच !

१९५५

२१

# न्हाणीघर

स्वस्त घरें कशीं बांधावींत यासंबंधी आपल्या देशांत सध्या जोराची चर्चा सुरू आहे. मी ती मोठ्या आवडीने वाचीत असतों. हा प्रश्न निकडीचा आहे यांत शंकाच नाही ! मुंबईला एका खोलीच्या चार कोपऱ्यांत चार जोडप्यांनीं संसार थाटल्याची कथा परवांच एका मित्रानें मला सांगितली. सिंदबादच्या सफरीपेक्षाहि ती मला अद्भुत वाटली. पण सत्य हा कल्पितांचा राजा आहे हेंच खरें.

हे चार संसार चार महिने सुरळीत चालल्यास या जोडप्यांना राष्ट्रपतींच्या हस्तें सुवर्णपदकें द्यावींत अशी माझी नम्र सूचना आहे. कारण उघडच आहे. प्रसंगीं दहा पुरुष जन्मभर एकत्र राहतील. पण दोन बायका तीन दिवस एके ठिकाणीं सुखाने नांदणार नाहीत असा आजपर्यंतचा आपला अनुभव आहे. तो लक्षांत घेतां चार बायकांनी एकदा सुद्धा पोलिसाला न बोलावितां एका खोलींत चार महिने प्रपंच करणें ही निःसंशय एव्हरेस्टचें शिखर गाठण्यापेक्षा अधिक कठिण गोष्ट आहे. हीं सर्व दांपत्यें कुटुंबनियोजनाला अनुकूल आहेत असें आपण गृहित धरूं या. तेवढयामुळे

फार तर एक प्रश्न सुटेल—एकीचें पोर रडूं लागल्यामुळे दुसरीची झोपमोड होण्याची आपत्ति टळेल ! पण संसारांत मूल ही काय एकच भानगड असते ? एकीच्या यजमानांना लसणीची फोडणी दिलेली अंबाडीची भाजी आवडत असली आणि दुसरीच्या पतिराजांना तो सुगंध अगदीं असह्य होत असला तर हीं कुटुंबें एका खोलींत गुण्यागोविंदानें नांदायचीं कशीं ? कुणाची झोंप कुंभकर्णासारखी असते. कुणाची फुलावर बसलेल्या फुल-पाखरासारखी असते. कुणी घोरतो, कुणी झोपेंत बडबडतो. कुणी कुणी तर भर मध्यरात्रीं वळकट्या गुंडाळून त्या डोक्यावर घेऊन झोपेंत चालूं लागतात ! या सर्वांचें एका खोलींत पटायचें कसें ? या पुरुषांत एखादा कवी असला — लेखक व लोकसंख्या यांचें सध्यांचें प्रमाण लक्षांत घेतां तो असायला मुळींच हरकत नाही — तर त्याच्या हातून कवितादेवीची निर्वेध उपासना कशी होईल ? या गोंधळांत त्याला साधें यमक तरी सुचेल का ? एका कोपऱ्यांतील गृहिणी ' गुलाबी कोडें ' ही गडकऱ्यांची कविता वाचीत आहे. नंबर दोनच्या कोपऱ्यांत डाल्डा महाग झाल्याची चर्चा रंगली आहे. नंबर तीनच्या कोपऱ्यांत कांग्रेसची भक्त असलेली बायको आणि कॉम्युनिस्ट नवरा यांनीं द्वंद्वयुद्ध आरंभलें आहे आणि नंबर चारच्या कोपऱ्यांत आपल्या आईचे डोळे मुंबईच्या डॉक्टरांना दाखविणें आवश्यक असूनहि तिला नवरा बोलावीत नाहीं म्हणून बायकोचे नेपथ्य-पाठ सुरू आहेत. तुम्हीच सांगा, अशा स्थितींत बारा गुणिले पंधराच्या खोलींतच काय, पण उभ्या जगांत तरी शांति नांदूं शकेल काय ?

म्हणूनच स्वस्त घरें कशीं बांधावींत याचा विचार करणारे लोक युद्धें कशीं थांबवावींत या गोष्टीचा काथ्याकूट करणाऱ्या मुत्सद्यांपेक्षा मला अधिक प्रामाणिक, दूरदर्शी, व आदरणीय वाटतात. वर्तमानपत्रांत यासंबंधी जें कांही छापून येतें त्याचीं कात्रणें मी कापून ठेवतों. दोन तीन वर्षांपूर्वीं मी हैदराबादच्या बाजूला एका साहित्यसंमेलनाकरिता गेलों होतों. स्वस्त घरां-विषयीची एक पुस्तिका मीं तिथून मुद्दाम आणली, तिचा कसून अभ्यास केला. लौकरच या विषयावर व्याख्यानें देण्याइतकी तयारी होईल माझी !

सारें वाचून मी इंजिनियर कधीं बनलों अशी शंका एखाद्याच्या मनांत येईल. मी इंजिनिअर तर नाहींच, पण साधा कंत्राटदारसुद्धा नाहीं. इतकेंच नव्हे तर घरबांधणीशी ज्यांचा नित्य संबंध येतो अशा गवंडी-सुतारांशीहि माझें कांही नातें नाहीं. चार मजली इमारतीच्या माथ्या-वर काम करीत असलेला गवंडी पाहिला कीं खालून माझे डोळे फिरतात. पेन्सिल करण्यापलीकडे माझ्या सुतारकीची प्रगति कधीच झाली नाही. नव्या स्वस्त घरांविषयीं मला प्रेम वाटतें तें केवळ सामान्य माणसाचा प्रतिनिधि या नात्याने. लहानसें कां होईना स्वतःचें घर असणें—आपली झोंपडी असणें—हा जीवनांतल्या दैनंदिन आनंदाचा एक आवश्यक भाग आहे अशी माझी श्रद्धा आहे म्हणून ! हा आनंद शहरांतल्या शेंकडा नव्याण्णव लोकांना अगदी दुर्मिळ झाला आहे. तो त्यांना मिळाला पाहिजे. त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे तो.

या नव्या स्वस्त घरांच्या नानाविध नकाशांत मला नेहमी एक मोठा दोष दिसतो. तो दूर झाला नाही तर माणसाच्या स्वतंत्र घराच्या आनंदांत मोठी उणीव राहून जाईल असें भय मला वाटतें. असल्या कल्पित छोटया घरांच्या चित्रांत स्वैंपाकघरांतल्या हात धुवायच्या जागेलाच न्हाणी-घराची भूमिका पार पाडावी लागते. किर्लोस्कर नाटकमंडळींतला न्हावी शारदा नाटकांतल्या शंकराचार्यांची भूमिका करीत असल्याची कथा मीं लहानपणीं आजोबांकडून ऐकली आहे. त्यामुळे व्यवहारांत कुणीं कुठलीहि भूमिका केली तरी त्याविषयी मी तक्रार करीत नाहीं. या बाबतींत माझी खरी अडचण निराळीच आहे. घर कितीहि चिमुरडें असो. त्यांत स्वतंत्र न्हाणीघर असलें पाहिजे असें माझें प्रामाणिक मत आहे. त्याशिवाय त्या घराचा खराखुरा आनंद माणसाला मनमुराद कधीच लुटतां येणार नाही.

माझा हा हट्ट वैयक्तिक आवडीनिवडींतून निर्माण झाला आहे असें मात्र कृपा करून कुणी समजू नका. विद्यार्थीदशेंत पावगींचें प्रवासवर्णन मी वाचलें आहे. त्यांतल्या तुर्कस्थानांतल्या स्नानगृहांच्या माहितीनें माझ्या तोंडाला पाणी सुटलें होतें हें मी कबूल करतों. ऊन पाणी, थंड

पाणी, हवें तेवढें पाणी, उंची साबण, आंघोळ घालायला एक सुंदर तरुणी, मालिश करायला दुसरी, अंग पुसायला तिसरी ! हें सुंदर वर्णन इथेंच थांबविणें बरें. आत्मचरित्र लिहिणाऱ्या माणसासारखी माझी स्थिति झाली आहे. मला जें आठवत आहे त्यांत सत्याचा भाग किती आणि स्वप्नरंजन किती याची कांहीच कल्पना मला करतां येत नाही !

हमामखान्यांतल्या त्या पद्धतीच्या स्नानाचा मी मुळीच पुरस्कर्ता नाही. मी काकस्नान करीत नाहीं हें खरें आहे. पण एखाद्या दिवशीं आंघोळ चुकली म्हणून मला कांही चुकल्या चुकल्यासारखें वाटत नाही. बादली-भर पाणी असलें तरी तेवढ्यांत माझें अभ्यंगस्नान पार पडतें. पीअर्स साबणाची जाहिरात तेवढी मीं वाचली आहे. मला आंघोळीला कुठलाहि साबण चालतो. फक्त तो साबण कपड्याचा किंवा कुत्र्याचा नसावा एवढीच इच्छा असते. देवपणाच्या खालोखाल स्वच्छपणा हा मोठा गुण आहे, या उक्तीवरहि माझा फारसा विश्वास नाही. धुवट कपडे वापरणारीं, अगदीं परिटघडीच्या कपड्यांत वावरणारीं, अनेक माणसें मीं जवळून पाहिलीं आहेत. त्यांचे हात कशाने ना कशाने काळे झालेले असतात हें मला ठाऊक आहे.

एकदोन बादल्या गरम पाणी, साबणाचा लहानसा तुकडा ( चित्र-पटांत मोलकरणीचें काम करणाऱ्या नटीने त्या साबणाची शिफारस केली असली तर दुधांत साखर पडली म्हणायची ) आणि थोडा फार कोरडा असा पंचा किंवा टॉवेल एवढें भांडवल माझ्या स्नानसमारंभाला पुरतें. मग न्हाणीघरांतून पंधरावीस मिनिटांनी बाहेर प्रवेश करतों तो हसतच. आपल्यांत कांही तरी विलक्षण फरक पडला आहे, आपला चिडखोर स्वभाव पार नाहीसा झाला आहे, आतां कुणी आपली स्वाक्षरी मागायला आलें तर ' हसा, नाचा, खेळा ' हाच संदेश त्याला आपण देऊं असें त्या क्षणीं मला वाटत असतें.

दररोज पंधरा मिनिटांत होणाऱ्या या क्रांतीचें कारण पुष्कळ दिवस मलासुद्धा कळलें नव्हतें. मग इतरांना त्याची कल्पना कशी येणार ?

न्हाणीघरांत शिरतांना माझ्या अंगांत विश्वामित्र संचारला असला तरी तिथून बाहेर पडतांना मी वसिष्ठ होत असें. माझी पत्नी हा पालट पाहून चकित होई. स्वभावावर एखादे रामबाण औषध निघालें आहे, न्हाणीघराचें दार बंद करून गुप्तपणें तें मी घेत असतों, अशी कांही तरी शंका तिला येत असावी. गंगास्नानाने सर्व पापें धुवून जातात या जुन्या समजुतीवर तिचा विश्वास नव्हता. पण आपल्या टीचभर न्हाणीघरांतल्या ऊन पाण्यांत मात्र कांहींतरी अद्‌भुत गुण आहे असें तिला राहून राहून वाटे. आपला नवरा वेळीं अवेळीं पुस्तकांत डोकें खुपसून बसतो आणि गोष्टी नाहींतर कादंबऱ्या खरडतो. त्यापेक्षां हें मंतरलेलें पाणी होमियोपाथिक गोळ्यांच्या लहान लहान कुप्यांत भरून तें विकत तो गांवभर फिरेल तर आपल्या कुटुंबाला चार पैसे अधिक मिळतील असा पोक्त विचार तिच्या मनाला अधून मधून चाटून जात असावा. तिनें तो कधी माझ्यापाशी बोलून दाखविला नाही ही गोष्ट निराळी ! पण न्हाणीघरांतून आंघोळ करून बाहेर आल्यावर माझ्या स्वरांत आणि चेहऱ्यांत जें विलक्षण अंतर पडे त्याचें प्रतिबिंब तिच्या मुद्रेवर मला दररोज स्पष्ट दिसे.

त्यामुळे न्हाणीघरांत अशी काय जादू असतें याचें मी संशोधन करू लागलों. पंचमहाभूतांपैकी जल हे त्यांतल्या त्यांत सौम्य भूत आहे. त्याच्या स्पर्शानें आपलें मनहि हळुवार होत असावें असें प्रथम मला वाटलें. पण हीच जलदेवता क्रुद्ध झाली म्हणजे तुकारामसारख्या आगबोटींना घटकेंतच समुद्राच्या तळाशीं नेते हें माहीत असल्यामुळे माझा हा शोध मलाच पटेना. मी दुसरी उपपत्ति शोधूं लागलों. न्हाणीघराचें दार बंद केल्यामुळें माणसाला एकांत लाभतो, एकांत लाभल्यामुळे मनुष्य अंतर्मुख बनतो. मग त्याला आपले सारे स्वभावदोष दिसूं लागतात. म्हणूनच न्हाणीघरांत शिरतांना नवरा ज्वालामुखीसारखा असला तरी तिथून बाहेर पडतांना तो हिमालय होतो ! ही मीमांसा मला कांही दिवस ठीक वाटली. पण पुढे तिच्याविषयी अनेक शंकाकुशंका मनांत निर्माण होऊ लागल्या. आत्महत्या करणारे लोकहि दारें बंद करूनच एकांतात आपलें भयंकर काम

पार पाडतात ! तेव्हा एकांत हा मनुष्याच्या चांगल्या कल्पनांचें पोषण करतो असें छातीवर हात ठेवून कसें म्हणतां येईल. गर्दीत मनुष्य नकळत सामाजिक बनतो, सर्वसामान्य माणसाच्या पातळीवर राहतो. एकांतात तो देव तरी होईल किंवा पशु तरी बनेल ! अरण्यांचा आश्रय केवळ तपस्वीच करीत नाहीत. त्यांच्या जोडीने हिंस्र पशु असतातच !

मग न्हाणीघरांत माणूस इतका माणसाळतो कसा ? तिथें अशी कुठली जडीबुट्टी असते ? अनेक वर्षें मी या गोष्टीचा विचार करीत होतों. शेवटीं एके दिवशीं या प्रश्नाचें उत्तर मला सांपडलें. आंघोळीला जातां जातां अगदी क्षुल्लक कारणावरून –(मीं आणलेल्या दोडक्यांतली दोनचार कडू निघालीं त्यावर 'पुरुषांना व्यवहारांत कांही कळत नाही' असा सौभाग्यवतीनें शेरा मारला. 'पुरुष कांही दोडक्याच्या पोटांत शिरत नाहींत' असें मी तिला उत्तर दिलें. लगेच जिथे आंत शिरण्याचा प्रश्न नव्हता अशी दुसरी चूक तिने मला दाखविली. मी आणलेला साबुदाणा शिजतच नव्हता ! मी रागारागानें म्हणालों, 'पुढल्या खेपेला साबुदाणा आणतांना स्टो, काकडा, आगपेटी, स्पिरिटची बाटली वगैरे साहित्य घेऊनच बाजारांत जातों मी. त्या दुकानदारासमोर बैठक मारतो. नमुन्याकरितां थोडा साबुदाणा घेऊन शिजवून खाऊन पाहतो आणि मग. . .
. . . यावर ती काय बोलली आणि मी तिला उलट उत्तर कसें दिलें, इत्यादि इत्यादि सांगण्याची कांही जरुरी नाही. प्रत्येक घराच्या भिंतींना हे संवाद पाठ असतात.) आमचें भांडण झालें. मी तावातावानेंच न्हाणीघरांत गेलों. बाबाजी दौलतराव राण्यांच्या तुकारामाप्रमाणें 'हा नको नको संसार' अशी माझी स्थिति झाली होती. मी बंबांतलें पाणी सोडलें. बालदी पाण्यानें भरली. पण तें गरम पाणी कांहीं केल्या मला गरम वाटेना. त्या पाण्यांत हात बुडवून मी स्वस्थ बसलों. नकळत माझी बोटें त्या पाण्याशी खेळूं लागलीं. माझें बाळपण परत आलें. ती बालदी हें माझें तळें झालें. माझ्या बोटांच्या हालचालीने त्या तळ्यांत सुंदर तरंग उठूं लागले. त्या तरंगांत आमच्या सहजीवनाचीं अनेक चित्रें मला दिसूं लागलीं. किती

तरी गोड आठवणींनी माझें मन गजबजून गेलें. त्या तंद्रींतून मी भानावर आलों तो स्वतःच्या आवाजानें ! मी गात होतों ! पुष्कळ वर्षांपूर्वी वाचलेल्या एका कवितेच्या ओळी मी मोकळेपणानें गुणगुणत होतो–'चल ये वेडे । का घेतिस आढेवेढे ?'

बंद न्हाणीघरांतून माझा राग कुठें पळून गेला, केव्हां गेला, कसा गेला, हें मला कळेना. किंबहुना मी मघाशीं रागावलों होतों हेंच खरें वाटेना मला. गाण्याचा आवाज नसूनहि मी गात होतो. सारी लाजभीड सोडून.

पंचवीस वर्षांपूर्वी मी स्वतःची एखादी कविता म्हणून दाखवावी म्हणून लक्ष्मीबाई टिळकांनी जंग जंग पछाडलें होतें. अगदीं सासूसारखें छळलें त्यांनी मला त्या दिवशीं. तेव्हा मी ऐन पंचविशींत होतों. वेडेवाकडे गाणेंच काय पण नाचणेंसुद्धा मला शोभून दिसलें असतें ! पण त्या दिवशीं लक्ष्मीबाईंना मीं कांही दाद दिली नाहीं. 'देवानं मला तोंड दिलंय् पण गळा दिला नाही. तुम्ही व तात्यासाहेब कोल्हटकर असे दोनच श्रोते इथं आहांत तरीसुद्धां तुमच्यापुढं तासभर व्याख्यान द्यायला तयार आहें मी ! पण कवितेची एक ओळसुद्धा म्हणूं शकत नाही मी. क्षमा करा मला' असें मीं त्यांना सांगितलें.

अजूनहि माझी तीच भूमिका कायम आहे. मला तिचा विसर पडतो, तो फक्त एके ठिकाणीं. न्हाणीघरांत. जगासाठी अंगावर चढविलेले अनेक कपडे जसें आपण न्हाणीघरांत बाजूला काढून ठेवतो, त्याचप्रमाणें मनाच्या साऱ्या काळज्या आणि दुःखेंहि आपण तिथे दूर भिरकावून देतो.

पाणी हें जीवन आहे; धान्याच्या, फुलांच्या आणि फळांच्या निर्मितीशीं त्याचा निकटचा संबंध आहे, हें तत्त्व नकळत न्हाणीघरांत तो चिमुकला एकांत माझ्या मनांत बिंबवतो. बालदींतलें पाणी अंगावर ओतलें की केवळ शरीराचाच नव्हे तर माझ्या मनाचा सुद्धां मळ धुवून जातो. क्षुद्र किंवा क्षुल्लक कारणानें मनांत निर्माण झालेले रागलोभ या यक्षभूमींत मला हास्यास्पद वाटूं लागतात. न्हाणीघरांतून बाहेर पडतांना झालें गेलें विसरून जायचें आणि नव्या सुन्दर जीवनाला सुरुवात करायची असा मी मनाशीं

निश्चय करतों. त्या निश्चयाने माझ्या शरीराचा कण नि कण, मनाचा अणु नि अणु फुलून जातो. सुंदर संकल्पाइतकें सुख जगांत दुसऱ्या कुठल्याच गोष्टींत नसतें. बालदींतलें पाणी तांब्यातांब्यानें मी अंगावर ओतीत असतो. पण त्यांतल्या थेंबाथेंबाच्या स्पर्शाने कुठल्या तरी गोड समुद्राच्या लाटांवर मी तरंगत आहें, असा मला भास होतो. आणि मग त्या आनंदाच्या भरांत मी गाऊं लागतों.

गळा नाही म्हणून चार चौघांत गाण्याकरिता तोंड उघडायची आपल्यापैकी बहुतेकांना लाज वाटते. पण न्हाणीघरांत गोष्ट निराळी आहे. ' आप आप के तान मे चिडिया मस्त है ' अशी तिथे आपली अवस्था होते. कुठल्याहि बंद न्हाणीघराला कान लावून क्षणभर उभें राहा. तुमच्या कानावर संगीताचे सूर पडल्याखेरीज राहणार नाहीत. प्रौढ कुलीन स्त्री सुद्धा ' तेरा मेरा प्यार है ' हें गाणें गुणगुणूं शकेल अशी साऱ्या जगांत ती एकच जागा आहे.

प्रत्येक घराला बंद आणि स्वतंत्र न्हाणीघर हवें असा माझा आग्रह आहे तो या स्वैर संगीतासाठीच. यांत्रिक जीवनाच्या चक्रांत सांपडलेल्या शहरांतल्या गरीब माणसाला संगीत कुठें सुचत असेल तर तें फक्त न्हाणीघरांत. असें स्वगत संगीत हा जीवनाचा सुगंध आहे. सिलोन रेडिओवरून हरघडी ऐकूं येणाऱ्या हजार नाचऱ्या शृंगारिक गाण्यापेक्षाही प्रत्येकाने स्वतःच्या नादांत गुंग होऊन साध्या आवाजांत म्हटलेल्या कुठल्याहि ओळी मला अधिक गोड वाटतात. त्यांत केवळ कानांचें संगीत नसतें. मनाचें संगीत त्यांतून प्रगट होत असतें.

१९५३

# २२

# धागा

ती बातमी वाचून मी बेचैन झालों. आपल्याला बसनें जायचें आहे, एकदोन मिनिटें उशीर झाला तर बससाठी वीस मिनिटें तिष्ठत उभें राहावें लागेल. हें सारेंसारें मी विसरून गेलों. माझे डोळे त्या बातमीवर खिळून राहिले. पायाला काटा टोचला की क्षणभर त्या वेदनेशिवाय दुसरें कांही सुचत नाही माणसाला ! त्या क्षणीं बाकीच्या साऱ्या जगाचें अस्तित्व त्याच्या लेखीं नाहींसें होतें, तशी माझी स्थिति झाली.

त्या अभद्र दुःखद वार्तेवर विश्वास ठेवायला माझें मन तयार होईना ! वर्तमानपत्रें बातम्यांच्या हव्या त्या वावड्या उडविण्यांत पटाईत असतात हें खरें. पण तें राजकारणाच्या क्रीडांगणावर ! उगाच एखाद्या मनुष्याच्या मृत्यूची वार्ता तीं बिचारीं कशाला छापतील ?

मृत्यूविषयी मीं पुष्कळ वाचलें आहे; थोडा विचार केला आहे. जगावर राज्य गाजविणाऱ्या या उग्र, लहरी आणि जुलमी राक्षसाकडे मीं अनेकदा भयभीत दृष्टीनें पाहिलें आहे. त्याच्या डोळ्याशी डोळा देण्याचा प्रयत्नहि केला आहे. अद्यापि तें मला जमलेलें नाहीं. उरलेल्या आयुष्यांत जमेल

असें वाटत नाही. 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' वगैरे वगैरे गीतेंतले श्लोक मीं लहानपणींच पाठ केले आहेत. अर्थात् गीताजयंतीच्या दिवशीं ते म्हणून दाखवून बक्षीस मिळविण्याकरता ! ओळखीदेखीच्या एखाद्या माणसाच्या मरणाच्या वार्तेने मन अस्वस्थ होऊन गेलें की मी ते स्वतःशींच पुटपुटतों. भाजलेल्या जागीं शाई किंवा मध लावावा इतकासुद्धा त्यांचा उपयोग होत नाही. पण क्षणार्धात होत्याचें नव्हतें करून टाकणाऱ्या मृत्यूच्या धक्क्याने तोल गेलेल्या मानवी मनाला कसला तरी आधार लागतो ! जगांतलें सर्व तत्त्वज्ञान हें या एका गरजेच्या पोटीं निर्माण झालें आहे असें मला वाटतें.

आजच्या मृत्यूच्या वार्तेने नेहमीप्रमाणे मला विव्हळ केलें. तसें पाहिलें तर या बातमीच्या नायकाशीं माझी तोंडओळखसुद्धा नव्हती. तो गतवर्षी भारतांत आला होता, पण मीं कांही त्याला पाहिलें नव्हतें. त्याचें नांव मीं वारंवार वाचलें होतें; ऐकलें होतें. पण माझें नांव त्याला ठाऊक असण्याचा काडीइतकाहि संभव नव्हता. असें असूनहि त्याच्या मृत्यूच्या वार्तेने माझें मन व्यथित झालें होतें.

कॉली स्मिथचा मृत्यु ! वेस्ट इंडीजचा क्रिकेट संघ भारतांत आला असतांना स्मिथने अनेक वेळां पराक्रम गाजवला होता. हा क्रीडापटु युवक अवघ्या सव्विसाव्या वर्षी एका मोटार-अपघातांत सापडून मृत्यू पावावा, या घटनेला कांही अर्थ आहे काय ? त्याच्या जिवलगांचें दुःख, त्याच्या आप्तेष्टांचें आणि स्नेह्यासोबत्यांचें दुःख, त्याच्या संघाचें दुःख, त्याच्या देशाचें दुःख यांच्याशीं तुलना केली तर माझें दुःख कःपदार्थ होतें ! पण त्यालाहि निश्चित अस्तित्व होतें. हें दुःख माझ्या मनांत टोचत होतें; मला अस्वस्थ करून सोडीत होतें.

मी पुनःपुन्हा स्वतःला विचारीत होतों, माणूस हा निर्दय नियतीच्या विराट चक्राच्या आसावर बसलेला काय एक क्षुद्र कीटक आहे ? हा कीटक विलक्षण वेगाने फिरणाऱ्या त्या चक्राखाली केव्हा सापडावा आणि त्याचा चोळामोळा केव्हा व्हावा, त्याला कांहीच नियम नाही का ? जगांतलें

39.6.5... क्रमांक ...१.३.६.... नों. दि. १२।१९

वैषम्य, जगांतलें नैर्घृण्य, जगांतलें अकाल मृत्यूचें हें अकांडतांडव या सर्व गोष्टी आवश्यक आहेत काय ?

तसें पाहिलें तर हे प्रश्न जगाच्या दृष्टीने काय किंवा माझ्या दृष्टीने काय नवीन नव्हते. पण स्मिथच्या आकस्मिक आणि अपघाती मृत्यूने माझ्या मनांतल्या या साऱ्या प्रश्नांच्या खपल्या एका क्षणांत उडवून टाकल्या. त्या जखमा पुन्हा ओल्या दिसूं लागल्या. त्यांचें तें लालभडक आणि किंचित् ओंगळ स्वरूप मला पाहवेना !

खरेंच ! जगांत तरुण माणसें अशीं अकालीं मृत्यूमुखीं कां पडतात ? शेले, कीट्स, बालकवि, गडकरी यांना या जगांत दीर्घ काळ राहण्याची परवानगी का मिळत नाही ? लिंकन आणि गांधी यांच्यासारख्या सज्जनांची हत्या कां होते ? खलपुरुषांचा अनेकदा सहजासहजी विजय झालेला कां आढळतो ? एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून फिरणारीं माणसें एकमेकांचे गळे कापायला कां तयार होतात ? जगाच्या बाजारांत एकनिष्ठ प्रेमाच्या पारड्याच्या तुलनेने व्यभिचाराचें पारडें जड कां ठरतें ? मानवाचें जीवन हा काय नुसता काळपुरुषाने फुगविलेला एक रंगीबेरंगी फुगा आहे ? का कांही उच्च मूल्यांनी आणि उदात्त भावनांनी प्रेरित झालेला या सृष्टीचा तो एक घटक आहे ?

असले प्रश्न मनांत येऊं लागले म्हणजे मग कांही सुचेनासें होतें. स्वर्ग, नरक, परलोक, पूर्वजन्म, पुनर्जन्म, कर्मवाद वगैरे आपल्या संस्कृतींतल्या सर्व गोष्टी या प्रश्नांचीं उत्तरें देण्याकरिता शोधून काढलेलीं बनावट उत्तरें वाटूं लागतात. उदाहरण सुटेनासें झालें म्हणजे मुलें पुस्तकांत शेवटीं दिलेलें त्याचें उत्तर पाहून तें बरोबर लिहितात ! मात्र मधली रीत पाहावी तर सारा गडबडगुंडा असतो. तसाच हा प्रकार आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या किल्ल्या या प्रश्नांच्या कुलपांच्या आंत सहज जातात पण तीं कुलपें मात्र कांही केल्या उघडत नाहीत !

आपल्या या तत्त्वज्ञानामुळेच संस्कृत साहित्यांत शोकान्तिका निर्माण झाली नाही. खरी शोकान्तिका आमचे साहित्यिक अजूनहि निर्माण करूं

शकत नाहीत. ज्या जगांत परमेश्वराचें राज्य आहे त्यांत कोणत्याहि कथेचा शेवट दुःखान्त कसा होईल ? सज्जन मनुष्य संकटांत सापडला असतांना परमेश्वर काय स्वर्गात स्वस्थ अमृत पीत बसेल ? साहजिकच डोंबाचा नोकर झालेल्या हरिश्चंद्रावर तारामतीच्या शिरच्छेदाची पाळी येतांच भगवान् शंकराला कैलासाहून नंदीला पिटाळावें लागतें आणि पृथ्वीवर योग्य वेळीं दाखल होऊन हरिश्चंद्राचा हात धरावा लागतो.

या कल्पनेपायींच मुळांत आदर्श नसलेला दुष्यंत कालिदासाने शक्य तेवढा सज्जन घडविला आहे. वास्तविक शाकुन्तल हें दुःखान्तच नाटक व्हायचें ! चार दिवस एखाद्या आश्रमांतल्या पोरीबरोबर मजा मारणारा राजा पुढे तिची आठवण कशाला ठेवील ? कलावंतिणीच्या कुळांत जन्माला आलेली वसन्तसेना अंतर्बाह्य पवित्र दाखविण्याकरिता आमचा कवि धडपड करतो, याचें कारण हेंच आहे. पण जगांत आदर्श जीवन जगणारे थोडे ! त्या आदर्शापासून ढळणारेच पुष्कळ ! त्या ढळणाऱ्यांचें चित्रण जर आमचें साहित्य सतत करीत गेलें तर जीवनांतल्या कठोर वास्तवतेचा सरळ दृष्टिने विचार करण्याची शक्ति भारतीय मनाला प्राप्त झाली असती.

जीवनांत प्रीति, भीति, काम, लोभ, आशा, मत्सर, मृत्यु, आजार, प्रेमभंग इत्यादि गोष्टी आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या शोकान्तिका यांचें स्थान फार मोठें आहे. सामान्य मनुष्याला असामान्यतेचा एखादा सुवर्ण क्षण लाभतो तो अशा तीव्र दुःखाच्या क्षणींच. घरांतल्या प्रिय व्यक्तीवर मृत्यूची छाया पसरल्याची खात्री झाली म्हणजे माणसाचें मन गलबलून जातें. या विश्वाच्या अफाट पसाऱ्यांत आपली किंमत किती अल्प आहे– जवळजवळ शून्य आहे– याची त्याला पुरेपूर कल्पना येते ! तो नकळत तत्त्वज्ञ बनतो.

अशा प्रसंगी तो केवळ तत्त्वज्ञच होत नाही. तो कवीहि होऊं लागतो. ती प्रिय व्यक्ति आता आपल्याला दीर्घकाळ लाभणार नाही म्हणून तिच्या अगदी लहानसहान सुखांकडेसुद्धा तो अष्टौप्रहर लक्ष देऊं लागतो. तिचे सगळे अवगुण विसरून जाऊन तिच्या गुणांवर तो उत्कट प्रेम करायला

सुरवात करतो. त्या व्यक्तीचें नुसतें अस्तित्वसुद्धा किती सुखदायक आहे याची दिव्य प्रचीति अशा वेळीं माणसाला येते. मग मनुष्य नकळत अहंकाराच्या, वासनातृप्तीच्या आणि आपल्या क्षुद्र, संकुचित वृत्तीच्या बाहेर पडतो. कांही क्षण का होईना, तो दुसऱ्याकरता जगतो. विशाल जीवनाचा अनुभव घेतो.

असाच एक अंतर्मुखतेचा क्षण कॉली स्मिथच्या मृत्यूने मला मिळाला त्याबद्दल मी त्याचा अत्यंत ऋणी आहे. हा क्षण क्रिकेटच्या कसोटी सामन्यांतल्या त्याच्या शतकाइतकाच मला महत्त्वाचा वाटतो. कारण वेस्ट इंडीजमधला एक प्रख्यात क्रिकेटपटु आणि भारतांतला एक सामान्य मनुष्य यांच्यामधला तो अदृश्य पूल आहे. खेळांतला चेंडू सहज सीमापार करणाऱ्या कॉली स्मिथला नियतीने अगदी अकालीं आणि अचानक या जगाच्या सीमांच्या पलीकडे नेलें असलें, तरी जीवनाच्या क्षणभंगुरतेच्या करुण, अदृश्य धाग्याने त्याला आणि मला कायमचें जोडलें आहे !

१९५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम ३१८२८ वि:
क्रमांक १२८५५ नों. दि. २५१२
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११५३९

REFBK-0011536

किंमत पांच रुपये

## आमचीं प्रकाशनें

**वि. स. खांडेकर**

१ सायंकाळ
२ चांदण्यांत
३ अविनाश
४ मंदाकिनी
५ कल्पलता
६ तिसरा प्रहर
७ मंझधार

**अनंत काणेकर**

८ पिकलीं पानें
९ शिंपले आणि मोती
१० तुटलेले तारे
११ उघड्या खिडक्या
१२ विजेची वेल
१३ पांढरी शिडें